TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192839
UNIVERSAL LIBRARY

# हिमवंती

प्र. गो. जोशी
प्रकाशन
१९।१।३८

लेखक
चिंतामण दत्तात्रेय आंबेकर
'आम्रमंजरी', भोर.

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
६२१ १५ सदाशिव पेठ,
पुणें २.

मुद्रक
लक्ष्मण सखाराम केळकर
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस.
३९४ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

प्रस्तावनाः—प्रल्हाद केशव अत्रे
बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन ).

पुरस्कारः—विष्णु सखाराम खांडेकर
'शिरोडें'.

कापडी १॥। रुपये ] —किंमत— [ कागदी १॥ रुपया

# प्रस्तावना

—o—

भोरचे तरुण साहित्यिक श्री. चिं. द. आंबेकर यांनीं वेळों वेळ निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध केलेल्या स्वतंत्र नि अनुवादित लघुकथांची ही 'हिमवंती' भोरचे राजेसाहेब श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती दिनाच्या पवित्र प्रसंगीं प्रसिद्ध होत आहे ही गोष्ट अत्यंत उचित आहे. सकाळीं हिरव्यागार गवताच्या गालिचावर सांपडणाऱ्या 'हिमवंती'चा मोहकपणा मनाला मोहिनीच घालतो. श्री. आंबेकर यांच्या प्रतिभेनें लघुकथांच्या प्रांगणांत शिंपडेलली ही 'हिमवंती' रसिकांच्या हृदयाला हर्षभरित केल्याशिवाय रहाणार नाहीं. भाषेचा डौल, भावनेचा जिव्हाळा नि कल्पनेचें कौशल्य यांचा रुचिर संगम या 'हिमवंती'त प्रत्ययास येतो. मानवी स्वभावाच्या सूक्ष्म छटा समजण्याचें सामर्थ्य श्री. आंबेकरांच्या प्रतिभेत आहे. कित्येक प्रसंगीं वाचकांच्या भावनेच्या कोमल तारा छेडण्याची करामतही त्यांनीं दाखविली आहे. 'हिमवंती'चें सौन्दर्य प्रतिबिंबित असलें तरी लघुकथांच्या सृष्टींत स्वतंत्रपणें विलास करण्याचें बळें श्री. आंबेकरांच्या लेखणींत आहे असा प्रत्यय मिळतो. अनुभवाच्या व अध्ययनाच्या प्रखर प्रकाशानें 'हिमवंती' मधील पुष्कळसा द्रवांश कालांतरानें घनीभूत होण्याचा संभव असला तरी तिच्यांतील उर्वरित तेज जिवंतपणें चमकल्याखेरीज रहाणार नाहीं. श्री. आंबेकरांच्या प्रतिभेला असाच नवनवीन बहर येवो नि त्यामुळें महाराष्ट्र शारदेच्या विलासोद्यानाचें सौन्दर्य संवर्धित होवो अशी आशा बाळगणारा—

१७ सप्टेंबर १९३८
सारस्वत कॉलनी, पुणें

प्रल्हाद केशव अत्रे.

# पुरस्कार

पुण्यामुंबईसारख्या शहरीं जे नांवाजलेले खेळाडू असतात त्यांच्यामुळेंच क्रिकेटच्या खेळाची प्रगति होत असते असें मुळींच नाहीं. गांवोगांव हौसेनें खेळणारेही या प्रगतीला हातभार लावीत असतात. उद्यांचा एखादा पहिल्या दर्जाचा खेळाडू असल्या लहान हौशी संघांतूनही पुढें येऊं शकेल. वाङ्मयाची स्थितिही अशीच असते. ‘ प्रथितयश ’ ‘ सुप्रसिद्ध, ’ ‘ प्रतिभासंपन्न ’ इत्यादि विशेषणांनीं गौरविल्या जाणाऱ्या साहित्यिकांप्रमाणें प्रस्तुतकथा-संग्रहाचे कर्ते-श्री. चिं. द. आंबेकर यांच्यासारखे हौशी लेखकही सरस्वतीमंदिर सुशोभित करूं शकतात.

श्री. आंबेकरांनीं आपल्या संग्रहांत स्वदेशीचा भलताच आग्रह धरलेला नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. टॉलस्टॉय, ओ-हेन्री, मोपाँसा, किप्लिंग, कॉरेली वगैरेंच्या कथांना सुंदर मराठी साज चढविण्यांत त्यांचें चांगलेंच कौशल्य दिसून येतें. त्यांच्या स्वतंत्र कथांतहि विकासक्षम लेखनगुण आढळतात हें ‘ अबलेची नजर ’ ह्या गोष्टीवरून दिसून येईल. ‘ हिमवंती ’ च्या भाषेवर क्वचित् कृत्रिमतेची छाया असली तरी तिच्यांतील ओघ वाचकाला आकृष्ट केल्यावांचून राहत नाहीं ‘ अहो मला वाचतां येतंय् ’ या चाली-वरील ‘ काहो, किती वाजले ? ’ या गोष्टींत दिसून येणारी भावना-विवशता, गडकरी वळणाची भाषा, अगर अन्य कांहीं गोष्टी यांची चर्चा करण्याचें हें स्थळ नाहीं. तसें करणें म्हणजे पाठराखणीनें सासूपणा गाजविण्यांतलाच प्रकार होईल.

‘ हिमवंती ’ वाचून ‘ फुलवंती ’ निर्माण करण्याचें सामर्थ्य श्री. आंबेकरांत आहे हें वाचकांना पटेलच. श्री. आंबेकरांनीं परिश्रमपूर्वक वाढविलेल्या लेखनकलेची उत्तरोत्तर प्रगती होवो असें मीहि मनःपूर्वक इच्छितों.

हंस पिक्चर्स,<br>कोल्हापूर<br>११-९-४७

वि. स. खांडेकर

# प्रकाशकांची भूमिका

गुणविशेषांखेरीज कोणत्याही वस्तूकडे अथवा व्यक्तीकडे आपलें चित्त वेधलें जात नाहीं हा अनुभवसिद्ध नियम आहे. ' का हो, किती वाजले ? 'या गोष्टीनें बऱ्याच कालापूर्वी माझें लक्ष विलक्षण रीतीनें आकर्षिलें आणि ती गोष्ट माझ्या ' आवडत्या गोष्टींत ' समाविष्ट करण्याचा विचार तीव्रतेनें माझ्या मनांत कित्येक दिवस घोळत होता. पण त्या गोष्टीच्या लेखकाचा, लेखन-क्षेत्रांतल्याच माणसाला पत्ता लागूं नये हें विचित्र वाटलें तरी कटु—सत्य होतें. कदाचित् सातत्यानें नजरेसमोर नाचणाऱ्या प्रथितयश साहित्यिकांच्या नामावळींत त्या लेखकाचें नांव झळकणारें नसल्यामुळें ही अडचण उत्पन्न झाली असेल. पण वर उल्लेख केलेल्या गोष्टीनें माझ्या मनाला इतका विलक्षण चटका लाविला होता कीं, त्या गोष्टीचे लेखक प्रत्यक्षांत माझ्यापुढें श्री. आंबेकरांच्या स्वरूपांत उभे राहिले तेव्हां मला, बरेच दिवस अदृश्य झालेली आपली एकादी आवडती वस्तु एकाएकीं सांपडली म्हणजे जसा आनंद होतो तसाच आनंद झाला आणि ' हिमवंती ' च्या प्रकाशकाचें काम मी मोठ्या आस्थेनें पत्करलें.

श्री. आंबेकरांच्या अंगीं थोडयाशा प्रोत्साहनानें आणि अभ्यासानें चांगलेच विकसित होण्याजोगे लेखन-कलात्मक गुण आहेत ही गोष्ट ' हिमवंती ' च्या वाचकांना तात्काळ पटेल आणि अशा गुणांना परिणत व्हावयाला योग तो अवसर देणें अवश्य आहे असें निश्चितपणें त्यांना वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

मी लेखक असलों तरी माझी आजची भूमिका प्रकाशकाची आहे व शिवाय श्री. प्र. के. अत्रे व श्री. वि. स. खांडेकर यांच्या सारख्या प्रथितयश साहित्यिकांनीं ' हिमवंती ' बद्दलचें आपलें मत दिलेंच असल्या कारणानें मला यापेक्षां अधिक कांहीं लिहिलें पाहिजे असें नाहीं.

रसिक वाचक ' हिमवंती ' चा योग्य सत्कार करून श्री. आंबेकरांच्या गुणांचें चीज करतीलच.

य. गो. जोशी.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | लघुकथेचें नांव | प्रकार | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | मृगजळ | रूपांतरित | १ |
| २ | उत्पादक | रूपांतरित | २३ |
| ३ | काहो ! किती वाजले ? | स्वतंत्र | ४३ |
| ४ | पुनर्जन्म | रूपांतरित | ५१ |
| ५ | दोनच अश्रू | रूपांतरित | ६७ |
| ६ | अबलेची नजर | स्वतंत्र | ७७ |
| ७ | अखेर साधली | रूपांतरित | ८७ |
| ८ | निवळलेली कावीळ | रूपांतरित | ९९ |
| ९ | जगाच्या जीवन-कलहांत | स्वतंत्र | १२९ |
| १० | अपकाराची फेड | रूपांतरित | १३७ |
| ११ | जन्मान्ध | रूपांतरित | १५३ |
| १२ | प्रसंगावधान | ऐतिहासिक | १६९ |
| १३ | जीवन-कला | रूपांतरित | १७५ |



— चिंतामण दत्तात्रय आंत्रेकर

# मृगजळ 

मृत्युशय्येवर पडलेल्या महाराज ध्येयसेनांच्या शयनमंदिरांत, असावी तितकीशी शांतता नव्हती. कामानिमित्त इतस्तत: लगबगीनें धांवपळ करणारे राजदूत, कमालीच्या हलक्या पावलांनीं आंतून बाहेर, बाहेरून आंत, अशी सारखी ये जा करीत होते. शोकानें ग्रस्त झालेली राजघराण्यांतील लहानथोर मंडळी, सचिंत मुद्रेनें मंचकाभोंवतीं मुकाट उभी होती. राजकारभारांत मदत करणाऱ्या प्रधानमंडळांतील प्रमुख पुढारी व राजदरबारांतील बडेबडे सरदार ह्यांची बाहेरच्याच दिवाणखान्यांत, अगदीं आंतल्या आंत कुजबुज चालली होती. महाराजांच्या आत्यंतिक विश्वासांतील त्यांचे कांहीं जिवलग स्नेही दारांतूनच काळपाशांत जास्त जास्त गुरफटत जाणाऱ्या आपल्या राजमित्राकडे, पुन्हां पुन्हां केविलवाण्या नजरेनें डोकावून पाहात होते.

आपल्या राजाला यत्किंचितहि त्रास पोहोंचूं नये म्हणून जमलेल्या लोकांपैकीं प्रत्येकजण, आपल्याकडून सभोंवार एकांतिक निस्तब्धता राखण्याचा अत्यंत कसोशीचा प्रयत्न करीत होता; परंतु

एकत्रित आलेल्या इतक्या विविध व्यक्तींच्या सान्निध्यांत मुळींच आवाज होऊं न देण्याच्या त्यांच्या खटाटोपांत, साहजिकच सूक्ष्म अशा प्रकारची संमिश्र कोलाहल निर्माण होत होती आणि तिच्या अगदीं मंद लहरीसुद्धां हळुंहळूं क्षीण होत जाणाऱ्या ध्येय-सेनांच्या त्या हलुवार जीवनज्योतीस सहन करणें, अगदीं अशक्य कोटींतलें होतें.

पण......पण आतां त्याचें काय होतें ? राजवैद्यांनीं नुकतेंच सांगितलें होतें कीं, आतां त्यांना कांहींच ऐकूं येणार नाहीं. आणि खरेंच, त्यांना ऐकूं येत असल्याचें कोणतेंच चिन्ह त्यांनीं दर्शविलें नाहीं. नाहींतर, पलंगाशींच गुढघे टेकून बसलेल्या त्यांच्या सौंदर्य-संपन्न, तरुण पत्नीच्या हुंदक्यांनीं, त्यांच्या अंन्त:करणांत खास चल्बिचल् उडाली असती.

आज कित्येक दिवस, शय्यागारांत येणाऱ्या प्रकाशानें महाराजांचे डोळे दिपून जाऊं नयेत म्हणून, खिडक्यांवर अस्मानी रंगाचे झिरझिरीत पडदे सोडण्याची अत्यंत दक्षता बाळगली जात असे; पण आज, दु:खानें हवालदील झाल्यामुळें सगळ्या प्रासाद-भर पसरलेल्या तारांबळ—गोंधळाच्या दंगलींत, ते जाळ्यांवर ओढण्याचेंहि कोणास भान राहिलें नाहीं. शिवाय...आतां त्याचें काय होतें ? भिषग्वरांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें होतें कीं, आतां त्यांना कांहींच दिसणार नाहीं.

इतके दिवस महाराजांच्या खास तैनातींतील हुजऱ्यांशिवाय, कोणासच निद्रालयांत महाराजांच्याजवळ जाण्याची मुभा नव्हती. आज मात्र, इच्छेला येईल तो आंत जाऊन येत होता. आणि खरेंच...त्याचें आतां काय होतें ? कोणाहि माणसाला ते आतां ओळखूं शकणार नाहींत अशी आयुर्वेदाचार्यांनीं नुकतीच जाहीर घोषणा केली होती.

महाराजांच्या अंगावर पांघरूण घातलेल्या शालींतून बाहेर निघालेला त्यांचा एक हात, बराच वेळपर्यंत जणुं कांहीं तरी शोधण्यासाठींच अंथरुणावरील शुभ्र चादरीवर पडला होता. राणी

शीलवतीनें अंमळशानें तो हलकेंच आपल्या हातांत घेतला; पण त्यांत तिला प्रतिक्रियेची सजीवता भासली नाहीं. हलकें हलकें त्यांचे तोंड व डोळे मिटूं लागले आणि सरतेशेवटीं त्यांच्या हृदयाची क्रियाहि बंद पडली.

" काळाच्या कृष्ण छायेंत सुद्धां त्यांचं रूप किती मोहक दिसतंय ? प्रत्यक्ष सौंदर्याला देखील अजून त्याचा मोह सोडवत नाहीं आणि म्हणूनच त्यांवर तें रेंगाळतं आहे...! " अशा प्रकारच्या हळहळीचे दुःखद विचार जमलेल्या लोकांपैकीं प्रत्येकाच्या अन्तः–करणांत, त्या वेळीं प्रामुख्यानें उद्भवत होते.

* * *

राजा ध्येयसेनांना ज्या वेळीं शुद्ध आली, त्या वेळीं चोंहोकडे अगदीं सामसूम होतें. अर्धवट अंधःकाराची अस्पष्ट छटा सभोंवार पसरली होती; आणि त्यामुळें साहजिकच, त्या ठिकाणीं अधिक भासणारी प्रशांत गंभीरता इतकी विस्मयजनक व आल्हाददायक होती कीं, तिनें महाराजांस भोगाव्या लागणाऱ्या अनंत यातनांचा एका क्षणांत परिहार केला; इतकेंच नव्हे तर, त्यायोगें त्यांना इतका विलक्षण, इतका अनिर्वाच्य असा आराम वाटूं लागला कीं, आपण जणुं काय स्वर्गातच पहुडलों आहोंत, अशा प्रकारच्या सुख–संवेदनेनें त्यांचें शरीर प्रस्फुरित होऊन गेलें.

महालाच्या खिडक्या मोकळ्याच होत्या. त्यांतून मधुनच येणारी वाऱ्याची गोडशी झुळुक अत्यंत उत्साहवर्धक होती. पुष्पदाणींत ठेवलेल्या ताज्या टवटवीत कुसुम–गुच्छांच्या मधुर सुवासानें, सारें वातावरण कसें अगदीं दरवळून गेलें होतें. काळसर रंगाच्या लांबलचक मखमाली ओढणीनें डोक्याव्यतिरिक्त अवगुंठित केलेलें त्यांचें शरीर, ज्या पलंगावर ठेविलें होतें त्या पलंगाच्या खुरांशीं संथपणें तेवणाऱ्या शामदानांतील मेणबत्त्या, लोककल्याणार्थ प्रत्यक्ष आपला देह झिजविणाऱ्या महात्म्यांची आठवण करून देत होत्या. मृत्यूची धाकटी बहीण–जी निद्रा, तिच्या कोमल करपाशांत गुरफटून गेलेल्या शरीररक्षकांना, पहारा करण्याच्या आपल्या कामाची बिलकूल शुद्ध उरली नव्हती.

आजूबाजूंच्या ह्या आनंददायी व सौम्य वातावरणामुळें महाराजांचें जड बनलेलें अंतःकरण, इतकें प्रफुल्लित होऊन गेलें कीं, त्या समाधान-सौख्याच्या उन्मादांत, चलनवलन करण्याची उत्कट इच्छा त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली. राजवाड्याच्या महाद्वारांवरील नगारखान्यांत सहाव्या प्रहराचा चौघडा होईपर्यंत, म्हणण्यासारखी अशी कसलीच हालचाल त्यानीं केली नाहीं; पण त्यानंतर मात्र स्वतःशींच अस्फुट असें एक मंद स्मित करून ते अंथरूणावर उठून बसले.

आपल्या मनावरील आपला ताबा सुटत चालला असतांना, आपण आपली उरलेली सर्व शक्ति एकवटून, आपल्या प्रजेला आपल्या मदतीची अत्यंत अपेक्षा असतांनाच, तिच्यांतून आपल्याला बलात्कारानें ओढून नेणाऱ्या त्या अन्यायी शक्तिजवळ शेवटची कळकळीची विनवणी कशी केली......त्या कळकळीच्या विनवणीचा कांहींसा परिणाम होऊन, त्या दैवी मूर्तीला आपली दया कशी आली आणि त्यामुळें तिनें—"मृत्यूनंतर मी तुला चार घटकांचं आयुष्य देतों......या चार घटकांत तूं जगावंस अशी इच्छा करणारे तीन जीव जर तुला आढळले तर तुझा जीवनक्रम पुन्हां पूर्वींप्रमाणं चालू होईल......नाहीं तर......!" अशा प्रकारचें अभयवचन कसें दिलें वगैरे नुकत्याच घडलेल्या गोष्टी पुन्हां एकामागून एक त्यांस मनोमय आठवूं लागल्या.

चार घटका...!...!! या चार घटका त्यांच्या होत्या. मृत्यूची मनधरणी करून, त्याच्यापासून केवढ्या मेहनतीनें त्यानीं त्या मिळविल्या होत्या.

विश्वांतील कसल्याहि मौल्यवान् गोष्टींनीं ज्याचें कदापीहि मोल करतां येणार नाहीं, अशा त्या अमोलिक क्षणांपैकीं कितीतरी क्षण त्यांनीं अगोदरच वांया घालविले होते.

'प्रेमळ अन् उदार राजा' अशा प्रकारचा थोर लौकिक त्यांनीं संपादन केला होता. सुजन व न्यायी म्हणून चोंहोकडे त्यांची ख्याति होती. आपल्या प्रजेच्या सर्वांगीण अभ्युदयाकरितां अहोरात्र त्यांचें

शरीर अविश्रांत धडपड करीत होतें.

भीति अगर संदेह उत्पन्न करणारी अशी कोणतीच गोष्ट त्यांना डांचत नव्हती.

जगण्यांत......आयुष्यांतील मधुर सुखाचा आस्वाद घेण्यांत किती......किती मौज आहे, असें त्यांना आतां वाटत होतें.

जीवनांतल्या ह्या अत्युच्च आनंदाची त्यांना पूर्वी इतकीशी पुरेपूर कल्पना नव्हती हें खरें; पण ह्यावरून ते स्वार्थी होते, अशा प्रकारचें अनुमान काढणें मात्र परिस्थितीला व त्या बरोबरच सत्याला खास सोडून होतें. कारण यमधर्माच्या न्यायमंदिरांत आयुष्याचा हुकूमनामा ज्यावेळीं त्यांच्याविरुद्ध बजाविविण्याचें फर्मान सुटलें, त्यावेळीं जगण्याच्या मोहापेक्षां आपण सुरू केलेलें कार्य अर्धवट राहिलें, ही कल्पनाच त्यांना अत्यंत तापदायक वाटत होती.

कांहींहि असो! झोपेनें घेरल्यामुळें पेंगत...डुलक्या खात, इतस्तत: अस्ताव्यस्त पडलेल्या पहारेवाल्या ढालाईतांना ओलांडून ज्यावेळीं ते बाहेर पडले, त्यावेळीं आजूबाजूच्या बाह्य जगांत एकाएकीं कांही तरी विलक्षण व चमत्कारिक स्थित्यंतर घडून आलें असल्याचें त्यांच्या खास निदर्शनास आलें.

अन्यायाच्या जाणिवेचा जळजळीतपणा आतां पुष्कळच कमी झाला होता.

सिंहासनारूढ झाल्यापासून आपल्या प्रजेचें अनुरंजन करण्यासाठीं, जीवाचा आटापिटा करून आपण शक्य तों आटोकाट प्रयत्न केला. पण आज साकल्यानें विचार केला तर आपली ही कामगिरी किती तरी अत्यल्प आहे, असें त्यांस वाटूं लागलें. हें जग केवढें अफाट आहे......त्यांत आपणांपेक्षां किती तरी चांगलीं माणसें आहेत...त्यांचें परोपकाराचें कार्य किती विस्तृत अन् उदात्त आहे वगैरे विचारतरंग त्यांच्या हृदयांत हेलावून, त्यांचा दृष्टिकोन पार पालटून गेला आणि त्यांच्या मनाची स्थिति अत्यंत विव्हळ व करुणास्पद होऊन गेली. जगानें......त्यांतील

प्रत्येक अणुरेणूनें जणुं काय जगड्व्याळ असें विश्वरूप धारण केलें आहे, असा त्यांना आतां क्षणोक्षणीं भास होऊं लागला.

' मायदेश व मायभूमि ' ह्यांवर त्यांचें पूर्वीप्रमाणेंच प्रेम होतें. नुकत्याच गेलेल्या रात्रीच्या भयानक कालखंडांत आपणांबरोबर तींहि नाश पावलीं असलीं पाहिजेत, असें त्यांना वाटत होतें; पण आतां प्रत्यक्ष पाहतां, अजूनहि पूर्वी जशीं तीं होतीं तशींच तीं आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांत कोणत्याहि प्रकारचा फेरबदल झाला नाहीं, असें त्यांना स्पष्ट आढळून आलें.

दरवाजाबाहेर येतांक्षणींच, ' प्रथम कुठं जावं ? ' अशा विचारांत त्या ठिकाणींच कांहीं काळ ते घुटमळले. ' अगोदर आपल्या आवडत्या प्रियेकडंच गेलं तर...? अशा प्रकारची ओझरती एक कल्पना त्यांच्या एका मनांत डोकावली; पण तात्काळ ' नकोच ! ' असें दुसऱ्या मनानें प्रत्युत्तर करून, त्या कल्पनेला हातोहात निरोप दिला.

शीलवतीच्या शोकाच्या केवळ कल्पनेनेंच ध्येयसेनांच्या जीवाचें अगदीं पाणी पाणी होऊन गेलें. आपल्या बाहूपाशांत तिला कवटाळून तिची समजूत करण्याचा, तिच्या अधरामृताचें सेवन करून, ' तुझ्या सहवासांतील स्वर्गीयसुखाचा उपभोग घेण्यासाठीं मी कायमचा आलों आहें ... ... आतां अश्रूच गाळायचे झाले तर ते आनंदाश्रूच गाळ !' असें हक्कानें सांगण्याचा अधिकार प्राप्त होईपर्यंत, तिच्याकडे जाण्यांत काय अर्थ आहे, असें त्यांचें मन आपल्या मनाशींच विवेक करूं लागलें...... 'आणि...आतां घटकेनं थोडाच प्रहर होतो आहे...?...??--' त्यांनीं आपल्या स्वतःचीच समजूत करून घेतली. 'ह्या सातव्या प्रहरांतील चवथ्या घटकेचे ठोके पडण्याच्या आंत आपण पुन्हां खऱ्या-अगदीं खऱ्या जीवनांत प्रवेश करूं आणि मग, आत्तांच्या ह्या साऱ्या—साऱ्या गोष्टी आपणांस केवळ स्वप्नवत् भासतील !'

निधनाच्या या शेवटच्या विचारानें महाराजांचें हृदय कंपित झालें आणि भीतीची एक शिरीरी त्यांच्या शरीरांत चमकून गेली.

आपल्या शेवटच्या क्षणांतील भयंकर दिव्याचें मूर्तिमंत चित्र त्याच्या मनःचक्षूंसमोर उभें राहिलें आणि त्यामुळें, दुःखाचा एक दीर्घ निःश्वास टाकून ते आपणाशींच पुटपुटले—

" कालचक्राच्या ह्याच फेऱ्यांतून, पुन्हां असंच केव्हांतरी आपणांला जावं लागणार अं ?...?? मरणवेळा... ...जन्माला आलेल्या प्रत्येक प्राणीमात्राला कधींकाळीं निश्चितपणें ती सुटली आहे कां ? "

दैवाच्या इच्छेप्रमाणें, चार घटकांनीं सरळ समंजसपणें मृत्यू-पुढें मान वांकवावी हेंच चांगलें, अशा विचारानें नुकत्याच एका क्षणापूर्वी सोडलेल्या पलंगाकडे पुन्हां त्यांनीं आपली दृष्टि वळविली व आपले पाय वळविण्याच्याहि ते बेतांत होते; परंतु इतक्यांत, त्यांच्या आत्मविश्वासानें उचल खाल्ली आणि त्यांनीं स्वतःलाच प्रश्न केला.

" अपयशानं भेडसावल्यामुळं भीतीच्या आहारीं जाऊन एखादी गोष्ट आपण केली नाहीं असं आजपर्यंत कधीं घडलं आहे कां ? "

काळाशीं केलेल्या कराराचीं कलमें आठवतांच, त्यांचें त्यांनाच हंसूं आलें. चंद्राच्या शीतल प्रकाशांत तळपणारी मायावती सौधा-तलावरून अत्यंत हृदयंगम व मनोहर भासत होती. तिच्याकडे नजर जातांच महाराजांच्या मनांत विचार आला.

"...ह्या चार घटकांत तूं जगावंस अशी इच्छा करणारे तीन जीव जर तुला आढळले......? हंः ! ...तीन जीव...एवढ्या वेळांत तीनच काय पण तीन हजार जीव मला सहज खास आढळून येतील ! ह्या नगरींतील सारे लोक माझे हितचिंतक आणि मित्रच नाहींत काय ? "

राजवाड्याची तटबंदी ओलांडून बाहेर पडतांक्षणींच, एका घराच्या बाहेरील पायऱ्यांवर पाय पसरून आठ नऊ वर्षांची एक मुग्ध बालिका, स्फुंदून स्फुंदून आक्रंदन करीत असल्याचें त्यांना दिसून आलें.

" बाळ ! काय झालं ? अशी कां रडतेस ? " त्या भागांत गस्त घालणाऱ्या रखवाल्या शिपायांपैकीं एकानें क्षणभर त्या ठिकाणीं थांबून, तिची थोडीशी विचारपूस केली.

" थोरले सरकार देवाघरीं गेल्यामुळं आईन् बाबा राजवाड्यांत गेलीं आहेत. " हुंदके देत देत ती सांगूं लागली–" अन् कित्ती कित्ती वेळ झाला तरी अजून परत आलीं नाहींत ! रात्रीं न जेवतांच मी झोंपी गेल्यामुळं, मला आतां फार भूक लागली आहे ! शिवाय निजतांना मी उशाशीं ठेवलेली माझी छबुकडी बाहुलीहि पण सांपडत नाहीं !...खरंच महाराज, पुन्हां अगदीं...अगदीं जिवंत व्हावेत असंच मला वाटतं ! "

निर्व्याज अन्तःकरणाच्या त्या अजाण बालिकेचें हें बोलणें संपतें न संपतें तोंच तिचा कंठ जास्तच गहिंवरून आला आणि पुन्हां ती अधिकच ओक्साबोक्शी रडूं लागली.

ह्या चिमुकल्या प्रसंगानें राजा ध्येयसेनांच्या मनाची मात्र चांगलीच करमणूक केली.

" माझ्या प्रजाजनांपैकीं, " ते म्हणाले–" मी परत यावं अशी इच्छा करणारांतील ही अल्लड कन्यका पहिली तर ... !... ! ! "

ध्येयसेनांना स्वतःचें असें कांहींच मूलबाळ नव्हतें. त्यामुळें प्रेमभरानें त्या मुलीच्या पाठीवरून हात फिरवून ... तिला कुरवाळून तिचें सांत्वन करण्यांत, त्यांना कितीतरी आनंद वाटला असता; पण सध्यां केवढ्या महत्त्वाच्या कामाची निकड त्यांना दुसरीकडे खेंचत होती. आपल्या अत्यंत जिवलग व परम निरपेक्ष मित्राच्या ... लाडक्या विश्वासाच्या घराच्या दिशेनें ते चालले होते. आपल्या हानीमुळें दारूण दुःखाच्या कसल्या हीन परिस्थितींत तो आपणांस आतां आढळून येईल, ह्याचें कल्पनाचित्र त्यांच्या डोळ्यांसमोर तरळूं लागतांच, एक प्रकारच्या तामसी आनंदानें त्यांचें हृदय झणकारून गेलें.

" गरीब बिचारा विश्वास ! " ते म्हणाले—" त्याच्या जागीं मी असतों तर मला काय वाटलं असतं ह्याची मला पूर्ण जाणीव

आहे! खरंच दैवानं त्याला नेलं नाहीं ही त्या दयाघनाची केवढी महत्कृपा? त्याचा वियोग मला खात्रीनं सहन झाला नसता!"

आपल्या मित्राच्या निवासस्थानाच्या प्रवेशद्वारांतून बाहेरील प्राकारांत ज्यावेळीं ते शिरले, त्यावेळीं पागेंत घोडयांवर जीनें चढवून कमरा लावण्याची शिलेदारांची अगदीं तारांबळ उडाली होती. मुख्य इमारतींत तर, इकडून तिकडे, तिकडून इकडे, अशा रीतीनें दिव्यांची नाचवानाचव चालली असल्याचें दिसून येत होतें. त्या ठिकाणीं अशा प्रकारें निर्माण झालेल्या दंगलीच्या ह्या वातावरणाला, कोणती विशिष्ट परिस्थिति कारणीभूत झाली असावी, ह्याचा ध्येयसेनांना प्रथमदर्शनीं कांहींच अर्थबोध होईना. इतस्ततः आजूबाजूला त्यांनीं आपली शोधक दृष्टि फिरविली; पण विश्वासाचा त्यांना कोठेंच वागारा लागला नाहीं. पायऱ्या चढून, मोकळयाच असलेल्या दारांतून बैठकीच्या दिवाणखान्यांत त्यांनीं प्रवेश केला; परंतु तेथें आपला मित्र नसल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. दालनामागून दालन अशा रीतीनें सर्व दालनें त्यांनीं ओलांडलीं पण व्यर्थ! तीं सारीं मोकळींच होतीं.

सरतेशेवटीं, आपल्या मित्रासमवेत गप्पागोष्टींत ज्या ठिकाणीं त्यांनीं कित्येक सुखाचे क्षण घालविले होते, राजकारणांत वेळोवेळीं उपस्थित होणाऱ्या निरनिराळ्या भानगडींची मनसोक्तपणें चर्चा केली होती, अशा एका छोटेखानी खोलींत त्यांनीं पाऊल टाकलें. त्या ठिकाणींहि त्यांचा मित्र नव्हता; परंतु एकंदर बाह्य गोष्टींवरून अंदाज केल्यास, त्यानें ती नुकतीच सोडली असावी. असा सहज कुणीहि तर्क बांधला असता.

भिंतींत चौफेर बसविलेल्या कपाटांचीं दारें सताड उघडींच पडलीं होतीं. उसकापासकीमुळें त्यांत असलेल्या ग्रंथांच्या रांगा पार विस्कळित होऊन गेल्या होत्या. मेजावरील कागदपत्रांच्या पुडक्यांची तर अगदीं विलक्षणपणेंच उलथापालथ केलेली दिसत होती. फुटलेल्या कांचेचे कांहीं तुकडे खोलींतील जमीनीवर सभोंवार पसरले गेले होते.

दरवाजासमोरच रुजाम्यावर एक तजवीर पडली होती. महाराजांनीं ती उचलून पाहिली, तों ती आपलीच चिमुकली प्रतिमा असल्याचें त्यांना समजून आलें. बऱ्याच उंचीवरून खालीं पडल्याकारणानें, तिच्या नाजुक हस्तीदंती चौकटीवरील सुंदर नकसकाम बहुतेक मोडून गेलें होतें.

लाल लाल इंगळाचा चरचरीत चटका बसावा, त्याप्रमाणें त्यांनीं ती चटकन् परत खालीं टाकून दिली.

खोलींतील गारवा अंशत: कमी व्हावा म्हणून, धूपदाणी जवळ ठेवलेल्या शेगडींतील निखारा आतां बराच फुलला होता. त्यांत अर्धवट फाडून टाकलेल्या पत्राचे कांहीं तुकडे, अग्नीच्या भक्ष्यस्थानीं असूनहि, अजूनपर्यंत चांगलेच शाबूत होते. अधिराज ध्येयसेनांनीं आपल्या मित्राला उद्देशून लिहिलेलें तें शेवटचेंच लिखाण होतें. त्यांत त्यांनीं, जी विस्तृत योजना अमलांत यावी म्हणून, आजपर्यंत त्यांचें अन्तःकरण तिळतिळ तुटत होतें ती योजना,......त्या योजनेच्या मार्गांतील निरनिराळ्या अडचणी, ......त्यांचें मुद्देसूद निराकरण,......जनतेला तीपासून होणारे विविध फायदे वगैरे गोष्टींचें विस्तारानें विवेचन केलें होतें. दु:खित मनानें हस्तलिखिताच्या त्या अवशेषांवर, त्यांनीं पुन्हां एकदां आपली करुण दृष्टि फिरविली आणि परत ते, नुकत्याच वर येऊं लागणाऱ्या ज्वाळांना ते समर्पण करणार तोंच एका पाठोपाठ एक अशा दोन व्यक्तींचें खोलींत आगमन झालें. त्यांपैकीं एक पोक्त वयाची स्त्री असून, दुसरा पुरुष होता. पुरुषाच्या अंगावरील सध्यांच्या एकंदर पोषाखावरून, तो बराच लांबून प्रवास करून आला असावा असें दिसत होतें.

" विश्वास कुठं आहे ? " नवीनच आलेल्या त्या गृहस्थानें त्या स्त्रीजवळ पृच्छा केली.

" नूतन नृपवरांना अभिवादन करून, त्यांच्या चरणीं आपली सेवा रुजूं करण्यासाठीं, राजवाड्याकडं तो गेला आहे ! " त्या स्त्रीनें प्रत्युत्तर दिलें व ती पुढें सांगूं लागली—" सध्यां आम्ही

केवढया मोठ्या विवंचनेंत आहेत, ह्याची आपणांला कल्पना असेलच ! जुन्या महाराजांप्रमाणें कसल्या तरी विक्षिप्त, तऱ्हेवाईक अन् खुळचट कल्पना उराशीं धरून बसणारांपैकीं नवीन महाराज मुळींच नाहींत ! आणि ह्या कारणानंच उभ्या कारकीर्दीत त्यांचंन यांचं कधींहि सूत जमलं नाहीं ! उलट आंतून एकमेकांचा ते मनापासून द्वेषच करीत ! जुन्या राजवटींत विश्वासावर असलेली प्रभुकृपा आतां नवीन राजवटींत त्याच्या प्रगतीच्या मार्गात एक मोठीच धोंड होऊन पडण्याचा बराचसा संभव आहे ! मी तर म्हणतें...ज्या सुधारणा अमलांत आणण्याचा दिवंगत यजमानांचा मानस होता त्या अगदींच मूर्खपणाच्या असून, आपणांस पूर्ण नापसंत होत्या असं सांगून, कुणीकडून तरी नवीन नरेंद्रांशीं त्यानं वेळींच दिलसफाई करून घ्यावी, हेंच त्याच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर व जास्त सुखावह आहे! आतां एका तऱ्हेनं ...राजा ध्येयसेनांवर त्याचं विशेष प्रकारचं प्रेम होतं व त्यांच्या हृदयाचा तो अगदीं कलिजा होता हें खरं, पण...तुम्हीच सांगा, आपला आपणच कांहींतरी विचार केला पाहिजेना? निव्वळ भावनेवर भर देऊन आपल्यासारख्या लोकांचं कसं चालणार? आणि म्हणूनच...........महाराजांचं प्राणोत्क्रमण होतांक्षणींच तातडीनं दौडत विश्वास इथं आला व आपला लवाजमा मागाहून धाडण्याविषयीं मला सांगून, लगोलाग पुन्हां परत गेला.

"अगदींच बरोबर!" संमतीदर्शक मान हलवीत त्या नवोदित गृहस्थानें उत्तर दिलें आणि मग, आपल्या टीकेच्या विवेचनास त्यानें सुरवात केली. परराष्ट्रीय दरबार—वकीलांपैकीं तो एक असल्याचें ध्येयसेनांना ह्या वेळीं ओळखून आल्यामुळें, त्याचें बोलणें ते जास्तच लक्ष देऊन ऐकूं लागले.

"मग......मलाहि आतां विश्वासाच्या मागोमाग जलदीनं राजवाडयाकडं गेलं पाहिजे! तुमच्या आमच्यांतच बोलावयाचं झालं, तर झाली ही गोष्ट एका दृष्टीनं ठीकच झाली! राजा झाला होता एवढंच......पण राजकारण कशाशीं खातात, ह्याची त्या

अननुभवी गरीब पोराला कांहींचीहि कल्पना नव्हती ! आपल्या सर्वांच्या हित–संबंधांना अत्यंत विघातक, अशा एका देशबुडव्या तहाच्या कलमपत्रकावर त्यानें जुलमानं मला सही करावयास भाग पाडलं होतं ! सुदैवानं आतां मात्र........लवकरच युद्धाचं वारं वाहूं लागेल आणि रणांगणावरील रणभेऱ्यांच्या गोड निनादानं चोंहोंकडचं वातावरण कसं अगदीं दुमदुमून जाईल ! त्या नालायक नरेशाच्या मतानुसार राज्याचा गाडा असाच आणखी कांहीं दिवस चालला असता, तर लष्करांतील बढती, पराक्रम वगैरे गोष्टींना मूठमातीच द्यावी लागली असती ! "

अधिक ऐकण्यास महाराजांना त्या ठिकाणीं अधिक वेळ थांबवलें नाहीं.

" मी माझ्या लोकांकडंच जाईन ! " दुःखित स्वरांत त्यांच्या तोंडांतून आपोआप उद्गार बाहेर पडले......" माझी नालस्ती करून, माझ्या वारसाची स्तुतिस्तोत्रं गाण्याचं त्यांना तरी कांहीं कारण दिसत नाहीं !......उलट, ज्या सुधारणा प्रेमानं मी त्यांना बहाल केल्या आहेत त्या त्यांच्यापासून तो परत मात्र घेईल ! "

जाण्यासाठीं ते वळले, तों सातव्या प्रहरांतील घटकेचा पडलेला पहिला ठोका त्यांच्या कानांवर आला.

खरोखर, राजा ध्येयसेन म्हणजे एक अत्यंत विलक्षण व्यक्ति होती. राजधानींतील सर्वांत कंगाल आणि भिकार भागाचीसुद्धां त्यांना पूर्ण माहिती होती. वेष पालटून, कोणालाहि न कळत, त्या बाजूला पूर्वीं त्यांनीं कित्येकदां फेऱ्या घातल्या होत्या. गरिबीच्या संसारांत सर्वत्र भेसूरपणें वावरणारें त्या ठिकाणचें मूर्तिमंत दारिद्र्य, दुःख अन् मरण–हीं अवलोकन करूनच, त्यांचें अन्तःकरण पराकाष्ठेच्या सहानुभूतीनें दयार्द्र होऊन गेलें होतें; आणि म्हणून, जी गोष्ट अस्तित्वांत आणण्याचा आजपर्यंत कधींहि प्रयत्न केला गेला नव्हता, ती गोष्ट सत्य सृष्टींत आणण्याची चेतना त्यांच्या कोमल हृदयांत उत्पन्न झाली होती.

त्यांच्या जीवितनौकेला कालसागरांत बुडविणाऱ्या दोषिक तापाचा

संसर्ग त्यांना कोठें झाला होता, ह्याची राजवाड्यांतील कोणालाच कांहीं कल्पना नव्हती. खुद्द महाराजांना मात्र त्याबद्दलची अंधुकशी शंका आली होती; आणि मौज ही कीं, ज्या स्थळाबद्दल ती आली होती त्या स्थळाकडेच थेट सध्यां त्यांनीं आपला मोर्चा वळविला होता.

"तापाची मला ताप देण्याची आतां काय ताप आहे?" चालतां चालतां ते आपल्याशींच पुटपुटले. त्या शब्दनिष्ठ विनोदानें त्यांच्या चेहऱ्यावर हास्याची एक लकेर चमकून गेली.

दरिद्री नारायणाच्या विहारभूतींतील घरांचीं तीं खुराडीं पूर्वीप्रमाणेंच घाणेरडीं होतीं; आणि लोकहि पण क्षयरोग्याप्रमाणें तसेच निःशक्त, निर्बल अन् पांढुरके दिसत होते. रात्र जरी बरीच झाली होती, तरी रस्त्यांत घोळक्याघोळक्यानें गप्पा मारण्याच्या त्यांच्या कार्यक्रमास चांगलाच रंग भरला होता. प्रत्येकाच्या तोंडांत त्यांचेंच नांव खेळत होतें. त्यांच्या आजारांतील किरकोळ क्षुल्लक बाबींची सुद्धां अगदीं उत्साहानें विचक्षणा चालली होती. त्यांच्या देहाचा शेवटचा सन्मान म्हणून, राष्ट्रीय लष्करांकडून उद्यां त्यांना मिळणारी शेवटची सलामी ... शोकसमयाला साजेशा अशा विशिष्ट पद्धतीनेंच बादशाही वैभवांत त्यांची निघणारी उदईकची स्मशानयात्रा...अग्निसंस्कारासाठीं लागणारें चंदन, तूप, कापूरादि साहित्य···वगैरे विषयच त्यांना इतर कोणत्याहि गोष्टींपेक्षां अधिक महत्त्वाचे वाटत होते.

एका घाणेरड्या मदिरालयाच्या बाहेरील कट्टयांवर, पांच सहा माणसें सुरापान करीत बसलीं होतीं. त्यांचें संभाषण आडून ऐकण्याकरितां, महाराज जरा एका बाजूला थोडा काळ थबकून उभे राहिले.

"...... म्हणजे मग एक चांगलीच ब्याद टळली म्हणावयाची!" त्यांपैकीं त्यांच्या चांगल्याच तोंडओळखीचा एक जण म्हणाला—"स्वतःच्या कमाईपेक्षां एक पैहि अधिक खर्च न करणाऱ्या राजाचा, तुम्हीच सांगा, काय उपयोग? अशानं

व्यापाराला चलती मिळण्याची कल्पान्तापर्यंत सुद्धां आशा नको ! नवीन पोऱ्या मात्र अगदींच निराळ्या तऱ्हेचा आहे ! खात्रीनं लवकरच आपणांस मौजच मौज पहावयास मिळणार ! ... !! "

" हो ! हो !! हो !! अन् लुटावयास सुद्धां... ! " दुसऱ्या एकानें खिदळतच त्याला पुस्ती जोडली.

" ॲऽहॅऽहॅऽहॅऽ !! " मध्येंच तोंड घालून, विचित्र हेल काढीत तिसऱ्या एकानें आपली बत्तीशी पाजळली... " काय त्रासदायक लुडबुडं बाळ होतं पण ? असंच करा......तसंच करा...... घरंच स्वच्छ ठेवा म्हणून सतत त्या ध्यानानं आम्हाला सतावलं होतं ! हो ! मला कळलंच पाहिजे ...... आमच्या खाजगी व्यवहारांत त्याला हात घालण्याचा काय अधिकार होता ? "

" माझं तर असं मत आहे कीं, हे राजे सप्तपाताळांतच गाडले पाहिजेत... ! " उच्च स्वरांत चवथ्या एकानें गर्जना केली—

" अन् आपणांला जर ते हवेच असतील, तर त्यांना निदान भूपतींना शोभेल अशा थाटांत तरी वागूं द्या ! मदिरेच्या मोहक निशेंत मदिराक्षीच्या प्रेमकटाक्षानं विद्ध होऊन जाणारा रंगेल तरुणच मला मनापासून आवडतो ! "

" देहान्त शासनाची शिक्षा त्याला नामशेष करावयाची होती ! मला वाटतं, जन्मभर त्या गरीब बिचाऱ्यांना तुरुंगांत डांबून, त्यांच्याकडून फुकट काम चपाटून घेण्याचा बेट्याचा उद्देश असावा ! हो ! नाहीं तर काय ? पक्कं ध्यानांत धरा, त्याच्या मुळाशीं अशीच कांहीं तरी गोम असली पाहिजे ! उगीच कांहीं कारण नसतां, आपल्या प्रजाजनांच्या जीविताकरितां कुणीहि नसती कळकळ दाखविणार नाहीं ! " अकलेचे तारे तोडीत, पांचव्यानें आपल्या बुद्धिमत्तेचें प्रदर्शन केलें, आणि तो खो खो हंसूं लागला.

दारूचे पेले भराभर रिकामे करीत, त्याच्या भाईबंदांनींहि त्यास चांगलीच साथ दिली.

महाराजांनीं तोंड फिरवून कानांवर हात ठेवले. शेजारच्या

चौकींत ठण्ठण् अशा रीतीनें वाजलेल्या घंटेच्या कर्णकर्कश ठोक्यांनीं त्यांचे कान बधीर करून टाकले. क्षणभर त्यांची वृत्ति अगदीं गोंधळून गेली.

जन्मभर ज्याचें आपण वैर साधलें, अशा आपल्या कट्ट्या हाडवैऱ्यानें आपल्या तोंडावर आतां आपली खरमरीत निर्भर्त्सना केली, तरच आपलें हें तापलेलें डोकें थोडें तरी शांत होईल, असें महाराजांस निश्चितपणें वाटल्यामुळें,मुख्य तुरुंगाच्या रोखानें त्यांनीं आस्ते आस्ते पाऊल टाकण्यास आरंभ केला.

कैदखान्याच्या अजस्र भिंती एखाद्या काळ्या कभिन्न यमदूताप्रमाणें दिसत होत्या. त्यांतून एका दिंडीद्वारें आंत शिरकाव करून घेतल्यानंतर, फांशीची सजा सुनावलेल्या एका आरोपीच्या तळघराकडे त्यांनीं आपलें तोंड वळविलें. कडेलोट, शिरच्छेद वगैरे देहान्त शासनाचे प्रकार रद्द करण्याविषयींचा घाटत असलेला कायदा अजून अमलांत आला नव्हता; आणि उपरीनिर्दिष्ट व्यक्तीबाबत तरी, तो अजून जारी नसल्याबद्दल महाराजांना एक प्रकारचा विशेष आनंदच वाटत होता.

कोठडींतील तो अभागी जीव मांडीवर कागद घेऊन, कांहीं तरी लिहिण्यांत अगदीं व्यग्र होऊन गेला होता. काळजीनें खंगून खंगून एखाद्या वेड्याप्रमाणें त्याची दृष्टि शून्य अन् भकास झाली होती. मृत्यूच्या सरहद्द प्रांतावरच उभा असल्यामुळें, त्याच्या देहावर प्रेताची विद्रुप अवकळा येण्यास प्रारंभ झाला होता. राजा ध्येयसेनांनीं त्याला पूर्वी एक दोनदांच पाहिलें असल्यामुळें, त्याच्याकडे ते आतां अगदीं टक लावून पाहूं लागले.

इतक्यांत, तुरुंगावरील मुख्याधिकारी व मावळत्या प्रधानमंडळांतील एक प्रमुख कार्यकारी मंत्री—असे दोघेजण त्याठिकाणीं एकएकीं येऊन उपस्थित झाले. चमकून त्या गुन्हेगारानें एकदम वर पाहिलें—आणि प्रश्न केला—

"अजून उद्यांपर्यंत अवधी आहे ना?" परंतु लगेच, ह्यांत आपण थोडीशी भ्याड वृत्तीच दर्शविली कीं काय, अशी भीति

वाटून तो म्हणाला—“ पण......पण माझी केव्हांहि तयारी आहे ! फक्त हें पत्र माझ्या प्रिय पत्नीला पोहोंचविण्याची व्यवस्था झाल्यास, ह्या दुर्दैवी प्राण्यावर आपले अनंत उपकार होतील ! ”

“ महाराज कालवश झाले आहेत आणि आपली शिक्षा रद्द करण्यांत आली आहे ! ” मोठ्या गंभीरपणानें मंत्रिमंडळांतील त्या कार्यकारी सभासदानें उत्तर दिलें—“ राज्यावर अधिष्ठित होणाऱ्या नवीन महाराजांचीं मतं अगदींच निराळीं आहेत ! बहुतकरून उद्यां दुपारपर्यंत, आपली ह्या ठिकाणाहून सुटका करण्यांत येईल ! ”

“ काय ? महाराज कालवश झाले ? ” आश्चर्यानें स्तंभित होऊन त्या माणसानें परत विचारिलें.

“ हो ! महाराज कालवश झाले ! ” निधनाच्या त्या वार्तेची, अमात्यांनीं आणखी एकदां शांतपणें पुनरावृत्ति केली.

कपाळावरून आपला हात फिरवीत, कोठडींतील तो बंदीवान एकदम उठून उभा राहिला.

“ महाराज ! ” केविलवाण्या स्वरांत, हृदय पिळवटून मोठ्या अजीजीनें तो म्हणाला—“ त्या स्वर्गवासी माहात्म्याबद्दल मला खरोखर अत्यंत आदर होता !......कांहींहि असलं तरी राजा होण्याला अगदीं योग्य न् लायक असाच तो महाभाग होता, यांत तिळमात्रहि संशय नाहीं ! मला तर त्यांनीं सभ्य गृहस्थाला उचित अशा सन्मानानंच वागविलं होतं ?......माझ्याप्रमाणं त्यांनाहि संसार होता !......तेहि एका तरुण राजकुमारीचे पति होते !......अरेरे !......गरीब बिचारा...!.........महाराज ! आपण सांगितलेली ही बातमी केवळ स्वप्नाप्रमाणं असावी आणि खरोखर ते अगदीं जिवंत असावेत, अशीच माझी मनापासूनची उत्कट इच्छा आहे ! ”

फांसावर लटकण्याची शिक्षा झालेल्या त्या माणसाच्या डोळ्यांतून, हें बोलत असतां सारखे अश्रू ठिपकत होते. महाराजांना तें दृश्य सहन करवेना. शक्य तितक्या जलदीनें तें ठिकाण सोडून, ते तडक बाहेर पडले; आणि रस्त्याला लागतात न लाग-

तात तोंच तुरूंगाच्या मुख्य चवाठ्यावर घणाणणारे तिसऱ्या घटकेचे टोले त्यांच्या कर्णपथावर येऊन आदळले.

राजा ध्येयसेनांची छाती धडधड करूं लागली. नुकत्याच झालेल्या त्यांच्या विलक्षण मानहानीमुळें, त्यांच्या तप्त डोक्यांत निव्वळ घणाचे घाव पडत होते. त्यांच्या मित्रांनीं केलेल्या त्यांच्या कुचेष्टेपेक्षां त्यांच्या शत्रूनें केलेली त्यांची कींवच, त्यांना अधिक असह्य झाली होती. अशा माणसाला जन्माचें ऋणी होण्यापेक्षां, स्वखुषीनें पुढें होऊन हजार वेळां त्यांनीं आनंदानें मृत्यूला मिठी मारली असती, आणि असें असूनहि........ते स्वतः उदार असल्यामुळें, दुसऱ्यांमध्यें तोंच गुण उत्कटत्वानें वास करीत असलेला पाहून, त्यांना एक प्रकारचें विशेष समाधानच वाटलें.

ज्या गोष्टीसाठीं आपण एवढा खटाटोप केला त्यांत कांहींच अर्थ नव्हता, असा ते आतां आपणा स्वतःलाच तिरसटपणानें बोल लावून घेऊं लागले. आपल्या सद्यस्थितीचें सर्व बाजूंनीं त्यांनीं विहंगम दृष्ट्या पर्यालोचन केलें; पण त्यांत त्यांना समाधानाचें स्थान कोठेंच आढळून येईना. ज्या मित्रप्रेमावर त्यांनीं विश्वासानें श्रद्धा ठेविली होती, तो एक केवळ पोकळ आभास ठरला होता. ज्या लोकांच्या कल्याणाकरितां ते प्रयत्न करीत होते, त्या लोकांत आपली स्वतःची प्रगति करून घेण्याची अजून पात्रता आली नव्हती. एक अजाण लहान बालिका...थोर अन्तःकरणाचा एक उदार प्रतिस्पर्धी......एवढेंच काय ते म्हणण्यासारखे त्यांचे मित्र होते.

जगण्यांत एकंदरीनें आतां काय स्वारस्य होतें ?

इतःपर कोणतीच धडपड न करितां, असेंच परत जाऊन, प्राप्त परिस्थितीपुढें मान तुकविण्यांतच शहाणपणा नव्हता का ?

जगाच्या दुतोंडी न्यायाचा मासला त्यांनीं नुकताच अनुभविला होता. जनरीत कशी असते, ह्याची त्यांना पूर्ण कल्पना आली होती. अनुभवानें त्यांना आतां चांगलाच धडा शिकविला होता.

ईश्वरी संकेताच्या इष्टानिष्टतेची प्रचीति, प्रत्यक्षपणेंच त्यांच्या प्रत्ययास आली होती. प्रत्येक मनुष्य जरी आतां विश्वासघातकी ठरला असतां, तरी त्याचें त्यांना आतां काय होतें ? अन्यायाची भावना पार विरून जाऊन, कर्तृत्वाच्या अहंकारानें क्षणभर धुंद झालेली त्यांची दृष्टि आतां साफ निवळली होती. त्यांना अगदीं स्पष्ट......स्पष्ट दिसूं लागलें होतें.

चंद्रावर ह्या वेळीं दाट ढगांचें आवरण आल्यामुळें, चांदण्याचा प्रकाश जवळजवळ आतां काळोखांतच जमा झाला होता. रात्रीबरोबर अधिकाधिक तीव्र होत जाणाऱ्या थंडीच्या कडाक्यानें त्यांना हुडहुडी भरली. एकदम एकाएकीं, एकाकीपणाच्या अकथनीय भावनेनें त्यांचें अन्त:करण पूर्णपणें ग्रासून टाकिलें; आणि त्यांचा धीर सर्वतोपरी खचून गेला. ' आपली काळजी करणारं जगांत खरंच कुणी...कुणीसुद्धां नाहीं का ? ' अशी त्यांच्या फसलेल्या मनाला भ्रांत पडली. प्रेमळ सहानुभूतीच्या एका शब्दाकरितां—एका दृष्टीक्षेपाकरितां, त्या क्षणाला त्यांनीं वाटेल ती गोष्ट मान्य केली असती. जणुं काय, जीवाभावाच्या प्रेमासाठीं त्यांचें वंचित हृदय त्या वेळीं केविलवाणें मूक रुदनच करीत होतें.

सातव्या प्रहरांतील चवथी घटका होण्यास, आतां कांहीं क्षणांचाच कालावधि उरला होता. त्यांचें सर्वस्व असलेली--साऱ्या जगाच्या मोलाची अशी एक गोष्ट अजून शिल्लक राहिली होती. इतका वेळपर्यंत तिची त्यांना वाट पाहवली तरी कशी, ह्याचेंच आश्चर्य होतें. तिच्याविषयीं तरी निदान, त्यांना सर्वतोपरी अगदीं पूर्ण खात्री होती.

राणी शीलवतीसंबंधींच्या निव्वळ ह्या विचारांतच राजा ध्येयसेनांना आतां सौख्य आणि समाधान वाटूं लागलें. नुकत्याच घडलेल्या सर्व गोष्टी त्यांच्या विस्मृतींतून जवळजवळ पार नाहींशा झाल्या. तथापि, दुर्दैवानें दिलेल्या जोरदार तडाख्यामुळें त्यांचें शील इतक्या हीन आणि निकृष्टावस्थेला येऊन पोहोंचलें होतें कीं, आपल्या पत्नीच्या महालाच्या दाराशीं ते उभे असतांना. आंत

जावें कीं न जावें, अशा प्रकारच्या क्षुद्र शंकेनें त्यांचें मन द्विधा होऊन गेलें.

" अन् पहिल्याप्रमाणं हाहि एक मिथ्याभासच असला तर...? आशेनं मृगजळामागं लागून, दुप्पट निराशा पदरीं घेण्यांत काय तात्पर्य आहे? ...कित्येक वेळां अज्ञानांतच आनंदाचं परम निधान साठविलेलं नसतं का ?...??... ...मग, ...कळण्या-आधींच आतां परत फिरलं तर...तर...?? पण...भीतीनं कचरून, भ्याडाप्रमाणं मी आपलं पाऊल आजपर्यंत कधी तरी मागं घेतलं आहे का? नाहीं! नाहीं!! ...... तसं होणं शक्य नाहीं!!"

महालांत पलंगाशेजारीं एका आसनावर राणी शीलवती एकटीच विचारमग्न स्थितींत, शेगडीशीं बसली होती. तिच्या पाठीवर मोकळेपणींच रुळणाऱ्या तिच्या विशाल केशकलापांतील कित्येक चुकार बटा तिच्या चेहेऱ्यावर इतस्ततः विखुरल्या गेल्यामुळें, एखाद्या झिरझिरित बुरख्याप्रमाणें तिचें म्लान वदन अंशतः झांकून गेलें होतें.

पहिल्याच दृष्टीक्षेपाबरोबर आत्मनिर्भर्त्सनात्मक दुःखानें महाराजांचें हृदय व्याकुळ झालें, " भलत्याच प्रकारचा संशय आपणाला घेवविला तरी कसा?" कातरतेनें त्यांनीं स्वतःच्याच मनाला प्रश्न केला; आणि मग, त्यांना अगदीं विरमल्यासारखें झालें.

प्रेमाची खूण म्हणून, विवाहासमयीं त्यांनीं तिला अर्पण केलेली मुद्रिका आतांहि तिच्या हातांत होती. तिच्या नाजुक करांगुलीला अलंकृत करणाऱ्या, त्या दिव्य हिरकणीचे तेजोकिरण, तिच्या गोंडस हाताच्या कमलकलिकेवर पसरले होते. शयनमंदिरांत मूर्तीमंत वावरणाऱ्या सध्यांच्या एकंदर उदास वातावरणांत, चैतन्ययुक्त अशी एवढीच काय ती तेजस्वी गोष्ट दिसून येत होती.

तिचें सांत्वन करण्याची तीव्र मनीषा, त्यांच्या अन्तःकरणांत आतां जागृत झाली. तिला सोडून, तिच्या तैनातींतील सर्व पाळेकरणी...दासी वगैरे स्त्रिया दूर कशा गेल्या, ह्याचा त्यांना विलक्षण अचंबा वाटला. वैधव्याचा घाला पडल्यानंतरच्या पहिल्याच

रात्रीं...खरोखर तिच्याजवळ कुणी तरी खास असावयासंच पाहिजे होतं ?

विचारांच्या तंद्रींत ती पूर्णपणें विलीन होऊन गेल्यासारखी दिसत होती.

" ...आतां जर ती कांहीं बोलली...फक्त, आपलं नांव घेतलं...तर--तर ! " पण ती अगदींच स्तब्ध होती. एक शब्दहि तिनें उच्चारला नाहीं.

इतक्यांत, एका लहानशा आवाजानें महाराज एकाएकीं चमकून गेले; आणि त्यांनीं समोर पाहिलें मात्र...तो काय आश्चर्य ! ! भिंतींतील चोरदरवाजा हलूं लागला होता. त्याचें अस्तित्व आपणांस व आपल्या प्रिय पत्नीसच फक्त ठाऊक होतें, अशी त्यांची आतांपर्यंतची भाबडी समजूत होती; पण...पण विचार करावयास त्यांना आतां फुरसद कुठें होती ?

एक सुंदर युवक त्या दरवाजांतून बाहेर पडून, थेट राणीसमोर येऊन उभा राहिला होता.

त्याला गप्प राहण्याची इषारत देण्याकरितांच कीं काय, शीलवतीनें आपलें बोट ओंठावर ठेविलें व ससंभ्रमतेनें ती उठून उभी राहिली. आपल्या हंसतमुख स्निग्ध दृष्टीनें त्या तरुणाकडे एक गोड प्रेमकटाक्ष टाकून, धांवतच मग ती पुढें गेली; आणि त्यानें पसरलेल्या बाहूंपाशांत तिनें आपला देह अलगत सोडून दिला. त्याच्या गाढ आलिंगनांतील परमोच्च आनंद किती तरी काळ-अगदीं तल्लीनतेनें ती उपभोगीत होती.

कांहीं वेळ गेल्यानंतर, आपल्या हातांतील अंगठी काढून, तिनें त्याच्या हातांत घातली; व आपल्या कोमल हातांचा विळखा त्याच्या मानेभोंवतीं टाकून, आपलें तोंड शक्य तितकें त्याच्या तोंडाजवळ नेत ती हलकेंच लडिवाळपणानें त्यांस म्हणाली:—

" तूं आलास ! अहाहा ! ! किती...किती चांगलं झालं म्हणून सांगूं !...ते जात असतांना, त्यांचा हात मला हातांत घ्यावा लागला !...! ! इथं अगदीं एकटीच बसण्यांत, मला फार भय

वाटत होतें ! ते भूत होऊन परत येतील कीं काय, अशी धास्ती पुन्हां पुन्हां माझ्या मनांत डोकावत होती !...इतःपर ते कधींहि परत येणार नाहींत ! अहाहा ! आनंदाला आतां काय तोटा आहे ? एकमेकांच्या गोड समागमांत जन्मभर आपण आतां सौख्याचाच अनुभव घेऊं !"

* * *

महाद्वारावर सातव्या प्रहरांतील चवथ्या घटकेचे टोले ठणाणत होते. निद्रितावस्थेंत असलेले पहारेकरी त्या आवाजानें एकदम दचकून जागे झाले आणि डोळे वगैरे चोळून समोर पाहतात तों, लांकडाप्रमाणें ताठरलेलें महाराजांचें शरीर पूर्वीप्रमाणेंच पलंगावर पहुडलें होतें; पण त्यांच्या चेहऱ्यांवर मात्र, एक विलक्षण प्रकारचीच क्रांति घडून आली होती. त्यांच्या मुद्रेवर विलसणारी आतांपर्यंतची सौम्य समाधानाची आनंदी छटा पार विलयाला जाऊन, आयुष्याचा रखरखीत उन्हाळा झालेल्या माणसाप्रमाणें त्यांचें मुख आत्यंतिक निराशेनें कमालीचें हिडीस व विद्रुप होऊन गेलें होतें.

राणी सरकारांना आतां हें पुन्हां पाहवणार सुद्धां नाहीं, असें काळजीयुक्त स्वरानें म्हणत, रक्षकांपैकीं एकानें त्यांच्या अंगावरील लांबलचक मखमाली ओढणी वर ओढली; आणि तिच्या साह्यानें त्यांचा देह त्यानें आपादमस्तक पूर्णपणें झांकून टाकला.

* * *

| प्रकाशनस्थलः— ‘ चित्रमयजगत् ’ | Mary Coleridge च्या 'The king is dead; long live the king.' ह्या गोष्टीवरून | प्रकाशनकालः— एप्रिल १९३६. |
| --- | --- | --- |

## उत्पादक : : : २

वसंताच्या सुंदर उन्मादक बहरानें नटलेल्या ‘ सेवाकुंजांतील ’ रम्य वृक्षवाटिकांतून बॅरिस्टर राधाकमल व प्रोफेसर तारानाथ या वृद्ध मित्रद्वयांची जोडी इकडून तिकडे मोठया मौजेनें गप्पा मारीत हिंडत होती. प्रचलित राजकारण, सामाजिक सुधारणा, अस्पृश्योद्धार, वेश्याव्यवसाय, औद्योगिक चळवळ वगैरे कित्येक विषयांवर चिकित्सक बुध्दीनें अभ्यास करून बनविलेलीं विशिष्ट मतें सलोख्याच्या प्रेमळपणानें ते एकमेकांना निवेदन करीत होते. मधुनच मात्र, कसल्यातरी कारणांवरून बाळपणच्या एखाद्या मजेदार प्रसंगाची त्यांना सहज आठवण होई आणि त्या सहज आठवणीनें निर्व्याज मनोहर अशा गत आयुष्यांतील त्या मधुर स्मृतीशीं निगडित झालेले, काळाच्या विशाल उदरांतील कित्येक रम्य क्षण, क्षणभर एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणें त्यांच्या स्मृतीनेत्रांसमोरून सरकूं लागत आणि त्यांतच कांहीं काळपर्यंत त्यांची वृत्ति अगदीं तल्लीन-तदाकार होऊन जाई.

बागेच्या मध्यवर्ती तबकांत थुईथुई उसळणाऱ्या कमलाकार

कारंज्यांत चित्र विचित्र रंगांचे अनेक लहान मोठे मासे मनसोक्त-पणानें विहार करीत होते. लक्षावधी पिवळसर फुलांच्या लहान-लहान झुपक्यांनीं डंवरून निघालेला सुंदर ' मदनबाण ' जवळच डौलानें झुलत होता. मधुनच येणाऱ्या वाऱ्याच्या लहानलहान लहरी त्याचा गोड सुवास चोंहीकडे पसरवून टाकीत होत्या. साऱ्या कुंजांत प्रसन्नता जणुं काय स्वैरपणानें संचार करीत होती.

डोंगर पठारावरून सहल करीत असतांना, एखादा रम्य देखावा दृष्टीस पडला म्हणजे मनुष्य क्षणभर विस्मयानें चकित होऊन, ज्याप्रमाणें त्या सृष्टिसौंदर्याकडे कांहीं काळ निश्चल नजरेनें पहात उभा रहातो, त्याप्रमाणें आपल्या परिमळानें साऱ्या कुंजाला आनंदाचे रूप बहाल करणाऱ्या त्या नितांत रमणीय मदन-बाणाकडे राधाकमल कांहीं काळ निश्चल नजरेनें पाहूं लागले. अस्तंगत सूर्याच्या तांबुस किरणांशीं स्पर्धा करणाऱ्या त्या झाडाच्या ठसकेबाज डहाळयांनीं त्यांचें हृदय क्षणार्धांत काबीज करून टाकिलें. अनिवार मोहानें मोहीत झाल्यामुळें, ते त्या झाडाच्या अगदीं सन्निध जाऊन उभे राहिले आणि कांडोकांडीं विकसलेल्या असंख्य फुलांच्या मोहक मिषानें हंसणाऱ्या त्या सुंदर फुलोऱ्यावरील एक गोडसा, गेंदेबाज पुष्पगुच्छ त्यांनीं खुडून घेतला. त्याचा सुवास घेण्यांत त्यांचें मन एकीकडे व्यग्र झालें असतां, दुसरीकडे विचारमालिकेनेंहि आपला ठाकठीक संसार थाटण्यास सुरवात केली होती.

" ईश्वराची लीला किती अतर्क्य आहे पहा? दृष्टीलासुद्धां अगोचर असणाऱ्या या चिमुकल्या फुलांतील हे बारीक अणुरेणू इथून शेंकडों मैलांवर कुठंतरी डुलणाऱ्या समान झाडावरील फुलांतील सुंदर स्त्रीकेसरांकडे एखाद्या लोहचुंबकाप्रमाणें आकर्षिले जातात...त्यांच्याशीं शृंगार चेष्टा करून त्यांच्यांत चेतना उद्दीपित करतात...त्यांच्याशीं एकजीव होऊन उपभोगाचें सौख्यहि अनु-भवतात! हेंच मधुर मीलन नवजीवनाची सतेज ज्योत निर्माण करून उद्यांचीं छानदार लहान लहान रोपं जगांत उदयाला

आणतं!! आपण माणसं ज्याप्रमाणं नवीन पिढीला जन्म देतों आणि ती नवीन पिढी कांहीं दिवसांनीं जशी आपल्याच जागीं अधिष्ठित होते, त्याचप्रमाणं हीं झाडंसुद्धां आपल्याच जातीच्या नवीन झाडांना जन्म देतात आणि तीं नवीन झाडंसुद्धां कांहीं काळानं आपल्याच पूर्वजांच्या गादीवर विराजमान होतात!!!"

वाऱ्याच्या हिंदोळ्यावर स्वच्छंदपणें झोके घेण्याचा मदन-बाणाला अजून कंटाळा आला नव्हता. राधाकमलहि त्याच्या गोड हालचालीचें एकाग्रतेनें निरीक्षण करण्यांत पूर्णपणें रमून गेले होते. इतक्यांत त्यांना एक मजेदार कल्पना सुचली आणि तिच्या आवेशांतच त्या झाडाला खरोखरीचा एखादा गुलहौशी प्रियकर लेखून त्यांनीं त्याच्याशीं बोलण्यास सुरवात केली.

"रंगेल तरुणा! जगावर पसरलेल्या तुझ्या पोराबाळांच्या अफाट फाफट पसाऱ्याची तुला जर किंचित्शी जाणीव झाली तर, तूं किती गोंधळून जाशील याची तुला कल्पना तरी आहे का? कसलाच विचार न करतां असंख्य चिल्यापिल्यांचं लेंढार जगांत आणून सोडायचं आणि पुढं त्यांची कसलीच काळजी न करतां त्यांना बेदिक्कत जगाच्या वाऱ्यावर सोडून, आपण हात झाडून मोकळं व्हायचं अशा मूर्खशिरोमणींच्या माळेंत शोभणाऱ्या एखाद्या बेजबाब-दार पित्याचं जर जगांत कुणाला उदाहरण पाहिजे असेल, तर त्याला तुझ्याकडं मोठ्या अभिमानानं बोट दाखवितां येईल—"!!

बगिच्यांत गोळा केलेल्या निरनिराळ्या झाडांवरील अनेक तऱ्हेवाईक फुलांची लहानग्या मृणालिनीसाठीं सुंदरशी वेणी करण्यांत निमग्न झालेल्या तारानाथांचा हात, राधाकमलांच्या ह्या शेवटच्या वाक्यानें एकाएकीं थांबला गेला. त्यांनीं एकदम चमकून वर पाहिलें व थोडा वेळ विचार करून ते राधाकमलांना म्हणाले—

"राधाकमल! अभिमानानं बोट दाखवावयाला हें निर्बुद्ध झाडच कशाला पाहिजे? ईश्वराच्या कौशल्याची परिसीमा समजलीं जाणारीं आपण माणसं तरी काय कमी पराक्रमी आहोंत! जरा

डोळे उघडून सभोंवार नजर फेकली तर सहज दिसून येईल कीं, बुद्धीची घमेंड मारणाऱ्या आह्मां माणसांत देखील असे कित्येक हरीचे लाल दिमाखानं छाती वर काढून वावरत आहेत. !! ”

“ असतील! नाहीं कोण म्हणतो? या झाडांप्रमाणं आपण माणसंही पुष्कळ वेळां आपल्या पोराबाळांची निष्काळजीपणानं हेळसांड करतों...त्यांना रस्त्यावर सोडून देऊन, आपण नामानिराळे रहातों वगैरे गोष्टी मलाहि कबूल आहेत; पण तारानाथ कांहीं झालं तरी त्या मुलांविषयीं आपणांला थोडीतरी माहिती असते, ही बाब विसरून चालणार नाहीं! माझ्या मतें तर हा एकच मुद्दा आम्हा मानवांची श्रेष्ठता प्रस्थापित करण्यास अगदीं पुरेसा आहे!! ”

तारानाथांना राधाकमलांचें हें विधान नीटसें न पटल्यामुळें, त्यांनीं नकारार्थी मान हलविली व ते म्हणाले—

“ अहः! राधाकमल! तुम्ही चुकतां आहांत!! केवळ तुलना करण्याच्या दृष्टीनं मी बोललोंच नव्हतों! कांहींसुद्धां मनांत नसतांना हें झाड जितक्या नकळतपणानं दुसऱ्या झाडाला जन्माला आणतं, तितक्याच नकळतपणानं जन्माला आलेल्या हजारों अनाथ अर्भकांची आपण कधीं काळजी वाहिली आहे का? ज्याच्या हातून अशा प्रकारच्या एकाहि दुर्दैवी प्राण्याची कधीं आबाळ झाली नाहीं, असा मनुष्य जर पृथ्वीच्या पाठीवर शोधूं लागलं तर पुष्कळ वेळां लाजेनं खालींच मान घालावी लागेल!...!! राधाकमल! राजरोसपणें देहविक्रीचा धंदा करून पोट भरणाऱ्या वारयोषितांना दहा बारा आण्यांच्या सौद्यांत पटलेलीं अशीं एक दोन तरी मुलं असतात कीं, त्यांच्या बापाचं नक्की नांव सांगणं त्यांना अगदीं अशक्य असतं! कोणत्याहि व्यापारांत नफा आणि तोटा या जोडीचा अबाधित अंमल हा असावयाचाच! वेश्यावृत्तीच्या सार्वजनिक धंद्यांतील तोट्यांचीं कलमं म्हणजे प्रत्यक्ष जन्मदात्रीलासुद्धां भारभूत वाटणारीं हीं बेवारशीं बिनबापाचीं पोरं!! कोण? ...? राधाकमल! या अभागी जीवांचे उत्पादक कोण?...???

तुम्ही...मी...संभावित म्हणून जगांत नांदणारीं आपण माणसंच ना?...? ?......अलम दुनियेंतील चोर, दरोडेखोर, ढोंगी, लफंगे, खुनी हीं सारीं...सारीं राधाकमल, आपलीं मुलं आहेत!! आणि एका दृष्टीनं मी म्हणतों, आपण त्यांचीं मुलं असण्यापेक्षां तीं आपलीं मुलं आहेत, ही गोष्ट कितीतरी समाधानाची आहे; कारण पशू समजल्या जाणाऱ्या या हीन पिसाटांतहि आपल्याच प्रमाणं उत्पादनाची तीव्र शक्ति वास करीत असते!!"

"राधाकमल! लहानपणापासून तुम्ही माझे अगदीं जिवाभावाचे मित्र आहांत म्हणून, तरुणपणीं माझ्या हातून अविचारानं घडलेल्या एका भयंकर गुन्ह्याची कुळकथा हृदय उघडं करून मला आज तुमच्याजवळ सांगावीशी वाटते! राधाकमल! काय सांगू ? त्या पापाची नुसती आठवण झाली कीं, अजूनहि पश्चात्तापानें ऊर भरून येऊन मला अगदीं सुचेनासं होतं! विचाराच्या अतिरेकामुळं वासनेला बळी पडलों आणि अंतःकरणाला जखम करून घेतली! आज तीस वर्षं सतत सदसद्विवेकबुद्धीनं हृदयाच्या त्या व्रणावर टोंचीं हाणून हाणून मला अगदीं हैराण करून सोडलं आहे!!...चला...आपण त्या बांकावर बसू या म्हणजे मन मोकळेपणाच्या खुल्यादिलानं, मला माझ्या पापाचा पाढा तुमच्यासमोर नीटपणें वाचतां येईल आणि त्यामुळं अंतःकरणावर पडलेल्या दडपणाचा भार थोडातरी हलका होऊन, मला सहानुभूतीचं समाधान लाभेल!!"

"राधाकमल! पंचवीस वर्षांचा असतांना, आमच्या कॉलेजांतील डॉक्टर रामानंद नांवाच्या माझ्या एका जिवलग स्नेह्याबरोबर मी काश्मीरच्या पायीं प्रवासास गेलों होतों! मोठ्या पहाटेस उठून प्रातर्विधी चहा वगैरे कार्यक्रम उरकावयाचा आणि सामानाचीं बोचकीं हमालांच्या डोक्यावर देऊन चालूं लागावयाचं ......भर दोन प्रहरीं एखाद्या झाडाच्या अगर ओढ्याच्या आसऱ्याला जाऊन तीनचार घटका विश्रांती घ्यावयाची अन् पुन्हा मार्गावर पाऊल ठेवायचं...संध्याकाळीं एखादं सोयीस्कर

खेडं पाहून रात्रभर वस्ती करावयाची...............अशा प्रकारें मजल दर मजल करीत, पंधरा दिवस मोठ्या आनंदांत आमची सफर चालली होती. परंतु त्यानंतर एके दिवशीं सकाळीं निघण्याच्या वेळींच रामानंदांना थोडीशी कणकण आल्यामुळें, ते अगदीं गळून गेले आणि त्यांना अंथरुणावरूनहि उठवेना. अशा परिस्थितींत एकदम पुढील प्रवासाचं प्रस्थान ठेवणं जरा धोक्याचं असल्यामुळं, तो दिवस त्या खेडेगांवीं राहून घालविणंच आम्हांस भाग पडलं!”

“ दुसऱ्या दिवशीं रामानंदांना बरीच हुशारी वाटूं लागल्यामुळं, आम्ही पुनः प्रवासास सुरवात केली पण दहाबारा मैलांची मजल होते न होते तोंच, त्यांच्या छातींत एकाएकीं दुखूं लागलं आणि त्यांना इतका सणसणून ताप भरला कीं, पुढं एक पाऊल टाकणंहि त्यांना अगदीं अशक्य होऊन गेलं! भर दुपारची वेळ...... चालण्याच्या श्रमानं सारींजणं थोडीफार थकलेलीं......वाहनाची कांहीं सोय होईल म्हणावं तर जवळपास एखादं खेडंहि नाहीं ......तेव्हां अशा विलक्षण कचाटींत सापडल्यामुळं क्षणभर मी दिङ्मूढ होऊन गेलों! काय करावं हें मला सुचेना! पण निव्वळ डोक्याला हात देऊन बसण्याची ती वेळ नव्हती! प्राप्त प्रसंगांतून झटपट कांहींतरी तोड काढणं अगदीं अत्यावश्यक असल्यामुळं, मी मागंपुढं न पाहतां सामानासाठीं बरोबर घेतलेल्या हमालापैकीं एकाचं ओझं पटकन् आपल्या खांद्यावर घेतलं व रामानंदांना त्याच्या पाठंगुळीं देऊन, पुनः मार्ग आक्रमिण्यास आम्ही कंबर कसली! संध्याकाळच्या सुमारास मोठ्या कष्टाच्या मिनतवारीनं कसंबसं बसत-उठत ‘ भुलेरी ’ गांवची शींव ओलांडून, ज्यावेळीं तेथील एका पथिकाश्रमाजवळ येऊन आम्ही दाखल झालों, त्यावेळीं माझ्या जीवांत थोडा जीव आला आणि डोक्यावरील एक मोठीच धोंड खालीं उतरल्यामुळं, मला थोडं हलकं हलकंहि वाटूं लागलं !”

निवेदन केलीं आणि त्यांच्याकडून एक मनुष्य घेऊन, त्याची डॉक्टर आणण्यासाठीं तांतडीनं अगोदर गांवांत रवानगी केल्यानंतर, माडीवरील पश्चिम बाजूच्या दोन सोयीवार खोल्या मी बघून घेतल्या व एकींत सर्व सामान व्यवस्थित तऱ्हेनें लावून, दुसरींत रामामानंदांना निजण्याची मी सर्व सोय करून दिलीं! सुमारें अर्ध्या तासानंतर पाठविलेला मनुष्य डॉक्टरसाहेबांना घेऊन परत आला! डॉक्टरसाहेब खरोखरच फार सज्जन माणूस होते! त्यांनीं रामानंदांना नीटपणें तपासून, औषधाची उत्तमप्रकारें व्यवस्था केली व सकाळीं पुनः येतो असं सांगून त्यांनीं आमचा निरोप घेतला! मीहि सकाळपासूनच्या दगदगीनं चांगलाच दमलों असल्यामुळं, विश्रांति घेण्याच्या उद्देशानं आपल्या खोलींत आलों व जेवणास अजून बराच अवधि असल्यामुळं स्वस्थपणानं डोळे मिटून कॉटवर अंग टाकिलें!"

"राधाकमल! आपण अजून काश्मिरची सफर केली नाहीं. पण पुढंमागं जर कधीं काश्मीरला जाण्याचा योग आलाच तर एकदां भुलेरी पाहून येण्यास मात्र विसरूं नका! राधाकमल! खरोखर काश्मिरचं काश्मीरत्व जर कुठं एकंसमयावच्छेदेंकरुन एकवटलं असेल तर तें भुलेरीसच! देवदारूच्या विशाल वृक्षांनीं आच्छादून टाकलेलीं हिमदुर्गांचीं तीं एकाहून एक उंच गेलेलीं उत्तुंग शिखरं...जिकडं तिकडं उगवेलल्या हिरवळीवर मधुनच नाचणाऱ्या निरनिराळ्या धान्यांच्या शेतांनीं चित्रित केलेले ते रम्य भूभाग...उमलत्या कमलिनींनीं प्रफुल्लित दिसणाऱ्या 'मदनारा' सरोवराच्या प्रशांत जलाशयावर स्वेच्छेनं क्रीडा करणारे ते हंस...फ्लॉपरच्या रम्य राईमधून नागमोडी वळणांनीं गांवच्या शिंवाराला वेढा देणारा 'झेलम' नदीचा तो सुंदर प्रवाह... राधाकमल, हें रमणीय दृश्य पाहिलं कीं चित्तवृत्ति अगदीं थरारून जाऊन देहभान हरपून जातं अन् आपण स्वर्गीच्या नंदनवनांत तर सहल करीत नाहींना, असा क्षणोक्षणीं भास होतो!"

"भुलेरीस ज्या पथिकाश्रमांत आम्ही उतरलों होतों, त्या

ठिकाणीं किशोरी नांवाची एक सतरा अठरा वर्षं वयाची काश्मिरी तरुणी आमच्या खास तैनातींत होती ! भ्रमराप्रमाणं काळयाभोर असणाऱ्या तिच्या सुंदर डोळ्यांत एक प्रकारचं विलक्षण तेज नेहमीं झळकत असें ! कुंदकळ्यांना लाजविणारे तिचे पांढरे शुभ्र दांत तर इतके मोहक होते कीं, ती किंचित् जरी हंसली तरी त्यांची नाजुक प्रभा तिच्या गोड चेहऱ्यावर नुसती फुलून राही ! आमची भाषा तिला अगर तिची भाषा आम्हांला मुळींच समजत नसल्या-मुळं, आमचा बहुतेक व्यवहार हाताच्या खुणांनी अथवा तोंडा-वरील आविर्भावांनींच होत असे ! "

" पांच सहा दिवसांच्या कालावधीनंतर रामानंदांना बराच आराम वाटूं लागला होता; परंतु आणखी आठ दिवस तरी अंथ-रुणावरून मुळींच न हालतां, स्वस्थपणें पडून विश्रांती घेतली पाहिजे, अशी डॉक्टरसाहेबांनीं सक्त ताकीद दिली असल्यामुळं, मला दिव-साचा बराच भाग त्यांच्या उशाजवळ बसून त्यांची करमणूक कर-ण्यांत घालवावा लागे. त्यांना चहा, कॉफी वगैरे कांहीं लागलं कीं, पुनः पुनः किशोरीस हांक मारण्याची पाळीहि मजवरच येई ! प्रत्येक खेपेस खोलींत येतांच किशोरी माझ्याकडे मधुनमधून चोरून पाहण्याचा प्रयत्न करी ! मीहि खालच्या नजरेनं तिच्याकडंच दृष्टीक्षेप करीत असें. एखादें वेळीं तिच्या हें ध्यानांत येतांच, गालांतल्या गालांत किंचित् हंसून ती चटकन् आपली नजर दुसरी-कडं वळवी ! आमच्या या गमतीदार लपंडावाची तिला मोठी मौज वाटे ! "

" रेशमाप्रमाणं मऊ असणाऱ्या तिच्या लांब अन् सडक केसांची पाठीवर मोकळीच पडलेली ती वेणी...कोंवळ्या उन्हांत दंवबिंदूनीं टवटवीत दिसणाऱ्या गुलाबालाहि लाजविणारं तिचं तें मुखकमल ...अंगांत असलेल्या केशरी रंगाच्या रेशमी झग्यांतून उठावदारपणें दिसून येणाऱ्या उन्नत वक्षस्थलावर सहजतेनं रुळणारी मण्याची ती दूड...कोकिळेच्या गायनापेक्षांहि गोड वाटणारा तिच्या पायां-तील तोरड्यांचा होणारा तो मंजुळ नाद...प्रत्येक अवयवांतून रसरस-

णाऱ्या तारुण्याच्या बहराचं आकलन करण्याकरितांच कीं काय, डोक्यावरून घेतलेली ती झिरझिरित ओढणी......राधाकमल, अशा थाटांत कामासाठीं इकडंतिकडं येरझारा घालणारी ती छोटी छोकरी दृष्टीस पडली कीं, भुलेरीच्या सभोंवार दृग्गोचर होणारं काश्मिरचं सृष्टीसौंदर्य अधिक मोहक कीं, समोर हलणारं हे चालतं बोलतं जिवंत स्त्रीसौंदर्य अधिक मोहक, असा प्रश्न चटकन् माझ्या पुढं उभा राही अन् माझं दुबळं मन ह्याचं उत्तर देण्याचाहि थोडाफार प्रयत्न करी !"

"एके दिवशीं रात्रीं रामानंदांना झोंप येईना म्हणून, त्यांना "The Tempter" ह्या नांवाची एक प्रणयपूर्ण इंग्रजी कादंबरी वाचून दाखवीत, बराच वेळपर्यंत मी त्यांच्या उशाजवळ बसलों होतों सुमारें अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांचा डोळा लागूं लागला. मलाहि झोंपेनं चांगलचं घेरलं असल्यामुळं, मी पुस्तक मिटून त्यांच्या उशालगतचा दिवा लहान केला व पावलांचा आवाज न होईल अशा बेतानें बाहेर येऊन, खोलीचें दार लावतों न लावतों तोंच, खालचीं आंवरासांवर संपवून निजण्यासाठीं तिसऱ्या मजल्यावर असलेल्या आपल्या खोलीकडं जाणारी किशोरी माझ्या नजरेस पडली ! कसंबसं लपेटलेल्या काळया किनारीच्या पांढऱ्या स्वच्छ पातळांत तिची देहलतिका अत्यंत मोहक दिसत होती ! पाठीवर मोकळयाच सोडलेल्या विशाल केशराजींतील कित्येक पेड लडिवाळपणानें पुढें येऊन तिच्या उरोभागावर सैरावरा बागडत होते ! गच्चींत संथपणें तेवणाऱ्या कंदिलाचा सौम्य प्रकाश सभोंवार पसरला होता ! अस्फुट मधुरतेची गोड छटा किशोरीच्या कोमल कपोलावर मधुनमधून चमकत होती. !"

मनुष्य प्राणी......कसली विचित्र जात ईश्वरानें निर्माण केली आहे...!!!

विकल स्थितींतील किशोरीच्या उन्मादी सौंदर्यानें मला वेडा बनविलें ! पापी विचारांच्या शराबाची मादक धुंद माझ्या डोळयांसमोर तरळूं लागली ! माझी चित्तवृत्ति विचलित होऊन, माझे विषयी

विकार क्षणार्धांत जागृत झाले! मी काय करतों आहें, याची जाणीव मला उरली नाहीं! भावनेच्या भरांत मी एकदम तिचा हात पकडला व तिला खोलींत ओढून दार लावून घेतलें.

“शशकाप्रमाणं अंग चोरून भीतीनं थरथर कांपणारी किशोरी खोलींत माझ्यासमोर एकटी......अगदीं एकटी उभी आहे असं पहातांच, तिच्याविषयींची माझी अभिलाषा अधिकच तीव्र-तेनं उत्तेजित होऊं लागली! अधःपतनाच्या एकेक पायऱ्यावरून खालीं घसरत घसरत दुर्गतीच्या हीन गर्तेकडं, टेकाडावरून सुट-णाऱ्या धोंडयाच्या द्रुत गतीनं मी निसरूं लागलों! कामवासनेनं अंध झाल्यामुळं पागल बनलेलं माझं मन तिच्याभोंवतीं जास्तच लडबडूं लागलं! आपल्या बाहूंपाशांत तिला कंवटाळण्यासाठीं मी हलकें...हलकें पुढं सरकूं लागलों...!......!!”

“आतां आपण ओरडून जर माणसं जमविलीं तर आपल्याच अब्रूवर किटाळ येउन आपणांस पथिकाश्रमांतून जावं लागेल, या भीतीनं किशोरी ओरडली नाहीं! आपलं शील संरक्षण करण्या-साठीं मात्र, तिनं जीवाचीहि कदर न बाळगतां, अंगांतील शेवटच्या धुगधुगीनं माझा प्रतिकार केला पण भोगतृष्णेसाठीं आतुर झालेल्या एका नरपिशाच्चासमोर गलबलून गेलेल्या त्या दीन हरिणीचा कितीसा टिकाव लागणार...?...?? निर्बल, असहाय होऊन लवकरच ती जमिनीवर निश्चेष्ट होऊन पडली! सैतानी विजयानं माझं शरीर प्रस्फुरूं लागलं! एखाद्या गिधाडाप्रमाणं तिच्यावर मी एकदम झडप घातलीं. माझ्या मगरमिठींतून तिची सुटका होतांच, धांपा टाकीतच ती दरवाजाकडं धांवत गेली व झटकन् कडी काढून क्षणार्धांत तिसऱ्या मजल्यावरील आपल्या खोलीकडं तिनं प्रयाण केलं!

यानंतरच्या चारपांच दिवसांत किशोरी माझ्या वाऱ्यालाहि उभी राहिली नाहीं! रामानंद आतां चांगलेच खडखडीत बरे झाले असल्यामुळं, आम्ही लवकरच आमच्या राहिलेल्या प्रवा-सास आरंभ केला! माझ्या साहसी अधोगतीची स्मृति हलकें

हलकें माझ्या अंत:करणाच्या सीमारेषेबाहेर पाऊल टाकूं लागली. एकदोन आठवड्यांतच मी किशोरीस पार विसरून गेलों!!

" सव्वीस सत्तावीस वर्षांनंतरची गोष्ट ! मी "Roses of Kashmir" या नांवाचं एक प्रवासात्मक पुस्तक लिहीत असतां, कांहीं कारणानं पुनः भुलेरीस जाण्याचा मला योग आला ! जवळ जवळ पाव शतकाच्या एवढ्या दीर्घ मुदतींत भुलेरीस म्हणण्यासारखा असा कांहींच फेरबदल झाला नव्हता ! ज्या पथिकाश्रमांत पूर्वी आम्हीं उतरलों होतों तें पथिकाश्रमहि अजून पूर्वींच्याच जागीं कायम होतं. फक्त त्याच्या अंतर्बाह्य रचनेंत कालमानाप्रमाणं थोडीशी सुधारणा करून, त्याला कांहींसं आजतागायत स्वरूप देण्यांत आलं होतं !"

" संध्याकाळच्या सहाचा सुमार होता ! मी जेवावयास बसलों होतों व स्वत: मालक मला काय हवं नको याबद्दल तत्परतेनं चवकशी करीत होते ! बोलतां बोलतां सहज विषय निघाला म्हणून मी विचारलं...' का हो ! या आश्रमाचे पूर्वीचे मालक आपणांस ठाऊक असतील...?'...??"

" हो ! हो !! साहेब, ठाऊक असतील म्हणजे !" मालकांनीं मोठ्या अदबीनें उत्तर दिलें—" ते माझे वडीलच कीं !"

" असं का ?" जरासें आश्चर्य दाखवीत मी उद्गारलों—" सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी या ठिकाणीं मी एक पंधरा दिवस घालविले होते !...फार जुनी गोष्ट आहे म्हणा ! तुम्हाला आठवतहि नसेल !"

" वाः ! साहेब ! न आठवायला, काय झालं ? त्यावेळीं मी चांगला सोळा सतरा वर्षांचा होतों कीं ! तुमचे मित्र मध्येंच आजारी पडल्यामुळं तुमच्या प्रवासांत अचानक खंड पडून, तुम्हाला इथं बराच मुक्काम करावा लागला...माडीवरील पश्चिम बाजूच्या त्या शेवटच्या दोन खोल्याच तुम्ही घेतल्या होत्या...

अलीकडील खोलींत तुमचे मित्र निजत व अंगणाच्या बाजूकडी ती पलीकडची खोली तुमच्याकडे असे! "

" ह्याच...अगदीं ह्याच वेळीं पथिकाश्रमांतील त्या तरु मोलकरणीची–किशोरीची मला एकाएकीं स्मृति झाली! कुतूहला लगेच मी प्रश्न केला–' काहो! मालक! तुमच्या वडिलांच्य वेळीं किशोरी म्हणून एक सुंदर मुलगी इथं कामाला होती, त हल्लीं कुठं असते हो?...?'...! "

" हल्लीं कुठं असते?...??" जराशा दु:खित स्वरांतच माल उत्तरले–" साहेब! त्यानंतर थोड्याच दिवसांनीं बाळंतपणां तिचा अंत झाला! "

" अरेरे! गरीब बिचारी!!" मला साहजिकच वाईट वाटून माझ्या तोंडांतून आपोआप शब्द बाहेर पडले.

" तो पहा तिचा मुलगा...!...!!" बाहेरच्या आवारांती गोठ्याजवळ पडलेल्या शेणालिदीचा ढीग चिवडीत असलेल्या एका लंगड्या हडकुळ्या माणसाकडे अंगुलीनिर्देश करीत माल म्हणाले.

मी शेजारच्या दारांतून अंगणांत दृष्टि फेकली... मला एकद हंसू लोटलं—

" तिचा मु–ल–गा–?...??—??? आईसारखा तर मुळीं दिसत नाहीं! कदाचित् बापाच्या वळणावर गेला असेल...!...!?

" कदाचित्!...!!पण...साहेब, याचा बाप तरी कोण होता कुणाला ठाऊक आहे?...?? किशोरी कोणाला कांहींहि न सांगत मरण पावली! तिचं एखाद्यावर प्रेम बसलेलंहि कुणाच्या ऐवि वांत नव्हतं! संकटांत सांपडून ती गरीब गाय नाडली आहे ह गोष्ट समजतांच, प्रत्येकाला अगदीं आश्चर्य वाटलं! कुणाचाहि त्यावर विश्वास बसला नाहीं! "

"कसल्यातरी विलक्षण कल्पनेच्या भीतीनं माझ्या सर्वांगाला एव दम दरदरून घाम सुटला! सुईनं बोंचून कुरतडल्याप्रमाणं मा

पुनः मी त्या बाहेरच्या माणसाकडं पाहूं लागलों! जनावरांना पाणी पाजण्याकरितां विहिरींतून घागर काढून तो गोठ्याकडं चालला होता! चालतांना त्याच्या आंखुड पांगळ्या पायाची थोडी वेडी-वांकडी हालचाल झाली कीं, त्याला अतिशय क्लेश होत! कित्येक दिवसांत आंघोळ न केल्यामुळं, त्याच्या शरीरावर घाणीचं रोगण चढलं होत! डोक्यावर अवास्तव वाढलेल्या पिंगट केसांच्या जंजाळांतील जटा दोरखंडाप्रमाणं त्याच्या चेहऱ्याभोंवतीं लोंबक-ळत होत्या! त्याच्या अंगावर असलेल्या एकदोन कपड्यांची तर फाटून फाटून अगदीं दुर्दशा झाली होती!"

"आईबापाविना उघड्या पडलेल्या या अनाथ मुलाची माझ्या वडीलांना दया आली आणि त्यांनीं त्याला आश्रय दिला......" आवारांतील त्या माणसाची सविस्तर हकीगत सांगण्याच्या उद्देशानें मालक बोलत होते—"थोडा धर्म म्हणून आम्हीहि त्याला ठेवून दिला आहे, झालं! पण एकंदरींत साहेब, या माणसांत बिल-कुल् अर्थ नाहीं! कदाचित् इतर सर्व साधारण माणसाप्रमाणं लहानपणापासून त्याची व्यवस्थित तऱ्हेनं जोपासना झाली असती... त्याला उत्तम प्रकारचं शिक्षण मिळालं असतं, तर तोहि चांगला निपजला असता!......!!......पण......ना बाप—ना आई—ना पैसा......अशा स्थितींत त्याची काळजी तरी कोण घेणार?......??"

मी कांहींच बोललों नाहीं! पानावरून उठून मी हात धुतला व पुनः पंचवीस वर्षांपूर्वींच्या माझ्या पहिल्याच खोलीकडे हलकें हलकें चालूं लागलों! सबंध रात्रभर गोठ्यांतील त्या केविल-वाण्या जीवाविषयींच माझे विचार चालले होते! माझ्या भेकड-मनांत पुनः पुनः एकच प्रश्न येत होता...... 'अन् कदाचित् हा माझा मुलगा असला तर?'......??......तर किशोरीच्या मरणाला कारण होऊन, या विचित्र प्राण्याला मी जन्म दिला, असं नाहीं का होणार...?...?? देवा! देवा!! हें खरं असेल कां...?...???"

" त्या माणसाची जन्म वेळ बरोबर समजून घेण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं त्याच्याशीं बोलण्याचा मी निश्चय केला! माझ्या अंतःकरणांत उद्भूत झालेली भयंकर शंका एक दोन महिन्यांच्या फरकानंहि निरसन झाली असती ! "

" सकाळीं उठतांक्षणींच हाताच्या खुणेनं त्याला मी जवळ बोलावलं; पण माझं बोलणं त्याला कांहींच उमगेना ! शिवाय आपण किती वर्षांचे आहोंत, ह्याची त्याला कल्पनाहि असलेली दिसत नव्हती ! एखाद्या वेड्यापिश्याप्रमाणं हातांतील टोपल्याचा चोळमोळा करीत, अर्थशून्य नजरेनं मजकडं पहात तो उभा होता ! नंतर मधेंच कांहीं कारण नसतां, एकदम गोठ्याकडं वळून तो मोठमोठ्यानं हंसूं लागला ! हंसतांना त्याच्या उजव्या गालावर पडलेल्या बारिकशा खळीनं मला थेट किशोरीची आठवण करून दिली ! "

" इतक्यांत स्वतः मालक तिथं येऊन दाखल झाले ! त्यांच्या जवळ त्या माणसाची जन्म तारीख टिपलेली होती ! "

" माझ्या भुलेरीच्या वास्तव्यानंतर बरोबर आठ महिने सव्वीस दिवसांनीं त्याचा जन्म झाला होता !

" भयंकर वेगानं माझं हृदय एकाएकीं धडधडूं लागलं ! कुणी-तरी माझ्या छातीवर बसून माझा गळा दाबतं आहे, असा मला भास झाला ! माझा जीव गुदमरून जाऊन मला बोलतां येईना ! माझ्यासमोर उभं असलेलं तें जंगली जनावर माझ्याकडं टक लावून पहात होतं ! त्याच्या डोळ्याला डोळा भिडविण्याचा मला धीर होईना ! मी चटकन् आपलं तोंड दुसरीकडं फिरविलं व तेथून आस्तेआस्ते काढता पाय घेतला ! "

" तप्त झालेलं माझं मन ताळ्यावर आणण्यासाठीं सारा दिवस मी झेलम नदीच्या कांठाकांठानं हिंडत होतों ! हजारों शंका कुशंका काढून निरनिराळ्या मुद्यांच्या सहाय्यानं माझं पितृत्व कसंबसं नाशाबित करण्याच्या प्रयत्नांत, मी तासचेतास घालविले पण डोक्याला व्यर्थ शीण देण्यापलीकडं त्याचा कांहींच उपयोग झाला

नाहीं ! प्रत्येक खेपेस ‘ हा माझा मुलगा ’ ह्याच भावनेचा माझ्या मनावर अधिक पगडा बसे व मी जास्तच भेडसावून जाई !

“ त्या रात्रीं मला जेवण गेलं नाहीं ! बराच वेळपर्यंत मी सारखा अंथरुणावर तळमळत पडलों होतों ! तें विचित्र ध्यान माझ्याकडं पाहून, मला ‘ बाबा ! ’ म्हणून हांक मारीत आहे, असा मला क्षणोक्षणीं भास होत होता ! अगदीं पहांटेच्या सुमारास माझा थोडा डोळा लागला......आणि त्यांतच मला एक फार भयंकर स्वप्न पडलं ! ”

“ गोठ्यांतील त्या मुलाचा जन्मदाता कोण, हें शोधून काढण्यासाठीं माझ्या कॉलेजांतील सारी प्रोफेसर मंडळी माझ्या सभोंवार जमली होती ! प्रत्येकजण एकदां माझ्याकडं तर एकदां त्या झिपऱ्या कुतऱ्याकडं मोठ्या बारकाईनं पहात होता ! इतक्यांत त्यांपैकीं एकजण जोरानं ओरडून म्हणाला......अहो ! शंकाच नको ! हा ह्याचाच मुलगा ! तोंडावळ्यांत पहा, केवढं साम्य दिसतं आहे तं !......मी हळूंच खालच्या नजरेनं वर पाहिलं. त्या पशूंत अन् माझ्यांत विलक्षण सारखेपणा दिसून येत होता !...... मी एकदम चमकून गेलों ! लज्जेनं अर्धमेला झाल्यामुळं दोन्ही हातांनीं मी आपलं तोंड झांकून टाकलं व तेथून वाट फुटेल तिकडं सैरावैरां धांवत सुटलों ! इतक्यांत त्या गोठ्यांतील माणसाचं पिसाळलेल्या कुत्र्यांत रूपांतर होऊन, अतिशय वेगानं त्यानं माझा पाठलाग सुरू केला ! एक दोन पळांतच मला गांठून त्यानं माझ्यावर उडी घातली व पोटरीचा एक लचका तोडून माझ्या नरडीचा घोट घेण्यासाठीं तें धडपड करूं लागलं ! भयानं घाबरून जाऊन, मी एकदम मोठ्यानं किंकाळी फोडली अन्......लगेच जागा झालों ! ”

“ हें स्वप्न असं उमगून येतांच मला थोडं हायसं वाटलं; पण ‘ हा माझा मुलगा ’ ही कल्पना माझ्या डोक्यांत इतकी भिनून गेली कीं, त्या मनुष्याला पुनः पाहून एकदां काय तो सोक्षमोक्ष करून टाकण्यासाठीं मी अगदीं वेडा झालों ! ”

" सकाळीं तो ओंगळ अवतार बाजारांतून भाजीची पाटी डोक्यावर घेऊन परत येत असतां, त्याला मी रस्त्यांतच गांठला व त्याच्या हातांत कांहीं पैसे टाकण्याचं निमित्त करून, त्याचा चेहरा अगदीं सूक्ष्म तऱ्हेनं अवलोकन करण्याची मी संधि साधून घेतली ! माझ्या न्याहाळून पहाण्यानं तें वेडं थोडंसं बावरून गेलं ! एखाद्या वावश्याप्रमाणं विचित्र मुद्रा करून चमत्कारिक रीतीनं हंसत, त्यानं लवकरच तेथून पोबारा केला ! "

"आदल्या दिवसाप्रमाणं तो दिवसहि मला अत्यंत कष्टाचा गेला!"

" रात्रीं जेवण झाल्यावर बाहेरील मोकळया गच्चींत मी शतपावली करीत होतों ! इतक्यांत कांहीं निमित्तानं मालक तिथं आले ! इकडच्या तिकडच्या दोन चार गप्पा मारल्यानंतर संशय न येईल अशा बेतानं, मुद्दामच मी त्या मुलाचा विषय उकरून काढला......अन् म्हणालों—' मालक ह्या अनाथ पोरक्या पोराची मला फार दया येते......! त्याला कांहींतरी मदत करावी अशी माझी मनापासूनची उत्कट इच्छा आहे !'......! ! "

" कुणाच्याहि सदिच्छेच्या आड येणं ही गोष्ट वाईट हें खरं, पण साहेब, ह्या बाबतींत तरी आपल्या थोर हेतूचा फारसा उपयोग होईल, असं मला वाटत नाहीं.

" मालकांना अधिक आग्रह न करतां, मी स्वस्थ राहिलों ! मनाचं समाधान करण्यासाटीं काय करावं, ह्या विचारांनीं माझं मन पुनः विचारग्रस्त झालं ! "

" मध्यरात्रीच्या सुमारास दारूनं बेहोष होऊन तो पशु कसाबसा घरीं परत आला आणि साऱ्या पथिकाश्रमांत त्यानं एकच दंगल उडवून दिली ! गोटयाजवळ असलेल्या गवताच्या गंजीला जवळ जवळ आग लावून, हातांतील कळकटानं एका म्हशीला त्यानं अगदीं मरेमरेतोपर्यंत झोडपून काढली ! सर्वांवर कळस म्हणूनच कीं काय, आळवाच्या खळीशीं माजलेल्या चिखलांत त्यानं आपलं अंग टाकून दिलं व तिथं स्वस्थ चित्तानं घोरावयास सुरवात केली.

माझ्या सकाळच्या बक्षिसाची झालेली ही विल्हेवाट पाहून, मला अत्यंत वाईट वाटलं. दुसऱ्या दिवशीं मालकांनीं मजकडे येऊन पुनः त्याला एक पैहि न देण्याविषयीं मला मोठया कळकळीची विनंति केली—' ह्या माणसाजवळ कधींहि साहेब, एक पैसा नसतो ! ताडीच्या दुकानीं जाऊन स्वारी बेवडा झोंकून आली कीं समजावं, जाणाऱ्या येणाऱ्या एखाद्या अनोळखी प्रवासी महात्म्यानं भिकारी म्हणून दोन चार आणे अंगावर फेकले असावेत ! त्याला पैसा देणं म्हणजे खरोखर मृत्यूला हांक मारून त्याला त्याच्या स्वाधीन करण्यासारखं आहे ! ' ..... !! ”

“ सकाळ संध्याकाळ शेणालिदीचा उकिरडा उपसणाऱ्या त्या हमालाकडं.........माझ्या मुलाकडं विषण्ण चित्तानं पहात दोनचार दिवस मी खोलींत बसून काढले; पण नंतर त्या दुर्दैवी प्राण्याचं तें अमंगल जीवन उघडया डोळयांनीं पहात बसणं, मला बेशरमपणाचं वाटूं लागलं ! क्षणाचाहि विलंब न लावतां, मी आपलं सामान गुंडाळलं व तिथून एकदम चालता झालों ! ”

“ भयंकर कल्पनांच्या जळजळाटनं बेचिराख करून टाकलेल्या-माझ्या निर्जन आयुष्यांतील पुढील तीन वर्षे मी कशीबशी ढकललीं ! पण त्यानंतर माझ्या अंतःकरणांतील सुप्त भावनांच्या संवेदना जोरानं स्फुरूं लागून, गूढ अशा लाग्याबांध्यानं मी पुनः भुलेरीकडे ओढला जाऊं लागलों ! गोठयाच्या आसपास सरपटणाऱ्या त्या माणसाला फिरून पहाण्याची माझ्या हृदयांत एवढी तीव्रमनीषा जागृत झाली कीं, मी भुलेरीस केव्हां जाऊन पोहोंचलों, याचं मला भान सुद्धां राहिलं नाहीं ! ”

“ त्या माणसाला......... माझ्या मुलाला त्याच्या किळसवाण्या दैन्यावस्थेची जाणीव करून देऊन, त्यानं थोडंतरी नीट वागावं म्हणून, त्याला मी अनेक प्रकारें उपदेश करून पाहिला; पण त्याच्या हेकेखोर द्वाडपणापुढं कशाचाहि उपयोग झाला नाहीं ! त्याला सोसाव्या लागणाऱ्या यातना कांहीं कमी होऊन त्याचं आयुष्य थोडंतरी सुखांत जावं म्हणून, मी हजारों प्रयत्न केले; पण

दारूसाठीं अंगावरील कपडे विकणाऱ्या त्या राजेश्रींनीं ते सर्व पालथ्या घागरीवरील प्राण्याप्रमाणं निरर्थक ठरविले! शेवटचा उपाय ह्मणून मालकाची सहानुभूति मिळविण्याच्या खटपटीस ज्यावेळीं मी लागलों, त्यावेळीं तर ते अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले! जराशा तिरसटपणानंच त्यांनीं मला दोन शब्द सांगण्याचं धाडस केलं.........'साहेब! या माणसाला सुधारण्यासाठीं आपण जे जे म्हणून प्रयत्न करतां, त्यानं त्याचा फायदा होण्याऐवजीं नाश मात्र होईल! जरा का फुरसद अन् पैसा मिळाला कीं, या दिवट्यानं कुठंतरी काडी लावलीच म्हणून समजा! एखाद्या डाकूप्रमाणं याला सारखा नजरेच्या कैदेंतच ठेवला पाहिजे......!! अनाथ अर्भकांवर आपणाला जर उपकारच करावयाचे असतील तर जगांत आज अशीं कितीतरी बेवारशी बालकं उघडीं पडलीं आहेत कीं, आपल्या उदार मदतीचा कनवाळू हात आपण जर पुढं केला तर त्यांच्या जन्माचं सोन्याहूनहि पिवळं होईल...!!.........!!!"

"मालकांची ही समंजसपणाची विचारसरणी मला पटली; पण तिनं माझं समाधान कसं होणार?...??"

"या मुलाच्या आयुष्याचा मी खेळखंडोबा केला होता..... त्याला माणुसकीला मुकवून, गोठ्यांतील जनावरांच्या दावणीला मी अडकवलं होतं............त्याच्या आईला पापकर्मांत रुतवून, तिला मी मृत्यूची वाट दाखविली होती.......!......!!!"

"गोठ्यांतील त्या मुलाचा मी पिता ही गोष्ट मालकांना जर त्यावेळीं मी सांगितली असती......तर...माझ्या आयुष्याचा सत्यानाश होऊन काळवंडलेलं माझं हें थोबाड जगांत कुठंतरी मला दाखवितां आलं असतं का ...?...???"

तारानाथांना पुढें बोलवेना. एकदम भडभडून आल्यामुळें डोक्याला हात देऊन ते खालीं पाहूं लागले. पश्चात्तापाचे जळजळीत अश्रू त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरून टपटपां खालीं निसरत होते.

राधाकमलांचाहि कंठ दाटून आला. संकोचवृत्तीमुळें बांकावरून उठून ते कारंज्याजवळील मदनबाणाच्या झाडाजवळ जाऊन उभे राहिले. इतक्यांत गार वाऱ्याची एक गोडशी झुळुक आली आणि तिच्या आंदोलनांत मदनबाणाचें तें झाड आपादमस्तक डोलूं लागलें. वरकरणीं राधाकमलांची दृष्टि जरी त्या झाडावर खिळल्यासारखी दिसत होती, तरी त्यांच्या मनश्चक्षूंसमोर मात्र, दीनपणानें हिंडणाऱ्या हजारों पोरक्या पोरांच्या केविलवाण्या वाताहतीचें करुणरम्य चित्रच मूर्तिमंत तरळत होतें.

| प्रकाशनस्थल:— | Guy De Maupassant | प्रकाशनकाल:— |
|---|---|---|
| 'मनोरंजन' | च्या<br>"THE SON"<br>ह्या गोष्टीवरून | नोव्हेंबर-डिसेंबर<br>१९३२ |

# का हो किती वाजले ? : : ३

त्या वेळीं मी ज्यूनियर बी. ए. च्या वर्गात होतों. कॉलेजमधील आयुष्य किती स्वच्छंदी, किती मजेदार, किती आनंददायी, किती निष्काळजी ह्याची खरीखुरी कल्पना त्याचा अनुभव घेणारां-शिवाय इतरांना क्वचितच असेल. त्यांतल्यात्यांत ज्यूनियरची और मजा तर विचारायलाच नको. 'व्हेनिस पहावें, मग मरावें' अशा अर्थाची एक म्हण ज्याप्रमाणें युरोपमध्यें प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणें कॉलेजच्या स्वतंत्र वातावरणांत 'जन्माला यावं आणि एकदां तरी ज्यूनियर भोगावं,' अशा आशेच्या झुळकीच प्रत्येकाला हलवून सोडीत असतात. नेपोलियन्नें Impossible हा शब्द आपल्या कोशां-तून काढून टाकला होता म्हणतात; पण कॉलेजचे विद्यार्थी—विशेषत: ज्यूनियरचे सरस्वतीभक्त 'जबाबदारी' ह्या शब्दाला तिलांजली देऊनच कॉलेजमध्यें पाऊल टाकीत असतात. खरेंच आहे! महि-न्याच्या कांठीं बाप कधीं ५० रुपयांच्या ऐवजीं ४९ रुपयांची मनी-ऑर्डर करीत नाहीं! मग ह्या बेट्याला कसली काळजी आणि

कोणती जबाबदारी वाटावी ! ह्या नियमाला मी अपवाद होतों अशांतला भाग नाहीं. ' सर्व एकाच माळेचे मणी ! '

असो. आमच्या कॉलेजांतील*** ना श्राद्ध, पक्ष वगैरे ठिकाणीं आमंत्रण येण्याचा फारसा ' चान्स ' नसल्यामुळें, आमचें कॉलेज बरोबर अकरालाच सुरु होई ! मला परीक्षा असून नसल्या सारखीच असल्यामुळें क्लासला वेळेवर हजर रहाण्याचा जरी मी कधीं त्रास घेत नसें, तरी घरून मात्र कॉलेजमध्यें जाण्यासाठीं मी साडेदहा वाजतांच कूच करीं. अहो ! कॉलेजमध्यें वर्गांत शिकण्याशिवाय इतर कांहीं थोडीं व्यवधानें असतात का ? लायब्ररीच्या प्रशस्त गच्चीवरील अवास्तव गप्पा, बागेंतील ००० टेहळणी(?) व जाणारायेणारांची टवाळी, जिमखान्याच्या व्हरांड्यांतील पिंगपाँग ( तासाला बुट्टी देऊनसुद्धां ) असल्या सटरफटर गोष्टींतच दोनचार तास केव्हांच निघून जातात. खरोखर ! माझे हे दिवस किती लवकर जात होते, ह्याची मला कल्पनासुद्धां नव्हती. माझा दिनक्रम अगदीं सांच्यांत बसविल्याप्रमाणें ठरून गेला होता. कॉलेजला जाण्याचा रस्तासुद्धां मी सरळ आंखून ठेविला होता. बरोबर साडेदहालाच मी घरून निघत असें व साधारण पांचसात मिनिटांतच ' शिवाजी मंदिरा ' जवळ पोंहोंचें. त्याच ठिकाणीं एका–अर्ध्या फर्लांगाच्या टापूंतच आपल्या लहानग्या भावाबरोबर शाळेंत जाणारी एक १४।१५ वर्षांची विद्यार्थिनी मला दररोज भेटे. त्या मुलीबरोबरचा तो मुलगा फार झालें तर सात किमान आठ वर्षांचा असेल. अंगांत किरमिजी रंगाचा ' नेव्ही ' सूट, त्यावर पांढऱ्या किनारीचें निळें ' फ्लॅपर, ' डोक्याला चिमुकलीशीच ' फेल्ट हॅट ' व गळ्यांत पाटीपुस्तकांची कातडी पिशवी, अशा थाटांतल्या त्या बालमूर्तीचें मला मोठें कौतुक वाटे. आपल्या गोजिरवाण्या हातानें ताईचें बोट धरून चिल्‌बिल् करीत नाचत बागडत जाणाऱ्या त्या रमणीय दृश्याकडे मी कित्येकवेळां, मागें वळूनसुद्धां टक लावून पहात असें.

नियमानें एकाच ठिकाणीं आमची दरएक दिवशीं गांठ पडत असल्यामुळें, पुढेंपुढें आमची तोंडओळख झाली होती.

एके दिवशीं मला पहिले दोन ' अवरस् ऑफ ' असल्यामुळें मी मनांत विचार केला कीं, आज अकरा वाजतांच निघूं, म्हणजे तास–अर्धातास लायब्ररींत वर्तमानपत्रें वरखालीं करावयाला सांपडतील, व ' प्रेझेंटी ' च्या तासालाहि वेळेला जातां येईल. आज मात्र ती जोडी बहुतेक भेटणार नाहीं, अशी माझी खात्री होती; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं ' शिवाजी मंदीर ' ओलांडून १०।२० पावलें मी पुढें जातों न जातों तोंच ती दुक्कल घाईनें, जणु काय एखादा वाघच पाठीमागें लागला आहे इतक्या त्वरेनें येतांना मला दिसली. त्या लहान मुलाचे पाय तर एकमेकांत अडखळत होते. तरी तो चालत...पळत, झरझर चालणाऱ्या आपल्या ताईमागें येत होता.

त्या मुलीची व माझी दृष्टादृष्ट होतांच ह्या मजेदार योगायोगाबद्दल मला मौजेचें आश्चर्य वाटलें; आणि आश्चर्याची मौज ही कीं, तिच्याहि मनांत त्याच भावनेची संवेदना उमटली असावी, असें तिच्या भावनाप्रधान चेहऱ्यावरून अजमावणें मला फारसें कठीण पडलें नाहीं. मला पहातांच त्या लहान बटूलामुद्धां आनंद झालासा दिसला. हंसत तो आपल्या ताईस म्हणला—

" ताई ! अग ताई ! आपल्याला कांहीं फारसा उशीर झाला नाहीं ! ते बघ दररोज इकडून कॉलेजमध्यें जाणारे आत्तांच चालले आहेत ! विचार पाहिजे तर त्यांना, किती वाजले म्हणून ! "

एका परकीय गृहस्थाला, कांहींच ओळख नसतांना, तो आपणांला दररोज भेटतो म्हणून, ओळखीच्या इवल्याशा नाजुक धाग्यावर एखादा प्रश्न विचारणें, त्या हिंदू कुमारिकेला प्रथम कसेसेंच वाटलें असावें; परंतु नंतर तिनें विचार केला असावा कीं, विचारायला तरी काय हरकत आहे ? शिवाय लाडक्या अरविंदाचा तरी, आपण ' तूंच विचार ' असें म्हणून हिरमोड कां करावा ? ( त्या मुलाचें नांव अरविंद होतें हें मला मागाहून कळलें. )

भांबावल्या वृत्तीनें का होईना, तिनें ताडकन् प्रश्न केला—

"का हो! किती वाजले आतां?"

कॉलेजमध्यें शिकावयास आल्यापासून एक खाणावळीणबाई, दूधवाली व चहाची भांडीं घांसणारी मोलकरीण वगळल्यास स्त्रियांशीं, त्यांतल्यात्यांत कुमारिकेशीं बोलण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें ह्या अनपेक्षित प्रश्नानें मी अतिशय गोंधळून गेलों. माझी वृत्ति बावरल्यासारखी झाली. हातांतील 'रिस्टवॉच' कडे पहाण्याचेंसुद्धां मला भान राहिलें नाहीं. मनाच्या असल्या तरळलेल्या स्थितींतच कॉलेजस्टूडंटला शोभेशा ऐटींत मी बेदरकार, बेजबाबदारपणानें बरळून गेलों—"बारा!"

'बारा' हे शब्द कानीं पडतांच ती बालिका भयंकर घाबरली; परंतु दुसऱ्याच क्षणीं तिने जोरानें झटकण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें पूर्वीपेक्षांहि अधिक झपाट्यानें आपलीं पावलें उचलण्यास तिनें आरंभ केला.

ह्या वेळीं त्या कोमल बच्चाची मात्र फार केविलवाणी अवस्था झाली. मोठ्या कष्टानेंच आपल्या पायांना ढकलीत, तो बहिणीमागें ठेंचकळत पळूं लागला; कारण इतक्या वेगानें तिच्याबरोबर चालणें खरोखर त्या पोराच्या आंवाक्याबाहेरचें होतें.

मीहि जरा शुद्धीवर आल्यामुळें घड्याळाकडे पहाण्याची मला आठवण झाली; म्हणून हात वर करून मी मनगटाकडे पहातों तों काय—घड्याळजींनीं सत्याग्रह पुकारलेला. आश्चर्यानें आ वासूनच मी 'शिवाजी मंदिरा'च्या पवळीकडे वेड्यासारखा पाहूं लागलों. कांहीं वेळानें आमच्या अक्कलवान् डोक्यांत प्रकाश चमकला कीं, रात्रीं किल्लीच दिली नाहीं तर तें बिचारें तरी काय करणार? आतां परत पळत जाऊन त्या मुलीला सांगावें का कीं, माझें घड्याळ बंद आहे. अजून कांहीं बारा वाजले नसतील. पण छट्—अशाने माझें 'इम्प्रेशन' किती 'लूज' होऊन, माझी 'पोझीशन्' किती 'ऑक्वर्ड' दिसेल! ती मला नेभळट, मूर्खशिरोमणीच

म्हणेल ! स्वत:शींच मोठ्याने हंसून ' जाने...दे...भाई ' असें निष्काळजीपणानें उच्चारीत मी आपल्या मार्गाला लागलों.

कॉलेजांत गेल्यावर मी सायकल–स्टँडसमोरील मोठ्या घड्याळांत पाहिलें, तों तेथें ११ वाजून फक्त २५ मिनिटेंच झालीं होतीं.

दुसऱ्या दिवशीं शिरस्त्याप्रमाणें मी कॉलेजांत गेलों; पण त्या दिवशीं मला नेहमींच्या ठिकाणीं तीं भाऊबहीण भेटलीं नाहींत. असेल ! कालच्यासारखाच त्यांना आजहि उशीर झाला असेल, असें मनाचें समाधान करून मी आपल्या इच्छित स्थानाकडे वळलों. त्यानंतरच्या २।३ दिवसांत मी रोज ती जोडी आज तरी भेटेल, अशा प्रकारच्या बळकट आशा धरून जात असें; परंतु प्रत्येक दिवशीं माझी तीव्रतर निराशाच होत गेली. माझ्या मनाची ह्यामुळें अगदीं विलक्षण, तऱ्हेवाईक स्थिति होऊं लागली. हृदयानी बेसुमार खळबळ उडून, मला अगदीं सुचेनासें झालें. वर्गात तासाकडे अगर कॉलेजमधील इतर ' ॲक्टिविटीज् ' कडे माझें मुळींच लक्ष लागेना. साऱ्या दिवसभर माझ्या डोळ्यांसमोरून तें भाऊबहिणीचें चित्र हलेना. मनांत कधीं न येणाऱ्या अभद्र विचारांच्या वावटळीनें माझें अंतःकरण भरून गेलें. निराशेच्या धूलीकणांनीं सारें जग मला शून्य भासू लागलें. मी आपल्या हळव्या मनाची पुष्कळ निरनिराळ्या प्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न करूं लागलों कीं, कदाचित् तीं दुसऱ्या गांवाला गेलीं असतील, किंवा जवळचा दुसरा एखादा रस्ता त्यांनीं पत्करला असेल, कदाचित् त्यांच्या वडिलांनीं नवी मोटार घेतली असेल, त्यांतून तीं जात असतील. परंतु असल्या काड्यामोड्या बंधाऱ्यांची दाद मनांत उसळणाऱ्या वेड्यावांकड्या विचारकल्लोळाच्या प्रचंड प्रवाहापुढें कशी लागणार ? अंतःकरणफलकावर चितारल्या गेलेल्या त्या रम्य बालबालिकेच्या प्रतिमा मी अजिबात पुसटून टाकण्याचा नेटाचा प्रयत्न केला; परंतु अपयशाच्या करवंटीशिवाय कशाचाहि मी मालक बनलों नाहीं.

शनिवारीं दुपारीं ‘ मॅच ’ असल्यामुळें कॉलेज सकाळचें होतें. मी नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें लायब्ररींत वर्तमानपत्रें चाळण्यास गेलों. ज्ञानप्रकाशांतील ‘ शिवाजी मंदिराजवळील भयंकर अपघात ’ ह्या जाड अक्षरांतील मथळ्यानें माझें लक्ष तत्क्षणीं वेधून घेतलें. पण जसजसा मी खालील मजकूर वाचूं लागलों तसतसा माझा निष्काळजीपणा, माझा बेछूटपणा माझ्या डोळ्यांसमोर तरळूं लागला. मोटारखालीं चिरडून गेलेल्या त्या बेबल्याची आठवण होतांच, माझ्या हृदयांत धडकी भरली. त्या वेळची त्याची हृदयस्पर्शी, करुण किंकाळी माझे कान बधिर करून टाकीत आहे कीं काय, असा मला भास झाला. दृष्टीसमोर काजवे चमचमूं लागले. भोंवळ आल्यामुळें मी समोरील टेबलाचा आधार घेतला. माझा स्वतःवर, स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. मी हें स्वप्नांत तर वाचीत नसेन ना, असा संशय येऊन मी खूप जोरानें आपले डोळे चोळले व हाताला एक चिमटा घेऊन पुन्हां त्या वर्तमानपत्राकडे दृष्टि वळविली. पण–पण काय ? ? पुन्हां–हृदयाला एकाद्या सुरीप्रमाणें भोंसकून टाकणारीं तींच–अगदीं तींच अक्षरं !!...!!

अरेरे ! ! माझ्या चुकीमुळें केवढा अनर्थ गुदरला. गर्वाच्या गाढवपणामुळें म्हणा, ऐटीच्या ऐषारामामुळें म्हणा, किंवा मनाच्या नेभळटपणामुळें म्हणा, माझ्या... ‘ बारा वाजले ! ’ या सांगण्यामुळें एका लहान, गोजिरवाण्या अर्भकाचे बारा वाजले, ह्या विषारी विचारानें माझ्या अंतःकरणांत हलकल्लोळ उडवून दिला. तत्क्षणीं तो कागद टेबलावर भिरकावून देऊन, मी कसाबसा खालीं आलों व तसल्या अर्धवट बेशुद्धीच्या निशेंतच मी घराचा रस्ता सुधारला.

बिनधोकपणें मी सुखरुप घरीं कसा पोहोंचलों, ह्याचें मला अजूनहि राहूनराहून आश्चर्य वाटतें.

* * *

पांचसहा दिवसांनंतरची गोष्ट ! मी कॉलेजांत चाललों होतों. इतक्यांत शिवाजी-मंदिराच्या पुढील वळणावर ती मुलगी मला भेटली. तिचा तो अश्रूपूर्ण, दुःखी चेहरा मला दिसतांच, ती माझ्यावर

खुनाचाच आरोप करीत आहे कीं काय, असा मला क्षणभर भास झाला. एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें मी थरथर कांपूं लागलों. माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. माझें डोकें भ्रमण करूं लागलें. मी काय करतोंय, कुठें जातोंय, ह्याची मला शुद्ध राहिली नाहीं. भ्रमिष्टासारखा आकाशांतील ढगांकडे, दूरवर दिसणाऱ्या एखाद्या डोंगराकडे, अगर झाडाकडे टक लावून मी पहात उभा राहीं. कितीतरी वेळ मी सारखा चालत होतों. शेवटीं ठण्—ठण्—ठण् अशा वाजणाऱ्या घंटेच्या कर्णकटु नादानें मी आपल्या वेडगळ तंद्रींतून जागा झालों, अन् पाहतों तों काय—एरंडवणा Women's University च्या भव्य इमारतींतून, हंसणाऱ्या खिदळणाऱ्या मुलींचे घोळकेच्याघोळके बाहेर पडत आहेत.

* * *

ह्या गोष्टीला आज कित्येक दिवस झाले; पण शिवाजी मंदिराकडच्या रस्त्यानें जाण्याचें धारिष्ट अजूनहि मला करवत नाहीं !

| प्रकाशनस्थल:— | स्वतंत्र | प्रकाशनकाल:— |
|---|---|---|
| ' यशवंत ' | | जून १९३० |

## पुनर्जन्म : : : ४

विहार गांवच्या प्रत्येक कोळयाला गिरजेची हकीकत ठाऊक होती.

खरोखर! लग्न झाल्यादिवसापासून त्या बिचारीला सुखाचा एक क्षणसुद्धां ठाऊक नव्हता. खळ्यावर आणून टाकलेलीं धान्याचीं कणसें शेतकरी जसा दांडक्यानें जोरजोरानें झोपडतो, त्याचप्रमाणें तिचा नवरा तिला दररोज कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरून निर्दयपणानें झोडपीत असे.

रोज मिळणाऱ्या मारानें अर्धमेल्या झालेल्या बिचाऱ्या गिरजेला, जीव अगदीं नकोसा झाला होता.

तिचा नवरा पर्वती हा खाऊन पिऊन चांगला सुखी होता. त्याचा धंदा चांगला चालत होता. मासे धरण्याकरितां त्यानें एक नाव खरेदी केली होती. गिरजेच्या माहेरची अत्यंत गरीबी होती, तरी तिच्या सौंदर्यानें मोहित होऊन, पर्वतीनें तिच्याशी लग्न केलें होतें. पुष्कळ बाबतींत पर्वती पशुतुल्य आचरण करी हें खरें; पण

धंद्यांत मात्र त्याचा हात धरणारा एकही कोळी साऱ्या विहार गांवांत नव्हता. यशस्वी नाविकाला अत्यंत अवश्य असणारी बेगुमान धडाडी तर पर्वतीच्या अंगीं नांवाजण्याजोगी होती.

माशाच्या फेरीवरून परत आल्यावर झालेला शीण घालविण्याकरितां व पुढील कामाला पुन्हां जोम यावा म्हणून, घरीं येण्यापूर्वी म्हाताऱ्या जानबाच्या ताडीच्या दुकानीं जाऊन, सुरादेवीची सेवा करण्याचा पर्वतीचा रोजचा क्रम होता. एखादे वेळीं जादा मिळकत झाली कीं, मग त्याच्या रागरंगाची और मजा तर विचारायलाच नको ! दारूच्या प्रवाहांत त्याची अक्कल कुठल्या कुठें वहात जाई व बेभानपणें तो बाटल्यांमागून बाटल्यांचा फन्ना उडवी.

दारूच्या किती बाटल्या घशाखालीं गेलेल्या आहेत ह्याचें भान अशा स्थितींत मदिरासक्त पर्वतीला कोठून राहणार ?

दुकानांत दारूचे पेले भरण्याचें काम जानबाची मुलगी गिरजाच करीत असे. फुलपांखराप्रमाणें सदा बागडणाऱ्या फुलपांखराच्या आनंदीवृत्तीनें व तजेलदार तारुण्यानें तिनें साऱ्या लोकांचीं मनें आपल्याकडे ओढून घेतलीं होतीं. तिचें आचरण इतकें निष्कलंक होतें कीं, तिच्याविषयीं वेडावांकडा असा एक शब्दही बरळण्याची दारूनें बेहोष झालेल्या दारूड्यांचीसुद्धां छाती नव्हती !

पर्वती ज्या ज्या वेळीं गुत्त्यांत जाई, त्या त्या वेळीं गिरिजेकडे नुसतें पहात बसण्यांत त्याला कितीतरी सौख्य वाटे. तरुण हृदयाच्या उचंबळीनें तो तिची स्तुति करी. दारूच्या पहिल्या प्याल्यानंतर त्याला ती सुंदर वाटे, दुसऱ्या प्याल्यानंतर तो तिच्याकडे वल्लभाच्या जुलमी नजरेनें पाहूं लागे, तिसऱ्या प्याल्यानंतर तो तिच्याकडे पाहतांना मधुनमधून मिस्किलपणानें हंसे, चवथ्या प्याल्यानंतर तिच्याशीं प्रणयाच्या चेष्टा करण्यांत तो दंग होई,...... आणि दहाव्या प्याल्यानंतर जन्मोजन्मींच्या जिवलगाप्रमाणें तीं दोघें प्रेमाच्या कानगोष्टी करूं लागत.

पण एकट्या पर्वतीजवळ बसून रहावयास गिरजेला कुठें वेळ होता ?

इतर गिऱ्हाइकांच्या गरजा भागविण्याकरितां, त्यांना बसावयास टाकलेल्या फळ्याभोंवतीं तिला सारखें पळावें लागे. उडत्या रबरी फुग्याप्रमाणें साऱ्या दुकानभर ती सारखी नाचत असे व सर्वांची मर्जी राखून हंसतखेळत आपलें काम चोख रीतीनें बजावीत असे.

दिवसेंदिवस पर्वतीचें मन गिरजेभोंवतीं जास्तच घोटाळूं लागलें. गिरजेवांचून पर्वतीला सारें जग शुष्क व निरर्थक वाटूं लागलें. कोणत्याच गोष्टींत त्याचा जीव रमेनासा झाला. मासे धरण्याच्या त्याच्या व्यवसायांतसुद्धां ह्या सतत चिंतनानें व्यत्यय येऊं लागला.

चांदण्या रात्रीं पर्वती मोठ्या उत्साहानें आपलें जाळें समुद्रांत फेंकी; पण हृदयींची हुरहूर त्याच्या देहाला जोरजोराचे धक्के देई. अनिमिष नेत्रांनीं पाहणारी गिरजेची मनोहर मूर्ति त्याच्या चित्ता-समोर नाचूं लागे; आणि जाळें वर ओढण्याचेंही त्याला भान रहात नसे. चंद्रबिम्बामुळें चमकणाऱ्या लाटांच्या खेळाकडे तो किती तरी वेळपर्यंत विमनस्कपणें नुसती दृष्टि लावून बसे.

पर्वतीला गिरजेचा विरह अगदींच असह्य झाला, तेव्हां एक दिवस तो तडक म्हाताऱ्या जानबाकडे गेला व त्यानें तिला आप-ल्याकरितां मागणी घातली.

साऱ्या विहार गांवांत पर्वतीचें स्थळ हेवा करण्यासारखेंच होतें. म्हाताऱ्या जानबानें ह्या सोयरिकीला लगेच संमति दिली.

"खरोखर, माझ्या गिरजेचें भाग्यच मोठें, म्हणून माझ्या-सारख्या कंगालाला असलें सोन्यासारखें स्थळ लाभत आहे!" जानबा सद्गदित होऊन म्हणाला.

लवकरच लाडक्या गिरजेच्या विवाहासाठीं, म्हाताऱ्या जानबानें मोठ्या मेहनतीनें सांठविलेली आपली सर्व पुंजी खर्ची घातली.

२—

एखादी गोष्ट आपल्याजवळ नसली कीं, ती मिळविण्याकरितां आपण सारखे धडपड करीत असतों; पण ती वस्तु एकदां प्राप्त झाली कीं, तिच्याविषयींची आपली आसक्ति हळुहळू कमी होऊं लागते. हीच तऱ्हा गिरजेच्या बाबतींत पर्वतीची झाली. लग्नापूर्वी

पर्वतीला वाटणारी गिरजेची ओढ, आतां कमी होऊं लागली. एकांतांत असतांना पुष्कळ वेळां आपल्या मनालाच तो प्रश्न विचारी—

" इतर स्त्रियांपेक्षां गिरजेंत आपण अधिक असें काय पाहिलें? इतर मुलींहून ती अगदी निराळी आहे ही कल्पना माझ्या डोक्यांत शिरली तरी कशी?" त्याला वाटूं लागलें, " पदरीं फुटकी कव-डीही नसलेल्या एका भिकारड्या पोरीबरोबर लग्नगांठ बांधून घेण्यांत मी केवढी घाई—केवढा मूर्खपणा केला? तें कांहीं नाहीं—! पूर्वी ठरलेल्या मसलतीशिवाय हें काम झालें नाहीं! दारूच्या मिषानें त्या कार्टीनें माझ्यावर चांगलीच मोहिनी घातली! मला खड्ड्यांत घालण्याकरितां त्या थेरड्यानेंच हें जाळें पसरलें असलें पाहिजे."

गिरजेला व तिच्या गरीब बापाला अशा प्रकारचे शिव्याशाप देत असतांना, त्याचा त्वेष अनावर होई. आपल्या रागाचा वचपा पर्वती शेवटीं जाळ्यांत सांपडून तडफडणाऱ्या बिचाऱ्या माशांवर काढी. त्या जिवांना निर्जीव करून टोपलींत फेंकीत असतांना, त्याच्या तोंडून गिरजेच्या पितरांचा सारखा उद्धार होत असे.

घरीं आल्यावर त्याच्या तोंडाचा पट्टा जास्तच जोरानें सुरू होई. तुच्छतेनें गिरजेची विटंबना करण्यास तो मागेंपुढें पहात नसे; तरी त्याच्या आरड्याओरड्याला व शिव्याशापांना ती एका शब्दानेंसुद्धां उत्तर देत नसे. तिची सहनशीलता खरोखरीच अवर्णनीय होती; पण तिच्या ह्या गुणाचा परिणाम पर्वतीच्या कठोर हृदयावर उलटाच होत असे. तिच्या शांतपणामुळें त्याच्या रागाची आग जास्तच भडके. एके दिवशीं संध्याकाळी तर, गिर-जेच्या गंभीरपणामुळें पर्वती इतका चिडला कीं, त्यानें थाडदिशीं तिच्या मुस्कटांत लगाविली.

..झालें! त्याच्या आयुष्यांतील सुखनिधान लयाला गेलें! त्या क्षणीं त्यांच्या गृहसौख्याचा जवळ जवळ शेवटच झाला!

३—

ह्यानंतरच्या दहा वर्षांत तें जोडपें, म्हणजे साऱ्या गांवच्या कुटाळकीचा एक विषयच होऊन बसला. पर्वतीच्या रानटी वागणुकीबद्दल प्रत्येकजण तिरस्कार व्यक्त करूं लागला. निरनिराळ्या, नाविन्यपूर्ण व ग्राम्य म्हणी शोधून काढण्यांत व अस्सल हलकट शिव्यांची फेर झाडण्यांत पर्वतीही कांहीं कमी तरबेज नव्हता. जहाज बंदरांत येण्याच्या दिवशीं कोळ्यांच्या बायका आपआपल्या कारभाऱ्यांची वाट पहात किनाऱ्यावर उभ्या रहात. स्त्रियांच्या ह्या घोळक्यांत गिरजा दिसली कीं, लगेच पर्वती तिला शिव्यांची लाखोली बहाल करी व तिच्याकडे तिरस्कारानें पाहून तो समुद्रांत दोन-चारदां थुंके! लाजलज्जा गुंडाळून सर्वांसमक्ष तो उघडपणें हें करीत असे. त्याच्या ह्या कृतीचा अर्थ पाहणारांना तात्काळ उमजे.

पर्वतीच्या दावणीं लागलेल्या त्या बिचाऱ्या गरीब गाईबद्दल विहार गांवांतील सारे लोक हळहळूं लागले.

बोट नांगरून झाल्यावर इतर खलाशांना सोडून पर्वती किनाऱ्यांवर गिरजेसमोर येऊन धडकला कीं, त्याच्या अंगांत जणुं समंधच संचारे! त्या साध्याभोळ्या घाबरट हरिणीवर तो खवीस एवढ्या मोठ्यानें खेंकसे कीं, तिच्या काळजाचें पाणी पाणी होऊन ती ढसढसां रडूं लागे. त्या दगडाच्या कठोर वाक्प्रहारांनीं गिरजेची करपलेली कांति जास्तच काळी ठिक्कर पडूं लागली.

पदरानें डोळे पुशीत हुंदके देणारी गिरजा पुढें व रानडुकराप्रमाणें डुरकणारा मांगहृदयी पर्वती मागें, अशीं तीं दोघें नंतर घराकडे चालूं लागत.

उंबरठा ओलांडून घरांत प्रवेश केल्याबरोबर, पर्वतीच्या सोटेशाहीला कसलाच अडथळा उरत नसे. त्या चार भिंतींच्या तुरुंगांत तो सैतान त्या असहाय अबलेचे वाटेल तसे हाल करी! अगदीं क्षुल्लक कारणावरून देखील तो तिला गुराप्रमाणें बेदम सडकून काढी. एखाद्या हिंस्र पशूला रक्ताची चटक लागली कीं, मग रक्ताच्या तहानेनें समोर दिसेल त्यावर मस्तवालपणें तुटून पडण्याची

त्याची जशी धडपड चालते, तशाच बेगुमानपणें पर्वती गिरजेशीं हिसका-हिसक करी. पर्वतीनें हात उचलला कीं, त्याला मागलें पुढलें भान रहात नसे. प्रत्येक ठोशाबरोबर तिच्या झिंज्या हासडून तो गर्जून ओरडे—

"भिकराडे! कदासिणी! काय पण अवलाद जन्माला आलीय्? आईच्या पोटांतून आल्याबरोबरच जर चचली असतीस तर—तर जग काय ओस पडलें असतें? बोल! हडळी बोल! आतां कां दांतखीळ उचकटत नाहीं! अवदसे, सगळ्या गांवांत नाचत, मुरडत हिंडतेस तेव्हां! अन् तो थेरडा—कावेबाज खोकड लेकाचा! कधीं एकदां गचकतो कोण जाणे—म्हणचे पैशाची खडीसाखर तरी वांटीन!"

गिरजेच्या संसारांत ह्या मासल्याचा तमाशा, सतत दहा वर्षे चालला होता. यामुळें ती इतकी दीन—दुबळी बनली होती कीं, कुठें कांहीं खुट् वाजलें कीं, तिचा चेहरा भितीनें पांढरा फटक पडे. बावरलेल्या नजरेनें चारी बाजूंना ती टकमक पहात राही. रोज बसणाऱ्या बडग्यांशिवाय तिला कसलीच आठवण होत नसे. पर्वती समुद्रावरून कधीं येणार, हें तिला कधींच माहित नसे; पण तो आल्यावर काय होणार, ह्याची जाणीव मात्र तिच्या मनांत पूर्ण थिंबली होती. कायेनें, वाचेनें, मनानें ती संशयी व भीरू बनली होती. काळजीच्या प्रखर आंचीनें तिची रसरशीत देहलतिका दाटरलेल्या पिंगट दोडक्याप्रमाणें वाळून —सुकून गेली होती!

४—

भविष्यकाळाविषयीं विचार करण्याची शक्ति गिरजेच्या पोखरलेल्या मनांत आतां उरली नव्हती. आपल्या कपाळीं आलेल्या ह्या भोगांत आणखी किती दिवस आपणास खितपत पडावें लागणार,—हा एकच विचार तिला वर्तमानकाळाचा वीट आणण्यास पुरेसा होता.

रात्रीची वेळ! पर्वती समुद्रावर गेला होता. पिसाळलेल्या कुत्र्यांच्या भुंकण्याप्रमाणें होणाऱ्या वाऱ्याच्या आवाजानें, गिरजा

दचकून जागी झाली. कसला तरी भलताच विलक्षण आवाज ऐकल्याचा भास झाल्यामुळें, ती अंथरुणावर उठून बसली व भयभीतपणें चहूंबाजूंचा कानोसा घेऊं लागली. बराच वेळ ती त्या स्थितींतच होती; पण कसलाच आवाज कानीं न आल्यामुळें, शेवटीं पुन्हां तिनें आंग टाकलें व लवकरच ती झोंपीं गेली.

कांहीं वेळानें घोंगावणाऱ्या वाऱ्याची एवढी मोठी गर्जना झाली कीं, त्यानें सबंध घर कोलमडून पडतें कीं काय, अशी गिरजेला भीति वाटली. चहूंबाजूंनीं पेटलेल्या वणव्यांत सांपडल्यामुळें डरकाळ्या फोडणाऱ्या श्वापदांच्या किंकाळ्याप्रमाणें होणारा तो आवाज ऐकतांच, ती चट्कन् अंथरुणाबाहेर आली. विस्कळीत झालेले आपले केंस डाव्या हातानें मागें सारून, तिनें आपला ओचापदर नीट सांवरला व हातांत दिवा घेऊन, ती किनाऱ्याकडे धूम धांवत सुटली. गांवांतील इतर मंडळीही बंदराकडेच दिवे घेऊन पळत येत होती. काळजीनें मग्न होऊन जो तो सागराच्या त्या अफाट अवताराकडे पहात होता. ताडामाडांप्रमाणें उंचउंच उसळणाऱ्या त्या भीषण लाटा, त्या लाटांवर विराजमान होणारा तो शुभ्र फेंस, क्षणोक्षणीं वाऱ्याच्या धपक्यानें त्या फेंसाच्या खंडशः उडणाऱ्या त्या राईराईएवढ्या ठिकऱ्या, त्यांना गिळंकृत करण्याकरितां टपून बसलेली ती पाण्याची खोल दरी, हा देखावा प्रत्येकाचें काळीज चरचरां चिरीत होता.

वादळाचें आकांडतांडव सतत पंधरा तास चाललें होतें. सागराच्या अथांग उदरांत अकरा खलाशी गडप झाले. घरादाराला मुकलेल्या ह्या अभागी प्राण्यांतच पर्वती एक होता.

विहारपासून दहा कोसांच्या अंतरावर किनाऱ्यावर वाहून आलेला ‘ हंसेचा ’ जीर्ण देह लोकांच्या नजरेस आला. वेलारजवळ पर्वतीच्या बोटीवर काम करणाऱ्या नाविकांचे मुडदे भरती ओसरल्यावर वाळवंटाच्या मैदानांत आढळून आले.

मात्र पर्वतीच्या देहाचा थांगपत्ता कोठेंही लागला नाहीं.

गिरजेला साहजिकच वाटलें कीं, पर्वती कदाचित् वांचलाही

असेल! तिच्या ह्या कल्पनेला गहाळ झालेल्या एका रबरी पट्टयानें चांगलीच पुष्टी दिली होती.

" खात्रीनें शिडीचा तराफा करून त्यांनीं रबरी पट्टयाचा उपयोग केला असेल. जमिनीपासून थोडयाच अंतरावर असल्यामुळें, कदाचित् ते किनाऱ्यालाही लागले असतील. जाणाऱ्यायेणाऱ्या एखाद्या जहाजाची व त्यांची गांठ पडणेंही शक्य आहे! "

दिवसांमागून दिवस, महिन्यांमागून महिनेही निघून गेले; पण पर्वतीचा ठिकाणा लागला नाहीं. ' आपण अनाथ विधवा झालों !' ह्या दुःखद जाणिवेचा गिरजेच्या मनाला जरी सराव झाला होता, तरी रस्त्यांतून भटकणाऱ्या एखाद्या मालविक्या फेरीवाल्याची हांक कानांवर आली, अगर कामाकरितां येणाऱ्याजाणाऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या वर्दळीनें दाराचा आवाज झाला, तरीही तिच्या पोटांत एकदम धस्स होई. ' पर्वती आला कीं काय ' ह्या कल्पनेनें तिच्या अंगाला दरदरून घाम फुटून, ती थरथर कापूं लागे.

५—

पर्वती नापत्ता होऊन सुमारें चार वर्षें लोटलीं होतीं.

एके दिवशीं संध्याकाळीं गिरजा व तिची मैत्रीण बनू अशा दोघी देवळांतून परत येत असतांना, नुकत्याच वारलेल्या मामूभाई कप्तानाच्या घरापुढें बराच मोठा घोळका जमलेला त्यांच्या नजरेस आला. जवळ येऊन पहातात तों सारें प्रकरण त्यांच्या ध्यानांत आलें. मामूभाईंना कोणीच वारस नसल्यामुळें त्यांच्या चीजवस्तूंचा तो जाहीर लिलांव चालला होता.

" तीन रुपये! घडघड बोलणारा एक पोपट—तीन रुपये ! " समोर ठेवलेल्या एका पिंजऱ्याकडे अंगुलीनिर्देश करीत बेलीफ मोठमोठयानें हलकारीत होता.

पिंजऱ्यांतील पक्ष्याचा तो हिरवागार रंग, त्याची ती लालभडक चोंच, त्याचा तो निळसर कंठ, हीं सारीं प्रत्येकाला सुखवीत होतीं; पण मान तुकवीत तुकवीत, साऱ्या जगाला जणुं काय तुच्छ

लेखीत पाहण्याची त्याची विचित्र ढब मात्र पुष्कळांना आवडली नाहीं.

गिरजेचा खांदा गद्‌गद् हालवून, तिची मैत्रीण लडिवाळपणानें तिला म्हणाली, " गिरजे ! वे गडे तो पोपट ! कित्ती कित्ती सुरेख अन् छान आहे ! त्या निर्जन घरांत तुला चांगलीच सोबत होईल. नुसती एकांतांत विचार करीत बसतेस, त्यापेक्षां ह्याच्या सान्निध्यांत तुझी कांहींतरी करमणूक होऊन, तुझ्या मनाला थोडासा विरंगुळा तरी वाटेल. "

" चार रुपये ! चार रुपये ! " बेलिफानें रुपयांबरोबर आवाजही चढवून पुकारलें.

जिवाच्या करमणुकीकरतां चार रुपये देऊन गिरजेनें एक जीव विकत घेतला !

घरीं आल्यावर आपल्या निजावयाच्या खोलींत एका हुकाला तिनें तो पिंजरा अडकवून दिला आणि मग त्या पांखराच्या पोटापाण्याची व्यवस्था करण्याकरितां ती स्वयंपाकघराकडे वळली.

थोड्याच वेळांत एका हातांत भिजलेल्या डाळीची एक वाटी व दुसऱ्या हातांत पाण्याची एक चिमुकलीशी झारी घेऊन, ती बाहेर आली. पिंजऱ्यांत बसविलेल्या पाण्याच्या थाळींत पाणी घालण्याकरिता तिनें पिंजऱ्याचें दार उघडून आंत हात घातला असेल नसेल तोंच, त्या पोपटानें आपली अणकुचीदार चोंच तिच्या बोटावर मारली. त्या चाव्यानें गिरजेच्या करांगुलीचें कातडें खरचटून त्यांतून थोडेंसें रक्त आलें.

" खटयाळ मेला ! काय बाई द्वाड आहे ! पाणी घालतांना सुद्धां दांडगाई ! " डोळे वटारून गिरजा म्हणाली. तिच्या ह्या निर्भत्सनेंत कौतुकाचीच बरीचशी छटा चमकत होती.

आपलें नवें घर, आपली नवी मालकीण,—हीं पाहण्यांत तो नुकताच घेतलेला राघू व्यग्र झाला असतांना, गिरजेला डाळीची वाटी आंत सारण्यास बराच अवसर सांपडला. थोड्या वेळानें

पेरुची एक फोड व डाळिंबाचे कांहीं दाणेही तिनें पिंजऱ्याच्या फटींतून आंत सोडून दिले.

६—

पहांटेच्या प्रशांत प्रहरीं गिरजेला अगदीं पर्वतीसारख्या करड्या व घोगऱ्या आवाजांत कोणी तरी मोठ्यानें बोलल्यासारखा भास झाला.

“ आं ? अजून शेणी गोळा करण्याकरितां म्हारवडा नाहीं वाटतं पालथा घातलास ? ”

हें ऐकून गिरजा इतकी भ्याली कीं, तिनें डोक्यावरून गोधडी गुरगुटून घेतली. रोज सकाळीं उठल्याबरोबर ज्या महामंत्रानें पर्वती तिची संभावना करीत असे, तोच महामंत्र चार वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा तिच्या कानांवर पडतांच, ती अगदीं बावरून गेली ! थरथर कांपणाऱ्या ओठानें ती स्वतःशीच पुटपुटली, “ अगबाई ! घरधनी घराला आले वाटतं !–आई जगदंबे—”

पर्वतीच्या येण्यानें गिरजेला आनंद झाला कीं दुःख ? सतीचें सौभाग्यधन परत मिळाल्यावर कोणती सावित्री दुःखांत मग्न राहील ? गिरजा–गिरजा सावित्री नव्हती का ?–मग ती कष्टी कां झाली ? ”

पर्वतीच्या पहिल्या सलामीनें गिरजेला पूर्वीच्या खडतर आयुष्याची पुन्हां आठवण झाली म्हणून ! पूर्वीचा तो भयंकर जीवनक्रम तिच्या डोळयांसमोर नाचूं लागला म्हणून ! !

गिरजेच्या छातीचे ठोके अधिक जोरानें पडूं लागले. श्वासोच्छ्वासाचा पूर्ण अवरोध करून, ती अंथरुणांत निपचित पडून राहिली.

थोडा वेळ सर्वत्र निस्तब्ध शांतता वावरत होती.

आपणांला मारण्याकरितां अंथरुणाजवळ खुनशी नजरनें हात उगारून पर्वती उभा आहे, असें गिरजेला वाटत असल्यामुळें, डोळे उघडण्याचाही तिला धीर होईना. बऱ्याच वेळानंतर एकदां कसातरी हिय्या करून, तिनें बिचकत बिचकत डोक्यावरलें पांघरुण काढलें.

घराच्या झरोक्यांतून डोकावणाऱ्या उगवत्या सूर्याच्या कोमल कवडाशाशिवाय तिला कांहींच दिसलें नाहीं.

" कदाचित् ते दडूनही बसले असतील ! " गिरजेला शंका आली. दहापंधरा मिनिटें ती सारखी कान टवकारून ऐकत होती; पण कसलाच आवाज ऐकूं न आल्यामुळें, शेवटीं तिनें मनाची समजूत करून घेतली.

" गिरजे ! वेडे ! हट्—हें स्वप्न–एवढी साधी गोष्टसुद्धां तुला समजूं नयेना ? उगाच दोरीचा साप करून सैरांवैरां धांवत सुटलीस ! "

गिरजेच्या घाबरलेल्या मनाला हायसें वाटलें. " सुटलें बाई !" म्हणून आंग पिळवटून, तिनें एक लांब जांभई दिली व ती उठण्याचा विचार करूं लागली. इतक्यांत मघांचा तोच आवाज तिच्या कर्णरंध्रांत घुमूं लागला.

" ए ! आळसट म्हशी ! ! दिवसभर अंथरुणावरच पासलून राहणार का ? काय बेमुर्वतखोर बाजारबसवी आहे ! अग, जनाची नाहीं......तरी......निदान—"

जन्मभर दुसऱ्यापुढें मान तुकविण्याचीच संवय झाल्यामुळें, गिरजा ताड्दिशीं अंथरुणांतून बाहेर आली व लीन होऊन मोठ्या विनयानें म्हणाली, " धनी ! काय पाहिजे ! मी इथें आहेंना ? "

पर्वतीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

गिरजेची भीतीनें गाळण उडाली. पलंगाखालीं, खिडकींत, फळीवर, पोत्यामागें, ती त्याला शोधूं लागली; पण कोणीच तिच्या नजरेस आलें नाहीं. तिचे हातपाय लटलट कांपूं लागले. अंथरुणाकडे येऊन तिनें आपला देह पुन्हां त्यावर टाकून दिला. पर्वती–निदान पर्वतीचा आत्मा तरी ह्या घरांत निःसंशय वावरत असला पाहिजे, अशी तिची ठाम समजूत होऊन चुकली.

इतक्यांत गिरजेला गोठ्याची आठवण झाली.

" हो ! माझ्यावर झडप घालण्याकरितां ते तेथेंच माळ्यावर टपून बसले असतील !–कदाचित् एखाद्या बेटांतील रानटी राक्ष-

सांच्या तावडींत ते सांपडले असतील व तेथून नुकतीच त्यांची इ
झाली असेल.– हो! समजलें–त्यांचा आवाज पूर्वीपेक्षां जास्त ‹
कां तें ! रानटी लोकांच्या सहवासानें ते अधिकच रानटी
आहेत ? ”

गोठ्याचा विचार येतांच, गिरजा तडक तिकडे गेली व माळ
लावलेल्या शिडीच्या पहिल्या पायरीजवळ येऊन तिने विचा
“ कोण बसलंय् तिथं वर ? ”

वरून कोणी हूं कां चूंही केलें नाहीं.

गिरजेच्या हृदयानें आतां ठाव सोडला. कंदील आणण्याक
धांवत–धरपडत ती घरांत पळाली. दिव्याच्या उजेडांत सर्व म
तिनें धुंडाळून काढला; पण शेवटीं तो तिला तिथं आढळला न

माळ्यावर रचलेल्या गोंवऱ्यांच्या ढिगाला पाठ देऊन गि
रडूं लागली. ही भुताटकी आहे कीं, कांहीं दैवी चमत्कार अ
ह्याचा तिला उमज पडेना. तिचें डोकें भणाणून गेलें. स्व
राक्षस मागें लागला म्हणजे ज्याप्रमाणें मनुष्याला हालतां ि
बोलतां येत नाहीं, त्याप्रमाणें गांगरलेल्या गिरजेची अवस्था हो
भयानें तिची बोबडी वळली. ह्या चमत्कारिक स्थितींत मान ट
ती पडली असतां, घरांत पर्वती स्वतःशींच बोलत असल्याचें ि
ऐकूं आलें.

तो आतां बराच खुषींत आलेला दिसत होता.

“ काय घाणेरडी हवा पडलीय् ? अन् वारा तरी काय भ
सुटलाय् ! काय बुवा त्रास आहे ? पण कांहींही असलें तरी अ
त्याला न्याहारीला हें पाहिजेच ? न्याहारीशिवाय—”

गोठ्याच्या लहानशा बोळकंड्यांतून गिरजा ओरडून म्हणा
“ मालक ! मालक ! न्याहारी घेऊन मी येतें अं ? आज अ
त्यासाठीं किनई, मी उन्हून भाकरी व ताजें ताजें कोरड
करणार आहे ! रागावूं नका गडे ! ही पहा मी आलेंच ! ”

एखाद्या निर्बुद्ध यंत्राप्रमाणें गिरजा तर खालीं उतरली व घ
गेली; पण-पण काय, घर सताड मोकळें होतें.

गिरजेच्या साऱ्या अंगाला मुंग्या येऊं लागल्या. यमाच्या पाशाचा स्पर्श व्हावा, त्याप्रमाणें ती गार पडत चालली. जवळपास असलेल्या शेजाऱ्यांना मदतीसाठीं ओरडून हांका मारण्याच्या ती अगदीं बेतांत होती. इतक्यांत पुन्हां तो पहिलाच घोगरट आवाज तिच्या कानांवर येऊन आदळला,

" मला खायला पाहिजे ! भुकेनें माझा प्राण चाललाय ! "

पिंजऱ्यांतील पक्षी मान वांकवून तिच्याकडे शोधक दृष्टीनें टक लावून पहात होता.

आश्चर्यानं स्तंभित होऊन, गिरजासुद्धां त्याच्याकडेच पहात होती.

" हं ! महाराज ! आपला हा प्रताप वाटतें ? " ती मोकळेपणानें म्हणाली.

नंदीबैलाप्रमाणें तिच्यापुढें तो पोपट सारखा मान डोलवीत होता.

" थांब अं ! तुला चांगलाच चोप दिला पाहिजे ! " गिरजेनें चिडून त्रासिक स्वरांत दटावणी दिली.

७—

पर्वती कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें पुन्हां घरीं आला, ह्या कल्पनेचाच गिरजेच्या रांगडी मनानें ध्यास घेतला. ती कांहीं शिकलेली बायको नव्हती. मनुष्याचा आत्मा मरणानंतर दुसऱ्या देहांत प्रवेश करून, पूर्वजन्मीं अतृप्त राहिलेल्या वासनांचा उपभोग घेतो वगैरे गूढ तत्त्वज्ञानाचा तिला गंधही नव्हता. तरी पोपटाच्या शरीरांत प्रवेश करून पर्वतीनें ' पुर्नजन्म ' घेतला, ही गोष्ट मात्र तिच्या बावरलेल्या हृदयांत चांगलीच स्थिर झाली.

" एका जन्मींचा छळवाद अपुरां पडला म्हणून, दुसरा जन्म घेऊन, माझा छळवाद करण्याला ते आले अं ? "

" देवा, देवा ! ह्याच हाणामारीच्या दुःखांत माझें आयुष्य जाणार कां रे ? ह्या नरकांतून मरणावांचून माझी सुटकाच होणार नाहीं का ? "

“ हा पोपट संबंध दिवसभर मला असाच त्रासवून शिव्या देत राहणार ? कालच्याप्रमाणें चावून चावून माझ्या अंगाचीं सालडीं काढण्यालासुद्धां हा निर्दय मागेंपुढें पाहाणार नाहीं ! ह्या बाळाचे हे अचकट विचकट शब्द जर लोकांच्या कानांवर पडले तर ते तोंडांत शेण घालतील ! ”

“ देवा ! पूर्वींचा भोग कमी झाला म्हणून का पुन्हां हें तसलेंच ताट, माझ्यापुढें वाढून ठेवलेंस ? अरेरे ! मधून मधून मासे मारण्याच्या निमित्तानें तरी ते बाहेर जात व त्यामुळें एकदोन दिवस तरी मला शांततेचे लाभत ! पण आतां तें सुखसुद्धां तूं हिरावून घेतोस ना ? माझ्या कपाळीं सुख लिहिलेलेंच नाहीं का !. हा मेला चोवीस तास माझ्या बोकांडीं बसून मला असाच छळणार कीं काय ?... ”

ह्या विचारानें गिरजा विजेच्या चमकीप्रमाणें ताडकन् उठून उभी राहिली.

निश्चयाच्या करारी बाण्यानें शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडत होते.

“ नाहीं ! नाहीं ! मी नाहीं हें सहन करणार !—गळ्यापर्यंत आल्यावर कोणाचा इलाज—! ह्या वनवासांतून सुटण्यासाटीं—”

आपण काय करीत आहों, ह्याचें भान असण्याइतकी गिरजा आतां शुद्धीवर नव्हती. वाताच्या उन्मादांत मनुष्य जसा अनिवार होतो तशीच ती अनावर झाली आणि त्या आवेशाच्या भरांत पिंजऱ्यावर झडप घालून आंतील पांखराला तिनें जोरानें बाहेर हिसकलें.

आपल्या लहानग्या चोंचीनें व पंज्यानें गिरजेला कुरतुडून, तिच्याशीं झगडण्याची त्या चिमकुल्या प्राण्यानें अगदी शिकस्त करून सोडली; पण गिरजेनें त्याच्या ह्या चावण्या-ओंचकारण्याकडे मुळींच लक्ष न देतां, दोन्ही हातांनीं त्याला घट्ट आंवळून जमिनीवर आदळलें व मग त्वेषाच्या लहरींत त्याला आपल्या

पायाखालीं तुडवून तिनें त्या पक्ष्याचा अगदीं चेंदामेंदा करून टाकला !

त्याचा कर्कश–कठोर आवाज आतां बंद झाला होता. निळसर कंठानें विभूषित झालेली त्याची झोंकदार मान मोडून–लुली पडली होती. त्याच्या हिरव्यागार देहाची केंविलवाणी वाताहात होऊन तो नाममात्रच उरला होता.

लहान मुलाचा मृत देह फडक्यांत गुंडाळतात त्याप्रमाणें विस्कटलेल्या पिसांचा तो रक्तानें माखलेला गोळा एका फडक्यांत गुंडाळून घेऊन, गिरजा लगेच किनाऱ्याकडे निघाली.

समुद्र अगदीं शांत होता. झोंपलेल्या मनुष्याच्या वक्षःस्थला प्रमाणें त्याच्या हिरवट लाटा हळुहळू वरखालीं होत होत्या. सभोंवार पसरलेल्या भेसूर शांततेनें जिकडे तिकडे भयाण दुःखाचेंच वातावरण निर्माण केलें होतें. सागराच्या अफाट पृष्ठभागावर नावेचें एकही शीड फडफडत नव्हतें. लांबवर पसरलेल्या किनाऱ्यावर चिटपांखराचीही चाहूल येत नव्हती.

मेलेल्या पांखराचा देह गुंडाळलेला हातांतील रुमाल गिरजेनें समुद्राला समर्पण केला.

डोळयाचें पातें लवतें न लवतें तोंच त्या आधाशी समुद्रानें त्याचा मागमूसही राहूं दिला नाहीं.

घरीं आल्यावर मात्र, गिरजेला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. ती बावरून गेली. घडलेल्या हत्येचें भयंकर स्वरूप तिला भिववूं लागलें. .........“ माझ्या हातून हा केवढा घोर गुन्हा घडला ! एकाद्या डाकिणीप्रमाणें मी नवऱ्याचा खून केला ! ”

रिकाम्या पडलेल्या पिंजऱ्यापुढें अंग टाकून, गिरजा देवाची करुणा भाकूं लागली.

हळुहळू तिच्या शोकाचा आवेग वाढूं लागला. किती तरी वेळ ती सारखी रडत होती. इतक्यांत रस्त्यावरून माशाला निघालेल्या कोळयांच्या गाण्याचा आवाज तिला ऐकूं आला. श्रमपरिहाराची

एक लहानशी झुळुक तिचा देह थरारवून निघून गेली. तिच्या अंतःकरणाच्या अगदीं आंत कुणीतरी सुटकेच्या स्वच्छंदी मोकळेपणानें गुणगुणत होतें,–“ समुद्रावर गेलेला पर्वती आतां कधीं –कधीं परत येणार नाहीं ! ”

| प्रकाशनस्थल:– | Guy De Maupassant च्या | प्रकाशनकाल:– |
| --- | --- | --- |
| ‘ रत्नाकर ’ | ‘The Man who was Drowned’ ह्या गोष्टीवरून | जून-जुलई १९३० |

## दोनच अश्रू ! ५

'Happy are they who are dark with the dust of their Children's limbs." Kalidas

भिंतींतल्या कपाटावरील पुढें बसविलेल्या फळीवर असलेल्या 'पाइप-स्टेम्स' मध्यें, 'टेनिस' चा एक जुना रबरी चेंडू पडला होता. त्यावरील 'कॅनव्हस' मधुनमधून उंदरानें कुरतडल्या-प्रमाणें निघून गेलें असल्यामुळें, त्याचा मूळचा पांढरा रंग अजिबात पालटून, नव्या काळसर रंगाचें एक भुरकट पुटण त्यावर चढलें होतें.

एके दिवशीं संध्याकाळीं सांवळ्याराम—माझा खिदमतगार फळीवरील 'पाइप-स्टेम्स' स्वच्छ करीत असतां, मोठ्या अदबीनें मला म्हणाला.

"साहेब! ह्या चेंडूचा आपल्याला कांहीं उपयोग आहे?" साहेबांना त्या पुरातन वस्तूचा कांहीं विशेष उपयोग अगर फायदा होता अशांतला मुळींच भाग नव्हता; पण खिदमतगाराला तरी

त्या ‘ टेनिस बॉल ’ ची अशी काय गरज होती, ह्याचें त्यांना मोठें गूढ पडलें.

“ साहेब ! आपल्या कृपेनं मला एक लहानसा छोकरा आहे ! त्यानं हा चेंडू पाहिला—अन् घेतलाच् हट्ट झालं ! मला गरीबाला नाहीं तर ह्या चेंडूशीं काय करायचं आहे ? ”

ऐसपैस आडवातिडवा सुटलेल्या सांवळ्याला स्वतःला खेळण्याकरितां हा चेंडू पाहिजे असेल, अशी कल्पना कोणाच्या स्वप्नांत जरी आली असती तरी जगानें त्याला खास मूर्खांच्या सदरांत काढलें असतें.

“जा कीं ! घेऊन जा !!” अशी मी परवानगी देतांच सांवळाराम ती जुनीपुराणी चीज घेऊन ‘ व्हरांड्यां ’ त निघून गेला. तो जाऊन एकदोन पळें लोटलीं असतील नसतील तोंच, निर्व्याज मनोहर हास्याच्या एकामागून एक खुदूखुदून उठणाऱ्या गोड उकळ्या, दुडदुड धांवतांना पायांतील वाळलेण्याचा होणारा मंजुळ नाद, जमिनीवर आपटल्या जाणाऱ्या चेंडूचा टप्-टप्-टप् असा आवाज-हीं सारीं एकदमच माझ्या कानांवर येऊन आदळलीं.

‘ आपली ठेव ताब्यांत घेण्याकरितां सांवळारामाचा मुलगा दाराबाहेर उभा होता तर !—पण त्या लुच्च्याला इथल्या ह्या मालाची नेमकी बरोबर दाद कशी लागली बुवा ? ’

दुसरे दिवशीं शनवार होता. ‘ ऑफिस ’ मध्यें काम बेताचेंच असल्यामुळें मी एक तास लवकरच घरीं आलों. ‘ व्हरांड्यां ’ तच असलेल्या ‘ स्टॅंडवर ’ कपडे वगैरे टाकून, तोंडबिंड स्वच्छ करण्यासाठीं मी ‘ डायनिंग-रूम ’ कडे वळतों न वळतों तों तेथें असलेल्या एका लहान व्यक्तीचें अस्तित्व मला आढळून आलें. त्या चिमुकल्या प्राण्यानें धारण केलेला सद्रा इतका लांडा होता कीं, तो त्याच्या पोटाच्या नगाऱ्यावर टोपीसारखाच भासत होता. शिवाय कित्येक दिवसांत पाण्याची व त्याची गांठभेट न पडल्यामुळें, तेलकट गोणपाटाची मिचकट अवकळा त्यावर आली होती. तोंडानें हातांचा आंगठा चोखीत व स्वतःशींच कांहीं तरी गुणगुणत

ती बाल आकृति खोलींत टांगलेल्या तजबिरींचें मारे एकाग्रतेनें निरीक्षण करीत, इकडून तिकडे वावरत होती.

"हो! शंकाच नको! हेच ते सांवळारामबुवांचे छोटे चिरंजीव!!" मी स्वतःशींच म्हणालों.

माझ्या अपरोक्ष माझ्या खोलींत येऊन वाटेल तसा धुडगुस घालण्याचें ह्या पोराला कोणत्याहि प्रकारचें कारण नव्हतें हें खरें; पण तो बच्चा आपल्या संशोधनाच्या कार्यांत इतका व्यग्र होऊन गेला होता कीं, मी दारांत उभा आहें ह्याची त्याला कल्पना-सुद्धां आली नाहीं. खोलींत एकदम प्रवेश करून त्याला मीं इतकें आश्चर्यचकित करून सोडलें कीं, घाबरून जाऊन तो मटकन् खालींच बसला. त्याची चिमुकली जिवणी पोस्टाच्या पेटीप्रमाणें सताड उघडी पडली. त्याचे किलकिले काळेभोर डोळे आगगाडीच्या रुळांवर ठेवलेल्या पैशाप्रमाणें प्रसार पावले.

आतां लवकरच पावसाची सर येणार ह्याची मला पूर्ण जाणीव झाली, म्हणून मी चटकन् बाहेर आलों व 'सर्व्हंट्स् क्वार्टर्स' कडे तोंड करून 'सांवळ्या!' म्हणून एक जोरानें हांक दिली. आजपर्यंत माझ्या आवाजाची मजल इतक्या लवकर 'सर्व्हंट्स् क्वार्टर्स' कडे कधींच पोंचली नव्हती. दहा सेकंदांच्या आंतच सांवळाराम 'डायनिंग रूम' मध्यें हजर होता. फुलून फुलून निघणाऱ्या हुंदक्यांचा आवाज कानांवर येतांच मी आंत गेलों.

सांवळाराम, आपल्या सद्र्याचा बहुतेक हातरुमालासारखा उपयोग करीत असलेल्या त्या लहान गुन्हेगाराची रागानें खरड-पट्टी काढीत होता.

"हें फाजील पोर—मोठं हरामखोर आहे!" सांवळाराम एकाद्या सुज्ञ, समंजस न्यायाधीशाच्या विवेकी समर्पकतेचा आव आणून म्हणाला,

"असल्या वागणुकीनं हें कार्टं आज नाहीं उद्यां खास तुरुंगांत जाऊन माझ्या तोंडाला काळोखी फांसणार!!"

पश्चात्तापानें उचंबळून आल्यामुळें त्या छोकऱ्याच्या हुंदक्यांचें रूपान्तर आतां रडण्यांत झालें.

सांवळारामनें माफीसाठीं केविलवाण्या नजरेनें माझ्यापुढें पदर पसरला.

"त्या बाळाला सांग," मी कींव येऊन म्हणालों, "कीं साहेब कांहीं रागावले नाहींत!"

रडण्याचें पुन्हां हुंदक्यांत रूपान्तर झालेल्या आरोपीकडे सांवळारामानें माझा क्षमेचा संदेश पोंचता केला व नंतर ते दोघे दरवाजाकडे चालूं लागले.

जातांना सांवळाराम सहज थट्टा करण्याच्या उद्देशानें मला म्हणाला, "साहेब! ह्या चोराचं नांव सुभान्या, बरं का! अन् हा बिलंदर, पक्का—अगदीं पक्का हरामखोर आहे अं!!"

नुकताच कोसळलेल्या संकटांतून सहीसलामत सुटका झाल्यामुळें, सुभान्याला बराच धीर आला होता. बापाच्या हाताचें धरलेलें बोट तसेंच कायम ठेवून तो मागें फिरला व वडिलांनीं केलेल्या बेजबाबदार विधानाच्या चुकीची मोठ्या संभावितपणानें त्यानें दुरुस्ती केली,

"ताहेब! माधं नांव तुभान्या हें खलं, पन् मी हलामखोल नाहीं अं! मी मानुस आहे मानुस!!"

सुभान्याच्या आणि माझ्या गट्टीचा हाच तो पहिला चिरस्मरणीय दिवस!

ह्यानंतर तो जरी कधींहि माझ्या 'डायनिंगरूम' मध्यें आला नाहीं, तरी सर्वांना वापरण्याला पूर्ण मुभा असलेल्या बागेंत त्याची व माझी नेहमीं गांठ पडे, व आमच्या 'मैफली' च्या दोन अंकी, दोन पात्री नाटकाचा शेवट केवळ दोनच चरणांत खलास होई. "तलाम, ताहेब!" हा सुभान्याच्या नमनाचा पहिला चरण आणि "सुलाम, बचंजी!" हा माझ्या भरतवाक्याचा शेवटचा चरण.

रोज संध्याकाळीं ‘ ऑफिस ’ मधून येतांना, लतांनीं वेष्टिलेल्या जाळ्यांचा गुंफांमधून आंखुड सद्र्यांतील ती ‘ धुल्लमशेटी ’ आकृति हळूंच लपतछपत बाहेर येई, आणि आमची सलामी कधींकाळीं चुकूं नये म्हणून मीहि आपल्या घोड्याचा लगाम ह्याच ठिकाणीं रोज नियमितपणें जरा खेंचून धरल्याशिवाय रहात नसें.

सुभान्याच्या बाळगोपाळांची संख्या शून्यापलीकडे कधींच गेली नव्हती. कसल्या तरी गहन कामगिरीवर गुंतल्याप्रमाणें एरंडाच्या लहान लहान झुडपांमधून, बंगल्याच्या आवाराच्या आंतबाहेर दुडक्या तुरतुर चालीनें फिरण्याच्या त्याच्या व्यवसायांत कधींच खाडा पडत नसे.

एके दिवशीं मी सहज सहल करीत असतां पाणी घालण्याच्या हौदाजवळ सुभान्यानें मोठ्या मेहनतीनें जमिनींत तयार केलेल्या हस्तकौशल्यावर माझा चुकून पाय पडला. मी दिलेला ‘ टेनिस ’चा रबरी चेंडू त्यानें भुईंत अर्धवट पुरला होता व त्याभोंवतीं चित्रविचित्र रंगांचीं विलायती झेंडूची फुलें खोंचून त्यानें एक वर्तुलाकार आकृति केली होती. ह्या आकृतीचे बाहेरून विटकरांचे ओबडधोबड तुकडे लावून त्यानें एक वेडावांकडा चौकोन बनविला होता व नक्षी म्हणून मधुनमधून फुटक्या कपबशांच्या लहान लहान चकत्या बसवून, त्याला विलक्षण प्रकारची शोभा आणली होती. आपण चढविलेल्या ह्या गढीला कोणत्याहि तऱ्हेचा धक्का पोंहोचूं नये म्हणूनच कीं काय, सर्वांभोंवतीं एक लहानसा खंदक व मातीचा छोटेखानी तट उभारण्यासहि सुभान्या विसरला नव्हता.

बागेला पाणी देणाऱ्या म्हाताऱ्या माळ्यानें त्या लहान शिल्पकाराची बाजू घेतली.

“ साहेब ! एका अजाण मुलाच्या खेळाचं हें कोडकौतुक काढून टाकण्याचा मला धीरच होईना ! शिवाय बागेच्या सुंदरपणांत ह्यानं मोठासा बिघाड येईल असंहि मला वाटलं नाहीं ! ”

बालमनाच्या विकासाची ती अर्धस्फुट कलिका खुडून चुरगळून टाकण्याची त्या वेळीं माझी इच्छा होती का नव्हती, हें एक त्या सर्वसाक्षी परमेश्वरालाच ठाऊक.

विचारांच्या वेगमान् तंद्रींत मी पूर्ण रंगून गेलों असल्यामुळें, माझ्या नकळत सुभानाचा 'बालेकिल्ला' माझ्याकडून तुडविला गेला. आपल्या विविध रंगांनीं लोकांचीं मनें आकर्षून घेणारीं तीं सुंदर फुलें मातीमोल झालीं. किल्ल्याच्या संरक्षणासाठीं डोळयांत तेल घालून खडा उभा असलेल्या मातीच्या तटानें खंदकाच्या चिखलांत उडी घेतली. कपांच्या कपऱ्यांनीं केलेल्या कलाकुसरीच्या कामाची वाताहात उडून, इतस्तत: पसरलेल्या धुळींत त्यांनीं आपलीं डोकीं दु:खानें खुपसून दिलीं.

दुसरे दिवशीं सकाळीं, मी उध्वस्त करून टाकलेल्या किल्ल्यावर सुभान्या फुसफुसून रडत असल्याचें मला आढळून आलें.

कोणी तरी मोठ्या निर्दयतेनें त्याला सांगितलें होतें कीं, तूं केलेल्या बागेंतील घाणीमुळें साहेब फार गरम झाले व त्यांनीं रागानें तूं बांधलेला किल्ला उधळून दिला.

माझ्याकडून नकळत मोडल्या गेलेल्या किल्ल्याच्या ढिगाऱ्याचा पसारा तेथून काढून, ती जागा पूर्ववत् स्वच्छ करण्यासाठीं सुभान्या अर्धा तास नेटानें प्रयत्न करीत होता. संध्याकाळीं ऑफिसमधून घरीं येतांना "तलाम ! ताहेब ! " हे शब्द उच्चारतांना त्याच्या चेहऱ्यावरील नेहमींचा हंसरा आनंद कोठल्या कोठें पार मावळून जाऊन, तो बराच कष्टी दिसत होता. बंगल्यांत शिरतांच मीं सांवळ्याला हांक मारिली व त्याजवळ सुभान्याच्या रागाची थोडीशी चवकशी करून लगेच त्यास हुकुमाचें फर्मान दिलें,

" जा ! आत्तांच्या आत्ता जाऊन त्या पोराला सांग कीं, साहेब तुझ्यावर मुळींच रागावले नाहींत ! बागेंत तुझ्या मनाला येईल तसं खेळण्याला त्यांची तुला पूर्ण मोकळीक आहे ! "

लहान मुलांना रडण्याला जसें कांहीं मोठेसें कारण लागत नाहीं तसें त्यांना हंसण्यालासुद्धां मोठ्या साधनाची जरूर भासत नाहीं.

सुभान्या ह्या नियमाला अपवाद नव्हता. एकदोन दिवसांतच तोहि किल्ल्याची गोष्ट पार विसरून गेला व किल्यावरहि मात करणारें एक मजेदार तळघर मातींत खोदण्यास त्यानें मोठ्या उत्साहानें सुरुवात केली. एरंडाच्या लहान लहान झुडुपांमधून एकटा—अगदीं एकटा—पण स्वतःशीं नेहमीं कांहींतरी गुणगुणत सुभान्या 'पुन्हां, शेळीच्या लहानग्या करडाप्रमाणे आनंदानें नाचूं बागडूं लागला.

बागेंतील निरनिराळ्या झाडांचीं निरनिराळीं फुलें—रस्त्यावर पसरलेल्या वाळूंतील सुंदर गोलदार गारगोट्या—आवारांत पडलेलीं पांखरांचीं मऊमऊ पिसें—फुटक्या कांचांचे गोळा केलेले लहान-लहान रंगीबेरंगी तुकडे वगैरे साहित्यानें सुभान्या आज एखादा सुंदर किल्ला बांधी तर उद्यां तो मोडून, त्या जागीं तो लहानसें तळघर तयार करी. त्याच जाग्यावर कांहीं दिवसांनीं एखादी छोटीशी झोंपडी अगर चिमुकलीशी विहीर विराजमान झालेली दिसून येई.

सुभान्याचा हा कार्यक्रम दोनतीन महिने अव्याहत चालू होता.

फुलपांखराच्या पंखांवर असलेला सुंदर शिडकाव्याप्रमाणें असलेला एक मोठा सागर-शिंपला मी एके दिवशीं मुद्दाम सुभान्यानें नुकत्याच बांधलेल्या खोपटाजवळ टाकून दिला. ह्या छानदार शिंपल्याच्या मदतीनें सुभान्या कांहीं तरी विलक्षण करामत करून दाखवील अशी मला पुरेपूर खात्री होती; आणि खरोखर माझ्या ह्या खात्रीची सुभान्यानें निराशाहि पण केली नाहीं.

सबंध तासभर ती लहान गुटगुटीत गबदुलमूर्ति कसल्या तरी गूढ योजनेच्या चिंतनांत निमग्न झाली होती. तिच्या नेहमींच्या हलक्या गुणगुणण्याला केव्हांच रजा मिळून, उल्हासी आनंदाच्या उच्च स्वरांनीं ती जागा पटकावून घेतली होती.

एका लहानशा टुमदार देवळाच्या पायाला सुभान्यानें प्रथम सुरुवात केली आणि नंतर त्याचे एकेक आश्चर्यकारक भाग तो बनवूं लागला.

हें सुंदर छोटेखानी राउळ अतिशय उत्तम वठणार, अशा विश्वासाला पुष्कळ जागा होती; पण दुर्दैवानें ह्या कामाची सुभान्याकडून कधींहि पूर्तता झाली नाहीं.

‘ ऑफिस ’मधून घरीं आल्यावर ‘ सलाम, साहेब ! ’ म्हणून माझ्या आगमनाची उत्कंठेनें वाट पाहाणारी व्यक्ति दुसरे दिवशीं नेहमींच्या ठिकाणीं मला दिसली नाहीं. रोज तिच्याकडून होणाऱ्या माझ्या आगतस्वागताची मला इतकी संवय जडली होती कीं, तिच्यांत पडलेला हा अचानक खंड मला अतिशय जाणवला. इतकेंच काय, पण त्या रात्रीं मला धड झोंपहि आली नाहीं. सकाळीं उठतांक्षणींच पहिल्याप्रथम सांवळयाकडे मी सुभान्याची विचारपूस केली.

“ साहेब ! कालपासून तापानं पोर अंथरुणाला अगदीं जखडून पडलं आहे ! ”

सरकारी दवाखान्यांतील ‘ असिस्टंट सिव्हिल सर्जन ’ला एक चिठ्ठी लिहून, ती मी सांवळयाच्या हातीं दिली.

सांवळारामाच्या घरीं येऊन ‘ डॉक्टर ’नीं सुभान्याची तपासणी करून, त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था केली.

घरांतून बाहेर पडत असतांना ते हलकेंच स्वत:शीं पुटपुटत होते.

“ काय बुवा हीं अलीकडचीं पोरं ! त्यांना ‘ स्टॅमिना ’ कसा तो नाहींच ! ”

आठच दिवसांनंतर—सकाळची रपेट संपवून मी बंगल्याच्या फाटकांत शिरत होतों तोंच—जें संकट टाळण्यासाठीं मी वाटेल ती गोष्ट करण्यास मागेंपुढें पाहिलें नसतें, तेंच संकट एखाद्या फेरीवाल्या फकीराप्रमाणें ‘ अल्लक ’ म्हणून माझ्यापुढें उभें राहिलें.

सुभान्याच्या चिमुकल्या जिवाचा निर्जीव अवशेष एका पांढऱ्या फडक्यांत गुंडाळून, हृदय दगडासारखें घट्ट केलेला सांवळाराम एका इसमाबरोबर चालला होता.

वेलीच्या जाळीजवळ येतांच माझा ‘ झेंडया ’ एकाएकी मी न खेंचतांच आपोआप थबकून उभा राहिला व पुढील खुरांनीं

वाळू उकरीत पुन्हां पुन्हां मोठ्यानें फुरफुरूं लागतांच—आपल्या दडून बसलेल्या छोट्या बालमित्राला बाहेर येण्यासाठीं तो हांकाच मारीत आहे कीं काय, असा मला क्षणभर भास झाला.

माझ्या डोळ्यांतून माझ्या नकळत 'दोनच अश्रू' चटकन् खालीं पडले.

झेंड्याच्या मानेला त्याचा उन्हून चटका बसतांच, त्यानें एकदम चमकून मागें पाहिलें.

माझी निश्चल दृष्टि वेलीच्या जाळीकडे लागली होती!

| | | |
|---|---|---|
| प्रकाशनस्थलः— | Rudyard Kipling च्या | प्रकाशनकालः— |
| 'यशवंत' | 'The Story of Muhhmmad Din' ह्या गोष्टीवरून | जून १९३१ |

# अक्लेची नजर : : : ६

> " She fawned and whined, ' sweet gentleman,
> A penny for three tries ! '
> .........But oh, the den of wild things in
> The darkness of her eyes ! "
>
> —Ralph Hodgson—

सुमारें चारचा सुमार. रघुनाथ आपल्या खोलींतील आरशासमोर उभा राहून, 'पॉम्पेइच्या' सहाय्यानें भांगाचा शृंगार करण्यांत दंग झाला होता. इतक्यात दारांवर टिचक्यांचा गजर सुरू झाला. आपल्या पवित्र आन्हिक कर्मांत आलेल्या ह्या व्यत्ययानें रघुनाथ जरा चिडल्यासारखा दिसला. ' काय बुवा झगझग आहे ?' असें स्वत:शींच पुटपुटत, आरशावरून नजर न काढतां, केंस चापून चोपून बसविण्याचें आपलें काम तसेंच चालू ठेऊन किरीस्तावी हेल काढीत त्यानें जोरानें विचारणा केली—

" Who is there-?-Name, please ! !--"

बाहेरून उत्तर येण्याऐवजीं, दाराच्या फळयांवर लाथांचा व बुक्यांचा जोरानें वर्षाव होऊं लागला.

आतां मात्र रघुनाथाला त्या सौंदर्यवर्धक उपकरणांना घाई-घाईनें रजा द्यावी लागून, दाराची कडी काढावयास जावें लागलें व जातां जातां अर्धवट स्वत:ला उद्देशून त्याची कुरबुर चाललीच होती.

" काय कार्टी आहेत? अगदीं घोड्यावरून उतरलींत जशीं कांहीं ! ! लेकाचे 'इटिकेटसूच्या ' नांवानं अगदींच शंभू महादेव ! ! --मनुष्य कामांत असले तर जरा वेळ ' वेट ' करावयाला ह्यांच्या बाचं कांहीं जातं कीं काय कुणास ठाऊक ? ?—? "

" ए ! ' एटिकेटसूच्या ' गप्पा मारणाऱ्या पुराणपुरुषा ! ' वेस्ट-एन्डला ' ' व्हिल्मा, ' नाहीं तर तुझी ती ' नॉर्मा ' लागली असली कीं, रात्रीं-अपरात्रीं साऱ्यांचीं दारं ठोठावून सबंध रेसिडेन्सी डोक्यावर घेतोस कीं !...एक बाळ सिनेमाला निघालं तर शेंपन्नास लोक तरी झोपेंतून खडबडून जागे होतात—! ! "

" अहो महंत ! हा काथ्याकूट राहून द्या कीं आतां जरा बाजूला—अगोदर ' क्लबांत ' जाऊन हा तांब्याभर पाणी घेऊन या चहाला—तोपर्यंत मी स्टोव्हबिव्ह पेटवितों ! !—"

" विन्या ! मी बुवा आज फार दमलोंय ' प्रॅक्टिकल ' करून ! किशाला सांग ! ! नुसता लेकाचा लायब्ररींतून झोंपून आलाय !! "

" कधीं नवत महाराज ' प्रॅक्टिकल्ला ' गेलेत तर काय कौतुक चाललंय ! — मोठे घणच मारले असतील नाहीं—दमलोंय म्हणे ! !— " पाण्याला जातां जातां किसबानीं जोरयावर वाफ सोडली.

लवकरच तें मित्रमंडळ गरमागरम चहाच्या वाफेचा स्वाद घेण्यांत दंग झालें. चहाचा शेवटचा ' सिप् ' संपल्यावर मी रघु-नाथास विचारिलें...

" काय बुवा ? आज तरी चतुःशृंगीला येणार का ? रोज उद्यां उद्यां म्हणतां म्हणतां आज अष्टमी आली ! "

रघुनाथ जरासा विचारमग्न दिसतांच, जोश्यानें टीकास्त्र सुरू केलें,

" अहो शहाणे ! कसला एवढा विचार करताय ? कांहीं घ्यायचं नाहीं कीं ध्यायचं नाहीं ! देवाला जायचं......त्यांत काय एवढ्या चाळवण्या दाखवितोस ! ! "

" आलों असतों रे......पण......? "

" पण......पण काय ? ? "

" अरे ! आज त्या गजानं ' रिझर्व ' केलंय ना ?......ते ऽ ऽ व्हां......! "

" तेव्हां नाहीं न् कांहीं नाहीं ! त्या गजाला नाहीं उद्योग ! एखादे दिवशीं बुंदी नाहीं पाडली म्हणून कांहीं बिघडत नाहीं ! ......आज कांहीं झालं तरी आम्ही तुला नेणारच ! " किशानें जोराचा नेट दिला.

" पण मी विचारतों, येऊन येऊन असा फायदा तरी काय ?? "

" रघुनाथ ! रघुनाथ ! ! तूंच कां हें विचारितो आहेस ? अरे ! मित्रमंडळींत चार घटका मौजेनं जातील ! देवीचं दर्शन होईल ! निरनिराळ्या प्रकारच्या लोकांची गंमत पहावयास सांपडेल... शिवाय हे नवरात्राचे दिवस म्हणजे सृष्टिसुंदरीच्या नटण्या-मुरडण्याचे !......जिकडे तिकडे पसरलेल्या हिरवळीवर सळ्-सळ्णाऱ्या भाताचीं पिवळीं खाचरं पाहिलीं, म्हणजे वसुंधरेच्या हिरव्या शालूवर ही जरीची वेलबुट्टीच काढली आहे असं कुणाला वाटणार नाहीं ?......खडकाळींतून वाहणारे हजारों प्रवाह माव-ळत्या सोनेरी किरणांत चमकूं लागले कीं, जणुं काय, मेदिनीनें हा रत्नखचित कंबरपट्टाच चढविला आहे कीं काय असा भास होऊन, कोणाचे डोळे दिपून गेल्याशिवाय राहतील ? ?......तीळफुलांच्या खुळखुळ्याचा खुळखुळ आवाज झाला कीं, भूदेवीच्या पायांतील मधुर सिंजिताची कुणाला आठवण होणार नाहीं ? ?......देवळां-

वरील डोंगराच्या सुळक्यांवर बसून सभोंवार दृग्गोचर होणारं हें सृष्टिसौंदर्य पाहून तुझ्या मनाला कसलाच फायदा होणार नाहीं का ? ? ” प्रश्नात्मक विजयानें रघुनाथाकडे पहात मी पृच्छा केली.

“ अहो कविराज ! काव्याच्या अवसानांत काव्यसुंदरीलाच विसरलात ! त्याला सांगा कीं, देवीबरोबर देवींचींहि दर्शनं होतील, म्हणजे जामानिमा करून एका पायावर यायला तो तयार होईल ! ” जोश्यानें अचूक गोळी सोडली.

“ देवींची कीं तोंडावर देवीचा कविला उतरलेल्या छप्पन्न रोगांचं अधिष्ठान असणाऱ्या पैसा मागणाऱ्या भिकाऱ्यांची...? ? ” रघुनाथानें देवी शब्दावर कोटी करून आपल्या शहाणपणाला बाहेर वाट दिली.

बरीच भवती न भवती झाल्यावर ते सर्वजण एकदांचे पांडव-लेण्यावरून चतुःशृंगीकडे जाणाऱ्या रस्त्याला तर लागले.

“ अरेरे ! गरीब बिचारे ! ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत दातांच्या कण्या करून तोंड वेडावीत असतील तेव्हां कोठें पोटाला दोन चार पैसे मिळवत असतील ! ! ” देवळाच्या पायऱ्यांवर दोन्ही बाजूंस बसलेल्या भिकाऱ्यांपैकीं एका हात पाय नसलेल्या भिकाऱ्याच्या थाळींत दिडकी टाकतां टाकतां मी म्हणालों.

“ मन्या ! तूं कांहीं म्हण, पण आळसाला हें उत्तेजन देणं मला मुळींच पसंत नाहीं ! अरे ! इंग्लंडमध्यें औषधालासुद्धां निरुद्योगी लोक मिळत नाहींत !...उगीच नाहीं हजारों मैलांवरून आपल्यावर राज्य करीत...! ! ” साहेबी रघुनाथरावांनीं साहेबांच्या गुणवर्णनाची तळी उचलली.

“ अहो ! जेव्हां तेव्हां इंग्रजांचीच स्तुति गाणारे भाटराज ! जरा विचार केला तर आपणांला असें आढळून येईल कीं, हा दोष सर्वस्वींच आपला नसून आपल्यावर चालू असलेल्या सदोष राज्यपद्धतीचाहि आहे ! जे गलेलठ्ठ लोक देशांत धर्माच्या नांवा-खालीं भिक्षांदेहि करीत असतील त्यांना कायद्यानं तसं करण्याची बंदी करून, त्यांना शक्य तें काम पुरविणं व जे अनाथ, पंगू

असतील त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करणें, हें सुधारलेल्या राज्यकर्त्यांचें कर्तव्य नव्हे काय ? ?......अरे ! अनाथ अबलांच्या उदरनिर्वाहाच्या उद्योगधंद्यांत आजकाल अडचणीचे एवढाले हिमालय पसरले आहेत कीं त्यांची तुला कल्पनाहि येणार नाहीं !! ”

ह्यावर कोणीच कांहीं बोललें नाहीं. मुकाट्यानें पायऱ्या चढत आम्हीं महाद्वाराजवळ येऊन दाखल झालों. ह्या ठिकाणीं बऱ्याच माणसांची गर्दी तुंबली होती. दोन पोलीस शिपाई मोजक्या लोकांची एक टोळी आंत सोडीत होते व ती बाहेर पडल्यावर दुसरीला आंत शिरण्यास परवानगी देत होते. जवळच दोन युरोपिअन सार्जंट, पायऱ्यांवर वर खालीं फेऱ्या करीत बंदोबस्ताचें आपलें काम चोख रीतीनें बजावीत असल्याचें दाखवीत होते. तेथें उभे असलेल्या लोकांशीं त्यांची वागणूक इतकी तुसड्या उर्मटपणाची होती, कीं ती पाहून थंड रक्ताच्या मुर्दाडालाहि चीड आली असती, पण......पण ? ?

लवकरच आमची पाळी आली. मोठ्या शिस्तीनें आम्ही आंत घुसलों, व देवाचें दर्शन घेतल्यावर पुन्हां परत न येतां, तसेच देवळाच्या वरील डोंगरांवर जाऊन, तेथील एका खडकावर फराळाच्या डब्याचा समाचार घेण्यास आम्ही सुरवात केली.

“ अरे ! जातांना आपण Excellency रोडनें जाऊं या अं ! ” विनायकानें सुचना मांडली, व ती सर्वानुमतें पासहि झाली.

पैशाला चार पैसे ! पैशाला चार पैसे ! ! ...... या ...... महाराज...... या ...... ! ! नशीबाचाखेळ आहे ! ! ” एक वीस बावीस वर्षांची तरुणी आपल्या हातांतील डबडं वाजवीत किरकिऱ्या आवाजांत ओरडत होती. तिच्या पोषाखावरून अमुक एका नक्की जातीची ती असावी असें अनुमान करणें जरी धोक्याचें होतें तरी, तिच्या बोलण्याचालण्यावरून ती बहुतेक कुडमुडे जोशी अगर गोसावी ह्यांच्या जातींतील असावी असा आम्ही तर्क बांधला.

तिनें आपल्या सुंदर सडक केंसाच्या दोन वेण्या घातल्या असून, त्या तिच्या पाठीवर मोकळयाच पडल्या होत्या. तिच्या गळयाभोंवतीं गर्द निळया रंगाचा एक मोठा रुमाल असून, त्याखालून तिच्या वक्षस्थलावर रुळणारे चांदीच्या नाण्याचे एक-दोन डागहि मधूनमधून चमकत होते. तिच्या कानांतील कर्ण-फुलांनीं तिच्या चेहऱ्याला असाधारण शोभा आणली होती.

Excellency रोडच्या कडेला असलेल्या एका ‘ कॉर्कच्या ’ झाडाखालीं ती बसली होती, व आपल्या समोरच तिनें आपलें भाकरीचें साधन पसरलें होतें.

मेणकापडाच्या एका चांदव्यावर सोनेरी कागदानें इसपिक, किलवर, बदाम, चौकट, ताज व नांगर हे सहा छाप चिकटवले असून, त्याच्याच लहान प्रतिमा एका लहानशा ठोकळयाच्या सहा बाजूंवर डकविल्या होत्या.

दर्शन घेऊन परत जाणाऱ्या लोकांपैकीं कांहीं लोक तेथें जात, व पैसे टाकून आपल्या नशीबाची परीक्षा पहात. कित्येकांना दैव हात देई; कित्येकाशीं तें लपंडावाचा खेळ खेळे. आम्ही ही मौज पहात जवळच उभे राहिलों होतों. इतक्यांत, मघाशीं महाद्वारावर खडा बंदोबस्त राखणारांपैकीं एक वीर तेथें येऊन दाखल झाला. खिशांतील दोनचार पैशांना चलना दिल्यावर त्या महाशयांनीं आपल्या जिभेचा लगाम जरा सैल सोडला. ‘ कँपमध्यें ’ काम करणाऱ्या एखाद्या घाणेरड्या, चवचाल झाडूप्रमाणेंच ही गरीब-बाई छिनाल असेल, असा स्वतःच्या मनाशीं कयास बांधून तिच्याशीं निर्लज्ज पांचटपणा करण्यास मग त्या शिरोमणींनीं सुर-वात केली. पहिल्याप्रथम त्या स्त्रीनें इकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं, अगर चिडून जाऊन, हमरी तुमरी करून, लोकांत आपला तमा-शाहि करून घेतला नाहीं; पण जेव्हां ह्या शिष्टांचा लघळपणा अगदींच उच्चकोटीला पोंहोचावयाची वेळ आली, तेव्हां जमिनीवर अंथरलेल्या आपल्या पटाकडे पाहून ती फक्त हंसली, व लाज-

ण्याचें वगैरे कोणतेंच प्रदर्शन न करितां, अतिशय गोड व सौम्य शब्दांत त्यांस म्हाणाली:—

"बडे महाराज!! अवघें एकच घर खालीं...!! पैशाला चार पैसे!!......पैशाला चार पैसे!!!"

निष्ठुर दैवाच्या काळ्याकुट्ट हातांनीं हिरावून नेलेल्या इन्दुकान्ताच्या विरहामुळं, संकटांत सांपडून निराश्रित झालेली गरीब बिचारी अनाथ रजनीसुद्धां, एक क्षणभर कठोर विजेच्या विषारी गुलगुलीनें हंसण्याचें नाटकी अवसान आणते; पण त्या एका क्षणानंतर......त्या औट पळच टिकणाऱ्या चमकी साम्राज्याच्या लयानंतर, त्या मदांध सम्राटाला अंधःकाराच्या सप्तपाताळांत गाडण्याकरितां, त्या साध्वी सतीच्या विशाल अन्तःकरणांत भडकलेल्या काजळी डोंबानं जगाचे बावरलेले नेत्र थोडा वेळ मिटतातच ना?

घेरत जाणारी परिस्थितीची प्रबल पकड, निर्बल झालेल्या जातिवंत सिंहिणीला, भेकड कोल्ह्याकुत्र्यांनीं केलेल्या अतिपरिचयाकडे कानाडोळा करावयास लावते; पण झालेल्या अपमानामुळें उठणाऱ्या सुडाच्या लहरी ज्याप्रमाणें तिच्या शिथिल झालेल्या गात्रांनासुद्धां थरथरावयास लावल्यावांचून सोडींत नाहींत, त्याप्रमाणें उकळत्या तेलाचा चरका देत जाणाऱ्या त्या नराधमाच्या हलकट शब्दांनीं तिची देहलतिका संतापाच्या अतिरेकानं नखशिखांत लाल करून सोडली. पोटाची खळगी भरण्याकरितां परिस्थितीनुरूप कवटाळलेल्या धंद्याची पथारी रस्त्यावर पसरणारी ती जरी भिकारडी पोर होती, तरी ती आपल्या जातीला, धर्माला, कुळाला किंवा रक्ताला विसरली नव्हती.

"ह्या प्रकरणाचा नूर कांहीं निराळाच दिसतोय!"

आपली डाळ ह्या ठिकाणीं शिजण्याची फारशी आशा नाहीं, तेव्हां येथून हलकें पाऊल काढण्यांतच आतां खरा शहाणपणा

आहे असें पाहून, ते महाराज हातांतील कातडी छडी निष्काळजी-पणानें बोटाभोंवतीं फिरवीत व तोंडानें शीळ घालीत तेथून ‘सार्जंटी’ शिस्तींत पोबारा करते झाले.

आतां मात्र त्या बालिकेच्या हृदयांत कढणाऱ्या संतापाच्या आंचीची लाली, तिच्या चेहऱ्यावर संध्याकाळच्या नभःपटलाप्रमाणें क्षणोक्षणीं वाढत जाऊं लागली. तिचा पूर्वींचा तो सात्त्विक अवतार कोठल्या कोठें पार मावळून गेला. तो दुष्ट पाठमोरा होऊन एक दोन पळें लोटलीं असतील नसतील तोंच, इतका वेळ एखाद्या गंभीर सागराप्रमाणें सौम्य रूप धारण करणाऱ्या व मधूनच उसन्या हास्याच्या लकेरीचें पाणी खेळविणाऱ्या तिच्या आर्जवी डोळ्यांच्या प्रशांत समरभूमीवर, तिरस्काराची मूर्तिमंत रणदेवता रागत्वेषाच्या तीक्ष्ण आयुधांनीं बेफाम झालेल्या वादळी लाटांच्या थैमानानं थय्थय् नाचूं लागली.

निमिषापूर्वींची कुठें ती कारुण्याची प्रेमळ लतिका !! कुठें ही आतांची रौद्र रूप धारण करणारी भेसूर चंडिका !!

खरोखर ! त्या सैतानानें पुन्हां एकच वार जर निर्लज्जपणानें मागें वळून पहाण्याची तसदी घेतली असती तर, डिंवचलेल्या नागिणीप्रमाणें चवताळलेल्या त्या अबलेच्या भेदक नजरेंतून सुटणाऱ्या अग्निलोळाच्या ठिणग्यांनीं तो तात्काळ भस्मसात झाला असता.

सबंध वाटेनें आम्ही कोणीच कुणाशीं बोललों नाहीं. नुकत्याच पाहिलेल्या भयंकर दृश्यानं आम्ही मंतरलेल्या तक्षकाप्रमाणें मोहमुग्ध होऊन गेलों होतों.

“ सुधारलेल्या राजवटींतील हा सुधारलेला राजदूत अं ! ” हाच विचार पाण्यांत उठणाऱ्या वलयाप्रमाणें आमच्या हृदयाच्या किनाऱ्यांवर जोरजोरानें धडक्या घेत होता.

खोलींत शिरतां शिरतां मी रघुनाथास प्रश्न विचारला:—

"रघुनाथ! रघुनाथ!! पाहिलीस ना? नवऱ्याच्या मागें पोटाचा प्रश्न सोडविणाऱ्या अब्रुदार अबलांची आपल्या देशांतील सध्यांची अवस्था!!"

| प्रकाशनस्थल:— ' यशवंत ' | स्वतंत्र | प्रकाशनकाल:— जानेवारी १९३१ |
|---|---|---|

# अखेर सापडली ! : : : ७

बायजा आज अंथरुणाला अगदीं खिळून राहिली होती. आधींच तिच्या वयाला सत्तर वर्षे झालेलीं, त्यांत डोळे अजिबात गेलेले अन् तशांत पुन्हां हें आजारीपण !

तिच्या वंशाचा एकच आशातंतु......तिचा नातु...... विजय, आज आठ महिने झाले, लढाईवर गेला होता आणि त्यामुळें बिचाऱ्या म्हातारीच्या परावलंबीपणाची कमान अधिकच चढून, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मदतीशिवाय तिचें एक पानही हलेनासें झालें होतें. पैशाच्या चार कपर्दिकांसाठीं अगर अन्नाच्या चार कणांसाठीं आशाळभूतपणानें दुसऱ्याच्या तोंडाकडे, केंविलवाण्या स्थितीच्या निमताळेपणानें पाहाण्याची म्हातारीला जरी कोणत्याही प्रकारची गरज नव्हती, तरी दुसऱ्या इतर अशा किती तरी गोष्टी होत्या, कीं त्यांसाठीं तिला दुसऱ्याच्या मदतीची काठी घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पण म्हाताऱ्या बायजाचा स्वभावच इतका गोड व मनमिळाऊ होता,

कीं, तिचें काम करण्यासाठीं शेजाऱ्या बायाबापड्यांत नेहमीं अहमहमिका सुरू असे. त्या सर्व मोठ्या आस्थेनें पुढें येऊन, तिचें बारीकसारीक काम चुटकीसरसें आनंदानें उठवून देत. कोणी तिचा स्वयंपाक करी, तर कोणी तिच्या औषधपाण्याची व्यवस्था करी, कोणी तिचें अंथरूण घाली, तर कोणी तिला इकडून तिकडे हलण्यास मदत करी.

मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं झगडण्यास निघतांना विजयानें ज्या विश्वासानें म्हाताऱ्या बायजाला साऱ्या गांवच्या स्वाधीन केलें होतें, त्या विश्वासाला खरोखर गांवांतील प्रत्येक रहिवासी पुरेपूर पात्र होता. म्हातारी बायजा आपणाला नसतें ओझें आहे अशी कल्पनासुद्धां कधीं कोणाला शिवली नाहीं.

सध्यां मात्र एक मोठें संकट त्यांच्यापुढें ‘ आ ’ वासून उभें होतें !

म्हातारी बायजा आजारी पडलेली आणि तशांत लढाईच्या आघाडीवरून विजयाच्या खुशालीचें एकही पत्र सबंध तीन आठवड्यांत आलें नव्हतें या काळजीची भर !

दोन बाबतींत बायजाचा दुराग्रह अत्यंत विकोपाला गेला होता. एक, तिची अन्नावरची शिसारी इतकी तीव्र बनली होती कीं, कोणीं कितीही आग्रह केला तरी ती अन्नाकडे ढुंकूनसुद्धां पाहात नसे आणि दुसरी बाब म्हटली म्हणजे पोस्टमनच्या आगमनाची ती इतक्या आत्यंतिक उत्कंठेनें वाट पाही, कीं, तो आला नाहीं म्हणजे तिचा जीव निराशेनें कावराबावरा होऊन जाई.

बायजाला अंतोबा–पोस्टमन् अगदीं आपल्या सख्ख्या मुलासारखा वाटे. अंतोबा तर काय तिच्यावर अतिशयच प्रेम करी. लहानपणापासून विजय व तो तर ‘ बडे दोस्त ’ होते.

आज सकाळपासून बायजाची सारखी तळमळ चालली होती. साऱ्या रात्रभर तिच्या डोळ्यांस डोळा लागला नव्हता. अंथरुणांतून बाहेर पडल्यावर एखाद्या तिरशिंगराव तिरसटाप्रमाणेंच

तिनें " विजयची पत्रं आलीं का ? " म्हणून प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

" जिजि ! आत्तां कशीं पत्रं येतील ? अंतोबा येण्याची ही वेळ आहे का ? हें शेजारणीचें सौम्य उत्तर ऐकतांच म्हातारीस अतिशय वाईट वाटलें व तिच्या निस्तेज डोळ्यांतून एक दोन अश्रू सावकाशपणें तिच्या सुरकतलेल्या गालांवरून खालीं घसरले.

थंडीचा कडाका आज विलक्षणच असल्यामुळें, बायजाला फार वेळ अंथरुणाबाहेर राहवेना. दोन चार गोधड्या अंगाभोवतीं गुरगुटून घेऊन, ती अंथरुणाजवळ ठेवलेल्या शेगडीचा शेक घेऊं लागली. तिच्या म्लान चेहऱ्यावर आलेल्या फिक्कट पांडुरतेनें तिच्या शेजारणी फार घाबरून गेल्या. त्यांनीं तिच्यासाठीं उत्तमसा गवती चहा तयार करून, तिला तो बळजबरीनें पाजला व नंतर आनंद, दुःख, जन्म मृत्यू यांच्याशीं खेळ खेळणाऱ्या त्या आश्चर्यकारक अजबखान्यांतून मुंगीच्या पावलानें येणाऱ्या त्या सुस्त दूताची–पत्राची–वाट पहाण्यासाठीं त्या झोपडीबाहेरील अंगणांत निघून गेल्या. वयानें कोमजलेले हात निर्जीवतेनें एकावर एक टाकून बायजा इकडे शेगडीजवळ स्वतःशींच बोलत बसली होती.

" हो ! माझा विजय कुणाला आवडणार नाहीं ? लोखंडाच्या कांबीप्रमाणें कणखर व लवचिक असलेलं त्याचं अभिमानी शरीर आणि भरगच्च पिळदार छाती पाहून कोण मोहून गेल्याशिवाय राहील ?......हं ! विजयाशिवाय त्याचं चालणार कसं ? .........विजय.........आहाहा !............माझा विजय आपल्या देशाकरितां लढणार......मातृभूमीच्या उद्धाराकरितां आपला देह झिजविणार ! त्याला कितीतरी पदकं मिळतील ! .........तो बडा अंमलदार होईल !.........ओहो ! माझा विजय कित्ती–कित्ती मोठा होणार ! तो आल्यावर माझ्या अभिमानाला......माझ्या भाग्याला केवढी भरती येणार !... माझ्या सु–खा......ला...... !—' या ठिकाणीं बायजाचा

आवाज एकदम चिरकला व कसल्यातरी आठवणीनें तिचा कंठ अतिशय रुद्ध होऊन गेला. रडत रडतच ती किरकिचून म्हणाली—

" काय......काय तें ? कोण आहे तिकडं ? " दाराजवळ असलेल्या बायांपैकीं एक बाई झट्कन् आंत आली व तिनें मोठया जिव्हाळयाच्या प्रेमळपणानें विचारिलें—

" जिजी ! जिजी ! काय पाहिजे तुम्हाला ? कांहीं कमी जास्ती होत नाहींना ? "

बायजानें आपल्या आंधळया डोळयांनीं एकवार चहुंकडे पाहून घेतलें.

" नाहीं बाई ! कांहीं नाहीं !...मला......मला दिसत नाहीं पण मला वाटलं ईश्वरानं माझे गेलेले डोळे मला पुन्हां परत दिले आहेत !...तो पहा...तो पहा, दरवाजांतून विजय आंत धांवत येत आहे असं मला दिसतं आहे ! "

थोडा वेळ बायजा डोळे झांकून स्वस्थ होती. कांहीं वेळानें तिनें आपल्या नेहमींच्याच प्रश्नाची पुनरावृत्ति केली—

" राधे ! आपला अंतोबा आला काग ? "

" नाहीं, जिजी ! अजून नाहीं आला. "

बायजानें एक दीर्घ सुस्कारा सोडला व ती पुन्हा भिंतीला रेलून पडली. तिची शेजारीण हळूच हल्क्या पायानें उठली व दाराबाहेर असलेल्या इतर बायकांत जाऊन मिसळली.

" जिजीचं लक्षण आज कांहीं ठीक दिसत नाहीं ! " बाहेर येतांच ती मोठया गंभीरतेनें म्हणाली. " मला वाटतं कुणीतरी ' डॉक्टरकडे –' पाठविणं बरं. "

" खरंच ! " दुसरी एक जण हलक्या आवाजांत उत्तरली.

इतक्यांत साऱ्या गांवांत अंतोबा या घरगुती नांवानेंच ओळखला जाणारा ' पोस्टमन् ' रस्त्याच्या वांकणावरून, ज्या गल्लींत त्याची इतक्या जडहृदयी उत्सुकतेनें वाट पाहिली जात होती त्या गल्लीकडे वळला.

त्याच्या कातडी पिशवींत युद्धमंडळाच्या कचेरींतून बायजाच्या पत्त्यावर आलेलें एक पाकीट पडलें होतें. त्या पाकिटाच्या अनिष्टसूचक, व अशुभ रंगावरून अंतोबांनीं आंतील बातमी तावडतोब ताडली. ज्या खात्यांत तो नोकर होता त्या खात्याच्या नियमानुसार तें पत्र बायजाला देण्याच्या सेवाधर्मानें तो बांधला गेला होता; पण आंतील जहरी विषानें गरीब बिचाऱ्या बायजाची काय अवस्था होईल, ह्याची कल्पना येतांच त्याच्या लवचिक हृदयाला जडता आली. शेगडीशीं शेकत एकटीच पडलेल्या त्या आंधळया बाईचें केंविलवाणे चित्र त्याच्या डोळयांसमोर मनोमय नाचूं लागलें. तिच्या कोरडया डोळयांतून सतत निखळणारे ते अश्रू विजयाच्या खुशालीविषयीं तिला लागलेला घोर...हात जोडून पुनः पुन्हां मनोभावानें केली जाणारी देवाची ती प्रार्थना वगैरे हृदय-भेदक गोष्टी एखाद्या भुताप्रमाणं त्याच्यापुढें उभ्या राहिल्या. त्याचें अंतःकरण कचरूं लागलें. जड हृदयाने...जड पावलांनीं तो रस्त्यावरून कसा तरी चालला होता. इतक्यांत त्याच्या गोंधळ-लेल्या मस्तकांत एका कल्पनेची चमक चमकून गेली " समजा, एकदोन दिवस हें पत्र मीं असंच दडपून ठेविलं तर ? "

दाराशींच त्याची वाट पहात उभ्या असलेल्या बायकांच्या कानगोष्टी त्याच्या कानांवर आल्या.

" हां, अंतोबा ! पाऊल उचला. जिजींनीं सकाळपासून तुमचा अगदीं ध्यास घेतलाय्. "

अंतोबानें आपल्या पावलांना जरा गति दिली.

" अरे ! पण पत्राचं काय...? हो ! तिच्या स्थितीवरच तें अवलंबून ठेवणं श्रेयस्कर ! " त्यानें मनाशींच विचार केला.

उंबऱ्यांतून आंत शिरतां शिरतां अंतोबानें विचारिलें, " काय ? आज विशेष शिणल्या आहेत वाटतं ? कमी जास्ती आजारी बिजारी तर नाहींत ना ? "

" तसं कांहीं नाहीं म्हणा ! पण विजयच्या बातमीकरितां त्यांनीं अगदीं धरणं घेतलयं ! आघाडीवरून कांहीं पत्रबित्र ! "

" नाहीं. " निश्चयाच्या करारी आवाजांत अंतोबानें उत्तर दिलें व नंतर त्या लहानशा झोंपडींत असलेल्या बायजाच्या अंथरुणाकडे त्यानें आपला मोर्चा वळविला.

बायजाने दारांतच कांहींसा अंतोबाचा आवाज ओळखला होता व त्यामुळें ती अंथरुणावरून उठण्याचा अर्धवट प्रयत्न करीत होती.

" अंतू ! अरे अंतू ! " मोठ्या क्षीणतेनें ती पुटपुटली, " माझं डोकं आतांशा ठिकाणावर नसतं रे ! पूर्वीसारखं आवाजावरून अगर पावलावरून मला बरोबर माणूस ओळखतां येत नाहीं. तूं अंतूच कां बोल ना ? "

" जिजी—जिजी ! " अंतोबाने हलकेच उत्तर दिलें, " मी तुमचा अंतूच आहे नव्हे कां ? "

बायजाविषयीं वाटणारी माया त्यचाया डोळ्यांत द्रवरूपानें तरळूं लागली.

" अरे विजयकडून कांहीं पत्र आलंय कां ? " म्हातारीनें कळवळून विचारिलें.

अंतोबा जरा वेळ गप्पच होता. ' काय करावं ? ' हा एकच विचार त्याच्या अंतःकरणांत थैमान घालीत होता. ' आपणाला आतां खोटं बोलावं लागणार !'......कोणातरी एका अजस्त्र सैतानाच्या प्रबल पण अदृष्य अशा मगरमिठींत आपण सांपडलों आहोंत व तो आपणावर जोरजोरानें प्रहार करीत आहे असा अंतोबाला भास झाला. त्याचें हृदय कंपित झालें. देह थरारून गेला. साऱ्या अंगावर रोमांच उभे राहिले.

इतक्यांत बायजानें काकुळतीनें विचारिलें, " अरे सांग ना ? लढाईवरून कांहीं पत्र आलंय का ? "

" नाहीं ! " खरी गोष्ट धडधडीत लपवून अंतोबा असत्य बोलला.

बिचाऱ्या बायजानें भिंतीशीं ठेवलेल्या तक्क्यावर निःसहाय निर्बलतेनें आपली मान टाकून दिली.

"ह्या नुसत्याच वाट पाहण्यानं माझा जीव कसा टांगला आहे! हें कंटाळवाणें निर्जीव जीवन मला अगदीं असह्य झालं आहे!" बायजाची कुरबूर जगाला विटलेल्या एखाद्या अभाग्याप्रमाणें चाललीच होती.

अंतोबानें एकदां चौकसदृष्टीनें त्याच्याबरोबर आंत आलेल्या दोन बायांकडे पाहिलें व त्यांच्या चिंतायुक्त प्रश्नात्मक नजरेला नजरेनेंच उत्तर देत तो अगदीं खालच्या आवाजांत उद्गारला, " जातांना मी मुद्दाम 'डॉक्टरां'कडे जाऊन त्यांना धाडून देतों हं."

जातांना मोठ्या उत्साही स्वरानें बायजास धीर द्यावयास तो विसरला नाहीं. " जिजी, तुम्ही अशा घाबरताय काय ? अगदीं आनंदी राहा! आज कांहीं लढाईवरून डांक येण्याचा दिवस नाहीं."

" आं! खरंच कीं काय!" श्रान्त पडलेल्या बायजाच्या खोल आवाजांत आशेच्या नाजुक तारेची साथ ऐकूं येत होती.

" हो, खरंच. उद्यां किंवा परवां डांकेची वाट आहे. त्या वेळीं हमखास विजयच्या खुशालीचं पत्र येईल."

" अंतू! तुला खरंच का असं वाटतं ?"

" खरंच! अगदीं खरंच! विजय खात्रीनं खुशाल आहे असं माझं मन मला ग्वाही देत आहे."

" आहे—आहेच !" बायजा एकदम आनंदी उल्हासानें उत्तरली. " माझा विजय अगदीं खुशाल आहे ! अंतू, ईश्वर तुझं कल्याण करो. तूं अतिशय उत्तम अन् सद्गुणी मुलगा आहेस. माझ्याशीं तूं कधींही प्रतारणा करणार नाहींस. देव तुला नेहमीं सुखांत ठेवील, हा माझा म्हातारीचा आशीर्वाद कध्धीं—कध्धीं खोटा होणार नाहीं. विजय—विजय खुशाल आहे !"

खिशांतील रुमालानें आपले भरलेले डोळे पुसून अंतोबानें चट्कन् आपलें तोंड फिरविलें आणि नंतर आपल्या फेरीच्या फिरतीला त्यानें आस्ते आस्ते सुरुवात केली.

युद्धमंडळाच्या कचेरींतून आलेलें पत्र अजून त्याच्या कातडी पिशवींत जेथल्या तेथें कायम होतें.

*  *  *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पत्राची ‘ डिलिव्हरी ’ करीत असतां अंतोबाला बायजाच्या नांवावर विजयकडून आलेलें आणखी एक पत्र आढळून येतांच, अतिशय आश्चर्य वाटलें. त्याच्या लहानपणाच्या मित्राचें—विजयचें हस्ताक्षर जरी त्याच्या पूर्ण ओळखीचें होतें, तरी कांहीं वेळ त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना इतका तो भांबावला होता. थोड्या कालावधीनंतर मात्र त्याला सत्याची जाणीव झाली.

“ दुर्दैवी विजय हें पत्र लिहिल्यावरच मारला गेला असेल ! त्याच्या निधनाची वार्ता कळविणारं पत्र ‘ वॉर ऑफिसच्या स्पेशल सर्व्हिसमधून आल्यामुळं तें आपणाला या पत्राच्या एक दिवस अगोदर मिळालं. अरेरे ! काय विचित्र विधिघटना ही ! ! आजीला मोठ्या आनंदानं धाडलेलं पत्र त्याच्या आयुष्यांतील शेवटचंच ठरावं ना ? जिजींना ही बातमी कळली तर...तर काय...? ”

बिचाऱ्या अंतोबाला या विचाराची धग असह्य झाली. इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून मोठ्या नेटानें चढविलेला म्हातारीच्या आशेचा मनोरा दगडी निर्दयतेनें जमीनदोस्त करण्याइतकी निष्ठुरता त्याच्या कोमल व हळुवार हृदयांत खास नव्हती.

पत्र घेऊन धांवत धांवतच अंतोबा बायजाच्या झोंपडीकडे निघाला. जातांना त्याची एवढी तारांबळ...एवढी घाई उडाली होती, कीं थोडक्यांत चुकलें नाहींतर दाराच्या उंबरठ्याला ठेंचकळून त्यानें जमिनीवर साष्टांग प्रणिपातच घातला असता.

“ जिजी ! ” झोपडींत शिरतांच अंतोबानें हांक मारली. बायजा अंथरुणांत पडली होती; पण तिनें अंतोबाचा आवाज तात्काळ ओळखला व त्याला खुणेनेंच जवळ बोलाविलें.

ती आज अतिशय कृश व क्षीण दिसत होती.

अंतोबा जवळ जातांच तिच्या आंधळया डोळ्यांत थोडीशी तकाकी आली.

" आज पहांटेपासून माझं बस्तान थोडसं बिघडलं आहे; " ती म्हणाली " पण एवढं भिण्यासारखं कांहीं नाहीं अं ! अरे ! नेहमीं नसतं कां, त्यांतलंच ! बरं. तें राहूं दे ! तूं माझ्या विजयचं पत्र आणलंस का,? "

" होय ! आणलंय् ना ! " असें म्हणून अंतोबानें इतके दिवस ज्या मौल्यवान् लिखाणासाठीं बायजानें हाय घेतली होती तें लिखाण तिच्या हातांत दिलें.

कांपणारीं बोटें पत्रावरून फिरवीत बायजा सुस्कारा सोडून म्हणाली, " देवा ! देवा ! तुझे माझ्यावर अगणित उपकार आहेत ! ते मी आतां कसे फेडूं ? "

थोडा वेळ झोपडींत निर्वेध शांतता वास करीत होती. कांहीं वेळानें बायजानें तें पत्र फोडून वाचण्यास अंतोबाच्या हातीं दिलें.

विजयानें तें पत्र किती उत्साही आनंदानें लिहिलें होतें. प्रत्येक शब्दांत त्याच्या नव्या जोमाची धडाडी उचंबळून येत होती. घारी-प्रमाणें घिरट्या घालून झडप घालण्याकरितां आकाशांत टपून बसलेला तो मृत्यु......शत्रुपक्षाकडून गारांच्या पावसाप्रमाणें येणाऱ्या तोफांच्या वर्षावानें होणारा तो भयंकर संहार......प्राण-घातक विषारी सुरुंगानें दुभंग झालेल्या धरणीमातेंत पटापट बळी पडणारे ते अभागी जीव......देशाकरितां आत्मत्यागाला तयार झालेल्या वीरांच्या पोटांत धुसडलीं जाणारीं तीं तीक्ष्ण शस्त्रें...... मरणाच्या दारीं पडून तृषेनें व्याकूळ झालेल्या भाईबंदांच्या त्या करुण हृदयविदारक किंकाळ्या......समोर धडधडीत दिसणाऱ्या रणांगणाच्या ह्या भेसूर, भयाण वातावरणांतून लिहिल्या गेलेल्या पत्रांत निराशेचा एकही बोल नसावा......उलट आशादेवीच्या मधुर कंठांतून निघालेल्या गोड गोड गाण्यांनीं तें भरलेलें असावें हें केवढें आश्चर्य !

विजयानें आपल्या गांवांतील चिमुकल्या बालमित्रांना प्रेमाचा आशीर्वाद देऊन खाऊची लालूच दाखविली होती व वडिलधाऱ्या माणसांना त्यानें अत्यादरानें नमस्कार प्रविष्ट केला होता. ‘ मी लवकर येणार आहे ! तूं आनंदी रहा ! ’ असें त्यानें जिजींना पुन: पुन्हां बजावून लिहिलें होतें.

पत्राचा शेवट वाचतांना अंतोबाचा ऊर भरून आला. विजयचीं शेवटचीं ‘ तुझा लाडका विजय ’ हीं अक्षरें त्याच्या सद्गदित कंठांतून बाहेर आलीं नाहींत.

बायजाच्या आंधळ्या डोळ्यांत समाधानाचा आनंद विलसूं लागला. हातांत हात घालून ती मागें रेलून पडली. पूर्ण शांततेचें गोड हास्य तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर चमकत होतें.

“ ईश्वर किती दयाळू आहे पहा ! ” ती म्हणाली. “ एखाद्याच्या सहन करण्याच्या शक्तीपलीकडे तो कृपाळू त्याला कधींही छळणुकीचा त्रास देत नाहीं !......दु:खाची एखादी अंधारी रात्र घालवावी लागेल; पण त्यानंतर येणारा सुखाचा प्रभातकाल प्रत्येकाच्या असा अनुभवास येतोच येतो ! ”

बायजानें आपले आंधळे डोळे मिटून घेतल्यामुळें अंतोबाला उठावें लागलें. जाताना त्यानें तें गोड पत्र तिच्या उशालगतच्या कोनाड्यांत ठेवून दिलें.

त्या रात्रीची बायजाची झोंप ही शेवटचीच काळझोंप ठरली. पत्राच्या प्रकरणावर अशा रीतीनें जरी काळाचा काळा बुरखा पडला, तरी सदसद्विवेकबुद्धीच्या भाल्याची बोंच अंतोबाला स्वस्थ बसूं देईना. चारपांच दिवसांनीं पत्राची पोंच करण्याचें काम संपल्यावर, तो आपल्या वरिष्ठ अंमलदाराकडे गेला व युद्धमंडळाच्या कचेरींतून आलेलें तें पाकीट संथपणानें त्यांच्या स्वाधीन करून मालकाला पत्र न देतां तसेंच मागं ठेवण्याच्या गुन्ह्याचा स्पष्ट कबुलीजबाब त्यानें सरळपणानें त्यांच्यासमोर देऊन टाकला. पण हें करीत असतां त्याच्या आवाजांत थोडीशी कांपरी चंचलता आली. त्यचे घारे डोळे जमिनीकडे लागले.

" तिला जर कळलं असतं, कीं लढाईत आपला विजय मृत्यु-मुखीं पडला तर तिच्या आयुष्याचे शेवटचे क्षण भयंकर हालांत गेले असते! शेवटपर्यंत, आपला विजय खुशाल आहे अशाच-समजुतींत ती असल्यामुळं, तिला अगदीं सुखाचं मरण आलं आणि मोठ्या आनंदानं ती देवाच्या घरीं निघून गेली!

...पण!...पण मला वाटतं, मी असं करावयास नको होतं!... कदाचित् माझ्या नोकरीवरही आतां गदा येईल!"

मास्तरसाहेब अंतोबाचें बोलणें एकाग्रतेनें ऐकत होते. त्यांनीं तें 'वॉर ऑफीस लेटर' स्वतः फोडून वाचण्यास सुरवात केली. आंत विजयच्या निधनाचीच बातमी होती.

पत्र पाकिटांत घालून टेबलावर ठेवतां ठेवतां मास्तरसाहेबांच्या अन्तःकरणांतून एक जड निःश्वास बाहेर पडला.

"कांहीं असलं तरी तूं शिस्तीचं उल्लंघन केलं आहेस!" मास्तरसाहेब कठोरतेचा आव आणीत उद्गारले. "तसं म्हटलं तर कायद्याच्या दृष्टीनं तुला...! पण जाऊं दे! मी कांहीं तुझ्या-विरुद्ध 'रिपोर्ट' करणार नाहीं खास! जा! पुन्हां मात्र चूक करूं नकोस!"

"नाहीं! पुन्हां मी असं करणार नाहीं!" अंतोबा गोगल-गाईच्या गरिबीनें म्हणाला व कृतज्ञतेनें मास्तरसाहेबांस नमस्कार करून, त्यानें घराची वाट धरली.

'ऑफीस'च्या दारांतून बाहेर पडणाऱ्या अंतोबाकडे मास्तर-साहेबांची स्नेहपूर्ण दृष्टि लागली होती. सहानुभूतीच्या ओलाव्यानें त्यांच्या डोळ्यांवर अंधुकसा पडदा आला होता.

* * *

लवकरच विजयच्या मरणाची अशुभ वार्ता साऱ्या गांवांत पुराच्या पसरणाऱ्या पाण्याप्रमाणें हां हां म्हणतां पसरली.

तरुण, उत्साही, होतकरू वीराच्या ह्या अकालीं निधनानें गांवां-तील हरएक जीव हळहळून गेला. त्याच्या लहानपणाच्या बालिश

लीला, त्याचा गोड स्वभाव, त्याची खेळकर वृत्ति...गांवाविषयीं त्याला वाटणारा अभिमान...जिजीवरील त्याचें गाढ प्रेम...ह्याच गोष्टी कित्येकांच्या बोलण्याचा कित्येक दिवस विषय होऊन बसल्या.

स्वर्गस्थ बायजाविषयीं मात्र प्रत्येकजण हेंच म्हणाला कीं “ गेली बिचारी ! विजयच्या मरणाचा धक्का बसण्यापूर्वीच, म्हातारी हा लोक सोडून गेली. जिजीनें अखेर साधली ! ”

दु:खी आयुष्याची ती आनंदी अखेर, अखेर जिजीनें साधली, कीं अंतोबानें ? ?

| प्रकाशनस्थल:— | Mary Corelli च्या | प्रकाशनकाल:— |
|---|---|---|
| ‘ रत्नाकर ’ | “ A Breach of Post Office Discipline ” ह्या गोष्टीवरून | नोव्हेंबर-डिसेंबर १९३० |

# निवळलेली कालिमा : : : ८

"All seems infected that the infected spy
As all looks yellow to the jaundiced eye"

— oXo —

माझी आई वारली त्यावेळीं मी फक्त सोळा वर्षांची होतें. माझ्यासारख्या तरुण मुलीला मातेच्या त्या मृत्यूनें किती विलक्षण वाईट वाटलें असेल, ह्या विषयींची थोडीबहुत कल्पना तुम्हांपैकीं प्रत्येकाला करतां येईलच. खरोखर, त्यावेळीं मी अगदीं असहाय होऊन, माझी स्थिती कमालीची केविलवाणी झाली होती. वियोगाच्या दु:खाचा डोंगर निर्घृणपणानें मजवर कोसळून पडला होता आणि त्या भारानें माझें अन्त:करण शतश: विदीर्ण होत होतें. परंतु......असें असूनसुद्धां, दगडालादेखील पाझर फोडणाऱ्या माझ्या त्या शोकमग्नावस्थेंत, माझ्या हृदयाच्या अगदीं आंतल्या...आंतल्या भागांत 'झालं हें एक परीनं बरंऽच झालं!' अशा प्रकारच्या समाधानी नि:श्वासाचा मूकध्वनी मधुनमधून उम-

टतच होता; आणि त्याचें कारणहि पण उघडच होतें. माझ्या आईचें आयुष्य इतकें अभागी— कष्टदायक—त्रासाचें अन् एकाकी होतें कीं, मानवी प्राण्याला जेवढे म्हणून खडतर भोग भोगतां येणें शक्य आहे, तेवढे सारे—सारे तिनें भोगले होते. इतकेंच काय, पण त्या सर्वांच्या परिसमाप्तीनंतरच तिनें अखेरचा ‘राम’ म्हटला होता.

माझे बाबा मला स्वतःला क्वचितच आठवत. त्यांच्याविषयींचें माझें स्मरण म्हणजे माझी एक कल्पनाच असावी, असें मला वाटे; कारण माझी आई त्यांच्या ज्या गोष्टी सांगे त्यांत, व त्यांच्या-बद्दलच्या माझ्या अंधुक स्मृतींत फारच तफावत होती. नेहमीं ज्या वेळीं माझ्या मनांत त्यांच्यासंबंधीं विचार येत, त्यावेळीं.....माझें सतत मोठ्या लडिवाळपणानें कोडकौतुक करणारी......मी मागत असणारी प्रत्येक गोष्ट मला लगोलग आणून देणारी......त्यांच्या बरोबर पूर्वी आम्ही ज्या घरांत रहात होतों, त्या घराभोंवतीं असणाऱ्या सुंदर, छोटेखानी बागेंत माझ्याशीं पुष्कळ वेळपर्यंत हौसेनें खेळत बसणारी- अशी एक उंच, बांधेसूद काळ्याभोर केंसांची प्रेमळ आकृति माझ्या अंतश्चक्षूंसमोर उभी राही.

* * * *

बाबा आईला अत्यंत निष्ठुरपणानें वागवीत असत, असें माझी आई मजजवळ कित्येकदां तरी बोलली होती. आपल्याकडे निरंतर दुर्लक्ष करून, सदा सर्वकाळ ते आपल्याच ऐषारामांत दंग असतात, केवळ आपल्या चरितार्थास लागणारी जरूर ती पोटगी पाठविण्यांतहि त्यांची नेहमीं टंगळमंगळ चाललेली असते, अशा-प्रकारची तक्रारवजा कुरकुर केल्यावांचून तिचा एकहि दिवस सुना जात नसे. रोज घडणाऱ्या कसल्यातरी क्षुल्लक प्रसंगावरून तिच्या पूर्वकालीन आयुष्यांतील एखादा ओझरता विचार तिच्या मनांत येण्याचा अवकाश कीं, संतापातिरेकानें—‘ हत्तीच्या अंगासारखी असणारी घरची सारी संपत्ति आपल्या मूर्खपणानें बोळवून, उरव-टयाला पुरवठा म्हणून माझ्याहि माहेरकडून आलेल्या सगळ्या

जिंदगीचा त्यांनीं सत्यानाश करून टाकला......आणि......कसाबसा उभा असलेल्या आपल्या संसाराच्या डोलाऱ्याला आपणाच भडाग्नि देऊन, त्याच्या उबेंत मारे आतां स्वस्थपणानं ते शेकत बसले आहेत!' असे कहारी उद्गार पटकन् तिच्या थर्थर्णाऱ्या ओंठांतून बाहेर पडत आणि सरते शेवटीं त्याचें पर्यवसान—'तुझे वडील अगदीं खाष्ट......निर्दय......उलट्या काळजाचे आहेत!' असल्या ठराविक तळतळाटांत होई. तिच्या डिंवचलेल्या विकाराचा हा त्रासिक उद्वेग जरा वेळानें कांहींसा कमी झाल्यावर, तिच्या अन्तःकरणांतील इतर सौम्य भावना अगदीं उचंबळून येत आणि मग तिला भडभडून येऊन,—'सटवीनं माझ्या प्राक्तनांत सुखच लिहिलं नसलं, तर मला तरी तें कोठून मिळणार...?...??' असें रुद्ध कंठानें आपल्याशीं पुटपुटत, ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागे.

मलाही अर्थातच ह्या गोष्टींवर विश्वास ठेवणें भाग होतें; कारण माझ्या बालपणांतील मला थोडथोडी आठवणारी आमची श्रीमंती आणि सध्यांची आमची अगदीं हालाखीची स्थिति, ह्यांतील करुण विरोध चटकन् माझ्या डोळ्यांत भरण्यासारखा होता. पूर्वीं आमचें रहाण्याचें ठिकाण फारच सुरेख होतें......घरांत एक छानदारशी मोटारगाडी होती......दिमतीला दोन चार नोकर चाकर होते. माझ्या शैशवावस्थेंतील ह्या व असल्याच इतर कांहीं टळक ठळक बाबी मला चांगल्याच स्मरत होत्या......पण......पण...आतां त्यांचा काय उपयोग होता? प्रस्तुत तर त्या साऱ्या जाऊन, त्याऐवजीं सर्वसाधारण वस्तींत असलेल्या एका मोडक्यातोडक्या चंद्रमौळी इमारतींतील अगदीं बाजूच्या दोन गलिच्छ खोल्यांत रहाणें........व वडिलांकडून येणाऱ्या अर्धवट पुंजीवर कशीबशी गुजराण करून, आला दिवस कष्टानें ढकलणें........हेंच आमच्या नशीबीं आलें होतें. सुदैवानें, आम्ही ज्या एका संस्थानच्या गांवीं रहात होतों, त्याच्या आसपासच्या भागांत निरनिराळ्या प्रकारचीं फळें, भाजीपाला, दूधदुभतें वगैरे जिनसांची खूप

समृद्धी असल्यामुळें, त्या बऱ्याच अंशानें पुष्कळ स्वस्त मिळत व तेवढ्या बाबतींत तरी आम्हासारख्या गरीबांची रेटून चंगळ असे. आमची अगदीं निकृष्टावस्था असूनसुद्धां, माझी अंगलट उफाड्याची बनून मी सशक्त होण्यास व माझ्या शरीरसौष्ठवांत टचटचीत डौलदारपणा येण्यास ह्याच गोष्टी कारणीभूत झाल्या होत्या. इतकेंच नव्हे तर, केतकीप्रमाणें असणाऱ्या माझ्या अंगकांतींतील सतेज अन् पिवळसरपणाचें मूळहि पण बहुतांशीं त्यांतच होतें.

शिक्षण घेण्याच्या उद्देशानें ह्याच गांवीं असलेल्या स्थानिक ‘ सरस्वती मंदिरांत ’ मी नियमानें जात असें. खरोखर, ती शाळा मला मनापासून आवडे व तीवर मी अत्यंत निरतिशय प्रेम करीं. कित्येक वेळीं शाळा सुटल्यावर माझ्या कांहीं जिवलग मैत्रिणी मजबरोबर खेळायला म्हणून आमच्या घरीं येत व मग आमचें खेळणें वगैरे झाल्यावर, आम्ही सर्वजणी आईशीं अगदीं मनमोकळेपणानें बोलत बसत असूं. मला नेहमीं त्यावेळीं राहूनराहून वाटे कीं, माझ्या आईला दुसऱ्या मुलींच्या आया काय करीत हें समजून घेण्यापेक्षां, आम्ही काय केलें हेंच समजून घेण्यांत अधिक गंमत वाटे, हें कसें ? पण माझ्या मनाला आतां पूर्णपणें पटतें कीं, त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें असें कांहींच नव्हतें. आईच्या त्या एकलकोंड्या आयुष्यांत माझ्या जीवनाव्यतिरिक्त असा कोणता प्रेमाचा पाश तिला उरला होता ? मीच सर्वस्वीं तिच्या दुःखाचा विरंगुळा आणि सुखाचें परम निधान नव्हतें काय ?

एके दिवशीं संध्याकाळीं शाळा सुटून मी घरीं येतें तों, आई स्वयंपाकघरांत दाराशींच चौंवडी गुरगुटून घेऊन, हुः हूः करीत बसली होती. दुःखानें अगोदरच म्लान झालेला तिचा चेहरा अधिकच गलित होऊन, विलक्षण भेसूर दिसत होता. मी झट्दिशीं तिच्याजवळ गेलें अन् पहातें तों, तिच्या सर्वांगावर बारिक कांटा उभा राहून, तिला लवकरच थडथडून हिंव भरून येण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. ‘ मी तुला अंथरुण घालून देतें!.....

चांगलं पांघरुण घेऊन नीट नीज तरी ........! ' असें मी तिला परोपरीनें विनविलें पण तिनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. माझें न ऐकतां, तशाच कुरमुऱ्या स्थितींत ती उठली व चुलीवर भाताचें आधण ठेवून, आमच्या रात्रीच्या जेवणाची तयारी करण्यास तिनें प्रारंभ केला. ' शेजारच्या गजराकाकूंकडं जाऊन, त्यांच्या परसांतील थोडा गवती चहा आणूं का ?' मोठ्या अजीजीनें मी तिला विचारिलें पण तिनें ' कांहीं नको ! मला काय होतंय ? ' असलें कांहींतरी वैतागपूर्ण व उडवाउडवीचें उत्तर देऊन, त्या गोष्टीला सरळ नकार दर्शविला. स्वयंपाक होतांच, चुलीजवळच दोघींच्यीं ताटें वाढून घेऊन, तिनें मला जेवावयास बोलाविलें. पाटावर बसून मी जेवूं लागलें पण त्या दिवशीं जेवण्यापेक्षां माझें लक्ष तिच्याकडेच जास्त होतें. तिनें फक्त नांवालाच आपलें पान वाढून घेतलें होतें. पण त्यांतील एकाहि पदार्थाला ती स्पर्श करीत नव्हती. ह्या नाहीं त्या कारणावरून कसलें तरी बोलणें काढून माझ्याशीं बोलत बसण्याचा मात्र तिनें अखंड सपाटा चालविला होता. आपण जेवलों नाहीं तर मीहि कदाचित् जेवणार नाहीं अशी तिला शंका येऊनच कीं काय, तिनें हें सारें......निव्वळ सोंग केलें होतें. मलाहि मग फारसें जेवण जाईना; पण ' घे ग ! घे ग ' असें करून, ती मला पुन्हां पुन्हां आग्रहानें वाढतच होती. माझें जेवण होतांक्षणींच मात्र, तिला तिथें इतःपर अधिक वेळ बसवेना म्हणून, मागील आंवरासावर मला करावयास सांगून, ती तडक बाहेरील खोलींत मी घातलेल्या तिच्या अंथरुणावर निजावयास गेली. मीहि मग उष्टींखरकटीं वगैरे काढून भांडीं घासलीं व थोडीशी झांकापांक करून, स्वयंपाकघरांतीलच माझ्या नेहमींच्या खणांत आपली गादी पसरून दिली आणि पडल्यापडल्याच दुसऱ्या दिवसाच्या शाळेंतील पाठाचीं कांहीं पानें वाचून, नंतर झोंपीं गेलें.

मध्यरात्रीच्या सुमारास कसल्यातरी चमत्कारिक आवाजानें मला एकदम—एकाएकीं जाग आली. अंथरुणांत उठून बसून मी लक्षपूर्वक ऐकूं लागलें. माझी आई अगदीं उच्च स्वरांत बोलत होती

व मध्येंच विचित्रपणें हंसत होती. ती कुणाशीं बोलत असावी हें समजण्याकरितां, मी एक क्षणभर एकाग्रतेनें कानोसा घेतला पण त्या ठिकाणीं कोणींच नसावें असें वाटल्यामुळें मी उठलें व बाहेर तिच्या खोलींत गेलें. खोलींत कोणीहि नसतांना, स्वतःशींच हंसत —खिदळत, मोठ्यानें बडबड करीत, आई बिछान्यावर बसली होती. मी आल्याची चाहूल तिला मुळींच लागली नाहीं अथवा ती मला ओळखूंहि शकली नाहीं. मी भयंकर घाबरून गेलें. असल्या आजारीपणाचा मला कधींच अनुभव नव्हता. तरी आईची तब्येत अतिशय बिघडली असली पाहिजे, हें मला कळून आलें. दार उघडून धांवत धांवतच मी शेजारच्या गजराकाकूंकडे गेलें व त्यांना हांक मारली—

माझ्या एकदोन हांकांनीं गजराकाकू जाग्या होऊन बाहेर आल्या. त्यांनीं कांहीं विचारण्याच्या अगोदरच—‘ काकू ! काकू ! ! आई कशी करतीय, पहा हो ! तिला काय झालंय ? ’ असें मी रडत-रडतच त्यांना म्हटलें. त्यांनीं येऊन आईची स्थिति पाहिली व पुन्हां परत घरीं जाऊन, आपल्या पतीस—बळवंतरावांस संस्थानी धर्मार्थ दवाखान्यांतील थोरले डॉक्टर आणण्यास धाडून दिलें.

प्रत्येक गोष्ट त्या वेळीं इतक्या त्वरेनें घडली कीं, खरोखर काय घडलें हेंच मला मुळीं समजलें नाहीं. डॉक्टर आले व त्यांनीं आईला दवाखान्याच्या मोटारींत घालून, ताबडतोब ‘ हॉस्पिटल कडे ’ नेण्याची व्यवस्था केली. सकाळीं बाबांना तार करण्याविषयीं बळवंतरावांनीं मला सांगितलें पण त्यांचा पत्ता मला कुठें माहित होता ? मी स्वतः त्यांना पूर्वी कधींच पत्र लिहिलें नव्हतें. तथापि आईची ट्रंक धुंडाळून, मी तो शोधून काढला व ताबडतोब त्यांना निघून येण्याविषयींचा ‘ टेलिग्रॅम् ’ धाडून दिला. आपण येत आहोंत, असा त्यांचा उलट तारेनें जबाबहि आला पण ते येण्याच्या आंतच, ‘ हॉस्पिटल्मध्यें ’ जवळ कुणीहि नसतां, आईचा प्राण तिच्या कुडींतून निघून जाऊन, ती कायमची मुक्त झाली होती.

बाबा दुसरे दिवशीं येऊन दाखल झाले. आई गेल्याचें कळतांच, त्यांनीं फक्त एक लांब सुस्कारा सोडला.

बऱ्याच दूरवरून त्यांना यावयाचें असल्यामुळें, आईच्या देहावसानापूर्वी ते येऊं शकले नाहींत, ह्यांत खरें पाहिलें असतां त्यांचा कांहींच दोष नव्हता; पण मला मात्र त्या घडीला असें वाटलें कीं, आम्हांवर इतक्या दीर्घ काल त्यांनीं चालवलेल्या अन्यायाच्या जखमेंत हें आतां अपमानाचें मीठ भरणें आहे. ती वेळच अशी कातर होती कीं, त्यावेळीं माझ्या मनाचा दृष्टीकोन अतिशय एकांगी व असमंजस बनला होता आणि त्या कारणानें माझी तार मिळतांच ते तावडतोब निघाले, ही सत्य परिस्थितीसुद्धां माझ्या हेकेखोर अंत:करणावर कसलाच परिणाम करूं शकली नाहीं. उलट आईच्या मृत्यूला अप्रत्यक्षरीत्या बाबाच कारणीभूत झाले, असा माझ्या मनाचा पक्का दुराग्रह मात्र होऊन बसला.

* * *

बाबा आले तेव्हां, ज्यावेळीं त्यांची व माझी पहिल्या प्रथम दृष्टादृष्ट झाली, त्यावेळीं ' ते शरीरानं धिप्पाड, आनंदी आणि सुस्वरूप आहेत अशी त्यांच्याविषयीं माझी जी पूर्वकल्पना होती, ती अगदीं बरोबर आहे ! ' असा विचार क्षणभर माझ्या मनांत आला. पण नंतर मात्र, त्यांचा तो बराचसा उंची व अद्ययावत् पोषाख पाहून—' स्वत:च्या मिजाशीचे चोचले पुरविण्यास लागणाऱ्या पैशाला त्यांच्याजवळ यत्किंचित्सुद्धां वाण दिसत नाहीं; पण तेच पैसे कधींमधीं आम्हाला पाठविण्याची पाळी आली कीं, तेवढ्यापुरती त्यांची कमालीची कुंजुपगिरी चालावी अं ? '—ह्या आत्यंतिक चीड आणणाऱ्या प्रश्नानें माझें अंत:करण व्यथित करून टाकलें. इत:पर शक्य तितका त्यांचा द्वेष व तिरस्कार करावयाचा असा मी स्वत:शीं कृतनिश्चय केला. आईला व मला विभक्त ठेवण्याच्या प्रकरणांत सर्वतोपरी तेच दोषार्ह असले पाहिजेत, अशी पुरेपूर खात्री झाली; आणि म्हणून, आईचें आयुष्य त्यांनीं जितकें खडतर, दु:खी आणि असह्य करून टाकिलें होतें तितकेंच त्यांचेंहि आयुष्य आपण खडतर, दु:खी आणि असह्य करावयाचें, अशी मी आपल्या हृदयाशीं पक्की खूणगांठ बांधून घेतली.

इतक्या निष्ठुरपणानें सूडाची भावना ठेवण्याइतकें त्यावेळीं माझें वय नव्हतें, अशा प्रकारचा संशय कित्येकांना वाटण्याचा संभव आहे; पण ह्या बाबतींत कुणाला कांहींहि वाटो. आईच्या मरणाचें प्रायश्चित बाबांना ह्या ना त्या परीनें भोगावयास लावावयाचें, अशी मी आपल्या मनोदेवतेस साक्ष ठेवून आणभाक वाहिली, एवढी गोष्ट मात्र निश्चित.

आईला तेरा दिवस होतांच, बाबांनीं आमच्या बिऱ्हाडांतील बहुतेक सर्व सामानाची तिथेंच विल्हेवाट लावून टाकली व मला बरोबर घेऊन, ते परत मुंबईस जावयास निघाले.

मुंबईस पोंहोंचल्यावर पहिले एकदोन दिवस बाबांनीं मला आपल्या जुन्या बिऱ्हाडींच ठेवून घेतलें. त्या दोन दिवसांच्या अवधींत तेथील एकंदर परिस्थितीवरून, त्यांच्या पूर्वजीवनाची मला थोडीशी कल्पना आली व बाह्यात्कारीं दिसणारा त्यांचा तो डामडौल केवळ पोषाखी, दिखाऊ अन् फसवा आहे, असें स्पष्टपणानें माझ्या निदर्शनास आलें.

एका सर्वसाधारण भिकार चाळीच्या दुसऱ्या मजल्यावरील जिन्याजवळच्याच एका लहानशा खोलींत ते रहात असत व जेवणासाठीं कुठल्यातरी तिसऱ्या वर्गाच्या डफ्फड खाणावळींतून एक डबा आणवून, त्यांतील तें निवून गेलेलें गचाळ अन्न कामावरून आल्यावर, केव्हां तरी वेळीं अवेळीं खात झालें.

आम्हां दोघांनाहि पुरेल अशी नवीन व सोयीची जागा मिळेतोपर्यंत, मध्यंतरींच्या काळांत आपल्याप्रमाणें माझीही आबाळ होऊं नये म्हणून, ह्यानंतर बाबांनीं मला वीणाबाई नांवाच्या त्यांच्या विशेष परिचयाच्या अशा एका दूरच्या नातलग विधवा स्त्रीकडे रहावयास नेलें व —‘ ह्या बाई आपणांस कोणी परक्या नाहींत ! आपलं नीट लागी लागेपर्यंत तूर्त दोन तीन आठवडे तूं इथंच मुक्काम कर ! कांहीं हवं नको वगैरे गोष्टींची विचारपूस करण्यासाठीं रोज सकाळ संध्याकाळ मीं इकडं येतच जाईन ! ’ असें सांगून, ते आपल्या कामावर निघून गेले.

माझ्या आगमनाच्या नाविन्याचे पहिले पांच सहा दिवस लोटल्यानंतर, बाबांच्या व वीणाबाईच्या वागणुकींत बराच मोकळे-पणा येऊं लागला. त्या दोघांचा निव्वळ घरोबाच असावा, असें न वाटण्याजोगे एक एक प्रसंग हळुहळू माझ्या नजरेस पडूं लागले; आणि पुढें पुढें तर त्यांचें एकमेकांवर नितांतिक प्रेम असावें, इतकेंच नव्हे तर हा प्रेमसंबंध बराच जुना व चांगलाच दाट असावा, अशी माझी पक्की खात्री होऊन गेली.

बाबांचें आयुष्य शक्य तितकें दुःखी करण्याचा थोडयाच दिवसां-पूर्वी जो मी निश्चय केला होता, त्या निश्चयाच्या धगधगत्या आगींत ह्या नवीन प्रेम–प्रकरणाच्या जाणीवेनें खूपच तेल ओतलें गेलें आणि त्यामुळें माझा तो कृत–निर्धार अधिकच प्रज्वलित होऊन, माझ्या अंतःकरणाच्या होमकुंडांत अत्यंत प्रखरतेनें धडधडूं लागला. माझी सावत्र आई होऊं पाहाणारी ही स्त्री माझा जर द्वेष करूं लागली, तर माझा रसरशीत निखारा बाबांच्या पदरांत अस-तांना, त्यांच्याशीं लग्न करण्यास ती सहसा धजणार नाहीं असें सर्वसाधारण अचुक अनुमान आपल्या मनाशीं बांधून, तिच्याशीं वागतांना तिला मी अगदीं आवडेनाशी व्हावें याकरितां हेतुपुरस्सर मी आपल्या वर्तणूकींत कमालीचा तिरसटपणा आणण्याचा प्रयत्न करूं लागलें. बाबांशीं बोलतांनासुद्धां कित्येक वेळां त्यांच्या तोंडा-वर, तिच्याबद्दल ती असतांना देखील अस्पष्ट व घाणेरडे असे टोमणे देण्यास मी मागेंपुढें पाहिलें नाहीं.

बाबांची सांपत्तिक स्थिति फारशी चांगली नाहीं हें मला आतां ठाऊक झालें असून देखील, मला ज्या ज्या नवीन गोष्टींची गरज होती त्या त्या सर्वांची निकडीची मागणी मी त्यांच्याकडे केली. मी नुकत्याच जाऊं लागलेल्या दादरच्या 'सब्बर्बन् गर्लस् हायस्कूल' मधील माझ्या नवीन मैत्रिणी अधींमधीं आपल्या घरीं आणण्याची मला लाज वाटूं नये म्हणून, शाळेजवळच असलेल्या 'हिंदू कॉलनींतील' एखादा दोन खोल्यांचा सुटसुटीत अन् सुंदर 'ब्लॉक' घेण्यासाठीं त्यांच्याजवळ मी अगदीं लहान मुलासारखा हेका धरून

बसलें. पण माझ्या अट्टाहासामुळें घेतल्या गेलेल्या आमच्या त्या नवीन बिऱ्हाडांत स्वच्छता व टापटीप ठेवण्याच्या बाबतींत मात्र मी मुळींच मन घातलें नाहीं. इतकेंच काय, पण प्रसंगानुसार माझ्या अंगावर पडलेला व थोडा फार विचार केला असतां माझें कर्तव्यच असलेला—आमचा दोन वेळचा स्वयंपाक व चहादेखील कुणी-कडून तरी उमलून टाकून, हात झाडून मोकळें होण्याचा माझा शिरस्ता असे. बाबा ह्या गोष्टींकडे अजिबात लक्ष देत नसत. निदान त्याबद्दल मला ते कधीं बोलले नाहींत; अगर तत्संबंधीं नापसंती दर्शक भुणभुण लावलेलीहि कधीं माझ्या कानांवर आली नाहीं.

दर महिन्याला वरकड खर्चाकरितां म्हणून बाबा मला कांहीं पैसे देत पण मी ते लगेच खर्चून टाकून, पुन्हां—कधीं सिनेमा-करितां तर कधीं गायनवादन मंडळाच्या वर्गणीकरितां......कधीं उत्तम प्रकारच्या 'फॅशनेबल्' कापडाकरितां तर कधीं एखाद्या मैत्रिणीच्या नादानें नवीनच निघालेली हौसेमौजेची विशिष्ट टूम खरेदी करण्याकरितां अधिक पैशांसाठीं त्यांच्यापुढें सतत हात पसरीं व अशाप्रकारच्या पठाणी तगाद्यानें त्यांना खूप सतावून सोडीत असें.

ह्यानंतरच्या दोन तीन महिन्यांत मात्र,—'बाबा एक गोड गृहस्थ आहेत! त्यांचा स्वभाव फारच चांगला आहे! ज्या प्रका-रानं मी त्यांच्याशीं वागतें त्या प्रकारानं त्यांच्याशीं वागण्यांत माझी मोठी चूक होत आहे!' अशा प्रकारचे कांहींसे बदलते विचार माझ्या अन्तःकरणांत पुन्हा पुन्हां अभावितपणें उद्भवूं लागले आणि त्यांना तेथून समूळ उन्मूलन काढण्याकरितां मोठ्या निश्चयानें मी आपल्या मनाशीं किती तरी जोराची धडपड केली, पण व्यर्थ. माझ्या मनाविरुद्ध त्यांचीं पाळेंमुळें तिथें चांगलींच रुजून माझ्या नकळत बऱ्याच जोमानें ते त्याठिकाणीं वाढीस लागले होते. तथापि अशी परिस्थिती असूनहि, माझ्या रोजच्या आचारांतील उधळेपणा, आज्ञाभंग, उद्धटता वगैरे बेमुर्वतखोर प्रवृत्ती यत्किं-चितसुद्धां कमी झाल्या नव्हत्या. उलटपक्षीं पूर्वींच्याच चाकोऱ्यांतून

पूर्वींप्रमाणेंच त्यांचीं गतिचक्रें बिनधोक, सरळ, अविरतपणानें फिरत होतीं.

*  *  *  *

बाबांची प्रकृति दिवसानुदिवस खंगत जाऊन ढांसळत चालली आहे, हें मला आतां उघडपणें दिसत होतें. रोज संध्याकाळीं कामावरून आल्यावर ते कितीतरी गळून गेल्यासारखे दिसत, हें मी प्रत्यक्ष उघडया डोळयांनीं पहात होतें. पण त्यांच्या ह्या श्रमाचा, ममतेच्या स्नेहाळतेनें परिहार करण्याचा अगर त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें जिव्हाळयाची मदत करण्याचा सुविचार माझ्या कठोर हृदयांत कधींच प्रादुर्भूत झाला नाहीं; अथवा त्या दृष्टीनें मी केव्हांहि प्रयत्न केला नाहीं.

रविवारीं सुट्टीचा दिवस असल्यामुळें, बाबांना सकाळीं बराच वेळपर्यंत अंथरुणांत झोंपून रहावेसें वाटे पण पुढें लवकरच ह्या त्यांच्या निरुपद्रवी सुखांत देखील व्यत्यय आणण्याची अजब कामगिरी बजावून मी एक प्रकारचा असुरी आनंद उपभोगला. माझ्या नवीनच बनलेल्या एका जीवश्चकंठश्च मैत्रिणीच्या घरीं 'बेबी फोर्ड' 'पॅटर्नची' एक मुरेख 'लँडो कार' होती. ती 'ड्राइव्ह' करावयास शिकावयाचें,असें तिनें अन् मी ठरविलें व बाबांना उत्तम प्रकारचें 'ड्राइव्हिंग' येत असल्यामुळें, त्यांना घेऊन दर रविवारीं मोठ्या सकाळींच 'रेस कोर्सच्या' बाजूस जावयाचें अशाप्रकारचा बेत आम्ही दोघींनीं मनामध्यें आंखला व त्याप्रमाणें मी बाबांस विचारलेंहि. आमच्या उत्साहाचा केवळ विरस होऊं नये म्हणून, बाबांनीं स्वतःकडे थोडें दुर्लक्ष करूनहि आमच्या योजनेला आपली संमति दर्शविली व अशा प्रकारें आमचें 'ड्राइव्हिंगचें' शिक्षण तर बिन्बोभाट सुरू झालें.

ह्यानंतर बहुतेक प्रत्येक रविवारीं 'ड्रायव्हिंग' शिकून परत यावयाला आम्हाला बराच उशीर होई व मग माझी मैत्रीण हटकून मला मोठ्या आग्रहानें आपल्या घरचें जेवावयाचें आमंत्रण देई. मीहि मग अर्थात् बाबांना काय वाटेल ह्याची कोणतीच

क्षिती न बाळगतां, एकदम बेदरकार निर्विकारपणानें त्यांना म्हणें —" बाबा ! तुम्हांला आतां ऐकट्यालाच घरीं गेलं पाहिजे ! मला सुनंदा आज इथंच जेवायला ठेवून घेते आहे ! "

" असं का..... ?......बऽऽरं तर! ...... तुझी इच्छा ! " एवढेच दोन चार त्रोटक शब्द ह्यावेळीं त्यांच्या तोंडातून कसेबसे बाहेर पडत; पण तेवढ्याच त्यांच्या त्या त्रोटक शब्दांत त्यांच्या अंतःकरणांतील दुखावलेल्या भावनांची आंच पूर्णपणें प्रतीत झालेली असे. संथपणानें पाठीमागें वळून, घरीं जाण्यासाठीं जड पाऊलें टाकीत ते चालले असतांना, मध्येंच तोंड फिरवून, एकदोनदां ज्यावेळीं माझ्याकडे ते पाठमोरा दृष्टीक्षेप करीत, त्यावेळीं त्यांच्या चेहऱ्यावर येणारा तात्कालिक लाचारतेचा तो दैन्यवाणा भाव पाहिला कीं, मला अगदीं भडभडून येई व त्यांच्याविषयीं विलक्षण अनुकंपा वाटे. ' सुनंदाला सांगून झट्दिशीं त्यांच्या पाठोपाठ धांवत धांवत जावं व त्यांना गांठून आनंदानं एकदम स्तिमित करून सोडावं ! '—अशा प्रकारचा एक क्षणिक विचार क्षणभर माझ्या हृदयांत डोकावे; पण तो कृतींत येण्याच्या अगोदरच बंगल्याच्या' गॅलरींतून ' " मीना ! मीनाक्षी ! ! " अशी सुनंदानें घाईच्या स्वरांत मारलेली प्रेमळ हांक माझ्या कानांवर येई व त्या आवाजाच्या आंदोलनानें माझ्या मनाला जोराचा हेलकावा बसे.

सुनंदाच्या ऐश्वर्यसंपन्न व सुखासीन सहवासांत मला उपभोगावयास मिळणारा तो गोड अन् रम्य काल एका क्षणार्धांत माझ्या नजरेसमोर मनोमय उभा राही आणि त्या मधुर, मादक वातावरणांत माझें मन गुंगून, त्यांत मी रममाण झालें असतांना, क्षणापूर्वीं निमिषमात्रच आलेला तो चलित्-विचार कुठल्याकुठें पार लुप्त होऊन जाई, हें माझें मलाच उमगत नसे.

* * *

जों जों स्वतंत्रपणें मोटार हांकण्याच्या कलेंत आमची प्रगति होऊं लागली तों तों बाबांच्या खऱ्या त्रासांना व काळज्यांना प्रारंभ झाला. संध्याकाळीं साडेचार वाजून शाळा सुटली रे सुटली कीं,

पांचसहा मैत्रिणींचें कोंडाळें जमवून खेचाखेचीनें मोटारींत घुसावयाचें व मुंबईच्या निरनिराळ्या टोकांना असणाऱ्या विविध विहार–स्थलांपैकीं लहर लागेल तिकडे कूच करावयाचें—अशा प्रकारचें एक सत्रच आम्ही सुरू केलें. माझ्या मैत्रिणीपैकीं बहुतेकजणी घरच्या बऱ्याच सधन असल्यामुळें, त्या थोडयाफार प्रमाणांत लाडांतच वाढलेल्या होत्या व मला तर घरचा कोणचाच धरबंद उरला नव्हता. अशा स्थितींत मन मानेल त्याप्रमाणें मनसोक्त मजा करीत...स्वच्छंदी मोकाटतेनें अवास्तव गप्पांची लांबलांब गांठोडी सोडीत......स्वैरतेनें हिंडून—फिरून परत यावयाला आम्हांला रात्रीचे सहज आठ साडेआठ होत. ह्यावेळीं जिन्यावर माझ्या पावलांची नेहमींची चाहुल लागली कीं, अस्वस्थ मनानें बाहेरच्याच खोलींत इतस्तत: येरझारा घालणारे बाबा क्षणभर थांबले जात व मी दाराशीं दिसतांच, सुखरूपपणें मी परत आलें ह्या सुटकेच्या समाधानाचा एक आनंदी नि:श्वास आपोआप त्यांच्या मुखावाटे बाहेर पडे; आणि लगोलग त्यांच्या गंभीर चेहऱ्यावर, प्रफुल्लित होत चाललेल्या त्यांच्या अंत:करणांतील एक सूक्ष्म छटा प्रसन्नपणें विलसूं लागे.

वरकरणीं न दिसणारें परंतु अंतर्यामीं वास करणारें असें बाबांचें माझ्यावर गाढ अन् एकांतिक प्रेम होतें, हें प्रस्तुत प्रकार-सारख्या कितीतरी चिमकुल्या प्रसंगांवरून उत्तरोत्तर माझ्या जास्त-जास्त प्रत्ययास येत होतें. माझ्या वर्तणूकींत पदोपदीं आढळून येणाऱ्या बेजबाबदार तुसडेपणाकडे मुद्दाम उदारतेनें कानाडोळा करून, जगण्यांत अजून राम आहे असें वाटावयांला लावणाऱ्या वात्सल्यरसाची मजकडून यत्किंचितहि अपेक्षा नसतांना, बाबांना मजसंबंधीं एवढा विलक्षण अभिमान वाटण्याचें कारण खरोखरच मला गूढ होतें.

एके दिवशीं हिंडून परत यावयाला कांहीं कारणांमुळें मला नेहमीं-पेक्षां बराच जास्त.........म्हणजे चांगला तास दीड तास उशीर झाला आणि त्या कारणानें अर्थात बाबांच्या सहनशीलतेच्या

मर्यादा पार सुटून जाऊन, ते भयंकर संतप्त होऊन गेले. खोलींत मी प्रवेश करतांच, मला थोडीशी जरब बसावी या हेतूनें मला एकदम थांबवून, माझा हात धरून, त्वेषानें गर्जत ते उद्गारले—‘ मीने ! आतांशा तूं अगदींच ताळतंत्र सोडलास ! असल्या बेफाट बेबंदपणानं तूं वागणार असशील तर उद्यांपासून तुझं ‘ड्राइव्हिंगच ’ काय पण हिंडणंसुद्धां मी बंद करून टाकीन, हें पक्कं लक्षांत ठेव.........! ”

आज आम्हीं फिरावयाला गेलों असतांना, दुपारीं शाळेंत सहज घुणाक्षरन्यायानें, नवीनच नेमलेल्या व विद्यार्थीवर्गांत विलक्षण लोकप्रिय होत चाललेल्या एका तरुण, होतकरू, अविवाहित शिक्षकाकडून माझ्या बाबतींत घडलेल्या एका क्षुल्लक प्रसंगावरून सुनंदानें माझी खूप थट्टामस्करी केल्यामुळें, मी आधींच बेसुमार चिडून गेलें होतें आणि तशांत आतां, घराचा उंबरा ओलांडतें न ओलांडतें तोंच, ह्या अनपेक्षित मानहानीकारक स्वागताच्या सलामीची भर पडल्याकारणानें माझा माझ्यावरील ताबा पार उडून गेला आणि क्रोधातिरेकानें मी आपादमस्तक थर्‌थर्‌ कांपूं लागलें. देहभान विसरून जाऊन, बाबांना वाटेल तसें अद्वातद्वा, ताडताड उलटून बोलण्यास मग मी सुरवात केली; आणि सरतेशेवटीं तर मोठ्यानें गळा काढून—“ तुम्ही जर मला असं छळणार असाल तर मी खरोखर पळून जाईन......जीव देईन......काय लागेल तें करीन ! ”—अशा प्रकारच्या धमकीवजा दहशतीच्या त्राग्याचें खूप मोठें सोंग आणलें आणि दणदण पाय आपटीत, तणतण करीत मी आंतील खोलींत निघून गेलें. माझ्या ह्या बालिश पोरकटपणाची कींव येऊन बाबांनीं ‘ हं : ! ’—असा एक अर्थपूर्ण, उपहासात्मक हुंकार सोडला आणि बेचैनतेनें पुनरपि त्यांनीं खोलींत इकडून तिकडे, तिकडून इकडे, अशी जोराची शतपावली करण्यास आरंभ केला. मीहि मग गुपचुपपणें दारामागें उभी राहून, बाबा आतां पुढें काय करितात हें पहाण्यासाठीं, दाराच्या फटीला डोळे लावले व ते जर कांहीं बोलले तर त्यांचें तें बोलणें ऐकूं यावें

म्हणून, श्वासाचा अवरोध करीत, एकाग्रतेनें कान टवकारुन तिथें वाट पहात बसले. थोडयाच वेळांत टिचभर खोलीच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हेलपाटे घालीत असतांना, मध्यंतरींच थांबून, स्वतःशींच एक कृत्रिम विडंबनात्मक हास्य करीत—' हट्टीपणा, हेकटता, अकरताळी वृत्ति वगैरे आईच्या अंगांत पुरेपूर मुरलेले गुण पोरींत अगदीं सर्वांशानं उतरलेले दिसतात अं ! ' हे त्यांनीं प्रगटपणें उच्चारिलेले शब्द अतिशय वेगानें माझ्या कानांवर येऊन आदळले. इतकेंच नव्हे तर, त्यांचा आघात माझ्यावर इतक्या प्रखर तीक्ष्णतेनें झाला कीं, त्यामुळें आधींच संत्रस्त झालेलीं माझीं गात्रें अगदीं लाललाल होऊन गेलीं; आणि माझा मनस्ताप कमालीचा वाढून, एखाद्या खोल गुहेंत उठणाऱ्या प्रतिध्वनीप्रमाणें तेच शब्द पुन्हां पुन्हां अधिक जोरानें माझ्या कर्णरंध्रांत घुमूं लागले.

पण.........अथांग सागरावर उसळणाऱ्या भरतीच्या उंच-उंच लाटांनीं शेवटची अत्युच्च परिसीमा गांठली कीं, लगेच त्यांचें रूपांतर सुकतीच्या प्राथमिक उर्मींत होऊं लागतें ना ? क्षुब्ध झालेल्या माझ्या पित्त–प्रकोपाचेंहि ह्यावेळीं असेंच झालें. काळ-जाला घरें पाडणाऱ्या बाबांच्या त्या जिव्हारी शब्दांनीं माझ्या विचार-तरगांच्या उद्रेकाला चांगलीच कलाटणी देऊन, त्यांच्या आजपर्यंतच्या वागणूकीची एक निराळीच अज्ञात बाजू माझ्या नजरेसमोर आणून उभी केली आणि त्यामुळें बदललेला माझा दृष्टिकोन एका नवीनच भूमीकेवरून तिची चिकित्सकपणानें छाननी करूं लागला.

" कदाचित्......कदाचित् ह्याहि गोष्टीला दुसरी....निराळी बाजू असूं शकेल ! नाहीं कुणी म्हणावें ? कारण—कोणतीहि गोष्ट झाली तरी तिला उलटसुलट अंगं हीं असणारच ! मग तीं सारखीं असोत वा वेगवेगळीं असोत !......आणि नाहीं तरी...... बाबांच्याबद्दल बनलेलीं माझीं मतं प्रत्यक्ष, अनुभवसिद्ध कुठं होतीं ? आईकडून आलेल्या एकतर्फी सांगीवरूनच तीं कलुषित झालेलीं

नव्हतीं काय ? शिवाय......शिवाय...आईचा स्वाभाव थोडासा एककल्ली व बराच तऱ्हेवाईक असल्याची जाणीवसुद्धां, किती तरी प्रसंगांच्या परिचयानं माझ्या चांगलीच गळीं उतरली होती ! तेव्हां ती सपशेलच्या सपशेलच नाकबूल करण्यास माझं मन तरी कसं धजणार ? ”

परंतु असें असूनहि, ह्यापुढें बाबांचे व माझे संबंध जास्त जास्त दूरावत जाऊन, दिवसानुदिवस अधिकाधिकच फाटत जाऊं लागले. बाबांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा उत्तरोत्तर वाढत चालला आहे......केवळ माझ्यासाठीं ते आपल्या ऐपतीपेक्षां जास्त खर्च करून, अधुमधून मला लागतील तसे पैसे पुरवीत आहेत—ह्या गोष्टींची मला पूर्ण दखलगिरी असूनसुद्धां, प्रत्येक वेळीं मला मिळणाऱ्या पैशांतील पै न् पै मी बेछूटपणानें उधळून टाकित होतें; कारण बाबांना भोगाव्या लागणाऱ्या त्या असंख्य यातनांतच मला एक प्रकारच्या राक्षसी आनंदाचें समाधान लाभल्यासारखें होत होतें.

यानंतर थोड्याच कालांत, नोकरीनिमित्त कलकत्त्याकडे असणाऱ्या माझ्या एकुलत्या एक आत्याबाई फारां वर्षांनीं माहेरपणाला म्हणून, आमच्याकडे सात आठ दिवस रहावयास आल्या. आजपर्यंत, माझ्या आठवणींत कोणा एका व्यक्तीविषयीं, आई जर अत्यंत आदरानें व आपुलकीच्या प्रेमळपणानें बोलली असेल तर तें ह्या आत्याबाईविषयींच होय. ‘ किती साधाभोळा, सरळ अन् समंजस जीव ! ’ अशा भावनोत्कट उमाळ्यानें पुन्हां पुन्हां निघणारे तिच्या तोंडांतील ते अन्तःस्फूर्त उद्गार कितीदां तरी माझ्या कर्णपटलांवरून जाऊन, माझ्या हृदयाशीं अगदीं आत्मरूप होऊन गेले होते.

माझ्याशीं वागतांना बाबांना सध्यां ज्या एका भयंकर पेंचप्रसंगांतून जावें लागत होतें, त्याविषयीं त्यांनीं कदाचित् आत्याबाईना पूर्वीं लिहिलें असावें; कारण त्यांचें मुंबईस येणें झाल्यानंतर एके दिवशीं दुपारीं मला शाळेला सुट्टी आहे असें पाहून,

त्यांनीं मुद्दामच चहा वगैरे कार्यक्रम उरकल्यावर मजबरोबर 'मलबार हिल्वर' हिंडावयास जाण्याचा बूट काढला व तिथें जाऊन माणसांच्या वर्दळीपासून थोडीशी बाजूला अशी कांहींशी निवांत जागा शोधून काढून, त्याठिकाणीं मोकळेपणानें मला आपल्या शेजारीं ऐसपैस बसवून घेतल्यानंतर, त्यांनीं आईचें व बाबांचें वितुष्ट येऊन, त्यांची फारकत होण्याला ज्या ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांची समग्र हकिकत विस्तारशः मला निवेदन केली. त्यांचें त्या वेळचें बोलणें इतकें गोड, मनमिळाऊ, विचारवंत आणि साहजिकच कुणालाहि पटणारें होतें कीं, बऱ्याचशा बाबतींत त्यांनीं आईला दोषी धरलें असूनहि तें सारें-सारें मी अगदीं निमुटपणानें व स्वखुषीनें ऐकून घेत होतें.

आत्याबाई मुंबईला येणार असें कळल्यापासून, त्यांच्याशीं देखील आपण शक्य तितक्या हिडीस-फिडीस वृत्तीनें वागावयाचें, असें मी स्वतःशीं नक्की ठरविलें होतें; कारण बाबा त्यांच्यापेक्षां वयानें थोडे मोठे असूनहि त्यांना अतिशयच मान देत, ही गोष्ट मला चांगलीच ठाऊक झाली होती. अशा स्थितींत लाघवीपणानें वागून त्यांची मर्जी संपादन करण्याचा जर मी प्रयत्न केला असता तर, बाबांच्या तें चांगलेंच पथ्यावर पडलें असतें. माझ्या हातून जें व्हावें, अशी बाबांची उत्कट इच्छा होती व ज्याकरितां त्यांच्या अन्तःकरणाला एक प्रकारची विलक्षण ओढ लागली होती, त्या विलक्षण ओढीची अढी माझ्या ह्या वागणुकीमुळें उलगडली जाऊन ती बरीच सैल होण्याचा अशामुळें जबरदस्त संभव नव्हता का? माझ्या मनाच्या तसल्या त्या परिस्थितींत, माझ्या तें अगदींच वावड्यावर असल्यामुळें मला तें मुळींच नको होतें.

आत्याबाईंचें बोलणें संपल्यानंतर आम्ही दोघीहि जणी समोर दूरवर दिसणारें व अस्तकालीन संधिप्रकाशांत अधिकाअधिक अस्पष्ट होत जाणारें सागराचें धूसर चित्र किती तरी वेळ अगदीं शून्य नजरेनें पहात बसलों होतों. इतक्यांत बागेच्या विविध स्तंभांवर

समूहानें लावलेल्या फिरत्या विद्युद्दीपांचे रंगीबेरंगी गोलक एकदम एकसमयावच्छेदेंकरून लावले गेले आणि त्यांची झगझगीत सप्त-वर्णी प्रभा......हिरव्यागार मखमली गालीचाप्रमाणें भासणाऱ्या हरिततृणभूमीवरील नानाप्रकारच्या रम्याकृतींवर व त्या रम्याकृतींच्या मध्यभागीं मुद्दामच तयार केलेल्या अनेकविध वर्तुलाकार पुष्प-राशींच्या कृत्रिम डोंगरावर अत्यंत मनोहारित्वानें तळपूं लागली.

तें दृश्य रमणीय तसेंच आल्हाददायक होतें, ह्यांत तिळप्रायहि संदेह नव्हता परंतु त्या हृदयंगमतेनेंसुद्धां माझ्या चेहऱ्यावर, नुकत्याच घडलेल्या प्रसंगामुळें आलेली उदासीनता यत्किंचित्‌-देखील कमी होत नाहीं असें पाहून, आत्याबाईनीं विषयांतर कर-ण्याच्या हेतूनें मजजवळ उगीचच निरनिराळ्या बाबींसंबंधीं खूप चवकशी करण्यास प्रारंभ केला. माझ्या त्रोटक व अगदींच वर-करणी उत्तरांवरून, माझी विमनस्क परिस्थिति अद्याप आहे तशीच कायम आहे, तेव्हां आतां घरीं परतणेंच श्रेयस्कर असें ठरवून—
" हं! बराच वेळ झाला—नाहीं? आतां आपल्याला परत फिरलं पाहिजे!" अशी त्यांनीं माझ्या अवनत चेहऱ्याकडे टक लावीत, मजजवळ पृच्छा केली. मीहि मग संमतिदर्शक मान हलवून, मामुली पद्धतीचा होकार देण्याकरितां आपली नजर वर केली आणि त्यांच्याकडे पाहिलें मात्र, तोंच त्यांची न्‌ माझी दृष्टादृष्ट झाली व इतका वेळ केवळ दृढतर संयमनानें थोपवून धरलेला माझा शोका-वेग मला आवरतां न येऊन, मला एकदम भडभडून आलें आणि माझ्या डोळ्यांतून झरझर निखळणारे अश्रुबिंदू खळ्कन्‌ माझ्या गालांवरून खालीं माझ्या वक्षःस्थलावर ठिबकूं लागले.

आत्याबाई ह्यावेळीं झट्‌दिशीं पुढें झाल्या आणि मला जवळ घेऊन वात्सल्यानें मला कुरवाळीत...व प्रेमभरानें आपला हात माझ्या पाठीवरून फिरवीत—फिरवीत अगदीं समजावणीच्या स्वरांत मला म्हणाल्या—"मीने! हत्‌ वेडे! इतकं का तुला वाईट वाटलं? ......हं! गप्‌ अगदीं गप्‌ आतां!......बाळ! तुला लागावं अथवा दुःख व्हावं या उद्देशानं मी बोललेंच नव्हतें! ' अॅपेंडि-

सायटिस्' सारख्या विकारानं तुझ्या वडिलांची प्रकृति ढासळून किती विकोपाला गेली आहे, हें तूं जाणतेसच ! 'ऑपरेशन्‌शिवाय त्याला आतां दुसरा कोणता तरणोपाय उरला आहे ?...आणि अशा मध्यम वयांत तें 'ऑपरेशन्' तरी किती जीवावरचं आहे ? लवकरच त्यांना तें करून घेतलं पाहिजे ! ह्यांतच दैवयोगानं त्याच्या जीवाला कांहीं अपाय झाला...अन् नको असलेलंच नशीबानं आपल्यापुढं वाढून ठेवलं...तर...तर...??"

"तर...तर...काय आत्या...? ह्या अफाट जगांत माझं असं म्हणण्यासारखं मला कोणीच न उरून, मी अगदीं पोरकी—पोरकी बनेन !—" कळवळून जाऊन मी पट्‌दिशीं उद्गारलें.

"वा: ! वेडीच कीं आहेस मीने ! म्हणजे मी तुझी कोणीच नव्हे कीं काय ? ह्या शस्त्रक्रियेंतून माझा भाऊराया अगदीं सुखरूपपणें पार पडावा, अशीच सतत मी त्या परमेश्वराजवळ प्रार्थना करीन... आणि इतकं करूनहि त्या दयाघन प्रभूला माझी प्रार्थना ऐकूच गेली नाहीं तर...मीने...बाळ, स्वत:च्या मुलीप्रमाणं तुझा सांभाळ करून, तूं आपल्या पसंतीनं निवडलेल्या, तुझ्या भावी वराच्या प्रेमपूर्ण आणि शीतल छायेंत तुला छानदार, सुरेखसा संसार थाटून देईन !......आपल्या नाहीं,तरी निदान आपल्या आवडत्या मुलीला तरी कौटुंबिक सौख्याचा अवीट आनंद लाभावा, ही जी तुझ्या वडिलांची आजपर्यंतची कळकळीची मनीषा, ती यथासांग सफल झाल्यावरच, मग माझ्या जीवाला कांहीं तरी समाधान लाभेल !"

माझ्या स्वार्थी व संकुचित जीवनांत पहिल्याप्रथमच पाहिलेल्या ह्या सरळ आणि समतोल विचारसरणीनें मी विलक्षण विस्मयचकित होऊन गेलें; कारण एकतर बाबांच्याविषयींची माझी आदरबुद्धि अलीकडे जास्त वृद्धिंगत होत चालली होती आणि दुसरें असें कीं, त्यांच्या हानीचा माझ्या जीवितावर होणारा परिणाम आईच्या हानीपेक्षांहि अधिक घोर आणि इतका दूरवर पोहोंचणारा होता कीं, त्याची केवळ नाममात्र कल्पनाहि माझ्या हृदयाचा थरकांप उडवून, पाणी पाणी करण्यास अगदीं पुरेशी होती.

बाबांशीं मी कशाप्रकारें वागत होतें ह्याची आत्याबाईंना खडा-नूखडा माहिती असूनहि, त्यांनीं बाबांच्या पश्चात् माझा प्रतिपाळ करण्याचें कबूल केलें होतें ह्याचें एकमेव कारण, म्हणजे त्यांचें बाबांच्या ठिकाणीं असणारें निरिसम भगिनी–प्रेमच होय, हें मी ओळखून होतें. ज्यांच्याशीं म्हणून आत्याबाईंचा संबंध येई ते ते सारे त्यांची मुक्तकंठानें स्तुति करून, त्यांचे गोडवे गात व त्यांच्याविषयीं निरंतर धन्योद्गार काढीत. तेव्हां अशाप्रकारच्या सद्‌गुणी, सुस्वभावी आणि असामान्य स्त्रीच्या प्रेमाचें स्थान होणारे माझे बाबा त्या प्रेमाला सर्वांशानें पात्र असले पाहिजेत; इतकेंच नव्हे तर, त्यांच्या ठिकाणीं कांहीं तरी विशेष प्रकारचें व्यक्तिमत्व वास करीत असलें पाहिजे, असें माझें मन मला निःशंकपणें ग्वाही देऊं लागलें.

* * * *

‘ हॉस्पिटलमध्यें ’ जाण्याला बाबांना अजून एक महिन्याचा अवकाश होता. त्या एक महिन्याच्या मुदतींत मी इतकी बदलून गेलें कीं, तशा प्रकारचा आमूलाग्र फरक आजपर्यंत कोणत्याहि व्यक्तींत निःसंशय झालेला नसेल. ह्या कालांत मी आपल्या आचार पद्धतींत अंगिकारलेल्या ह्या नवीन धोरणामुळें माझीच सदसद्विवेक बुद्धि दुखविली जात होती, हें माझ्या ध्यानांत येत होतें; पण त्याला काय इलाज होता ? माझ्या मनाची परिस्थितीच त्यावेळीं अत्यंत नाजुक व बिकट होत चालली होती. ‘ मृत झालेल्या गतकालांतून ऐकूं येणाऱ्या आईच्या अर्धवट शब्दांवर विश्वास ठेवूं कीं, सांप्रतकालीं स्वतःच्या अन्तःकरणांत उद्‌भूत होणाऱ्या संवेदनांना साथ देणाऱ्या हृदयांच्या हांकेलाच ओ देऊं ? ’ अशा प्रकारच्या परस्परविरोधी व दोलाचल विचारांच्या कात्रींत मी सांपडलें होतें आणि त्यामुळें माझ्या अनुकंपनीय दशेला अगदीं पारावार उरला नव्हता.

सरतेशेवटीं एकदां कांहींतरी सोक्षमोक्ष लावण्याकरितां, एके दिवशीं रात्रीं जेवण झाल्यावर, मनाचा हिय्या करून मी बाबां-

त्याजवळ आईच्या छळासंबंधींचा अप्रिय विषय जाणून बुजूनच उकरून काढला व कोणताहि आडपडदा न ठेवतां, इतके दिवस माझ्या डोक्यांत थैमान घालणारे त्याबद्दलचे विचार अगदीं उघड रीतीनें त्यांच्यापुढें प्रतिपादन केले. बाबा तें ऐकून प्रथम कांहींच बोलले नाहींत अगर त्यांनीं आश्चर्यहि दर्शविलेलें दिसलें नाहीं. कारण त्या बाबतींत, आजपर्यंत त्यांनीं स्वत: मनाशीं खूपच विचार करून, माझ्या वर्तणुकींत योग्य तो पालट घडवून आणण्याच्या कामीं, परिणामाच्या दृष्टीनें मुग्धताच स्वीकारणें अधिक श्रेयस्कर, असें ठरविलें होतें; पण आतां, वेळ आलीच आहे, तेव्हां त्याचें परिस्फूटन करण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं असें जाणून, आईच्या व त्यांच्या बिकोपाला गेलेल्या भांडणाचा साद्यंत वृत्तांत त्यांनीं मजजवळ मोकळेपणानें कथन केला.

"मीना! आर्थिक दृष्टया मीं यशस्वी होऊं शकलो नाहीं म्हणूनच तुझ्या आईचा सारा राग बरं! मनुष्य आहे...त्याच्या हातून कधीं चुकतंच आहे......व्यापारी व्यवहारांत एखादे वेळीं सोळाचे बारा हे व्हावयाचेच......ह्या साध्यासुध्या व सूज्ञ विचार–मालिकेला तिनं आपल्या मनांत कधींच थारा दिला नाहीं. उलट अष्टौप्रहर कसलं तरी क्षुल्लक कुसपट काढून माझ्याशीं ती सारखा वितंडवाद घालीत बसे आणि मला अगदीं जिकीरीस आणी! पुढंपुढं तर तिची ही धुसफूस व जळफळ इतक्या अंतिम थराला जाऊन पोहोंचली कीं, मला सळो कीं पळो करून सोडण्याचा जणूं तिनं चंगच बांधला होता! आमच्यावर गुदरलेल्या त्यावेळच्या आमच्या ओढगस्त स्थितीमुळं, तिला तिच्या इतर बड्या व धनवान मैत्रिणींप्रमाणं इत:पर वागतां येईना म्हणून यापुढं तिला इतकं विलक्षण वैषम्य वाटूं लागलं कीं,–'मुंबई सोडून, दुसरीकडंच जाऊन आपण स्थाईक होऊं या!'–असा तिनं माझ्या पाठीमागं एकसारखा लकडा लावला व मला अगदीं त्राहि त्राहि भगवान करून सोडलं! 'सध्यां आपला काळ फिरलेला आहे! तेव्हां अतिशय खटाटोपानं कशीबशी लाभलेली ही सोन्या-

सारखी नोकरी सोडून, दुसरीकडं जाण्यांत काय तात्पर्यार्थ आहे? हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागं लागण्याचा पश्चात्ताप मात्र व्हावयाचा! त्यापेक्षां आहे त्या परिस्थितींतच समाधान मानून, संसाराचा गाडा असाच मोठ्या धीरानं हांकण्यांत शहाणपणा नाहीं का?'—अशा प्रकारची तिची मी खूप मनधरणी केली पण ती सारी पालथ्या घागरीवरील पाण्यासारखी झाली! तिची आपली सदासर्वकाळची एकच पिरपिर आणि तिचा तो त्रासदायक घोषा ती कांहीं केल्या थांबवेना! तेव्हां मात्र मी अतिशय त्रासून—कावून गेलों आणि माझ्या तोंडांतून कांहीं उणेअधिक शब्द बाहेर पडले......व त्याचा शेवट शेवटीं तुला घेऊन तिचा-आपल्या माहेरी निघून जाण्यांत झाला!.........पण माहेरीं पडला साराच चुलत कारभार......आणि तशांत तुझ्या आजोबांनीं स्वतःची कमाई जांवयाला दिल्यामुळं रुष्ट झालेला! तेव्हां तसल्या त्या जमान्यांत, असल्या छांदिष्ट व उच्छृंखल बाईचं जमणं कधीं तरी शक्य होतं का? एकदोन महिन्यांतच तेथील मंडळीशीं तिचं न पटून तिनं जवळच असलेल्या भोरपपूर मुक्कामीं नवीन असं स्वतंत्र बिऱ्हाड थाटलं! नंतर कांहीं दिवसांनीं जेव्हां तिच्या चुलत भावाकडून सहज ही गोष्ट माझ्या कानांवर आली, तेव्हां माझ्या संतापाचा पारा खूपच वर चढला होता व आतां आपण जशास तसं हेंच तत्व आमलांत आणावयाचं, असा मी आपल्या मनाशीं बेतहि केला होता पण माझ्या रागाचे पहिले जोरदार झटके ओसरल्यावर, एकानं गाय मारण्याचा मूर्खपणा केला म्हणजे लगेच दुसऱ्यानं वासरूं मारण्याचा शहाणपणा करणं चांगलं नव्हे असं वाटून, तुमच्या चरितार्थाकरितां आपल्या तोटक्या मिळकतींतून का होईना कांहीं पैसे पाठविणें हें आपलं प्राप्त कर्तव्यच आहे, असं मी समजलों आणि त्याप्रमाणं दर महिन्याला कांहीं पैसे मी तुमच्याकडं धाडून देऊं लागलों!"

बाबांचं निवेदन संपण्याच्या सुमारास त्यांचे डोळे आसुवांनीं भरून येऊन, त्यांचें अन्तःकरण अगदीं गहिंवरून गेलें होतें;

आणि त्यामुळें त्यांचा कंठ कमालीचा सद्गदित झाला होता. तें पाहून त्यांच्याजवळच त्यांच्या 'कॉटवर' बसलेल्या मलाहि कळवळून आलें व त्यांच्या कुशींत डोकें खुपसून मीहि एखाद्या लहान अर्भकाप्रमाणें मुसमुसून रडूं लागलें. माझें सांत्वन करण्याच्या उद्देशानें बाबांनींहि मग आपल्या विकल भावनांचा थोडासा निग्रह करून, मला आपल्या हृदयाशीं घट्ट आंवळून धरलें व वात्सल्याच्या उमाळ्यानें हळुहळूं माझ्या पाठीवर थोपटीत थोपटीत—“ मीने ! कांहींहि असलं तरी तुझ्या आईवर ज्या प्रमाणं मी प्रेम केलं त्याप्रमाणं तुझ्यावरहि माझं प्रेम आहे ! तिच्याप्रमाणं ......किंबहुना अधिकच तूं मला आवडतेस ! ”—अशा प्रकारच्या प्रेमळ आश्वासनांनीं मला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मायेच्या त्या मृदुल स्पर्शानें माझ्या चित्ताची उडालेली खळबळ त्यावेळीं तात्पुरती बरीचशी शमन झाली हें खरें...... पण तदनंतर मात्र......'दारिद्र्याच्या केवढ्याहि प्रचंड आघातानं कसल्याहि प्रकारचं कंगाल हीनत्व प्राप्त होवो......त्यानं मुळींच न डगमगतां आहे त्या स्थितींतच नेकीनं प्रपंच करण्याचा व केवळ आपल्या उच्च प्रेमामृतानं त्या गरीबीच्या संसाराला स्वर्गीय नंदनवनाचं स्वरूप देण्याचा......आर्यस्त्रीला भूषणभूत असणारा जो गृहिणीधर्म तो झुगारून देऊन, माझी आई आपल्या पतीविषयक कर्तव्याला पराङ्मुख झाली होती. एवढंच नव्हे, तर भावी आयुष्याचं यशापयश अवलंबून असणाऱ्या, मुग्धावस्थेंतील पित्याच्या लालन-पालनाला मला आंचवून, एका परीनं आपल्या मातृत्वाच्या जबाबदारीचीहि तिनं वाऱ्यावरची वावडी केली होती...'—ह्या मधुनच उसळीसारख्या उफाळणाऱ्या विचार-प्रणालींच्या उर्मींनीं त्या शांततेंत व्यत्यय येऊन, ती फिरून फिरून सारखी भंग पावत होती.

त्या रात्रीं झोंपावयास जाण्यापूर्वी बाबांनीं प्रेमभरानें पुन्हां एकदां मला आपल्या बाहुपाशांत कवटाळून धरलें व माझ्या

मस्तकाचें अवघ्राहण करून लाडिकतेनें माझा चेहरा कुरवाळीत ते मला म्हणाले—

" मीनू! झालं गेलं ते पार गंगेला मिळालं असंच समजून, आपण आपल्या गतायुष्यांतील ह्या साऱ्या दु:खदायक आठवणी अगदीं समूळतेनं विसरून जाण्याचा प्रयत्न करूं या......आणि आपल्या जीवित–ग्रंथांतील नको असलेलीं हीं भूतकालीन पानं सरळ, निर्विकारपणानं उलटून टाकल्यावर, पुनरपि पुन्हां अगदीं नवीन अशा कोऱ्या करकरीत पृष्ठापासून आपण आपल्या जीवनाला पुन्हां प्रारंभ करूं या!"

\+ \+ \+

दुसऱ्या दिवशीं सकाळीं 'बाथरूम' मधून तोंड धुवून, चहा घ्यावयास म्हणून बाबांनीं जेव्हां आमच्या इवल्याशा स्वयंपाकघरांत पदार्पण केलें, त्या वेळीं आमच्या जीवित ग्रंथांतील नवीनच उलगडलेलें तें कोरें करकरीत पान व त्यावरील, आमच्या बदलत्या जीवनाच्या आरंभीचा तो पहिलाच श्रीगणेशा पाहून, ते आश्चर्यानें अगदीं स्तंभित होऊन गेले.

मी आपल्या आयुष्यांत अगदीं पहिल्याप्रथमच बाबांच्या चहाची व फराळाची मोठ्या आवडीनें व हार्दिक उत्सुकतेनें तयारी केली होती. हातांतील 'टॉवेलला' तोंड पुशीत पुशीत ते जेव्हां मी त्यांच्याकरितां मांडून ठेवलेल्या पाटावर विराजमान झाले तेव्हां एखाद्या सुगृहिणीला साजेसा मी केलेला तो थाटमाट पाहून सहज माझी थट्टा करण्याच्या उद्देशानें हंसत हंसत विनोदी स्वरांत ते मला म्हणाले—

" वा: ! मीनाताई! हा चहा, फराळ जेवण कीं मेजवानी? "

हें ऐकतांच मला थोडें लाजल्यासारखें होऊन मी बरीच गोंधळून गेलें; पण दुसऱ्याच क्षणीं थोडेसें व्यवधान राखून मी उत्तर दिलें—

" मेजवानी कसली आली आहे! आहे आपला साधासुधा चहा झालं!"

" ओ ऽ ऽ! अशा प्रकारचा सकाळच्या प्रहरचा चहा होऊं लागला तर, एकदां सोडून दिवसांतून दोनदां सकाळ व्हावी असाच माझ्यासारखा प्रार्थना करावयाचा कीं!"

" हो! अग् केली म्हणून काय झालं? मी काय त्याला डरेन असं वाटलं होय?"—आत्मविश्वासानें मी उद्गारलें. माझ्या त्या निग्रही शब्दांत बाबांची आतां शक्य तितकी सेवा करून त्यांच्या जीवाला जास्तींत जास्त विसांवा देण्याचा जो मी दृढ निश्चय केला होता, त्याची छाया किती तरी ठळकपणानें प्रतिबिंबित झाली होती!

तिसऱ्या प्रहरीं शाळेंतील शेवटच्या तासाला बुट्टी मारून, मी मुद्दाम वीणाबाईकडे गेलें व त्यांना रात्रीं जेवण्याकरतां व राहण्याकरतां आमचेकडे घेऊन आलें. आपण होऊन मी आलेली पहातांच प्रथम वीणाबाईना खूपच अचंबा वाटला पण त्यांच्या ह्या आचंब्याची पहिली वहिली लाट ओसरण्याच्या अगोदरच, एखाद्या भाटाप्रमाणें भडभड बोलण्यास मी सुरवात केली व त्यांना येण्याविषयीं गळ घालून इतकें पुरेपुरेसें केलें कीं, सरते शेवटीं त्या म्हणाल्या—" मीनाताई! अहो! हो! हो!! इतक्या कां काकुळती येताय? एवढया नाकधुऱ्या काढायला मी का यायला नाहीं म्हटलं? अहो! इतक्या आपलेपणानं व प्रेमानं बोलाविणारं मला तरी नात्यागोत्याचं दुसरं कोण आहे बरं?"

संध्याकाळीं बाबा जेव्हां कामावरून आले, तेव्हां फारा दिवसांनीं भेटलेल्या जीवाभावाच्या दोन प्रेमळ जीवांप्रमाणें गुल्गुल् गुजगोष्टी करीत, चुलीशीं स्वयंपाक करण्यांत गुंतलेल्या मला व वीणाबाईना पाहून ते आश्चर्यानें अंगदीं थक्क होऊन गेले. आंत येऊन त्यांनीं ज्यावेळीं बोलण्यास सुरवात केली त्यावेळीं त्यांचे विस्फारित झालेले ते डोळे......त्यांत विपुलतेनें खेळणारें प्रसन्नतेचें तें चमकदार पाणी......मुग्ध मधुर अशा आनंदी भावामुळें चेहऱ्यावर उमटत चाललेली समाधानाची ती नयनरम्य लकेर ......व आधींच असामान्य गोड असलेल्या त्यांच्या आर्जवी

आवाजांत आलेल्या मार्दवतेचा तो मृदुल कंप....... वगैरे गोष्टी एकामागून एक अशा यथाक्रमानें माझ्या दृष्टिपथांत आल्या आणि त्या योगानें माझ्या असावलेल्या नजरेचें पारणें फिटून, मी केलेल्या प्रयत्नांच्या मानानें त्यांचें मोल शेंकडों.......नव्हे हजारों पटीनें अधिक आहे, अशी माझी बालंबाल खात्री होऊन चुकली.

जसजसा अधिकाधिक काळ लोटूं लागला तसतसा बाबांच्या विषयींचा माझा आपलेपणा वाढत जाऊन, त्यांच्याविषयीं मला अकथनीय असें प्रेम वाटूं लागलें.

ह्यानंतर पुढें प्रत्येक आठवड्यांत निदान तीन चार दिवस तरी, ह्या निमित्तानें नाहीं त्या निमित्तानें वीणाबाईंचें आमच्याकडे रहाणें पडूं लागलें व मग अशा वेळेला न चुकतां, रात्रीचें जेवण वगैरे झाल्यावर मजेनें बोलत–बोलत खूप लांबवर सहल करावयास जाण्याचा जणूं आमच्या तिघांचा कार्यक्रम ठरलेलाच असे. माझ्याशीं होत जाणाऱ्या वीणाबाईंच्या त्या निकट सहवासामुळें त्यांचा माझा दाट परिचय होण्यास चांगलीच मदत झाली आणि त्या कारणानें सहजच त्यांच्या स्वभावांतील गोडवा व लोकांला आपलेसें करून घेण्याची प्रवृत्ति माझ्या दृष्टोत्पत्तीस येऊन, त्यांच्याविषयीं मला वाटणारा पूर्वीचा दुजाभाव अगदीं निःशेषपणें नामशेष झाला. इतकेंच काय पण, त्याचें हृदय द्योतक म्हणून परकेपणा दर्शविणाऱ्या ' वीणाबाई ' ह्या रूढ, लोकोपचारी नांवानें त्यांना हांक मारण्याऐवजीं ' माई ' ह्या आपुलकीच्या प्रेमळ, जिव्हाळी नात्यानें मी त्यांना इतःपर संबोधूं लागलें.

बाबांना ज्या दिवशीं ' हॉस्पिटलमध्यें ' जावयाचें होतें त्याच्या आदल्या रात्रीं मी त्यांना म्हणालें—" बाबा ! खरोखर मी तुमची शतशः अपराधी आहे ! प्रथम जेव्हां मी इथं आलें तेव्हां माझ्या हातून घडलेल्या विक्षिप्त, तऱ्हेवाईक वागणुकीवर तुम्ही केवढ्या विशाल अन्तःकरणानं प्रेमाचं पांघरूण घातलंत आणि केवढ्या उदारतेनं मला क्षमा केलीत हें मी जाणतें ! माझ्या त्या वेळच्या त्या चमत्कारिक वर्तनाची आतां मला नुसती जरी पुसट आठवण

झाली, तरी मला अतिशय दुःख होतं व माझं हीन क्षुद्रत्व माझ्या मनाला पटून माझी मलाच भयंकर लाज वाटूं लागते! बाबा वीणामाईसंबंधानं तुमच्या मनांत पूर्वी घोळत असलेल्या विचारांत माझ्या येण्यानं......विशेषतः माझ्या अघोचरी वर्तनानं व्यत्यय आला हें मी ओळखून आहे! इतकंच काय, पण मला बरं वाटावं...माझ्या सुखांत काडीचाहि अडथळा येऊं नये म्हणून स्वतः कमालीचा मानसिक त्रास भोगून तुम्ही तो विचार आपल्या अन्तःकरणांतून धुडकावून लावलात हेंहि मला समजतं आहे... आणि म्हणूनच...बाबा...मला आतां आपणाला असं सांगावसं वाटतं कीं, 'हॉस्पिटलमधून' बरं होऊन परत आल्याबरोबर तुम्ही आपल्या त्या कृतसंकल्पाची तांतडीनं सांगता करावीत, अशी माझी आत्यंतिक कळकळीची मनीषा आहे! आणि तसं जर आपल्याकडून झालं नाहीं...तर...तर...मात्र...पश्चात्तापाची तळमळ माझ्या जीवाला अगदीं हैराण करून सोडून, मला थोडी सुद्धां शांति लाभूं देणार नाहीं हें अगदीं खास आहे!"

आंसवांनीं आर्द्र झालेल्या डोळयांनीं मजकडे पहात, बाबा अगदीं माझ्या जवळ येऊन उभे राहिले व माझ्या खांद्यावर आपला हात टाकून, अत्यंत गद्गद स्वरांत माझ्या कानाशीं ते हलकेंच पुटपुटले—"मिना! बाळ! माझ्या 'ऑपरेशन्‌चं' कांहींहि होवो! त्याबद्दल नसती काळजी करण्याचं कांहींच कारण नाहीं!... ईश्वराच्या मनांत जें होणारें असेल तें होणारच। त्याला कोणाचा काय इलाज चालणार आहे?......पण...पण...बाळ...मलाहि आतां तुला असं सांगावसं वाटतं कीं, माझ्या आजपर्यंतच्या सबंध आयुष्यांत विशुद्ध प्रेमाचा व सात्त्विक आनंदाचा असा जर कोणता काळ गेला असेल तर तो गेल्या महिन्यांतीलच होय!"

* * *

दुसरे दिवशीं एकच्या सुमारास शाळेच्या 'ऑफीसमधून' मला बोलावणें आलें. माझ्या पोटांत एकदम धस्स होऊन, माझी छाती जोरानें धडधड करूं लागली. उलथापालथ झालेल्या माझ्या

मनाच्या गोंधळलेल्या अवस्थेंत, बाबांचें कांहीं तरी बरेंवाईट झालें असावें, अशा प्रकारचा एक अशुभ विचार उद्भवून, त्याचा चरका माझ्या अन्तःकरणाला चाटून गेला.

माझ्या अविचारी दुर्वर्तनाबद्दल बाबांना मजजवळून कायमचें हिराऊन नेऊन, ईश्वरानें मला चांगलेंच पारिपत्य केलें असावें, असें मला वाटलें. भीतीच्या जबरदस्त धसक्यानें देहाचें पाणी पाणी होत असतांना, थरथर कांपत, देवाचें नांव घेत कशीबशी मी ‘ ऑफीसच्या ’ दाराशीं जाऊन उभी राहिलें. तेथें ‘ हेड मिस्ट्रेस ’समोरच एका खुर्चीवर वीणामाई विराजमान झालेल्या माझ्या नजरेस पडल्या.

“ मीनाताई ! मीनाताई ! ! ” खुर्चीवरून लगबगीनें उठून मजजवळ येत वीणामाई अगदीं हांवऱ्या अधीरतेनें म्हणाल्या— “ तुमचे बाबा शस्त्रक्रियेंतून कसे छान......सुखरूपपणें पार पडले......? लवकरच चांगले बरे होऊन ते परत घरीं येतील!”

माझ्या डोक्यावरील दडपणाचा भार एकदम हलका होऊन, मला विलक्षण हायसें वाटलें आणि मग इतका असीम आनंद झाला कीं, त्याचें विराट स्वरूप माझ्या चिमुकल्या अन्त:करणाच्या त्रिभुवनांत मावेचना.

‘ शस्त्रक्रियेच्या ह्या भयंकर दिव्यांतून तुमच्या वडिलांची यशस्वी रीतीनें मुक्तता होण्याला त्यांचें गेल्या महिन्यांतील मनस्वास्थ्यच निःसंशय कारणीभूत झालें ’ असें जेव्हां वीणामाईनीं पुढें मजजवळ बोलून दाखविलें, तेव्हां, त्यांच्या पुनर्विवाहाबाबतींत, कालच रात्रीं बाबांना आपण जें कांहीं सांगितलें होतें, तें सारें त्यांना आत्तां...इथेंच आपण सांगून टाकावें, असें केवढ्या तरी प्रकर्षानें मला त्या वेळीं वाटलें.

* * *

दोन महिन्यानंतर एके दिवशीं संध्याकाळीं शाळेंतून घरीं येत असतांना, आमच्या राहत्या बंगलीच्या बाहेरच्या लहानशा बगिच्यांत बाबा व वीणामाई, जिवाशिवाचा संगम झालेल्या एखाद्या

प्रौढ प्रणयी जोडप्याप्रमाणें हृदयांतील प्रीतीच्या कानगोष्टींची कुजबूज करीत, चहाचे गोड-गोड घुटके घेत बसले आहेत, असें माझ्या अवलोकनांत आलें.

होरपळलेल्या आशांनीं निर्जीव बनलेलें त्यांचें नीरस जीवन उशीरानें का होईना, पण संसार-सौख्याच्या अनुपमेय जीवनानें पुन्हां ताजेंतवानें होऊन चांगलेंच टवटवीत झालें, ह्या सुखद विचारानें मला केवढें अवर्णनीय...केवढें अनिर्वाच्य समाधान दिलें-ह्याचें वर्णन केवळ शब्दातीत आहे.

त्या दोन प्रेमी जीवांचें तें गोड मीलन पाहून, आठ दिवसांपूर्वी बाबांच्या चालढकलीकडे दुर्लक्ष करून, अत्याग्रहानें त्यांचा पुनर्विवाह घडवून आणण्याच्या कामीं मी तीव्र चिकाटी दाखविली होती, त्याचें सर्वांशानें सार्थक होऊन, अगदीं पूर्णत्वानें माझ्या जीविताचें साफल्य झालें असेंच मला त्यावेळीं वाटलें.

[ मनोविश्लेषणात्मक पद्धतीनें कथन केलेली एका आधुनिक कुमारिकेची एक अभिनव-आत्मकथा ]

| प्रकाशनस्थल:- | " The Father I Hated " | लेखनकाल:- |
|---|---|---|
| 'अप्रकाशित' | ह्या गोष्टीवरून | ऑगस्ट १९३८ |

# जगाच्या जीवनकलहांत : : १

" There is a tide in the affairs of men
Which, taken at the flood, leads on to fortune."

संध्याकाळच्या सहाचा सुमार. दिवसभर शहराच्या बजबजपुरींतील श्रमानें दमून भागून गेलेल्या जीवांनीं " लॉईड ब्रिज " अगदीं फुलून गेला होता. कांहीं लोक मित्रमंडळीशीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यांत दंग झाले होते, तर कांहीं स्वतःच्याच तंद्रींत विलीन असल्यामुळें, जवळपास चाललेल्या मानवी धांवपळीकडे त्यांचें लक्ष असणें शक्य नव्हतें. कोणी टांगे, मोटारी, सायकली इत्यादि वाहनांच्या वाहतुकींत निमग्न झाले होते, तर कोणी संधिप्रकाशांत दूरवर दिसणारें ' कॅम्पचें ' मनोहर दृश्य पाहण्यांत-अगर पुलाखालील सरितेच्या निर्मल, नील जलांत चमकणारी तारावेष्टित चंद्राची रमणीय कोर अवलोकन करण्यांत गुंगून गेले होते. " शिवाजी बघा ! आपलीं जुनीं माणसें पहा ! " असें म्हणून

चिवडेवाला लोकांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेऊन, "काय महाराज ! देऊं कां शेरभर ?" असें म्हणत, मोठ्या आनंदानें आपली गाडी हळूंहळूं हलकी करण्याचा प्रयत्न करीत होता. "मसालेदार टेसवाला" विकणाऱ्या भय्यांच्या फेऱ्या अनाठायीं जात नव्हत्या. "गांवरान, खारी भाजली, हात पोळतोय" वाल्यांनीं तर आपल्या ओरडण्यानें अगदीं धुमाकुळ उडवून देऊन, आपल्या पाट्या संपवीत आणल्या होत्या. "देरे बाबा ! एक पैसा !" असें भजन करणाऱ्या आंधळ्यांच्या माळका प्रत्येकाला ओळीनें त्रास देत, पैसा मिळविण्याचें आपलें काम चोख रीतीनें बजावीत होत्या.

अशा वेळेला नदीच्या वाळवंटावर असलेल्या एका उंच खडकावर जगदीश बसला होता व त्यानें आपली शून्य दृष्टि सरितेच्या वाहत्या प्रवाहाकडे लाविली होती. त्याचा चेहरा जरी निराशेनें काळवंडला होता, तरी कसल्या तरी दृढनिश्चयाची झांक त्यावर पूर्णपणें दृग्गोचर होत होती. बराच वेळपर्यंत अंतःकरणांत उडालेल्या हलकल्लोळाला तिथेंच दाबून...अडवून ठेवण्यांत जगदीश्वराला जरी बरेंच यश आलें होतें, तरी पुढें पुढें त्याच्या वाढत्या सामर्थ्यापुढें त्याचा इलाज चालेना. तो अगदीं हतबल–हतवीर्य होऊन गेला. शेवटीं वाचेच्या "ऑटोमॅटीक गेटमधून" विचारजलाच्या लोंढ्याला बाहेर वाट मिळालीच......

"पैसा ! पैसा !! काय अजब चीज मानवानें निर्माण केली आहे, कीं तिच्याकरितां प्रत्येक प्राणी जगांत सारखा आयुष्यभर धडपड करीत असतो ! पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि जा, सूक्ष्म रीतीनें कोठेंहि दृष्टि फिरवा, पैसा हेंच प्रमुख मानवी ध्येय आहे असें आपणांस आढळून येईल ! मी सुद्धां या जीवनाच्या कोलाहलांत अभिमानानें वावरण्यासाठीं, कॉलेजांतील शिक्षणक्रम, वार, स्कॉलरशिप्स वगैरेंच्या जोरावर पूर्ण केल्यापासून, सरस्वतीदेवीला सोडून त्या लक्ष्मीला प्रसन्न करून घेण्यासाठीं साऱ्या पुण्याभर आज दहा बारा महिने सारखा पायपिटी करीत आहें ! निरनिराळ्या ऑफिसांत शेंकडों अर्ज केले ! मोडक्या तोडक्या वशि-

त्यानिशीं हजारों प्रायव्हेट फर्मस् पालथ्या घातल्या;पण प्रत्येक ठिकाणीं 'No Vacancy'चें गालबोट लागून अधिक काळ्या ठिक्कर चेहऱ्यानेंच मला दाराची वाट धरावी लागली ! नोकरीकरितां केविलवाण्या तोंडानं हिंडतांना आलेल्या एक एक कटु अनुभवाची आठवण झाली म्हणजे अंगावर शहारे येतात ! नकळत काळजीनें खोल गेलेल्या डोळ्यांत अश्रूंची गर्दी उसळते !"

" ज्यावेळीं माझी बी. ए. ची परीक्षा पास झाली त्यावेळीं माझ्या आईला आकाश, कसें अगदीं ठेंगू झालें होतें ! तिला वाटलें कीं माझा बाळ माझ्या इतक्या दिवसांच्या श्रमाचे पांग आतां एका क्षणांत फेडून टाकील! पण त्या भोळ्या जीवाला त्यावेळीं परिस्थितीची जाणीव कोठून असणार ? अरेरे! जिनें माझ्या शिक्षणाप्रीत्यर्थ पोळपाटलाटणें-सुद्धां हातीं धरण्याची कदर बाळगली नाहीं, त्या माझ्या आवडत्या, गरीब पण थोर मातेपुढें 'नोकरी मिळत नाहीं' असलीं नालायक रडगाणीं मी कोणत्या तोंडानं गाऊं ? माझ्या वाटेकडे आशेनें डोळे लावून बसलेल्या त्या माउलीला नोकरीच्या अभावीं निराशेनें थोबाडलेलें हें तोंड मी कसं दाखवूं ? ... ... ... वीष खाऊन प्राण देईन म्हटलं तर आज मजजवळ एक फुटकी कवडीसुद्धां नाहीं ! !......देवा ! देवा ! ! ह्या जगदीश्वराला जन्माला घालून तूं कोणतं कार्य साधलंस ? ज्याला आपल्या आईला तिच्या म्हातारपणीं सुख देतां येत नाहीं,... ...तिला पोसतां येत नाहीं...... मातृऋणाची थोडीसुद्धां भरपाई करितां येत नाहीं अशा नामर्दानं जगण्याची तरी इच्छा कां करावी ? प्राणापेक्षां प्रिय असलेल्या आईची ह्यापुढें उपासमार होणार !......अन्नाला मोताद होऊन .........!!! नको ! नको !! तें हिडीस चित्र मला पाहवत नाहीं ! दुर्दैवाचे जोरदार धक्के सहन करण्याचें त्राण जगदीशाच्या अंगांत आतां उरलें नाहीं ! बस्स !...... ठरलें !! ...... आतां एकच उपाय आहे तो म्हणजे या सरितेच्या ......!!!...... या !! अंधकार सहचरीनों ! लवकर या, व आपल्या तिमिरपटलानं जगाला जगदीश्वराचें हें नामुष्कीचें कृत्य दिसूं देऊं नका !!!

ह्याच सुमाराला इकडे पुलावरील कट्टयावर एक मवाली, जुन्या बाजारांत एका गृहस्थाच्या खिशांतून नुकत्याच मोठ्या शिताफीनें उडविलेल्या पांच रुपयाच्या नोटीकडे मोठ्या अभिमानी दृष्टीनें पहात, ती आतां कशी उडवावी ह्या विचारांत मग्न होऊन गेला होता. इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटला, व त्यानें त्याच्या हातांतील ती नोट खरोखरीच उडून (?) जाऊन, कर्मधर्मसंयोगानें बरोबर जगदीश्वराच्या पुढ्यांत येऊन पडली. त्या बदमाषाचे मनांत रचलेले मांडे मनांतच राहिल्यामुळें तो वाऱ्यावर अतिशय संतापला; पण चरफडण्यापलीकडे त्याच्या हातीं तरी काय होतें ? चुरमुऱ्याचे फाके मारण्यास लागणारी दिडकीसुद्धां त्याच्या खिशांत नव्हती.

उठलेल्या वावटळीचे धूलीकण डोळ्यांत जाऊं नयेत म्हणून जगदीश्वरानें आपले डोळे मिटून घेतले होते. ते उघडल्यावर त्याला ती नोट दिसतांच तो आश्चर्यानें थक्क होऊन गेला. ऐन वेळेवर ज्या अर्थी हा ईश्वरी कृपाप्रसाद आपल्याला मिळाला आहे, त्या अर्थी आपल्या हातून कांहीं तरी कार्य व्हावयाचें असून, जगण्यांत अजून अर्थ आहे असाच दैवी संकेत दिसत नाहीं काय ?

त्या नोटीनें जगदीश्वराच्या आयुष्याला नवजीवन प्राप्त करून, त्याला निराळेंच वळण लाविलें. दुसऱ्याच दिवशीं त्या रुपयांचीं वर्तमानपत्रें खरेदी करून, स्वतःला थोडासा फायदा ठेवून तीं विकण्याचा उद्योग जगदीश्वरानें आरंभला. खरोखरीच दिसण्यांत जगदीश अतिशय सुंदर होता. त्याच्या भव्य शरीराकडे व रुबाबदार चेहऱ्याकडे नजर गेली कीं मनांत कौतुक व त्याच वेळीं त्याच्या असहाय स्थितीबद्दल अनुकंपा उत्पन्न होत असल्यामुळें, त्याचीं वर्तमानपत्रें चटसारीं खपून जात. त्यांत त्याला रोज ५।६ आणे मिळत, व त्यांवर तो आपल्या आईचें पोट कसें तरी भरी. तो जरी एवढा शिकलेला होता, तरी त्याला ह्या धंद्याची किसळ वाटली नाहीं, किंवा त्यानें त्याचा तिरस्कारहि केला नांहीं. तो म्हणे धंद्यांत उच्च-नीच हा भेदाभेदच नाहीं. सचोटीच्या चक्राभोंवतीं जर धंदा फिरता असेल, तर लाखों रुपयांचें जवाहीर विक-

णारा एखादा शेट जितका श्रेष्ठ तितकाच दोन रुपयांचा जोडा विकणारा चांभारहि श्रेष्ठ. जो धंदा आपण स्वीकारला आहे, किंवा परिस्थितीनुरूप ज्या धंद्यांत आपणांस पडावें लागलें आहे, त्या धंद्यावर प्रेम करून, त्याच्याशीं समरस होण्यांतच यशाची गुरु-किल्ली आहे.

जगदीश्वराला २।४ महिने नुसतींच वर्तमानपत्रें विकून हाल-अपेष्टांत दिवस काढावे लागले; परंतु त्यानें आपल्या हलाकीची कुरकुर दुसऱ्याजवळ कधींहि केली नाहीं. स्वत: कांट्याकुट्यांत राहून दुसऱ्याला कसें हंसवावें, ही गुलाबफुलाची वृत्ती जगदी-श्वराला छान साधली होती.

लवकरच जगदीश्वराला एका सिनेमागृहांत 'डोअरकीपरची' लहानशी नोकरी लागली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो वर्तमान-पत्रें विकी, व नंतर ६ वाजतां ह्या कामावर हजर होई. त्या नव्या नोकरींत त्याला मोठी मौज वाटूं लागली. प्रत्येक चित्रपटाचें मोठ्या सूक्ष्म रीतीनें तो अवलोकन करी. एखादेवेळीं आपणही 'रुडॉल्फ व्हॅलेन्टिनो' प्रमाणें प्रख्यात सिनेमा 'स्टार' होऊन जगांत आपलं नांव अजरामर करावं अशा प्रकारची प्रबल इच्छा त्याच्या मनांत डोकावे, पण दुसऱ्याच क्षणीं परिस्थितीची जाणीव त्याला मागें खेंची व पुन्हां निराशेनें तो उदास होई.

जगदीश्वर 'डोअरकीपर' असल्यामुळें त्याची नानाप्रकारच्या लोकांशीं ओळख झाली होती. त्याच्या मनमिळाऊ गोड स्वभावा-मुळें व प्रत्येकाशीं अदबीच्या वर्तनामुळें तो सर्वांना फार आवडत असे. 'टॉमसब्रूक' नांवाचे एक घरंदाज, सिनेमाप्रेमी, युरोपीयन 'सिव्हिल सर्व्हंट' तर 'शो' च्या अगोदर व मधल्या 'रिसेस' मध्यें त्याच्याशीं सिनेमा सृष्टींतील' पुष्कळ विषयांवर गप्पा मारीत बसत.

जगदीश्वराच्या तोंडून विविध सिनेमा नटनटींच्या बारीक सारिक गुणदोषांची छाननी ऐकून तर ह्यानें अभिनयाचा चांगलाच चिकि-त्सक बुद्धीनें अभ्यास केलेला दिसतो, असें 'ब्रुक' साहेबांस आढळून

आलें. त्यांनीं मनाशीं विचार केला कीं जर ह्याला 'हॉली वुड' मध्यें नेलें तर हा खरोखरीच आपलें नांव काढील.

एके दिवशीं 'Rudolph Valentino'–a man of Perfect Smiles and ravishing Kisses, and 'Vilma Banky'—the well-known Veronese bewitching beauty— ह्या प्रसिद्ध नटांच्या भूमिका असलेली जगविख्यात 'Son of the Sheik' ही फिल्म चालली होती. 'डोअरकीपर'च्या स्टूलवर बसलेला जगदीश्वर 'रुडॉल्फच्या' भूमिकेशीं इतका समरस, इतका एकतान झाला होता कीं रिसेसची पाटी त्याला दिसली नाहीं. दरवाज्यावरील काळा पडदा दूर सारण्याचें त्याला भान उरलें नाहीं. इतक्यांत त्याच्या खांद्यांवर 'टॉमसब्रूक' साहेबांनीं थाप मारून, त्याला समाधींतून शुद्धीवर आणलें, व विनोद करण्याच्या उद्देशानें सहज हंसत हंसत विचारलें:—

"काय? रुडॉल्फ कसें होतां येईल ह्याचा विचार चाललाय वाटतं?"

"साहेब! विचार करण्यापलीकडे न जाण्याचीच माझी सध्याची गृहदशा आहे!! ........... संधी आली तर ...... तर ... ...... पण कशाला हा गगनचुंबी मनोऱ्याचा डोलारा???"

"भल्या गृहस्था! संधी अपोआप चालत येत नसते! तिला ओढून अणावी लागते!......आहे कां तुझी तयारी? 'हॉलीवुड' मध्यें माझ्या ओळखीचा एक सिनेमा डायरेक्टर आहे! जातांना येशील कां माझ्याबरोबर??"

वाचकहो! जगदीश्वरानें काय उत्तर दिलें असेल???

× × × ×

रस्त्यांत वर्तमानपत्रें विकणारा पोर जगदीश हाच नटसम्राट 'हिंद'.........the world's greatest ideal lover of the Screen.........असें जर आज कोणाला सांगितलें तर तो सांगणाराला मूर्खांतच काढील.

नामर्दपणानें आत्महत्या करावयास निघालेल्या जगदीश्वराच्या आयुष्यांत त्या चिमुकल्या नोटीनें कवढी क्रान्ती घडवून आणली ??

साऱ्या जगांत आपल्या नांवाची पताका फडकावून "जगाच्या जीवनकलहांत" तो केवढा यशस्वी "यशवंत" बनला ???

× × × ×



| प्रकाशनस्थल:— 'फर्ग्युसन कॉलेज त्रैमासिक' | स्वतंत्र | प्रकाशनकाल:— सप्टेंबर १९२९ |
|---|---|---|

# अपकाराची फेड : : : १०

भावपुरांत, त्याप्रमाणेंच त्याच्या आसपासच्या दहापांच खेड्यांत, दयाळशेट किसनप्रसाद हे व्यापारी कोणास माहीत नाहींत, अशी व्यक्ति आढळणें बहुतेक कठीणच. भावपुरांतच दयाळशेटांच्या मालकीचें असें एक रहाण्याचें घर व दोन मोठमोठीं दुकानें होतीं.

त्यांचा सुंदर व भव्य बांधा, भुरभुरणारे कुरळे केस, सदोदित हांसरा चेहरा, व विनोदी स्वभाव—हीं पाहिल्याबरोबर त्यांच्याविषयीं मनांत प्रेम व आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नसे. त्यांचा आवाज गोड व सुरेल होता. ज्यावेळीं तारुण्याच्या अनोळखी प्रांताचे ते मुशाफर होते, त्यावेळीं 'गद्धेपंचविशीला साजेशा, कोंवळ्या अल्लडवृत्तीमुळें, त्यांना 'बाटलाबाईचें' बरेंच व्यसन लागलें होतें; परंतु लग्न झाल्यादिवसापासून मात्र, प्रेमळ पत्नीच्या सतत प्रयत्नामुळें सुरादेवीचे ते कट्टे शत्रू बनले होते.

एके दिवशीं संध्याकाळीं दयाळशेटजींनीं आपला माल घेऊन, ‘ वाघोलीस ’ भरणाऱ्या प्रसिद्ध जत्रेस जाण्याचें ठरविलें. दुसरे दिवशीं कोंबडा आरवण्याच्या पूर्वी मोठ्या पहाटेस उठून, त्यांनीं आपली निघण्याची सर्व तयारी केली, व नंतर पत्नीचा निरोप घेण्यासाठीं म्हणून, ते आपल्या निजावयाच्या खोलीकडे वळले. ते आंत शिरण्याला व त्यांची बायको झोपेंत वाटणाऱ्या कसल्यातरी भीतीमुळें एकदम ओरडण्याला एकच गांठ पडली. लगेच घाबऱ्या घाबऱ्या ते पुढें झाले व त्यांनीं तिला हलवून जागी करून, ‘ काय झालें ? ’ म्हणून मोठ्या प्रेमानें विचारिलें.

“ नाथ ! माझ्या गळ्याची शपथ आहे ! आपण आज जाऊं नये गडे ! मला आज आपणांविषयीं फार–फार वेडेंवांकडें स्वप्न पडलें ! मी आतां स्वारींना मुळींच सोडणार नाहीं !...... ...नाहीं ना जाणार गडे ? ” असें म्हणून नुकत्याच पाहिलेल्या भयंकर दृश्यामुळें पार घाबरून जाऊन, घामानें डबडबलेल्या आपल्या हातांचा विळखा तिनें दयाळच्या मानेभोंवतीं घातला व हरिणीप्रमाणें बावरलेली आपली नजर, आपल्या प्रियकराच्या दृष्टीला भिडवून, तिनें त्यास जितकें कवटाळतां येईल तितकें कवटाळलें.

आपल्या पत्नीचा हा घाबरटपणा पाहून, दयाळशेटजींना अतिशय हसूं लोटलें व सहज विनोद करण्याच्या उद्देशानें त्यांनीं पृच्छा केली....

“ कमलिनी ! तुला भीति वाटते होय, कीं मी जत्रेंत गेल्यावर, मौज म्हणून इतरांच्याबरोबर गुत्त्यांत जाऊन, पूर्वीप्रमाणेंच आपलें विमान वर चढवीन ? नाहीं ! नाहीं ! कमलिनी, जिवांत जीव असेतोंपर्यंत, दारूच्या एका थेंबासही स्पर्श करणार नाहीं, अशी शपथ तुझ्यासारख्या देवतेला साक्षी ठेवून मी घेतली नाहीं काय ? ”

“ मला कशाची भीति वाटते, तें कांहीं मला बरोबर सांगतां येत नाहीं; पण एवढं मात्र खरं, कीं मला......फार–फार वाईट स्वप्न पडलं ! मला असं वाटलं, कीं आपण गांवाहून आला आहांत व आपले कपडे वगैरे काढण्यास मी दिवाणखान्यांत आलें आहे !

पण पाहतें तों काय ! आपल्या डोक्यावर आंतांसारखे हे काळे कुळकुळीत केस नसून, पांढऱ्या स्वच्छ केसांनीं आपला सुंदर चेहरा, १०० वर्षांच्या जख्खड म्हाताऱ्याप्रमाणें विद्रूप करून टाकला आहे !" कमलिनी पडलेल्या स्वप्नावर आपला पूर्ण विश्वास आहे, अशा आवाजांत म्हणाली.

दयाळशेटजी पुन्हां मोठ्यानें हंसले व म्हणाले:—"वा मग तर उत्तमच ! अग तो एक चांगला शुभ शकुनच आहे ! शिवाय, मी जर आपला सर्व माल विकला नाहीं, तर तुझे निरनिराळे लाड पुरवायला मी काय मोठा जहागिरदार लागून गेलों आहे ?"

अशा रीतीनें दयाळनीं कमलिनीची कशीतरी समजूत घातली व जड अंतःकरणानें तिचा निरोप घेऊन, ते आपल्या मार्गास लागले.

दिवसभर प्रवास केल्यानंतर संध्याकाळीं मुक्कामाला म्हणून ते वाटेंत असलेल्या एका मोठ्या खाणावळींत उतरले. कर्मधर्मसंयोगानें तेथें त्यांना खानापूरचे 'जगजीवनदास मोहनदास' नांवाचे प्रसिद्ध व्यापारी भेटले. दोघांनीं थोडासा चहा, फळफळावळ वगैरे घेतल्यावर, हॉटेलच्या मालकानें त्यांना निजण्याकरतां, एकमेकांस लागून असलेल्या अशा दोन खोल्या दाखविल्या.

दयाळशेट हे सूर्यवंशी नसल्याकारणानें लवकरच उठले व त्यांनीं आपल्या गाडीवानास उठवून, त्यास बैल जोडावयास सांगितले. मग ते मागील झोपडींत रहात असलेल्या मालकांकडे गेले व आपलें बिल वगैरे चुकतें करून, पुढील प्रवास आक्रमण करण्यास त्यांनीं सुरवात केली.

जवळ जवळ पंधरावीस मैल गेल्यावर, बैलास थोडा विसांवा देण्याकरतां म्हणून, ते एका ओढ्याच्या कांठीं उतरले. इतक्यांत भरधांव वेगानें एक दोन घोड्यांचा टांगा तेथें येऊन दाखल झाला व त्यांतून एक कामगार, दोन सुसज्ज शिपायांसकट खालीं उतरला. कामगारसाहेब वेळ न घालवितां लगेच दयाळशेटजीपुढें येऊन राहिले व 'आपण कोण ?' 'कुठले ?' 'कोठून आलां ?' वगैरे

प्रश्नांची सरबत्ती त्यांनीं पोलीस ऑफिसरच्या धंद्याला साजेशा आवाजांत त्यांच्यावर सोडली.

दयाळशेटजींनीं त्यांच्या प्रश्नांस मोठ्या गंभीरपणानें उत्तरें देऊन, 'आपण मजबरोबर थोडासा चहा घेणार ना?' असेंहि मग सहज हंसत हंसत विचारिलें.

पण ऑफिसरसाहेबांनीं तिकडे मुळींच लक्ष न देतां, आपली जबानी सारखी चालूंच ठेवली होती—

"काल रात्रीं मुक्कामाला कोठें होतां? एकटेच होतां कीं जोडीला कोणी व्यापारी होता? मग ते दुसरे व्यापारी सकाळीं पाहिलेत का? मोठ्या पंहाटेसच खाणावळींतून कूच केलेंतसें?" वगैरे वगैरे.

हा मनुष्य आपणांस असे वेडेवांकडे प्रश्न कां विचारीत आहे ह्याचें दयाळशेटजीस फार आश्चर्य वाटलें; परंतु झालेली सर्व हकीकत सरळपणें सांगण्यास त्यांनीं मुळींच मागेंपुढें पाहिलें नाहीं. नंतर ते म्हणाले—

"कांहो! आपण मला एखादा रामोशी अगर दरवडेखोर समजतां वाटतं? महाराज! स्वतःच्या व्यापाराकरतां म्हणून मी प्रवास करीत आहे! तेव्हां उगीच नसते प्रश्न विचारून सतावण्याचा शिष्टपणा आपल्यासारख्या अधिकारीचाण्याला मुळींच शोभत नाहीं!"

"सद्गृहस्था! मी ह्या प्रांताचा फौजदार आहे! कालची रात्र आपण ज्या व्यापाऱ्याबरोबर घालविली, त्याचा गळा कोणी तरी दुष्टानें पैशाच्या लोभानें कापला आहे! माझें कर्तव्य म्हणून तुमच्या सामानाची झडती घेणें मला भाग आहे!"

आपल्या वरिष्ठाच्या हुकमाप्रमाणें, त्या आडदांड पोलीस शिपायांनीं लगेच गाडींतील सामान बाहेर ओढलें व त्याची ते बारकाईनें तपासणी करूं लागले. इतक्यांत त्या पोलीस अधिकाऱ्याची नजर एका पिशवीवर गेली. ती उघडतांच त्यास आंत एक लांब पातीचा सुरा दिसला. विजयी आनंदानें त्यानें तो बाहेर हिसकला व मोठ्यानें गर्जूनच दयाळास विचारिलें.

" हरामखोरा ! कोणाचा आहे हा सुरा ? "

दयाळनें त्या सुऱ्याकडे नजर फेकली व तो रक्तानें माखलेला आहे हें पाहतांच, त्याच्या डोळयापुढें अंधारी आली. भीतीनें तो थरथर कांपूं लागला. धीरानें तर त्याला केव्हांच सोडलें होतें.

" ह्या सुऱ्यावर हें रक्त कोठून आलें ? "

दयाळनें उत्तर देण्याचा प्रयत्न केला, पण त्याला एक शब्दहि नीट उच्चारितां येईना. " म...म...मला कांऽऽही...मा...माही ऽऽत नाऽहीं. मा...माऽऽझा नाऽऽहीं ! "

" रात्रीं तर तूं तेथें एकटाच होतास, व घर तर आंतून बंद होतें ! महाराज ! हें अमानुष कृत्य करणारे वीर आपणच आहांत ! सुऱ्यावरील हे लाल डाग, आपली ही बावरलेली वृत्ति व कावराबावरा जाहलेला हा चेहरा...हीं सर्व कशाचीं चिन्हें आहेत ? राजेश्री ! मग आतां सांगा पाहूं...' आपण हा खून कसा काय केलांत ? ' व ' ह्या सट्टयांत किती पैसे मारलेत ? "

दयाळनें देवाची शपथ घेऊन सांगितलें—" रावसाहेब ! हें क्रूर कृत्य मी मुळींच केलें नाहीं ! रात्रीं चहा घेतल्यानंतर त्या व्यापाऱ्यास मी पाहिलेंसुद्धां नाहीं ! मजजवळ माझे स्वत:चे असे २००० रुपये आहेत ! ह्या सुऱ्याबद्दल म्हणाल, तर महाराज, त्या सर्वसाक्षी देवाला स्मरून सांगतों कीं...तो माझा नाहीं ! " पण हें सांगत असतांना दयाळाचा आवाज कापरा झाला. त्याचा चेहरा पांढरा फटफटीत पडला व एखाद्या गुन्हेगाराप्रमाणेंच जणुं-काय तो आपादमस्तक थरथर कांपूं लागला.

त्या पोलीस अंमलदारानें लगेच आपल्या शिपायांस त्यास गिरफदार करण्याची आज्ञा सोडली. आपल्या हातांपायांतील तें नूतन लेणें पाहतांच, दयाळचा कंठ दाटून आला. त्याच्या डोळयांत अश्रूंची गर्दी झाली. त्याचे सर्व पैसे व माल सरकारजमा करण्यांत येऊन, त्याला जवळच्या गांवांत तूर्त अटकेंत ठेवण्यांत आलें. भावपुरांत त्याच्या वर्तणुकीविषयीं बरीच चवकशी करण्यांत आली. तेथील लोकांनीं सांगितलें, कीं तरुणपणीं त्याला दारूचें बरेंच

व्यसन होतें; परंतु अलीकडे तो बराच सुधारला असून, त्याच्यासारखा सरळ, सीधा व सज्जन मनुष्य सांपडणें विरळाच.

लवकरच खटल्यास सुरवात झाली............दयाळशेटजीवर त्या खानापूर व्यापाऱ्याचा खून करून, १०००० रुपये चोरल्याबद्दलचा गुन्हा शाबीत झाला.

कमलिनीवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. कशावर विश्वास ठेवावा हें सुद्धां तिला कळेना. तिचीं सर्व मुलें फार लहान लहान होतीं........एकाचें तर अजून, आपल्या आईच्या दुधावरच जीवन होतें. कमलिनी त्या गोजिऱ्या अर्भकांना आपणांबरोबर घेऊन, ज्या गांवांत तिचे पंचप्राण अडकले होते, तिकडे जाण्यास, सर्व लाजलज्जा गुंडाळून निघाली. पहिल्याप्रथम तिची बिचारीची कोठेंच दाद लागेना, पण बराच वेळ गयावयां करून याचना केल्यावर, तुरुंगावरील एका ऑफिसरास तिची दया येऊन, फारच थोडा वेळ त्यांनीं तीस आपल्या नवऱ्यास भेटण्याची परवानगी दिली. शृंखलांनीं बद्ध करुन चोर, रामोशी, दरोडेखोर यांच्या पंक्तीला डांबून टाकलेल्या आपल्या नवऱ्याची ती कैद्याच्या पोषाकांतील मूर्ति पाहतांच, कमलिनीस मूर्च्छा आली. व ती धाडदिशीं जमिनीवर पडली. बऱ्याच वेळानें शुद्धीवर आल्यावर इकडेतिकडे करीत असलेल्या आपल्या मुलांना तिनें जवळ ओढलें, व कसातरी मनाचा हिय्या करून, मोठ्या जड अंतःकरणानें ती आपल्या नवऱ्याजवळ जाऊन बसली. घराकडील हकीकत सांगत असतांना, कमलिनीस आलेला हुंदका मुळींच आवरतां येईना. अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर तिनें रडत रडतच दयाळास विचारिलें—

"नाथ! मग ह्यांतून सुटण्यास कांहीं मार्ग नाहीं कां?"

"एक निरपराधी मनुष्य कारण नसतां जगाला मुकत आहे, अशा प्रकारचा अर्ज सरकारकडे केला पाहिजे! तेवढाच काय तो एक आशेचा किरण मला दिसत आहे!"

आपण असा एक अर्ज केला होता; पण त्याचा स्वीकारच केला गेला नाहीं, असें कमलिनीनें त्यांस कळविलें.

दयाळाला उत्तर देतां येईना. निराशेच्या जबर आघातामुळें मधुर संसाराच्या नंदनवनाचा, होत असलेल्या धुळधाणीचा देखावा त्याला स्पष्ट दिसूं लागला. त्यानें आपली मान खालीं घातली, व शून्य दृष्टीनें तो जमिनीकडे पाहूं लागला.

दुःखाची पहिली लाट ओसरल्यावर, कमलिनी म्हणाली—
" माझ्या स्वप्नांत कांहींतरी अर्थ होता तर ? उगीच नाहीं मला आपले केस पांढरे झाले म्हणून स्वप्न पडलें ! आपणांला आठवतें ना ? त्या दिवशीं आपण निघावयास नको होतें गडे !"......
...नंतर आपल्या सुंदर हाताचीं बोटें मोठ्या प्रेमानें दयाळच्या केसांवरून फिरवीत तिने विचारिलें—" नाथ ! आपल्या प्राणापेक्षां प्रिय असलेल्या लाडकीला खरं.........अगदीं खरं सांगा ! तें भयंकर कृत्य करणारे, प्रियकरा तुम्ही नव्हतां ना ? "

" कमलिनी ! कमलिनी ! ! तुला देखील माझा संशय येतो ना ? " असें म्हणून दयाळनें दोन्ही हातांनीं आपला चेहरा झांकून घेतला व एखाद्या अबलेप्रमाणें तो अश्रुविमोचन करूं लागला.

इतक्यांत एक शिपाई आंत आला व भेटीची वेळ संपल्या कारणानें, त्यानें दयाळाच्या बायकोस व मुलांस जाण्याविषयीं फर्माविलें. जड पावलांनीं जाणाऱ्या आपल्या प्रिय माणसांकडे दयाळनें शेवटचें पाहून घेतलें.

मंडळी जाऊन बराच वेळ झाल्यावर दयाळ स्वतःशीं विचार करूं लागला— " माझ्या बायकोलासुद्धां ... ... मी दोषी आहे असें वाटलें ना ? ... ... ...जगांत सत्याचा जर खराच कोणी वाली असेल, तर तो एक परमेश्वरच ! त्यालाच आतां मी शरण जाईन व त्याच्यापाशींच दयेची याचना करीन ! माझ्यासारख्या पामराचा उद्धार, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान त्या रामचंद्राशिवाय कोण करणार आहे ? "

दयाळनें यापुढें अर्जाचा विचार पार सोडून देऊन इतके दिवस बांधलेले आशेचे भव्य मनोरे एका क्षणार्धात कोसळून टाकले व बाह्यजगाशीं असलेला आपला संबंध अजिबात तोडून

सदासर्वकाळ त्या दयाघन प्रभूची प्रार्थना करण्यांत तो आपला काळ कंठू लागला.

दयाळला रोज चाबकाच्या फटक्यानें मार खावा लागे. घाण्याच्या बैलाप्रमाणें रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोलू फिरवून तेल काढावें लागे. ज्या दिवशीं कोलू नसेल, त्या दिवशीं दळणाची कंबर मोडेपर्यंतची कामगिरी ठेवलेलीच. अशा रीतीनें दोन वर्षें त्या नरकांत काढल्यावर, दयाळला इतर कांहीं कैद्यांबरोबर अंदमानांत पाठविण्यांत आलें.

२६ वर्षें दयाळ अंदमानांत कैदी म्हणून राहिला. त्याचे सर्व केस बर्फाप्रमाणें पांढरे शुभ्र झाले. त्याचा विनोदी स्वभाव पार मावळला. कंबर वाकल्यामुळें त्याला फार हळूहळू चालावें लागे. तो कोणाशीं फारसा बोलत नसे. हंसणें...........हंसण्याला किंवा जगांतील आनंदाला तर तो केव्हांच पारखा झाला होता.

तुरुंगांत दयाळ सुंदर सुंदर गालीचे विणण्यास शिकला होता. काम करून राहिलेला वेळ तो 'थोर पुरुषांचीं चरित्रें' वाचण्यांत घालवी. मधून मधून तो ईशस्तुतिपर पदेंहि म्हणे. अजूनही त्याचा आवाज बराच गोड होता.

त्याच्या गरीब स्वभावामुळें, तुरुंगावरील अधिकाऱ्यांची त्याच्यावर बरीच मेहेरनजर असे. इतर कैदी तर त्याला फारच मान देत. ते त्याला 'आजोबा' 'म्हातारे बाबा' अशा लाडक्या नांवानें संबोधीत. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अर्ज किंवा तक्रारी वगैरे करावयाच्या असल्या म्हणजे ते त्याला आपला पुढारी नेमीत व आपसांतील भांडणेंहि त्याला न्यायाधीश समजून त्याच्याकडून तोडवून घेत.

आजपर्यंत घराकडील कांहींच बातमी दयाळला कळली नव्हती. आपली बायको व पोरें हीं जिवंत आहेत, कीं 'देवाघरीं' गेलीं आहेत, हें कळण्यालासुद्धां त्या बिचाऱ्याला कांहीं मार्ग नव्हता.

एके दिवशीं, कैद्यांची एक नवी टोळी हिंदुस्थानांतून अंदमानांत येऊन दाखल झाली. संध्याकाळीं सर्व जुने कैदी नव्या कैद्यांच्या भोंवतीं जमा झाले व त्यांना ' तुम्ही कोठून आलां ? ' ' तुम्हांस कशाबद्दल शिक्षा झाली ? ' वगैरे प्रश्न विचारूं लागले. दयाळही इतरांच्या बरोबर त्या नव्या कैद्यांजवळ बसला होता व मान खालीं घालून, चाललेली हकीकत तो स्वस्थपणें ऐकत होता.

त्या नव्या कैद्यांपैकीं, एक ५५ वर्षें वयाचा, उंच व धिप्पाड मनुष्य 'आपणांस कां धरलें' ह्याचें कारण खोटेंच बनवून, मोठ्या आढ्यतेनें इतरांस सांगत होता.

" मित्रहो ! मला फक्त एक घोडा चोरल्याच्या आरोपावरून शिक्षा करण्यांत आली ! मी त्यांना पुष्कळ सांगितलें, कीं कांहीं जरूरीच्या कामाकरितां मला जावयाचें असल्यामुळें, मी तो घेतला होता व आल्यावर लागलीच तो मी परत करणार होतों ! शिवाय घोड्याचा मालक माझ्या स्वतःचा मित्र होता. पण त्यांचा ह्यावर मुळींच विश्वास बसेना ! ते म्हणाले कीं तूंच तो चोरलास ! परंतु ' कसा ' व ' केव्हां ' हें त्यांस मुळींच सांगतां येईना ! मागें मात्र माझ्या हातून एक मोठा गुन्हा घडला होता व खरं बोलायचं म्हणजे ह्यापूर्वीच पुष्कळ वर्षें मी येथें यायचा ! मागें एकदां फारच थोड्या वर्षांकरितां मी अंदमानांत आलों होतों ! "

" आपलें गांव कुठलें ? " त्यांपैकीं एकानें उत्सुकतेनें पृच्छा केली. " मध्यप्रांतांतील भावपूर ! तेथें माझें घर असून, माझी सर्व मंडळी तेथेंच असतात ! माझें नांव ' पिलाजीराव जमदाडे ' पण घरचे बहुतेक लोक मला 'हरबा' ह्या टोपण नांवानेंच हांक मारतात !"

दयाळनें एकदम डोकें वर करून प्रश्न केला– " पिलाजीराव ! भावपुरांतील दयाळशेट व्यापाऱ्याच्या कुटुंबाविषयीं, आपणांस कांहीं माहिती आहे काय ? "

" हो ! हो ! दयाळशेटजींचीं सर्व मुलें अतिशय श्रीमंत आहेत व स्वतः दयाळशेटजी खुनाच्या आरोपांत सांपडल्यामुळें, आमच्या-

सारखेच अंदमानांत खिचपत पडले आहेत! तें असो म्हणा! पण, आजोबा, आपण असा कोणता गुन्हा केला, म्हणून आपणांस येथें धाडण्यांत आलें!"

स्वतःच्या दुर्दैवाची कहाणी पुन्हां पुन्हां उगाळणें दयाळला मुळींच आवडत नसे. त्यानें फक्त एक सुस्कारा सोडला व तो एवढेंच म्हणालाः—" माझ्या पातकांसाठीं!............ गेलीं २६ वर्षें, त्या कृत्याचीं कडु फळें मी ह्या तुरुंगांत चाखीत आहे!"

" कोणतीं पातकें!" हरबानें मोठ्या जिज्ञासेनें विचारिलें.

दयाळनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो आपल्या दुःखांतच मग्न होता. परंतु त्याच्या जवळच्या एका मित्रानें हरबांस सर्व हकीकत सांगितली.

ती ऐकतांच हरबानें एकदां दयाळकडे दृष्टी फेकली व आपल्या मांडीवर थाप मारून तो म्हणाला—" वा:! हें तर फारच आश्चर्यकारक बुवा! विश्वाससुद्धां ठेववत नाहीं ह्या गोष्टीवर!.....

.....पण बाबा, आपण फारच थकलेले दिसतां?"

' हरबास इतकें आश्चर्य कां वाटलें? त्यानें दयाळास पूर्वी कोठें पाहिलें होतें काय?' वगैरे प्रश्न इतर सर्व कैद्यांनीं त्यास केले.

हरबानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो फक्त म्हणाला—"मंडळीहो! आपली येथें अशी ओळख व्हावी, ही खरोखरी विधिघटनाच नव्हे काय!"

" हरबा! ह्या प्रकरणाविषयीं कदाचित् आपण मागें ऐकलें असेल! मला पूर्वी कधीं पाहिल्याचें आपणांस आठवतें काय?"

" ऐकल्याशिवाय कसें होईल! खोट्यानाट्या कंड्यांचा वारा जगांतून सारखा वाहत असतोच! पण ही गोष्ट फार जुनी असल्यामुळें, काय ऐकिलें हें बहुतेक मी विसरून गेलों!"

" कदाचित् खरा खून कोणी केला हें आपण ऐकलें असेल!" दयाळनें अधीरतेनें विचारलें.

" ज्याच्या पिशवींत सुरा सांपडला, त्याच्याविषयीं कांहीं तरी असावें! दुसऱ्या कोणी जर तो पिशवींत दडवून ठेवला असेल, तर सांपडेपर्यंत कायद्याच्या दृष्टीनें तो कांहीं गुन्हेगार नव्हे! शिवाय तुमच्या डोक्याखालीं असलेल्या पिशवींत सुरा ठेवतां कसा येईल! अशानें तर, तुम्हीं तात्काळ जागे झालां असतां!"

त्या मनुष्याचे हे उद्गार ऐकतांच, दयाळाला त्याच्या गुन्ह्याविषयीं तिळभरही संशय उरला नाहीं. क्षणभर सुद्धां तेथें न थांबतां, तो उठला व तेथून चालता झाला. ती सबंध रात्र दयाळनें झोंपेशिवाय बसून काढली. असल्या दुर्दैवी, किळसवाण्या आयुष्याचा त्याला वीट आला. आयुष्यांत घडलेले निरनिराळे सुखदुःखाचे प्रसंग, आतां एखाद्या चलत् चित्रपटाप्रमाणें त्याला आपल्या पुढें दिसूं लागले.

प्रथम, जत्रेला निघण्याच्या वेळची आपल्या बायकोची ती घाबरलेली मूर्ति, अश्रूनें भरलेले तिचे सुंदर डोळे, झोपेंतून नुक्तीच उठल्यामुळें, इतस्ततः भ्रमण करणारा तिचा केशकलाप वगैरे गोष्टी त्याच्या डोळयासमोर मनोमय नाचूं लागल्या. ती जणुंकाय आपल्यापुढें आतां उभी असून, आपल्याशीं मोठ्या आनंदानें हितगूज करीत आहे, असें त्यास वाटलें. नंतर, त्याला प्राणापेक्षां प्रिय असलेलीं आपलीं मुलें दिसूं लागलीं. स्तनपान करीत असलेल्या लहानग्या बाळाच्या गोजीरवाण्या दृश्यानें तर त्याच्या मनाला पूर्ण भूल पाडली. तरुणपणच्या निष्काळजी, व सुखाच्या जीवनाची त्याला आठवण झाली. ओढ्याकांठच्या झाडाखालीं आपण मोठ्या मौजेनें दिलरुबा वाजवीत असतांना, आपणांस पकडून तुरुंगांत कसें नेलें, हातांपायांत बेड्या कशा अडकवल्या, चामडी लोळेपर्यंत चाबकाचे फटकारे कसे लगावले वगैरे प्रसंग त्याला अगदीं कालच घडल्याप्रमाणें भासले. नंतर त्याला आपल्या सभोंवारच्या कैद्यांची, तुरुंगांतील २६ वर्षें आयुष्याची, व अकालीं वार्धक्याची जाणीव झाली. हृदयाला सुरीप्रमाणें कापत जाणाऱ्या शेवटच्या

विचारानें तो इतका त्रासला कीं, आत्महत्या करण्याकडे त्याच्या मनाचा कल झुकूं लागला.

" आणि ही सर्व......सर्व त्या दुष्टाची करणी ! ! "

दयाळ रागानें इतका बेहोष झाला, कीं सूडाशिवाय कांहींच दिसेना. सबंध रात्रभर तो देवाची प्रार्थना करीत होता; पण त्याला शांतता लाभली नाहीं. दिवसासुद्धां तो हरबाकडे गेला नाहीं किंवा डोळे वर करून त्यानें त्याकडे पाहिलें नाहीं.

अशा रीतीनें एक पंधरवडा गेला. दयाळला रात्रीं मुळींच झोंप येत नसल्यामुळें काय करावें, अन् काय न करावें असें त्याला होऊन गेलें.

एके दिवशीं रात्रीं तुरुंगांतून जात असतांना, कैद्याच्या निजावयाच्या फळीखालून, बरीचशी माती वर येत असलेली दयाळला दिसली. तो तत्क्षणीं काय आहे हें पाहण्यासाठीं तेथें थांबला. इतक्यांत पिलाजीराव जमदाडे फळीखालून सरपटत बाहेर आले व अतिशय घाबरून जाऊन दयाळकडे पाहूं लागले. दयाळ त्यांकडे मुळींच न पाहतां पुढें जाऊं लागला; पण हरबानें त्वरा करून त्याचा एक हात पकडला व त्यास उभे करून तो म्हणाला—

" म्हातारे बाबा ! ह्या गोष्टीविषयीं कोठें चर्चा करूं नका ! दररोज कामाला जातांना ही माती बुटांत भरून, ती मी शिपायाचा डोळा चुकवून बाहेर मोकळी करतों ! तुम्हांलासुद्धां बाहेर पडतां येईल ! पण लक्षांत ठेवा, जरा कां तुमची जीभ चळली, कीं ते माझा जीव काढण्यास मागें पुढें पाहणार नाहींत ! इतकें तरी कशाला......तुम्हालाच आतां यमसदनास पाठवितों म्हणजे भानगडच उरणार नाहीं ! "

दयाळचे डोळे रागानें लालबुंद झाले. त्यानें आपली गहिरी नजर एकदां त्या दुष्टावर टाकली व आपला हात हिसकाऊन घेऊन तो म्हणाला—

" सुटून पळून जाण्याची आतां मुळीं मला इच्छाच नाहीं ! तुलाही मला मारण्याची आतां गरज उरली नाहीं......कारण २६

वर्षांपूर्वींच मजजवळ जगण्यासारखें जें कांहीं होतें तें तूं हिरावून घेतलें आहेस ! सांगण्याविषयीं म्हणशील तर ईश्वर मला जशी बुद्धि देईल, त्याप्रमाणें वागण्यास मी कदापीहि कमी करणार नाहीं."

दुसऱ्या दिवशीं कैद्याना बाहेर कामाला नेत असतांना, त्यांच्यावरील पहारेकऱ्याला कोणीतरी आपल्या लांब बुटांतून बरीच माती बाहेर टाकली असावी, असा जबर संशय आला. लागलीच सबंध तुरुंगाची पाहणी करण्यांत येऊन, तें बीळ शोधून काढण्यांत आलें. मुख्य अधिकाऱ्यानें सर्व कैद्यांस त्याविषयीं प्रश्न विचारले; परंतु कोणीच ती गोष्ट कबूल करीना. शेवटीं जेलरसाहेब दयाळकडे वळले व त्यांनीं त्यास विचारलें.

" आजोबा ! ह्या मंडळींत तुम्हीच एक सच्चे माणूस दिसतां ! तेव्हां ईश्वराला स्मरून सांगा, कीं हें भोंक कोणी खोदलें ? "

पिलाजीराव आपल्याला ह्यांतली कांहींच माहिती नाहीं असें दाखवून, मोठ्या डौलानें जेलरकडे पाहत होते. दयाळकडे पाहण्याची मात्र त्यांची छाती झाली नाहीं. ह्यावेळीं दयाळचे ओठ स्फुरण पावूं लागले. त्याचे हात थरथर कापूं लागले. व बराच वेळ त्याला एक शब्दहि उच्चारतां येईना. त्यानें स्वतःशीं विचार केला——

" ज्यानें माझ्या संसाराचा नायनाट करून, मला जगांतून उठविलें, त्याच्या अपराधांवर मी काय म्हणून पांघरूण घालावें ? पापाचा घडा केव्हां तरी भरणारच !..............त्याच्या गुन्ह्याविषयीं जर मी आतां वाच्यता केली, तर क्षणाचा विलंब न करतां ते त्याला फांसावर लटकावतील...........पण त्याच्या नाशाला कारण होण्यापलीकडे, मला ह्यापासून काय फायदा ? "

" म्हातारे बाबा ! तुम्हांला भिण्याचें मुळींच कारण नाहीं ! खरं काय असेल तें सांगण्यास अगदीं कचरूं नका. " जेलर साहेबानें आपल्या प्रश्नाची पुनरावृत्ति केली.

दयाळानें आपली नजर एकदां हरबांकडे फिरविली व तो म्हणालाः——

" सरकार ? मला सांगतां येत नाहीं, आणि त्या ईश्वराची इच्छाहि मी सांगावें अशी नाहीं ! मी आपल्या ताब्यांत आहेच ! माझ्या शरीराचे आपणांस जे कांहीं धिंदवडे करावयाचे असतील, ते करण्यास आपणास पूर्ण अधिकार व सामर्थ्य आहे ! "

दयाळनें खरी हकीकत सांगावी, म्हणून जेलरनें जंगजंग पछाडले; परंतु दयाळाच्या तोंडून एक शब्दहि न निघाल्यामुळें, त्याला ती गोष्ट तशीच सोडावी लागली.

त्या रात्रीं दयाळ आपल्या बिछान्यावर पडला असतां कोणीतरी लपत छपत येऊन आपल्या अंथरूणावर बसला आहे, असा त्याला भास झाला. अंधारांत डोळे ताणून पाहतांच, तो हरबा असल्याचें त्यास आढळून आलें.

" माझ्यापासून तुला पाहिजे तरी काय ? " दयाळनें त्रासिकपणानें विचारलें " अजूनही तूं माझा पिच्छा सोडत नाहींस ना ?"

पिलाजीरावाचा कंठ दाटून आला. त्याच्या तोंडून एक शब्दही उमटेना. दयाळ उठून बसला व म्हणाला—

" हरबा ! तुझा उद्देश तरी काय आहे ? आतां बऱ्या बोलानं जातोस, कां पहारेकऱ्यांस हांक देऊं ? "

हरबानें लगेच दयाळचे पाय धरले व सद्गदित होउन विनविलें—

" दयाळशेटजी ! मला क्षमा करा ! पैशाच्या पाशवी लोभानें उन्मत्त होऊन मीच दुष्टानें त्या व्यापाऱ्याचा खून केला; व आपल्यावर गुन्हा घालण्याकरितां, तो सुरा आपल्या पिशवींत दडवला ! शेटजी ! करणार ना मला क्षमा ? सदसद्विवेक बुद्धीच्या भाल्यांनी माझ्या हृदयाची अगदीं चाळणी करून, मला वेड लावावयाची पाळी आणली आहे ! "

दयाळ स्तब्ध होता. काय बोलावें, हें त्यास मुळींच सुचेना. हरबानें जमिनीवर गुडघे टेकून, अश्रूंनीं ओथंबलेले आपले नेत्र दयाळकडे लावले व पुन्हा याचना करण्यास सुरवात केली.

" दयाळ ! दयाळ ! असे निष्ठुर होऊं नकाहो ! ईश्वरावरील आपल्या प्रेमाकरितां तरी ह्या गरीबावर क्षमेचें उदक सोडा !...

...... ..... ...आपल्या सुखाची होळी करून, त्यावर ह्या नराधमानें आपली पोळी भाजून घेतली ! तुमच्या संसाराचा नायनाट करून, मी पापाच्या पायावर आपला संसार चढविण्याचा प्रयत्न केला; पण आपण... ... ...आपण मात्र ... ... ...
...अपकाराची फेड उपकारानें करून, माझ्या राक्षसी करणीची मला जाणीव करून दिलीत! दैत्य वृत्तीच्या व पाशवी विकाराच्या मनुष्यांत माणुसकीचा संचार होतो तो अशाच निरपेक्ष दयेमुळें ! शेटजी ! माझा आतां अंत पाहूं नका ! मी अधिकाऱ्याजवळ त्या खानापूर व्यापाऱ्याचा खून केला म्हणून कबूल करीन व मग आपणांस बिनधोकपणें घरीं जातां येईल ! ”

“ तुला बोलणें अगदीं सोपें वाटतें ! पण गेलीं २६ वर्षें मी या तुरूंगांत खिचपत आहे !...मी आतां कोठें जाउं ?...

...माझी बायको हें जग सोडून गेली असेल व माझीं मुलें तर मला विसरूनही गेलीं असतील !.......................
...जाण्यासारखें असें एकहि ठिकाण जगाच्या पाठीवर मला उरलें नाहीं !” दयाळ पूर्ण निराशेनें उद्गारला.

हरबा मुळींच उठला नाहीं. आपलें डोकें जमिनीवर आपटून केविलवाण्या आवाजांत तो म्हणाला—

“ दयाळ ! मला क्षमा करा हो ! तापलेल्या सळया डोळयांत खुपसून किंवा शिशाचा रस घशांत ओतूनसुद्धां जितक्या वेदना होणार नाहींत, तितक्या किंबहुना त्यापेक्षां हजारोंपटीनें जास्त वेदना, आपल्या रागीट नजरेकडे पाहून मला होत आहेत ! ”

इतकें झाल्यावर मात्र हरबानें दोन्ही हातांनीं आपलें तोंड झांकून टाकलें व मोठयानें हुंदके द्यावयास सुरवात केली.

* * *

दयाळनें जेव्हां हरबाच्या रडण्याचा आवाज ऐकला, तेव्हां त्यालासुद्धां भडभडून आलें. तो म्हणाला—

“ ईश्वर तुला क्षमा करण्यास पूर्ण समर्थ आहे ! ”

हे शब्द उच्चारितांच दयाळचें अंत:करण हलकें झालें. पूर्ण समाधानाचा आनंद त्याच्या तोंडावर विलसूं लागला. पुन्हां घरीं जाण्याच्या आशेचा अंकूर जागच्या जागींच पार जळून खाक झाला. सतत २६ वर्षे, दगडानें दगडाच्याच भिंतीवर काढलेल्या आपल्या खोलींतील ज्या प्रभु रामचंद्राच्या चित्राकडे आपण पहात आलों, त्या चित्राकडे पहात असतांनाच आपले डोळे कायमचे मिटावेत, एवढीच इच्छा दयाळला आतां राहिली.

हरबानें दयाळच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष न देतां, आपला गुन्हा अधिकाऱ्यासमोर जाऊन कबूल केला, पण सुटकेची बातमी येण्यापूर्वीच दयाळचा आत्मा ह्या नश्वर जगास सोडून गेला होता !

* * *

| प्रकाशनस्थल:– | Count Leo Tolstoy च्या | प्रकाशनकाल:– |
| --- | --- | --- |
| ' स्फूर्ति ' | " God Sees the Truth but Waits" ह्या गोष्टीवरून | फेब्रुवारी १९३० |

## जन्मान्ध ११

जन्माला येऊनहि न येणाऱ्या दुर्दैवी जीवांपैकीं परसू एक होता. प्रकाश म्हणजे काय, ही चीज त्याला ठाऊक नव्हती. जागृतावस्था व झोंप ह्या दोन्हीहि स्थिति त्याच्या मृत दृष्टीनें एकच होत्या. अष्टौप्रहर समोर दिसणाऱ्या गडद अंधःकाराशिवाय त्याला कांहींच दिसत नसे. निरनिराळ्या ऋतूंत नानाप्रकारच्या चित्रविचित्र रंगांनीं विभूषित होणारीं वसुंधरेचीं विविध रूपें पहाण्याचें थोर भाग्य त्याच्या फुटक्या कपाळीं कोरलें गेलें नव्हतें. अभिनव शृंगाराने सदोदित नटणाऱ्या सृष्टिसुंदरीच्या मोहक दर्शनापासून निर्माण होणाऱ्या निरामय आनंदाला तो कायमचा पारखा झाला होता.

परसूला जन्म देणाऱ्या मातेनें त्याला जगांत आणून सोडलें; पण ज्या भूमातेच्या ओटयांत तिनें हें बाळ टाकलें, त्या भूमातें-कडे त्याला डोळे भरून पहातांहि येऊं नये, ह्या अन्यायाबद्दल तिला अत्यंत वाईट वाटलें, आणि जणुं त्याची दाद मागण्याकरितां कीं काय, ती तावडतोब देवादारीं निघून गेली. पित्याच्या प्रेमळ

छत्राखालीं परसूनें आपल्या आयुष्याचीं पहिलीं दहावीस वर्षे कशीबशीं रेटलीं; पण त्यानंतर कर्मधर्मसंयोगानें तें छत्रहि दुर्दैवाच्या झंझावातांत सांपडून, तो अगदीं पोरका बनला आणि ह्या अफाट जगांत खऱ्या मायेचें असें त्याला कोणीच न उरल्यामुळें, पोटासाठीं निलाजऱ्या निमताळेपणानें त्याला आपल्या चुलत चुलत्याची चूल धरावी लागली.

हयातभर काबाडकष्ट करून निढळाच्या घामानें ‘ सांठविलेली लहानशी पुंजी व वाडवडिलार्जित चालत आलेलें भाताचें एक चिमुकलें खाचर, परसूच्या वडिलांनीं परसूच्या चुलत्याच्या स्वाधीन केलें. परसूच्या चुलत्यानेंहि ‘ जीवांत जीव असेपर्यंत परसूला अंतर देणार नाहीं. ’ म्हणून डबडबलेल्या डोळ्यांनीं देवाची आणभाक वाहिली. घुटमळणाऱ्या म्हाताऱ्याचा आत्मा शांत समाधानानें विसर्जन पावला....पण काळाच्या अव्याहत ओघांत एकदोन वर्षांची भर पडते न पडते तोंच, परसूच्या चुलत्याला आपल्या वचनाचा आस्ते आस्ते विसर पडूं लागला. केवळ जीव तगविण्यास लागणारें अन्नवस्त्र देण्याचेंहि, त्या महात्म्याच्या अगदीं जीवावर आलें. घरांतील इतर बायकापोरेंहि त्या बिचाऱ्याचा तिरस्कार करून, त्याला सारखीं हिडिसफिडिस करूं लागलीं. ‘ आयतोबा, रेडा, पोळ ’ वगैरे घडीघडी बहाल केलीं जाणारीं विशेषणें त्याच्या पूर्ण परिचयाचीं होण्यास फारसा अवधी लागला नाहीं. शिव्याशापांच्या लाखोलींत रोज बेचाळीस कुळांचा उद्धार झाल्याशिवाय त्या अभाग्याला भाकरीचा एक चतकोर तुकडा व घोटभर पाणी मिळण्याचीहि पंचाईत पडूं लागली.

दिवसेंदिवस होत जाणाऱ्या या अधिकाधिक हलगर्जीपणामुळें, आधींच निस्तेज असलेला परसूचा चेहरा मृत्यूच्या भीषण छटेनें अधिकच काळवंडून गेला. त्याच्या निर्जीव डोळ्यांत कधींकधीं चमकणारी अंधुकशी लुकलुकी पार विलयाला जाऊन, एखाद्या ओबडधोबड मूर्तीला बसविलेल्या कवड्यांच्या हिडीस डोळ्यांप्रमाणें ते पांढरे फटफटीत दिसूं लागले.

दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत कानावर येणाऱ्या हर-तऱ्हेच्या अपमानास्पद कटु बोलण्याकडे, परसूला नेहमींच दुर्लक्ष करावें लागे. देवानें जन्मापासून त्याला आंधळा बनविलें होतें. परिस्थितीनें आतां त्याला संपूर्ण बहिरा करून सोडलें.

माध्यान्ह टळून बराच वेळ गेल्यावर, उरल्यासुरल्या खरकटया अन्नाचे पुढें आलेले चार घांस परसू कसेबसे पेटलेल्या जठरा-ग्नींत लोटी आणि दाराबाहेर असलेल्या पडक्याशा पडवींत येऊन, तेथं त्याचें विश्व बनलेल्या फाटक्या रकटयावर रात्रीच्या जेवणाची वाट पहात, एखाद्या दगडी पुतळयाप्रमाणें स्वस्थ बसे. त्याच्या शिकंदर नशीबानें रात्रीं घरांतील कुणाला त्याची आठवण झालीच तर त्यानीं वाढून दिलेला गोळाभर भात देवांचें नांव घेऊन तो समाधानानें खाई आणि नंतर सकाळीं उठतांना उशाशींच घडी करुन ठेवलेली आपली हजार ठिगळांची गोधडी अंगावर पांघरून झोंपी जाण्यासाठीं तो रकटयावर अंग टाकी.

जगण्यांत परसूला कसली मौज अन् कोणता अर्थ वाटत होता कुणाला ठाऊक ? त्याच्या निष्प्रेम, निकामी आयुष्याविषयींचे विचार त्याच्या अंतःकरणांत कधीं उद्‌भवत होते कीं नव्हते, हें एक त्याला निर्माण करणाऱ्या परमेश्वरालाच ठाऊक ! कारण त्याच्या दुःखद परिस्थितीबद्दल कळवळा येऊन, आपुलकीच्या प्रेमभावानें त्याची सहानुभूतीपूर्वक विचारपूस करण्याची कोणी कधींच तसदी घेतली नाहीं.

जीवनाच्या अशा ह्या जळत्या धगधगींत परसू आपल्या आयुष्याच्या घोर रात्री कशाबशा कंठीत होता; पण निष्ठुर दैवाला त्याची चाललेली विटंबना अगदींच कमी वाटून, आपल्या भात्यां-तील एकेक अमोघ अस्त्रांचा नव्या उमेदीनें त्या अभाग्यावर वर्षाव करण्यांत त्याला विशेष प्रकारचा एक असुरी आनंद वाटू लागला.

घरादारांतील मुलांबाळांनीं तर परसूचें एक खेळणेंच बनविलें होतें. त्याच्या आंधळेपणाचा फायदा घेणारी ही बालगोपाळ मंडळी

त्याला हरतऱ्हेचा त्रास देऊन इतकी सतावून सोडीत कीं, प्रत्येक क्षणाला 'देवा! नको हा जन्म!' असे विटलेले उद्‌गार निरंतर त्याच्या थरथरणाऱ्या ओठांतून बाहेर पडत. कोणी हळूंच मागाहून येऊन त्याच्या पाठींत एक रपाटा देत तर कोणी साक्षात पुढून मोर्चा साधून, त्याच्या डोक्यावरील बेरंगी पागोट्याला कोपऱ्यांतील शेणाचा ढीग दाखवीत.........कोणी तपकीर म्हणून त्याच्या हातावर धुळीची चिमूट टाकीत तर कोणी त्याची जन्माची सोबतीण बनलेली काठी लुंगवून दूर भिरकावून देत......कोणी त्याच्याभोंवती फेर धरून गाढवी हैदोस घालीत तर कोणी नुसताच गलगा करून त्याला भयंकर भंडाविण्याचें महत्कार्य शिरावर घेत.परसू मात्र एकाद्या मुडद्याप्रमाणें थोडीहि हालचाल न करतां, जड-भरतासारखा अगदीं स्वस्थ बसून राही. छळवादाचा अतिरेकच झाला तर मात्र त्याच्या व्यंगी डोळ्यांच्या पापण्या झराझर वर खालीं होत आणि त्यांतून दुःखाचे कडकडीत अश्रू त्याच्या निर्जीव गालांवरून टपटपां धरणीवर उड्या घेत.

अपशब्दाच्या उच्चारानें परसूनें आपली जीभ कधींच विटाळली नाहीं. मग अचकट विचकट शिव्यांची फेर झाडून दुसऱ्याच्या अंतःकरणाचे लचके तोडण्याची गोष्ट तर दूरच. त्याची मूकवृत्ति आणि सहनशीलता खरोखरच मानवी प्राण्यापेक्षां फारच वरच्या कोटींतील होती.

कांहीं दिवसानंतर घरांतील समंजस समजलीं जाणारीं वडील माणसें असमंजस समजल्या जाणाऱ्या बाबालोकांच्या ह्या मर्कट-चेष्टांत हलकें हलकें भाग घेऊं लागलीं. ज्याअर्थीं या आश्रित माणसाला कांहीं कारण नसतां आपण पोटाला घालीत आहोंत, त्या अर्थीं त्याचा मोबदला म्हणून कां होईना, त्याच्याकडून आपली भरपूर करमणूक करून घेण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, अशाच तऱ्हेनें त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या अकलेचें तारूं वाहत होतें.

थोड्याच काळांत परसूचें जेवण म्हणजे घरांतील मंडळींना, त्याचप्रमाणें शेजारच्या आळींतील दहावीस तमासगिरांना मनोरंज-

नाची एक वडीच मेजवानी होऊन बसली. त्या गरीब निराधार प्राण्याला फसविण्यासाठीं, जमलेल्या निरनिराळया अक्कलवंतांच्या सुपीक मेंदूंतून ज्या अजस्र आणि नाविन्यपूर्ण कल्पना निघत, त्यांची कल्पना करणें खरोखर कल्पनेबाहेरचें आहे. आंधळेंच तें ! फसण्याला कितीसा उशीर ? आणि तसें तें फसलें कीं प्रत्येकाच्या हास्यरसाला अगदीं अष्टमीची उधान भरती येई—आणि त्यांचा आनंद त्रिभुवनांत मावेनासा होऊन, ते बहुत 'बेहोष' होऊन जात. कितीतरी वेळां भात म्हणून त्यांत मिसळलेल्या भाताच्या फोलकटांनीं परसूच्या हिरडयांचें रक्त काढलें असेल............ कितीतरी वेळां आमटी म्हणून पुढें दिलेल्या धुणांतील चिंचकोळाच्या पाण्यानें त्याची दांतखीळ बसली असेल.........कितीतरी वेळां भाजी म्हणून नुसत्याच वाढलेल्या मिरच्यांच्या तुकडयांनीं त्याच्या जीभेचीं सालटीं काढलीं असतील.........कितीतरी वेळां कोरडयास म्हणून कुठल्यातरी झाडांच्या ओरबाडलेल्या पाल्यानें त्याचें तोंड कडूजहर झालें असेल............कितीतरी वेळां भाकरीच्या पीठांत मुद्दाम घातलेले खडे त्याच्या घशांत अडकलेले असतील.........कितीतरी वेळां पिण्याच्या पाण्यांत मस्करीनें टाकलेलीं मातीची ढेकळें त्याच्या पोटांत गेली असतील.........पण.........त्याबद्दल कधीं कोणाला त्याची कींव आली असेल तर शपथ. 'बाबानों तुमचा खेळ होतो पण माझा प्राण जातो !' हे डबक्यांतील बेडकाचे उद्‌गार त्याच्या जिव्हाग्रावर कित्येकदां नाचले असतील; पण केवळ स्वतःचा जीव रिझविण्यांकरितां गोळा झालेल्या त्या सोळभोकांत त्याची क्षिति बाळगणारा एकही मायेचा पूत अस्तित्वांत नव्हता. दृष्टीनें दीन झालेल्या एका लुल्यापांगळ्या अभागी जीवाच्या जोरावर 'जीवाची ममई' करणारे ते सारेच करमणूकीच्या कोंदणांतील देदिप्यमान हिरे (!) होते.

कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक लवकरच त्या गोष्टीच्या तिरस्कारांत रूपांतरित होतो, हा जगाचा सर्वसाधारण नियम परसूच्या

बाबतींत तरी निराळा कसा असणार ? त्याच्या आहार—नाटका-पासून निर्माण होणाऱ्या आनंदांत मंडळींना पूर्वीचा राम वाटेनासा होऊन, त्यांना त्याचा हलकें हलकें वीट येऊं लागला. परसूची ग्रहदशा मात्र यामुळें संपली असें नव्हे, तर चुलींतून निघून फुफाट्यांत पडावें त्याप्रमाणें एका संकटांतून मुक्तता होते न होते तोंच, दुसऱ्याच एका संकटाचे पाश त्याच्या भोंवतीं आंवळले जाऊं लागले.

नाना तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्या योजून परसूला सर्व प्रकारें छळण्याच्या पाशवी आनंदाला मुकलेल्या परसूच्या चुलत्याला त्याचा निरुपयोगीपणा आतां राक्षसी स्वरूपांत दिसूं लागला. त्याला फुकट पोसणें त्याला अगदीं असह्य होऊन गेलें. परसूच्या वडिलों कडून बहाल घेतलेलें भाताचें खाचर तो विसरून गेला...... जन्मभर रक्ताचें पाणी करून सांठविलेली पुंजी घेण्याकरितां पुढें केलेल्या हाताची त्याला आठवण राहिली नाहीं.........दैवहीन परसूच्या केविलवाण्या, असहाय स्थीतीनें त्याच्या अन्त:करणांत दयेचा पाझर फोडला नाहीं ... ... ... फक्त माणुसकीला मुक-लेल्या त्याच्या धुंद दृष्टीला स्वार्थाच्या मोहक कामिनीनें घेतलेलें गोंडस स्वरूपच दिसत होतें.

दुसऱ्याचें सर्वस्व गिळंकृत करून, वर संभावितपणाचा बडे-जाव करणाऱ्या एखाद्या सैतानी साधूप्रमाणें लवकरच त्या महंत शिरोमणीनें परसूच्या हातांत भिक्षेची करवंटी दिली. केवळ काका असून कावेबाज ‘ काकाची ’ क्रूर करणी करण्यांत त्यास केवढी कमालीची कृतकृत्यता वाटली.........उघडच आहे......गरज सरली होती......साधन साधलें होतें.

* * *

“ आंधळ्याला पैसा दे भगवान ! दे ऽ ऽ भगवा ऽ ऽ न ! ! आंधळ्याला पैसा दे भगवान ! ! ! ”

परसूच्या जीवनपटांतील एका निराळ्याच भागाला सुरवात झाली होती.

सकाळीं उठतांक्षणींच थोडीशी न्याहारी घालून, परसूला घरांतील कोणा मुलांबाळांबरोबर शेजारच्या मोठ्या रस्त्यावरील मोटार ‘ स्टँडवर ’ नेऊन बसविण्यांत येई. त्याठिकाणीं असलेल्या ‘ ड्रायव्हर्स् गेस्ट हाऊस ’ जवळ रोज जाणाऱ्या येणाऱ्या वाहतुकीच्या कितीतरी मोटारी थांबत; आणि तशा त्या थांबल्या कीं भिक्षेचा महामंत्र जपून, गयांवयां करीत तो आपली थाळी पुढें करी. संध्याकाळीं घराकडील कोणी न्यावयास येईतोंपर्यंत त्याचें भिक्षेचें हें कार्य थोडाहि चुकारपणा न करतां, अव्याहत विश्वासानें चाललेलें असे.

परसूला घरीं पोहोंचण्यास बराच उशीर होई. उंबरठ्याच्या आंत पाऊल टाकतांच, अगोदर सकाळपासून दांतांच्या कण्या करून कमाविलेली तीन चार आण्याची कमाई तो घरमालकाच्या हवालीं करी; आणि नंतर दिवसभर अर्धपोटीं ओढलेल्या पोटाला पुढें दिलेल्या पितळींतील दोन घांस चारून, बाहेरच्या पडवींत स्वस्थपणानें तो सकाळपर्यंत ताणून दई.

आंधळ्या भिक्षेकऱ्याच्या दैनवाण्या पेशांत कां होईना, आंधळ्या परसूनें अशारीतीनें एकदोन वर्षें जराशा सुरळीतपणाच्या सुखांत घालविलीं; पण त्यानंतर लवकरच त्याच्या कमनशीबी दैवाला फिरून ‘ आकाबाईचा सटवी फेरा ’ आठवला. खडकाळ प्रदेशांतून उच्छृंखलपणें वहात जाणाऱ्या कालसरितेच्या भयंकर भागांतून कशीबशी निसटलेली त्याची जीवित–नौका थोडीशी संथ-प्रवाहांतून प्रवास करिते न करिते तोंच, तिला पूर्वीप्रमाणें इतस्तत: पसरलेले ते अक्राळविक्राळ फत्तर......त्यामुळें उसळणाऱ्या त्या अफाट लाटा...त्या लाटांबरोबर क्षणाक्षणाला मृत्यूला मिठी बसण्याची ती जबरदस्त भीति......पुन्हां पूर्वीपेक्षां जास्त रौद्र स्वरूपांत दिसूं लागली.

प्रथम प्रथम परसु आपल्या व्यवसायांत बरीच मिळकत मिळवी; पण सारेच दिवस सारखे कोठून असणार! दिवसांतून सहज शेपन्नास मोटारी जाणाऱ्या त्या बड्या ‘ स्टॅन्डवर ’ त्या एकट्यानें इतके दिवस काबीज केलेल्या धंद्यांत त्याला त्याच्यासारखे एक-

दोन अभागी जीव प्रतिस्पर्धी म्हणून उत्पन्न झाले. अशा स्थितींत ज्या ठिकाणीं बसल्याबसल्या तो दोन अडीच चवल्यांचा खुर्दा सहज हंसत हंसत जमा करी, त्या ठिकाणीं आणा अर्ध्या आण्याची कमाई करण्याचेंहि त्याच्या अगदीं नाकींनव येऊं लागले.

परसूच्या चुलत्याला मात्र ह्या बदललेल्या वातावरणाची मुळींच कल्पना नव्हती. संध्याकाळीं घरीं आल्यावर परसूनें दिवसाकाठीं कसेबसे मिळविलेले दोनचार पैसे त्याच्यापुढें ठेविले कीं, त्याचा संताप अनिवार होऊन, त्याची तळपायाची आग मस्तकास जाई; आणि अर्धपोटीं परसूला अन्नाचा भरपूर अंश मिळण्याऐवजीं माराचा मलिदा मात्र भरपूर मिळे. ‘ काका ! आज एवढेच पैसे मिळाले ! ’ म्हणून त्यानें कितीहि जीव तोडून सांगितलें तरी त्या-वर त्याचा विश्वास बसत नसे. परसूला पूर्वीसारखेच पैसे मिळतात पण ते पूर्वीसारखे घरीं न आणतां, त्यांतले काहीं तो तेथील ‘ हॉटेलांत ’ खाण्यापिण्यांत उडवितो, अशीच त्याची पक्की समजूत होऊन बसली होती.

वैशाखाचा महिना. बारा वाजून गेले होते. मोटारी वगैरे येण्याची वेळ नसल्यामुळें, ‘ हॉटेलजवळील ’ पिंपरणी वृक्षाच्या गर्द सावलींत, बुंध्याशींच परसू डोळे मिटून पडला होता. त्याच्या भाबड्या अन्तःकरणांत उद्भवणाऱ्या परस्परविरोधी विचारांनीं त्याच्या दुबळ्या मनाची बरीच खळबळ उडून गेली होती. जगांत आल्यापासून जगाशीं आलेल्या त्याच्या संबंधांत, त्यास जगाचा जो अनुभव आला होता त्या अनुभवाचें सारें सार एवढेंच होतें, कीं, जग हें एक चावरें कुत्रें आहे आणि संधी सांपडतांच प्रत्येकाचा चावा घेण्यासाठीं तें सारखें धडपड करीत असतें......पण अली-कडे भिक्षेकऱ्याचा पेहेराव धारण करावा लागल्यापासून त्यास भिन्नभिन्न प्रकृतीचीं भिन्नभिन्न माणसें आढळलीं होतीं. जगांत ज्याप्रमाणें कांहीं दुवर्तनी लोक आहेत त्याप्रमाणें कांहीं सद्वर्तनानें चालणारेहि आहेत......दीन, दरिद्री, अनाथ अपंगांची हीन स्थिति पाहून दयेनें द्रवणारीं हृदयेंहि या दुनियेंत कमी नाहींत......

आणि म्हणूनच इतके दिवस पोटांत कावळे कुरतडत असतांना... हातांत प्रत्यक्ष मोह खेळत असतांना...एक पैहि मागें ठेवण्याचा वेडावांकडा विचार त्याच्या मनाला शिवला नव्हता; पण त्याच्या चुलत्याच्या सतत टोंचणीनें त्याच वेडयावांकडया विचारानें त्याच्या हृदयांत शिरकाव करून घेतला, आणि तेथें कायमचें ठाणें देऊन त्यानें तें सर्वस्वीं काबीजहि करून टाकिलें.

"वाघ म्हटलं तरी खातो, वाघोबा म्हटलं तरी खातो! मग वाघ म्हणून तरी खाल्लं जाण्यांत काय अर्थ आहे?" आज पासून जेवढे पैसे मिळतील त्यांतले फक्त दोनच घरीं द्यावयाचे आणि बाकीचे सारें, या 'हॉटेलांत' आपल्या निमपोटी पोटाची उपासना करून, त्यास संतुष्ट करण्यांत खर्च करून टाकावयाचे, असा त्यानें दृढनिश्चय केला.

दोन अडीच होतात न होतात तोंच परसू मोठ्या उत्साहानें उठला आणि रोजच्यापेक्षां दुप्पट उमेदीनें त्यानें भिक्षा माग-ण्यास सुरवात केली. भिक्षादेवी आज त्याच्यावर चांगलीच संतुष्ट झाली होती. सूर्य अस्ताला जाण्यास एकदोन घटकांचा अव-काश असतानांच, त्याच्या नरोळयांत पांच आण्याचे पैसे सांचले. त्यापैकीं एक आणा—म्हणजे ठरविल्यापेक्षां दोन पैसे अधिक घरीं देण्यासाठीं गांठीं बांधून, बाकीच्या पैशाचे कांहीं खाण्याचे जिन्नस खरेदी करण्यासाठीं तो 'हॉटेलच्या' दाराशीं जाऊन उभा राहिला. सबंध दोन वर्षांच्या कालावधींत पाण्याव्यतिरिक्त एक पैशाचाहि पदार्थ न घेणारा परसू, आज चार आण्याचा माल मागण्यासाठीं आलेला पहातांच, 'हॉटेल' मालकांस फारच आश्चर्य वाटलें; आणि थोडीशी थट्टा करण्याच्या उद्देशानें त्यानें परसूस विचा-रिलेंहि:—"कां परसोबा आज दसरा कीं दिवाळी?" परसू या प्रश्नामुळें थोडासा लज्जित झाला; पण लगेच निश्चयाचें पाणी त्याच्या निर्विकार चेहेऱ्यावर खेळूं लागलें. बांधलेले पुडे घेऊन त्याचा पोटाला नैवेद्य दाखविण्याकरितां तो आपल्या नेहमींच्या

बसण्याच्या ठिकाणाकडे वळला. कितीतरी वर्षांत अशा प्रकरचे ताजे, मसालेदार, खमंग, अन् रुचकर जिन्नस त्यास खावयास मिळाले नव्हते.‘.....परंतु काय ......... दिसेल त्या ठिकाणीं ठेंचण्यासाठीं सदैव टपून बसलेल्या त्याच्या विचित्र दैवाच्या गहिऱ्या नजरेंतून, सोन्यासारखी चालत.........आलेली ही सुवर्ण-संधि कशी निसटणार? त्यानें नेमकें आजच त्याच्या चुलत्याला, तो ‘ स्टँडवर ’ काय करतो, हें आडून पहाण्याची बुद्धि देऊन आपल्या विजयाचें गौरीशंकर गांठलें; आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली.

नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें संध्याकाळीं घरीं जातांच, परसूनें गांठीं गांठलेले चार पैसे आपल्या चुलत्याजवळ दिले; परंतु त्याच्या चुलत्यानें त्याला आज तिसऱ्या प्रहरीं पाहिलेल्या प्रकाराबद्दल एका शब्दानेंहि ओळख दिली नाहीं. उलट प्रेमानें त्याची विचारपूस करून तो म्हणाला—

“परसू! आज तूं फारच दमला असशील—अन् तुला भूकहि बरीच लागली असेल. सकाळपासून उकडत तरी काय भयंकर होतं! अंगांतून सारख्या घामाच्या धारा निथळत होत्या! दुपारीं उगवतीला थोडीशी वीजहि होती......एकदोन दिवसांत बरसाद खात्रीनें कोसळण्याचं चिन्ह दिसतंय...!...!! उठ......काढ कपडे......अन् माझ्या बरोबरच ताटाला चल!!”

पाय धुतांना--जेवतांना, त्याचप्रमाणें झोंपी जातांना परसूची चित्तवृत्ति आज फारच उल्हसित झाली होती. आपलें नष्टचर्य संपून, आपणांस आजपासून चांगले ग्रह प्राप्त झाले आहेत, असें त्याच्या भोळ्या मनांत आलें. दुपारीं केवळ चार घटकांत आपणांला पांच आण्याचे पैसे लाभले. संध्याकाळीं नेहमीं मिळणाऱ्या धम्मकलाडूच्या खुराकाऐवजीं खराखुरा खुराक खावयास मिळाला आणि त्यावर कधींच ऐकावयास न मिळणारे दोन मधुर शब्दहि कानावर पडले; पण अशा शुभघडीच्या मंगलप्रसंगीं आपल्या हातून मात्र फारच अनुचित अशी अमंगल

गोष्ट घडली, याचें त्यास अतिशय दुःख झालें. 'देवा! जन्मापासून नावडत्या असणाऱ्या तुझ्या एका अजाण लेकराकडून घडलेल्या या एका अपराधाची तूं दयाळू अंतःकरणानें क्षमा करशील ना?' अशी भोळया भक्तिभावानें त्या दीनदयाळाची करुणा भाकून, तो हतभागी जीव लवकरच निद्राधीन झाला.

गरीब बिचारा अननुभवी परसू चुलत्याच्या अनपेक्षित प्रेमळपणाच्या उमाळयानें सहज फसला गेला. वरून मुद्दाम मानभावीपणाचें सौम्य स्वरूप धारण करणाऱ्या त्या ज्वालामुखीच्या आंत संतापाची केवढी प्रचंड आग धगधगत होती, आणि उद्यांच किती भयंकर रीतीनें तिचा स्फोट होणार होता, याची त्या अभाग्याला कल्पनाहि नव्हती. सुरीखालीं चर्‌चर् चिरली जाणारी कोंबडीची मान कापण्याआधीं तिला पाणी पाजून शेंदूर थापतात तशा गतींतीलच तो एक प्रकार होता. केवळ जिव्हेवर नाचणाऱ्या गोड गोड शब्दांनीं त्याचा गळा कापला होता. हृदयांत सरपटणाऱ्या हलाहल जालीम विष-सर्पाची त्याला चाहूलही नव्हती.

कमनशिबी परसूच्या वेड्याभाबड्या मनांत आजच आलें होतें, कीं आपल्या दैवाची दिशा बदलली आहे; पण त्या बापड्या दुर्दैवी प्राण्याला काय ठाऊक, कीं किरण साधून नरडीचा घोट घेण्यासाठीं वाघ ज्याप्रमाणें दोन पावलें मागें सरतो त्याप्रमाणें आपला शेवटचा स्वाहाकार करण्यासाठीं आपल्या दैवानें दोन पावलें माघार घेतली आहे.

अंथरुणांत असतांनाच, परसूच्या कानांतर चुलत्याची हांक आली—"परसू! ऊठ लवकर! न्याहारीची वेळ झाली!... अन् हें पहा...दोन तीन दिवसांनीं डोंगरावरील आपल्या मंगळाईची जत्रा असल्यामुळें त्या बाजूला सध्यां माणसांची नुसती रीघ लागलीय! तेव्हां आजपासून चार पांच दिवसांत तुला 'स्टँडकडं' न नेतां, जर त्या बाजूच्या एखाद्या रस्त्यावर बसविलं तर इतर भिकाऱ्यांचा त्रास चुकून तुला बरीच प्राप्ति कमावितां येईल!"

"बरं!" म्हणून परसू उठला न प्रातर्विधी, न्याहारी वगैरे उरकून घेऊन मोठ्या मुदित मनानें चुलत्याबरोबर चालण्यास त्यानें सुरवात केली.

चांगल्या सडकेनें सुमारें पावमैल गेल्यावर ते पाऊलवाटेला लागले, नेहमीचा पायाखालचा रस्ता नसल्यामुळें परसूला स्वतंत्र-पणें चालतां येईना म्हणून त्याच्या चुलत्यानें त्याच्या हातांतील काठीचें एक टोंक आपल्या हातांत घेतलें. बरेच खांचखळगे ओलां-डून इच्छित स्थलीं येऊन पोहोंचतांच त्यास थांबावयास सांगून, तो त्यास म्हणाला—

"हं! परसू! हें आंब्याचं झाड बरं दिसतंय! या खालींच तूं बसून रहा! संध्याकाळीं दिवस कासरा दोन कासरे वर आहे तोंच शेतांतून परततांना मी तुला घरीं घेऊन जाईन!"

सांगण्याबरहुकूम परसूनें आपलें पटकर पसरलें आणि आपली चिमुकली टाळ काढून, तिच्या गोड तालांत त्यानें आपल्या नेहमी-च्या भजनास प्रारंभ केला.

"आंधळ्याला पैसा दे भगवान्........देऽभगवाऽऽन्! आंधळ्याला पैसा दे भगवान्!!"

घटका घटल्या......पळें पळालीं......प्रहर पालटले पण परसूला एका माणसाचाहि वागारा लागला नाहीं. फक्त दूरवरच्या रस्त्यावरून जाणाऱ्या एखाद्या मोटारीच्या 'हॉर्नचा' अस्पष्ट ध्वनी, मधुनच त्याच्या कानावर पडला म्हणजे त्याला तेवढ्यावेळपुरता थोडासा धीर येई; परंतु आतां बराच वेळपर्यंत तो आवाजही त्याला ऐकूं न आल्यामुळें, तो घाबरून जाऊन अगदीं कावराबावरा झाला. 'आपली परभारें विल्हेवाट लावण्यासाठीं आपल्या चुलत्यानं आप-णाला मुद्दाम तर या अनोळखी अरण्यांत आणून सोडलं नसेल ना?" हा संशय त्याच्या अन्तःकरणांत उद्‌भवतांच, त्याच्या हातां-तील टाळ गळून पडली; आणि त्याच्या तोंडांतून एक शब्दहि बाहेर फुटेना. त्या अंब्याच्या झाडावर होणाऱ्या आतांच्या पक्ष्यांच्या किलबिलाटावरून संध्याकाळ होत आली असून, आपल्या चुलत्याची

येण्याची वेळ पार टळून गेली आहे, असें त्याच्या ध्यानांत आलें. ‘ काका ! काका ! !’ म्हणून उठून उभें राहून, त्यानें मोठ्या आर्त स्वरानें दहाबारा हांका दिल्या; परंतु त्या हाकांच्या उठणाऱ्या प्रतिध्वनीवांचून कोणींच त्याला ओ दिली नाहीं. बिचाऱ्या परसूचा धीर खचून जाऊन, तो मटकन् खालींच बसला; आणि डोक्याला हात देऊन ढळढळां रडूं लागला.

कांहीं वेळ गेल्यानंतर, परसूनें मनाशीं थोडासा विवेक केला. ‘ निर्मनुष्य अशा ह्या भागांत आपल्या अरण्यरुदनाचा काय उपयोग ? त्यापेक्षां थोडेसे हातपाय हालविले तर जाणारं येणारं एखादं माणूस तरी भेटण्याचा संभव आहे ! ’ परसू उठून उभा राहिला आणि आपल्या काठीच्या सहाय्यानें एकेक पाऊल टाकण्यास त्याने हलके हलके सुरवात केली.

गचके खात, दहावीस कदमें परसूनें ओलांडलीं असतील नसतील तोंच, सोसाटयाचा वारा वाहूं लागला आणि त्या जोरानें आपण उडून जाऊन फेंकले तर जाणार नाहीं ना, अशी त्यास जबरदस्त भीति वाटूं लागली. वेगानें वाहणाऱ्या वाऱ्याच्या घों घों आवाजांत उन्मळून पडणाऱ्या वृक्षांच्या काड काड ध्वनीनें त्याच्या हृदयाचें अगदीं पाणी करून सोडलें. ह्या बिकट परिस्थितींतून आपली सुखरूपपणें सुटका व्हावी म्हणून--‘ देवा! सोडीव ह्या संकटांतून......! ’ अशी आर्जवानें त्यानें देवाची आळवणी केली. इतक्यांत आकाशांत विजेचा चमचमाट होऊन, प्रचंड मेघगर्जना झाली आणि त्या पाठोपाठ सुपारी एवढाल्या गारांच्या वर्षावांत मुसळधार पावसाची जोराची वृष्टि होण्यास प्रारंभ झाला.

वादळी वळीवाची लीला केवळ दहापांच मिनिटेंच चालली असेल पण तिनें परसूला पुरतें नामशेष करून टाकिलें. थंडीनें गारठल्यामुळें त्याचें सर्वांग थरथर कांपत होतें. गारांच्या वर्मी मारानें त्याच्या अशक्त शरीरावर हजारों टेंगळें उठलीं होतीं आणि त्यांतून उठणाऱ्या वेदना त्याला अगदीं असह्य होत होत्या. अन्नावर कशाबशा तगविलेल्या त्याच्या निःसत्व देहांत

हलण्याचें यत्किंचितसुद्धां त्राण उरलें नव्हतें; परंतु आशेनें अजूनहि त्यास सोडलें नसल्यामुळें तो उठण्यासाठीं सारखा धडपड करूं लागला. सरते शेवटीं अंगांत उरलेल्या शेवटच्या धुगधुगीनें लटपटणारे हातपाय कसेबसे सांवरून, तो एकदांचा उभा राहिला पण पाऊल टाकण्यासाठीं त्यानें पाऊल उचललें तोंच, त्याचा तोल गेला आणि क्षणांत मूर्च्छित होऊन, बेसावधपणें धाड्दिशी त्याचें शरीर जमिनीवर आदळलें गेलें.

\+ \+ \+

"पाऊस संपून बराच वकुत होऊन गेला! अद्यापहि परसूचा ठावा नाहीं!—' घरधनीण घरमालकास जेवावयास वाढीत असतांना म्हणाली—

" हात धुतल्यावर त्याला शोधण्यासाठीं कंदील घेऊन टपालावर जायला हवं ना?"

"छट! इतक्या रात्रीचं कोण जातो? त्याची काय उगीच काळजी करीत बसलीस! बसला असेल तेथील एखाद्या 'हॉटेलांत' तुकडे मोडीत झालं! सकाळीं न्याहारीची वेळ झाली कीं अगदीं अवतण केल्यासारखा दारांत हजर होईल बघ!"

सकाळ झाली......न्याहारीची वेळही येऊन ठेपली ... पण परसू अवतण केल्यासारखा दारांत हजर झाला नाहीं. इतकेंच काय पण त्यानंतर कितीतरी सकाळ उजाडल्या......कितीतरी न्याहारीच्या वेळाहि येऊन गेल्या पण परसू गेला तो कायमचाच.

\+ \+ \+

" शी ऽ! शी ऽऽ !! शी ऽऽ !!! कसली बाई कुजट घाण सुटलीय !" मंगळाईच्या डोंगरांत मोळ्या आणावयास चाललेल्या दोन बायांपैकीं एक बाई दुसरीस म्हणत होती.

"हो ! खरंच कीं ग ! काय बरं असावं ?.........? ?... ......हं !......तें बघ...त्या खड्यांत कावळ्यांची केवढी झुंबड उडालीय ! एखादं मेलेलं गुरबीर दिसतंय !"

" अं हं ! अलीकडं कुणाचं जनावर दगाविल्याचं ऐकिवांत नाहीं !.........मला बाई संशय येतो ! आज चार पांच दिवस आपल्या शेजारचा आंधळा परसू सांपडत नाहीं !.........चल .........आपण काय तें पाहून तर येऊं ! "

" मी नाहीं येत जा ! तुझं आपलं भलतंच कांहींतरी ! टपालावर भिक्षा मागायची सोडून, या आडरानांत परसू कशाला....धरपडायला येईल ! "

" कशाला येईल ? मुद्दाम आणलं असेल ! त्याचं काय ! ............बऽऽरं.........तें असुन दे मेलं ? तूं आपली इथं उभी रहा कशी ! मी आपल्या मनाच्या समाधानासाठी, काय आहे, तें पाहून येतेंच ! " असें म्हणून परसूविषयीं थोडीशी कळकळ वाटणारी ती धट्ट व चौकस बाई पुढें झाली, आणि खड्याजवळ जाऊन तिनें आंत डोकावून पाहिलें, तों काय... कोल्ह्याकुत्र्यांनीं ओढलेलें...कावळ्यागिधाडांनीं कुरतडलेलें...... ......विद्रूप होऊन पडलेलें परसूचें बेवारशी प्रेत.

" अरेरे सुटला बिचारा एकदांचा कांचातून ! " दुःखानें पिळवटून जाऊन त्या स्त्रीच्या तोंडांतून आपोआप उद्गार बाहेर पडले.

क्षणोक्षणीं प्राणांतिक वेदनांनीं विव्हल होणाऱ्या परसूच्या आयुष्यांत चाललेल्या त्या विचित्र खेळखंडोबापेक्षां मृत्यूचें तशा स्थितींतील तें भीषण स्वरूपसुद्धां, त्या बाईला कितीतरी कमी भयप्रद वाटलें असेल.

| प्रकाशनस्थल:— | Gny De Maupassant च्या | प्रकाशनकाल:— |
|---|---|---|
| 'नवजीवन' | " The Blind Man " ह्या गोष्टीवरून | ऑगस्ट १९३४ |

## प्रसंगावधान : : : १२

केवळ कल्पनेच्या करेल्यावर फिरणारें एखादें काल्पनिक कथानक नव्हे, म्हाताऱ्या बायाबापड्यांच्या तोंडून ऐकलेली एखादी वेडीवांकडी दंतकथा नव्हे, किंवा मनाच्या मानससरोवरांत भ्रमण करणारी कपोलकल्पित कादंबरीहि नव्हे; तर वाचकहो, इतिहास छातीला हात लावून सांगत असलेलें, सुवर्ण—अक्षरांत कोरून ठेवलेलें असें तें एक 'ऐतिहासिक सत्य' आहे. पेशवाईतील 'साडेतीन शहाणे' माहीत नाहींत, अशी व्यक्ति साऱ्या हिंदुस्थानांत, निदान तमाम महाराष्ट्रांत तरी आढळणें अशक्यच. ज्यांनीं आपल्या लेखणीच्या व तरवारीच्या जोरावर, उसळत्या मोंगलशाहीला वेसण घालून, आपल्या ज्ञानानें, तेजानें व शौर्यानें सारें भारतवर्ष थरारून ...... दिपवून सोडलें अशीं तीं नररत्नें खरोखरीच फार श्रेष्ठ होत. धन्य धन्य ती हिंदमाता कीं तिच्या पोटीं असले लाल जन्माला आले.

ह्याच साडेतीन शहाण्यांपैकीं, पेशवे दरबारचे कुलमुखत्यार सखारामबापू बोकील; ह्यांची कन्या सौ. येसूबाईसाहेब ह्या आपल्या प्रस्तुत कथेच्या चरित्रनायिका आहेत. ह्यांचें लग्न इ. स. १७८० ह्या वर्षी भोर संस्थानचे अधिपति शंकरराव रघुनाथ उर्फ बाबासाहेब पंतसचिव ह्यांच्याशीं झालें.

बाबासाहेब हे जात्या थोडेसे भोळसर होते. ते जेव्हां गादीवर आले, तेव्हां त्यांच्या दरबारांत त्यांच्या वडिलांच्या कारकीर्दीपासून चालत आलेलीं आपसांतील बरींच वैमनस्यें होतीं. त्यामुळें बाबासाहेबांचा कारभार बरोबर चालेनासा होऊन, त्याचा बोभाटा पुण्याच्या दरबारीं पेशव्यांच्या कानावर गेला. पेशव्यांनीं आपले उजवे हात—नाना फडणवीस ह्यांच्या सल्ल्यानें भोर दरबारची व्यवस्था नीट राखण्याकरितां, तेथून बाजीराव मोरेश्वर नांवाच्या गृहस्थाची कारभाऱ्याच्या जागीं नेमणूक केली.

बाजीराव मोरेश्वर ही एक तोंडपुजी मूर्ति होती. बरेच दिवस नानापाशीं असल्यानें, नानांशीं त्यांचा निकट सहवास झाला होता. पुण्यांतील प्रसिद्ध घाशीराम कोतवालाप्रमाणेंच ही बाजीराव मोरेश्वरांची स्वारी होती. तो जसा नानांच्या प्रीतींत वाढून त्यांच्या नाकांतील बाल बनला होता व त्यांच्या पाठिंब्यामुळें वाटेल तीं अनन्वित कृत्यें तो करीत असे; त्याचप्रमाणें हे बाजीराव मोरेश्वरहि नानांच्या मेहरनजरींत, त्यांच्या गळ्यांतील अगदीं ताईत बनले होते. योग्य संधि प्राप्त होतांच, फडणीसांच्या वशिल्यानें तो सचिवांचा कारभारी झाला. घाशीराम कोतवालानें जशी पुण्यांत ‘ घाशीरामी ’ चालविली, तशीच ह्या बाजीरावानेंही भोरच्या दरबारांत आपली ‘ बाजीरावशाही ’ गाजविण्यास आरंभ केला.

विश्वाच्या आरंभापासून, कोणत्याही काळीं व कोणत्याहि स्थळीं ‘ आनेवाले का बोलबाला, व जानेवालेका मूं काला ’ अशी म्हणणारी मंडळी असणारच. त्याप्रमाणेंच बाजीराव मोरेश्वरासही अशा कांहीं घरभेद्या लोकांचें लवकरच बरेंच साहाय्य मिळालें. अगोदरच आपसांतील दुही व त्यांत हा ‘ दुष्काळांतील

तेरावा महिना ' ह्यामुळें भोर दरबारची स्थिती अत्यंत नाजूक होऊन, बाजीरावाचें पारडें दिवसेंदिवस अतिशय जड होत गेलें, व थोडयाच दिवसांत संस्थानचीं राज्यसूत्रें त्यानें आपल्या पूर्ण-पणें हातांत घेतलीं. अशा रीतीनें सर्व कारभारांत आपलें वजन उत्तम प्रकारें घडवून आपल्या हुकमाशिवाय एक पानहि हाललें जाणार नाहीं, असा कडेकोट बंदोबस्त त्यानें करून टाकला.

सर्व कारभार आपल्या आटोक्यांत आला असें पाहून, खुद्द मालकांसही कळसुत्री बाहुल्याप्रमाणें नाचविण्याच्या खटपटीस तो लागला; व थोडक्याच काळांत त्याला त्यांत चांगलें यशहि आलें. त्याची चढती प्रबल महत्त्वाकांक्षा सारखी वाढत जाऊन, ' माल-कांचा मालक ' बनण्याची अघोरी हांव त्या राजश्रींना सुटली. त्यानें पुण्याच्या दरबारीं सचिवांसंबंधानें " बाळाजी, नाना फड-णीस यांस गैरकावा मजकूर " कळवीत जाऊन, तिकडचें द्वार त्यांना अजीबात बंद करून टाकलें. अशा रीतीनें आपल्या कृष्ण-कारस्थानाचें जाळें भोरच्या दरबारांत पसरत जाऊन, बाबासाहे-बांच्या भोळसरपणाला वेडेपणाचें स्वरूप देऊन, त्यांस आपल्या पिंजऱ्यांत पुरें अडकवण्याचा मग त्या दुष्टानें बेत केला. 'आसुरी-लालसेनें ' बेफाम होऊन त्यानें संस्थानच्या जामदारांस, व आणखी कांहीं मतलबी व स्वार्थसाधू लोकांस वश करून घेऊन, जामदारखान्यांतूनच पीतांबर, शालजोडया, पैठण्या वगैरे मोठ-मोठीं वस्त्रें फाडून, त्यांचे तुकडे नानांस आपल्या सांगण्याची व बाबासाहेबांच्या वेडेपणाच्या सत्यतेची साक्ष पटण्याकरितां म्हणून पुण्यास पाठवून दिले.

ह्या सर्व प्रकारामुळें बाबासाहेबांच्या दुर्दशेला मात्र प्रारंभ झाला. शेवटीं तर ह्या त्रासाला अगदीं कंटाळून जाऊन, ' आतां आपलें संस्थान सोडून कोठेंतरी निघून जावें ' असें ठरवून, ते भोराहून निघून जेजूरीस जाऊन राहिले. परंतु बाजीरावानें तेथेंही त्यांचा पिच्छा पुरवून, त्यांस मुळींच चैन पडूं दिलें नाहीं. त्यांच्या-वर सक्त पहारा ठेवण्याची सुद्धां त्या पशूनें व्यवस्था केली. ह्यामुळें

श्रीमंत बाबासाहेब त्या कुटिल मंत्र्याचे राजरोस जरी नाहीं, तरी 'नजरबंद कैदी' बनले.

बाबासाहेब जेजूरीस गेल्यावर, 'पिशाच्या हातीं कोलीत' दिल्याप्रमाणेंच भोरची स्थिती झाली. अगदींच मोकळें मैदान सांपडल्यामुळें, बाजीराव भोर संस्थानचा 'मीच चालक' अशा रीतीनें वागूं लागला. सचिवपद बळकावण्याची त्याला जबर आकांक्षा होती, तरी बाबासाहेबांच्या हयातीपर्यंत आपला हेतु शेवटास जाण्याची आशा नाहीं असें वाटून त्या अधमाधमानें आपल्या मालकाच्या गळ्यावर सुरी ठेवण्याकरितां 'जेजूरी मुक्कामीं त्यांजवर मारेकरी घालून एके दिवशीं गर्दी देखील केली.'

रात्रीच्या भयंकर वेळीं बाजीराव मोरेश्वरानें पाठविलेले मारेकरी जेव्हां जेजूरी वाड्यांतील बाबासाहेबांच्या शय्यागृहांत शिरले, त्यावेळीं त्यांची शूर पत्नी येसूबाई ह्याही जवळच होत्या. त्या नागव्या तलवारींची ती चकाकी पाहतांच, त्यांचें स्त्रीहृदय क्षणभरच भीतीनें व निराशेनें दडपून गेलें; परंतु एका निमिषार्धांत आपल्या भोंवतालच्या भयंकर परिस्थितीच्या वावटळीची त्यांना जाणीव होऊन, त्यांनीं धैर्याचा अवलंब केला. बुद्धिबळाच्या डावांत बातमी सांगून आपलें बुद्धिवैभव दाखविण्याऱ्या चतुर वडिलांच्या आंगची आपल्या आंगीं थोडीतरी चतुराई आहे, असें ह्याप्रसंगीं अलौकिक प्रसंगावधान दाखवून त्या साध्वीनें साऱ्या जगाच्या निदर्शनास आणून दिलें. मारेकऱ्यांच्या भेसूर तलवारीनें आपल्या प्रियपतीची कंठनाल चिरली जाणार, इतक्यांत तिनें मोठ्या शिताफीनें आपल्या गळ्यांतील बहुमोल मोत्यांचा कंठा ताडकन् तोडून, त्याचीं मोत्यें साऱ्या दिवाणखानाभर विसकटलीं. तीं मोत्यें वेचण्याच्या भानगडींत ते मारेकरी गुंतले असतां, त्यांना आपल्या नवऱ्यासकट तेथून सुटका करून घेण्यास बराच अवसर सांपडला. खरोखर, त्यावेळेला आजची फक्त नामधारी P. T. शिकून पुरुषी बनलेली एखादी स्त्री तिच्या जागीं असती तर नवऱ्याची सुटका करणें तर दूरच राहो, पण आत्मरक्षण करण्याचें तरी तिला भान

राहिलें असतें किंवा नसतें ह्याची वानवाच आहे. सखाराम बापूसारख्या पूर्ण शाहण्याच्या पोटीं असें असामान्य कन्यारत्न निपजावें, ह्यांत मुळींच आश्चर्य नाहीं; कारण आपल्या आयुष्यांत, खराखुरा ज्या शिक्षणाचा उपयोग होईल असेंच शिक्षण तिच्या वडिलांपासून तिला मिळालें होतें. वाचकहो ! अशाच आर्यस्त्रियांकडे हिंदमाता आज आशेच्या नजरेनें पहात नाहीं काय ?

## जीवन-कला : : : १३

कलेच्या प्रेमपाशांत सांपडून, मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला, म्हणजे तिला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याला पत्करावी लागणारी कसल्याहि प्रकारची गुलामगिरी, त्यास मुळींच कष्टतर वाटत नाहीं, हें एक सर्वसाधारण रीतीनें सर्वांनाच संमत होणारें सर्वमान्य सत्य आहे. पण हें सर्वसाधारण रीतीनें सर्वांनाच संमत होणारें सर्वमान्य सत्य, खरोखरच सत्य आहे का? का इतर सर्व साधारण सत्याप्रमाणें अर्धवट सत्य आहे?.........कारण सर्वच सत्यें हीं विचाराअंतीं अर्धवट सत्यें ठरतात, असें विद्वान व तत्वज्ञानी लोकांचें म्हणणें आहे.

:

वाचकांना जी गोष्ट सादर करण्याचा माझा आतां मानस आहे, ती गोष्ट ह्या पूर्वपक्षीय विधानाचा विचार करून, त्याचा निर्णय तर लावीलच......पण हें पूर्वपक्षीय विधान कसें चुकीचें आहे, हें वाचकांना दाखवून, त्यांची तशी ती खात्री पटवून देईल.... ......आणि तसें झालें म्हणजे मग मात्र, लघुकथा-कथनकलेंत,

जगांतील सात आश्चर्यांपैकीं एक आश्चर्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या, चीन देशांतील त्या अजस्त्र तटाहूनहि फार पुरातन, आणि आधुनिक तर्कशास्त्रांत अगदीं अद्ययावत् म्हणून गाजलेल्या एखाद्या कमालीच्या क्रान्तिकारक शोधापेक्षांहि अधिक नाविन्यपूर्ण, असा तिचा निःसंशय लौकिक होईल, ह्यांत तिळप्रायहि संदेह नाहीं.

* * * *

'भारतीय कला-मंदिराच्या' चित्र शाखेचा जीवन हा एक विद्यार्थी होता आणि त्याच मंदिराच्या संगीत शाखेची कला ही एक विद्यार्थिनी होती. लहानपणापासून जीवनाला चित्रकलेची विशेष आवड होती. केवळ चौदा वर्षांचा असतांना,त्यानें आपल्या चिमुकल्या गांवांतील चिमुकल्या बाजारपेठेचें एक सुंदर चित्र काढून, तें रंगविलें होतें; आणि त्याच्या ह्या होतकरू बाल–प्रयत्नाचें कोडकौतुक म्हणून, त्याच्या गांवांतील दोन चार चिल्हर व्यापाऱ्यांत किंचित् नगर-शेटजी म्हणून गाजलेल्या शेट गोवर्धनदासांनीं, त्या चित्रफलकास एक छानदार, सुबकशी चौकट बसवून, तो चित्रफलक आपल्या दुकनांत पुढें मागें आलेल्या लहानमोठ्या वांकड्यातिकड्या डब्यांच्या मालिकेवर, सहज नजरेंत भरेल अशा प्रामुख्याच्या ठिकाणीं, कमालीच्या काळजीपूर्वक आस्थेनें लटकावून दिला होता.

आजदेखील जळमटांच्या जंजाळानें कांहींसें अलंकृत झालेलें आणि धूलीकणांनीं किंचित् धूसरून गेलेलें, जीवनाचें तें रम्य चित्र ......त्याची ती अभिनव कलाकृति......त्याच्या जन्मभूमींत ...त्याच ठिकाणीं मोठ्या डौलाच्या दिमाखानें फडकतांना कोणाच्याहि नजरेंत भरल्यावांचून रहाणार नाहीं.

जीवनाला विसावें वर्ष लागतें न लागतें तोंच, त्यानें इकडून तिकडून हजारों खटपटी–लटपटी करून चित्रकलेच्या उच्च शिक्षणास लागणाऱ्या भांडवलाची कशीबशी जमवाजमव केली आणि नंतर तें आपल्या पाठीशीं जराशी घट्टच आवळून, धांवत्या उत्साहानें धांवतच तो मुंबईस येउन दाखल झाला.

कला तर काय, शोभनपुरांत प्रतिवर्षी निघणाऱ्या प्रसिद्ध 'गणेश कन्या मेळयाची' गान-देवता होती. तिच्या कोकीळ कंठांतून निघणाऱ्या कर्णमधुर स्वर्गीय आलापांना बालबालिकांच्या गान-सृष्टींत इतरत्र कोठेंहि तोड सांपडणें शक्य नाहीं, अशा प्रकारचे कांहींसे अतिरंजित प्रशंसोद्गार, सदरहू काळांत प्रत्येक लहानथोर व्यक्तीच्या जिव्हेवर निरंतर नाचत असत. केवळ हौस व आवड म्हणूनच, कलेनें मेळयाच्या ह्या क्षेत्रांत पदार्पण केलें होतें परंतु त्यांत पुढें थोडीशी लोकप्रियता मिळतांच, शाळेंतील ठराविक सांच्याच्या क्रमिक शिक्षणाकडे साहजिकच तिचें हलके हलके दुर्लक्ष होऊं लागलें. आपल्या अंगीं निसर्गतःच वास करीत असलेल्या गोड गळयाच्या ह्या ईश्वरदत्त देणगीला, आपण गायन व अभिनय ह्या दोन कलांच्या शास्त्रीय ज्ञानाची सांगोपांग जोड द्यावी व रंग-भूमीवर अथवा रुपेरी पडद्यावर चांगलेंच चमकून, अद्वितीय अशा प्रकारची अलौकिक कीर्ति संपादन करावी, ही जबर महत्वा-कांक्षा लवकरच तिच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत झाली.

दिवसानुदिवस असामान्य नांव कमाविण्याची कलेची ही तीव्र-तम लालसा अधिकाधिक विराट-स्वरूप धारण करूं लागली आणि तिनें उत्तरोत्तर कलेला इतकें बेसुमार बेचैन करून सोडण्याचें व्रत अंगिकारलें कीं, त्याकरितां नंतर तिला, आपल्या आईबापांच्या अभावीं आईबापांच्याच ठिकाणीं असणाऱ्या एकुलत्या एक आवडत्या मावशीची पूर्ण नाखुषी पत्करणें अगदीं भाग पडलें. शेवटीं पडत्या फळाची आज्ञा म्हणून का होईना, तिनें मोठ्या मिनत-वारीनें आपल्या मावशींची कशीबशी परवानगी काढली आणि मग वडीलांनीं आपल्या पश्चात्, आपल्या शिक्षणासाठीं म्हणून ठेविलेल्या रकमेचें 'बँकबुक' आपल्या कडोसरीं लावुन, मोठ्या आशावादी अन्तःकरणानें तिनें मुंबापुरीकडे धांव घेतली.

* * *

' भारतीय कला-मंदिराच्या ' हरएक शाखेचे विद्यार्थी कलेच्या विविध प्रांगणांतील थोर थोर अशा उत्कृष्ट कलावंतांच्या निरनिराळया उच्च कलाकृतींची छाननी करून, त्यांवर साधकबाधक चर्चा करण्याकरितां मंदिराच्या ' ॲंपी थिएटरमध्यें ' दर रविवारीं संध्याकाळच्या सुमारास जमत असत. ह्याच संमेलनप्रसंगीं जीवनाची व कलेची गांठ पडून त्यांचा प्रथम–परिचय झाला आणि हा प्रथम–परिचय त्यांच्या दाट मैत्रींत रूपांतरित होण्यास अर्थातच फारसा कालावधि लागला नाहीं. दोघेंहि एकमेकांना अगदी सर्वतोपरी अनुरूप असल्यामुळें तात्काळ तीं दोघें एकमेकांवर कमालीच्या उत्कटत्वानें अनुरक्त होऊन गेलीं व उत्तरोत्तर एकमेकांच्या गोड सहवासाची उत्कंठित हुरहूर एकमेकांना इतक्या कमालीच्या तीव्रतेनें जाणवूं लागली कीं कांहीं दिवसांनीं त्याची परिणति स्वाभाविकपणेंच त्या दोघांच्या गाढ प्रणयांत बहरित होऊन गेली. लवकरच......तीं दोघें...... विवाहाच्या पवित्र आणि प्रेमळ बंधनांनीं एकमेकांशीं कायमचीं बद्ध झालीं, हें क्रमप्राप्त विधान सूज्ञ वाचकहो, न सांगतांच आपणांस आतां समजण्यासारखें नाहीं का? कारण......कारण अगदीं उघडच आहे! प्रस्तुत कथेच्या प्रथम नमनांतच मी उल्लेखिल्याप्रमाणें......कलेच्या प्रेमपाशांत सांपडून मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला, म्हणजे तिला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याला पत्करावी लागणारी कसल्याही प्रकारची गुलामगिरी त्यास मुळींच कष्टतर वाटत वाटत नाहीं, ह्या व्यतिरिक्त तें दुसरें कोणतें असूं शकणार...:...!?

* * *

गिरगांवांत ' फ्रेंचब्रिजच्या ' पायथ्याशींच असलेल्या शिरोडकरांच्या चाळींतील तिसऱ्या मजल्यावर एका दोन खोल्यांच्या टुमदार ' ब्लॉकमध्यें ' कलेनें जीवनाबरोबर आपला चिमणा संसार थाटला. खरोखर, तें नवपरिणीत जोडपें अत्यंत सुखी होतें; कारण एकीकडे—प्रत्येकांना आपल्या कलेच्या ध्येयशिखराचें उत्साहवर्धक गोड दृश्य प्रमुदित करीत होतें तर दुसरी-

कडे—एकमेकांच्या निकट साहचर्याची उन्मादकारी मधुर सुखाशा प्रत्येकाला क्षणोक्षणीं पुलकित करुन टाकीत होती.

मला जर ह्या क्षणीं कोणी विचारिलें, तर प्रत्येक भाग्यवान श्रीमतांच्या सुदैवी चिरंजिवांना मी असाच उपदेश करीन कीं तुम्हांला जर निश्चित् निरामय सुखाचा उपभोग घ्यावयाचा असेल तर आपली सर्व संपत्ति गरीबांना देऊन टाका आणि बरोबर केवळ आपली ध्येय-कला व प्रिय-कला घेऊन, चाळींतील गोड आयुष्याच्या अवीट आनंदाची मनमुराद गोडी चाखण्यासाठीं त्वरेनें मुंबईस धावत या. माझी पक्की खात्री आहे कीं, चाळीच्या चार खणी स्वर्गात रहाणारे हरीचे सर्व लाल माझ्या ह्या मत-प्रतिपादनाला सरळ, समंजसपणें पुष्टीच देतील.

'भारतीय कला-मंदिराच्या' चित्र शाखेच्या अनेक अध्यापकांपैकीं, आपल्या निसर्गरम्य चित्रांनीं जागतिक कीर्ति संपादन करणाऱ्या प्रोफेसर रविकिरणांच्या हाताखालींच जीवन आपले चित्रकलेचे पाठ घेत होता. प्रस्तुत पाठाकरितां जीवनाला प्रोफेसर मजकुरांना द्यावी लागणारी फी जरी अत्यंत जबर होती, तरी त्याबरोबर त्यांची विद्यादानाची पद्धत, तिची सुलभता, वगैरे गोष्टी विशेष कलायुक्त असून, अतिशय उच्च दर्जाच्या होत्या, हें मुळीच नाकबूल करून चालणार नाहीं.

कलेचीहि आपल्या कलेची सेवा संगीत-चूडामणी मेघनाथबुवा ह्या विख्यात गायन वादन-कुशल गुरूजवळ चालली होती. मुद्दाम मोठ्या प्रयासानें घडवुन आणलेल्या गाण्याच्या मैफलींत, एक दोन वेळां मेघनाथबुवांनीं सर्वमान्य भारतीय गायक खानबहादुर अब्दुल करीमखां ह्यांच्याशीं बरोबरी केलीं होती, आणि वादनाच्या बाबतींत तर, त्यांचा हात धरणारा एकहि वादक साऱ्या हिंदुस्थानांत त्यावेळीं अस्तित्वांत नव्हता, असें विधान केल्यास खास फारसें अतिशयोक्तीचें होणार नाही. कोणतेंहि वाद्य घ्या, त्यावर आपल्या हातांचीं बोटें केवळ विजेच्या चपलतेनें फिरविण्याचें कलात्मक वैशिष्ट्य अतिशय कष्टांनींच त्यांनी कमाविलें होतें.

जीवनानें आपल्या पाठीशीं बांधून आणलेलें भांडवल व कलेच्या नांवावर असणारी ' बँकेंतील ' तिची रक्कम, हीं शिल्लक असेतोपर्यंत त्यांच्या सुखाला कोणतीच सीमा अन् कसलेंच बंधन ठाऊक नव्हतें......खरंच आहे ! आपणां प्रत्येकाच्या बाबतींत तरी आपणांला ह्यावांचून दुसरा कोणता अनुभव येतो ? ..... पण .... पण .. ते जाऊं द्या ! नसत्याच विक्षिप्त तत्वज्ञानांत शिरण्याचें सध्यां आपणांस कांहींच प्रयोजन नाहीं. ...... जीवन आणि कला ...... त्यांच्या आकांक्षा .... त्यांचीं वैयक्तिक ध्येयें .... त्यांचे ईप्सित हेतु .... वगैरे गोष्टी अगदीं ठरलेल्या असून, त्यांच्या फलश्रुतीचा काल फारच समीप येऊन ठेपला होता.

अव्वल दर्जाचा बडा चित्रकार होऊं घातलेला जीवन, लवकरच आपलीं चित्रें विक्रीस मांडण्याकरितां, ' फोर्टमधील ' एका नाक्याच्या ठिकाणीं, एक नीट नेटकी ' शोरूम ' काढण्याच्या विचारांत होता ........... आणि त्याची ही ' शोरूम ' निघण्याचाच काय तो अवकाश होता .... कीं ... तींत खरेदी करण्याच्या उद्देशानें बडेबडे संस्थानिक, गुलहौशी अमीर उमराव, गर्भश्रीमंत शेटसावकार, धनाढ्य व्यापारी, शोकीन् लाटसाहेब इत्यादि नानाप्रकारच्या रसिक लोकांची झुंबड उडणार, हें जवळ जवळ अगदीं निश्चित ठरल्यासारखें होतें.

आणि—कला !.... कलेसारखी अभिनयकुशल व गाननिपुण अभिनेत्री, आपल्या आगामी चित्ताकर्षक बोलपटांतील चित्रपटचंद्रिका म्हणून आपणांस लाभावी, याकरितां निरनिराळ्या ' सिनेटोनच्या ' लक्षाधीश मालक-मंडळींत स्पर्धा लागून, तिचा भाव विलक्षण वाढणार, हें अनुमान करण्यांत कोणत्याच प्रकारची ' शेख महंमदी ' नव्हती. उलट तें यथार्थ परिस्थितीचें वास्तववादी निदर्शकच होतें, असें म्हटलें तरी चालेल.

जीवन आणि कला ह्यांचें चाळींतील तें आनंदमय जीवन म्हणजे स्वर्गीय नंदनवनांत स्वच्छंद वृत्तीनें केलेला केवळ अप्रतिहत सुख-संचार होता.

सकाळीं जरा घाईनेंच जेवून मंदिरांत जावें लागत असल्यामुळें, तिसऱ्या प्रहरीं चार वाजतां सुट्टी झाल्यानंतर त्यांना मिळणारा तो मनसोक्त मोकळेपणा...... त्या मनसोक्त मोकळेपणांत चहा करतांना व घेतांना त्यांच्या चालणाऱ्या इकडच्या तिकडच्या त्या अवास्तव गोड गप्पानंतर वेषभूषा, केशभूषा ह्यांचा शृंगारसाज साजरा करून, बोलत–चालत खेळीमेळीनें निघणारी 'चौपाटीवरील' त्यांची ती मजेदार सहल ...... त्या मजेदार सहलींत भुसभुशीत अशा मऊमऊ वाळूतून कांहीं काळ इतस्तत: संचार केल्यानंतर, धक्क्यावर ठेवलेल्या सुंदर, नक्षीदार बांकावर विराजमान होऊन सायंकालीन सुवर्णकिरणांत समुद्राच्या पृष्ठभागावर चालणाऱ्या जललहरींच्या पाठशिवणीकडे पहात असतांना त्यांची होणारी ती मनोमय तन्मयता ...... त्या मनोमय तन्मयतेनंतर घरीं येऊन, संथपणानें थट्टाविनोदांत चालणारें त्यांचें साग्रसंगीत, सुग्रास भोजन ...... त्या सुग्रास भोजनानंतर काम वगैरे आटोपून, मुखशुद्धीच्या मसालेदार खाऱ्या दाण्यांचा आस्वाद घेत–घेत, सुखशय्येवर बरीच रात्र होईपर्यंत त्यांनीं रचलेले आपआपल्या आवडत्या मनोरथांचे ते भव्य मनोरे ...... वगैरे त्या प्रणयी युगलाचे विविध कार्यक्रम, म्हणजे सुरांगनांच्या नयन मनोहर विहारस्थलांतील मधुर अमृताचे गोड गोड घुटकेच नव्हते काय ...? .... ??

परंतु......कांहीं काळ लोटल्यानंतर, त्यांच्या कलेच्या वृद्धिंगत होत जाणाऱ्या ह्या आल्हाददायक कला हलकें हलकें क्षय पावूं लागल्या. कारण त्यांच्या कीर्दखतावणीच्या चोपडींत जमेच्या कोणत्याच कलमांनीं आयाची बाजू कधींच अलंकृत होत नसून, खर्चाचें सदर मात्र निरनिराळ्या बाबींनीं निरंतर सारखें बेफाट फुगत चाललें होतें; आणि त्यामुळें रोजच्या साध्या व्यवहारांतसुद्धां पैशाची येणारी विलक्षण तंगी त्यांना आतां चांगलीच जाणवूं लागली होती. प्रो. रविकिरण तसेच सं. चूडामणी मेघनाथबुवा ह्या गुरुद्वयांना द्यावयाच्या मासिक वेतनाच्या रकमा, इतःपर सुरळीतपणें देणें अगदींच अशक्यप्राय होऊन गेल्यामुळें, कलेनें संसार-सुखाच्या

अधिष्ठात्री देवतेला—अन्नपूर्णेला सुप्रसन्न राखण्याकरितां संगीत शिक्षणाला तात्पुरती रजा देण्याचें ठरविलें.

कलेच्या प्रेमपाशांत सांपडून मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला, म्हणजे तिला प्रसन्न करून घेण्याकरितां तो कोणत्या प्रकारची अडचण व कसल्या प्रकारची गुलामगिरी पत्करील, ह्याचा मुळींच नेम सांगतां येत नाहीं, हेंच शेवटीं खरें !

* * *

दोन तीन दिवस कलेनें गायनाच्या कांहीं शिकवण्या मिळतात कीं काय, हें पाहण्यासाठीं मुंबईत बरीच पायपिटी केली. पुष्कळ खटपटीनंतर अल्पांशानें का होईना, पण तिला आपल्या कार्यांत थोडेसें यश आलें; आणि तिची मनःकामना कांहींशी परिपूर्ण झाली. त्या विजयानंदानें थोडीशी अभिमानित होत्साती अशी ती, संध्याकाळच्या सुमारास जराशा खुषींतच चाळीकडे परतली आणि खोलींत शिरून, मोठ्या उल्हसित वृत्तीनें तिनें जीवनास हांक मारिली—

" जीवन ! जीवन !! हें बघ ! .... मला आज एका बड्या घरची विद्यार्थिनी मिळाली आहे ! ' हॅंगिंग गार्डनच्या ' बाजूलाच असलेल्या त्या ' ह्यूजिस रोडवरील ' ते ..... ते प्रसिद्ध सर ..... एल्. वाय्. धुनेश्वर ...... तुला ऐकून ठाऊक असतीलच ! त्यांचीच ती कन्या आहे ! ....... त्या घरचीं सारींच माणसं अतिशय सुरेख अन् गोड स्वभावाचीं आहेत ! .... अहाहा ! त्यांचा तो भव्य बंगला तरी किती सुंदर आहे ? एखाद्या विलासप्रिय संस्थानिकालाहि लाजविणारा त्याचा तो रम्य दर्शनीभाग ... ... आणि त्या रम्य दर्शनी भागापेक्षांहि अधिक मनोवेधक असणारं त्याचं तें अंतरःस्वरूप ......! जीवना, नाहीं ... नाहीं ..... अशा-प्रकारचं नयन-मनोहर दृश्य मी आजन्मांतहि अवलोकन केलं नव्हतं ! "

" माझ्या शिष्येचं नांव धूता असून, ती फारच नाजुक मुलगी आहे ! नुक्तंच कुठं तिला चवदावं वर्ष लागलं आहे ! तिची वागणूक

विशेषच मधुर असून, तिची चालरीत अत्यंत साधी व सरळमार्गी आहे! अगोदरच मला ती फार...फार आवडूं लागली आहे! ...नेहमीं पांढऱ्या शुभ्र रंगाचा परीटघडी पोषाख धारण करण्याचा तिचा छंद मात्र, विशेषच विलक्षण आहे! रोज दोन अडीच तास मला तिला गायनाचें शिक्षण द्यावयाचं आहे आणि त्या-बद्दल मला जीवना, कल्पना तर कर महिना नक्त चाळीस रुपये मिळणार आहेत! गायनाचा वर्ग सोडावा लागून मला ही शिकवणी पत्करावी लागली, ह्याबदल मला मुळींच विषाद वाटत नाहीं आणि त्याची, मी यत्किंचितहि फिकीरहि पण करीत नाहीं! —कारण—सुदैवानं अशाच आणखी एक दोन विद्यार्थिनी मला मिळाल्या कीं, मेघनाथ बुवांकडील बंद पडलेलं माझं शिक्षण पुनरपि मला सुरू करतां येईल! —अं! अं! माझ्या लाडक्या! आतां तुझी ती भुवयांमधील बारिकशी आठी कां बरं? दे पाहूं तिला तावडतोब रजा—अं्‌ चल—झकासपैकीं भातपिठलं आणि तिखटामिठाचीं धिरडीं मी तयार करतें—त्याचा आपण एक-दिलानं पुरेपूर समाचार घेऊं या!"

"तुझ्यापुरतं कले हें सर्व अगदीं ठीक आहे! —पण—पण माझ्याबद्दल काय?" जीवनानें तिला उत्तर देऊन पुनरपि उलट पृच्छा केली व मग तो म्हणाला—"कलेच्या उच्च-वातावरणांत मी फक्त चंडोल भराऱ्या माराव्या आणि कले, तूं मात्र मजुरीसाठीं चाकरीच्या रुक्ष, वैराण वाळवंटांतून रखडत जावंस—छट्—अगदींच अशक्य! प्राण गेला तरी मी तें कधींच कबूल करणार नाहीं! मीच आतां एवढी कुठं 'नाइट ड्यूटीची' नोकरी मिळाल्यास अथवा 'पार्ट टाईम सर्व्हिस' असल्यास पहातों, म्हणजे आपलं सर्व प्रकारें भागुन, कोणतीच भानगड उरणार नाहीं!"

"जीवन! तूं अगदीं मूर्ख आहेस!" कला पुढें झाली आणि आपले हात त्याच्या मानेभोंवतीं टाकून, तिला लोंबकळत, लडिवाळ तक्रारीच्या स्वरांत त्यास म्हणाली—"तूं आपला

अभ्यासक्रम चालूच ठेविला पाहिजेस ! मी आपल्या कलेचं ध्येय कायमचं सोडून देऊन, भलत्याच मार्गाला भरकटते आहे असं थोडंच आहे ! उलट गायनाची शिकवण देतांना, माझा संगीताचा व्यासंग अनायासेंच होणार आहे कीं !...... माझ्या गायनाच्या ध्येय–परायणतेंत ह्यामुळें कसलाच व्यत्यय येण्याचा अजिबात संभव नाही ! जीवना ! आपल्या संसाराला वेळींच होणाऱ्या ह्या मदतीचं महत्त्व लक्षांत घे ! एखाद्या लक्षाधीशाऱ्याच थाटानं आतां आपणांला सहज चैनीच्या ऐषआरामांत राहतां येईल ! तूं मात्र रविकिरणांकडील आपल्या शिक्षणाला फाटा देण्याचा वेडाविद्रा विचार मुळींच मनांत आणतां कामा नये !"

"बरं ! बरं ! !" सरळ कबूली देत जीवन उत्तरला— "पण खरं म्हणशील तर, मला तुझं हें शिकवणी–प्रकरण बिलकूल पसंत नाहीं ! हो, ही कांहीं कला नव्हे ! पण ... पण ... राहूं दे ! तुझ्यापुढं माझं थोडंच चालतं आहे ! तूं म्हणजे केवळ एक हुकमी एक्का आहेस !"

"कलेच्या प्रेमपाशांत सांपडून मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला, म्हणजे तिला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याला पत्करावी लागणारी कसल्याहि प्रकारची गुलामगिरी त्यास मुळींच कष्टतर वाटत नाहीं !" निश्चयी मनानें कलेनें प्रत्युत्तर दिलें.

"'व्हिक्टोरिया गार्डन्स्मध्यें' परवां मी रेखाटलेलीं तीं दोन चित्रें — कले, तूं पाहिलीसच ! त्या चित्रांतील प्रमाण–बद्धता, प्रतिमासादृश्य, रंगवितरणाच्या सूक्ष्मछटा आणि मनोरम कल्पनाविलास वगैरे विविध गोष्टींची रविकिरणबाबूंनीं खूपच स्तुति केली ! इतकेंच नव्हे पण त्यांनीं ती आपल्या स्वतःच्या 'शोरूममध्यें', विक्रीकरितां मांडण्याचीहि मला खास परवानगी दिली ! आतां फक्त ...... एखादा छंदिष्ट अन् शौकीन् असा बडा लक्ष्मीपुत्र माझ्या आढळांत यावयाला पाहिजे कीं, त्याला तीं दाखवून, त्यांतील एखादं तरी बऱ्याच मोठ्या किंमतीला त्याच्या गळ्यांत मी सहज अडकवूं शकेन !"

"हो! हो!! त्यांत काय संशय आहे? माझी पक्की खात्री आहे कीं, एकदां त्यानें तीं पाहिल्यावर, तीं दोन्हीहि खरेदी करण्याचा मोह त्याला मुळींच आवरणार नाहीं! ...... बरं .... पण, चला आतां! ..... माझे आश्रयदाते ते सर एल्. वाय्. धुनेश्वर व भावी कालांत लवकरच तुझीं चित्रं विकत घेणारे ते अज्ञात लक्ष्मीधर—ह्या दोघांचेहि मनमुराद आभार मानून, त्यांचें आपण मनःपूर्वक अभिष्टचिंतन करूं या!" मुद्राभिनयाचा मोहक आविर्भाव करीत कला उद्गारली.

* * *

पुढील महिन्यांत जीवनाला रोज अरुणोदयाबरोबर 'जुहू बीचवर' जावयाचें असल्यामुळें, कला मोठ्या पहाटेसच उठून त्याच्या निघण्याची सर्व तयारी करूं लागली. जीवनाला आपला प्रातर्विधि, चहा, स्नान, 'टॉयलेट' थोडासा फराळ वगैरे आन्हिक उरकण्यास सहज तास दीड तास लागत. बरोबर सव्वा सहा वाजतां, मधल्या वेळच्या जेवणाच्या तरतुदीसाठी कलेनें भरून बंद केलेला 'टिफिन् कॅरिअर्' तिच्या हातांतून आपल्या हातांत घेत; तो तिचा प्रेमानें निरोप घेई, व आपल्या अजब जादूनें तिच्या गुलाबी गालांवर लाल रंगाचीं गोड वलयें निर्माण करून, आपल्या कामगिरीवर रुजू होण्याकरितां झर्झर् चालूं लागे.

नानाप्रकारच्या नयनरम्य रंगांनीं नटलेल्या आकाशाच्या मनोहर पार्श्वभूमीवर अधिकच खुलून दिसणारीं सागर—लहरींचीं दोन सुंदर दृश्यें— 'सूर्योदय' व 'सूर्यास्त' ह्या नांवानें जल—रंगांत चितारण्याचें कार्य सध्यां त्यानें हातीं घेतलें होतें. मंदिरांतील त्याचे रोजचे शिक्षणाचे तास व हें नवीन काम ...... ह्या साऱ्या गोष्टी संपवून घरीं परत येण्यास, त्यामुळें त्याला साहजिकच चांगली करकरीत तिन्हीसांज होऊं लागली. पण .... पण त्याला काय इलाज होता? कला म्हणजे ...... गृहजीवनांतील एखाद्या उद्योगप्रिय व व्यवहारदक्ष गृहिणीप्रमाणें निरंतर कार्यव्यापृत राहणारी स्फूर्ति—देवताच नसते काय ...? ....??

प्रत्येक नोकराला अत्यंत प्रिय अशी नवीन महिन्याची जी एक तारीख, त्या एक तारखेला कामावरून परत येतांना, कलेची आणि जीवनाची चाळीच्या फाटकांतच गांठ पडली व तेथून ते दोघे बरोबरच वर आपल्या बिऱ्हाडाकडे निघाले. दाराचें कुलूप वगैरे काढून ते आंत प्रवेश करतात न करतात तोंच, कलेनें मोठ्या ऐटीनें आपल्या ' ब्लाऊजच्या ' कटीभागाजवळील खिशांतून दहा-दहाच्या चार करकरीत ' नोटा ' बाहेर काढल्या व त्या एखाद्या अजबखान्यांत ठेवावयाच्या प्रेक्षणीय वस्तूप्रमाणें, खोलीच्या मध्य-भागीं असलेल्या चिमुकल्या अष्टकोनी टेबलावर तिनें कर्तबगारीच्या अहंपणानें मांडून ठेविल्या.

नंतर नुकतेच कपडे वगैरे काढून, ' इझिचेअरवर ' विश्रांति घेत पडलेल्या जीवनाकडे आपल्या अभिमानी नजरेनें दृष्टीक्षेप करीत, परंतु बरेंच काम करुन अगदीं थकून गेल्यामुळें श्रांत जीवाच्या गलित आवाजांत ती त्यांस म्हणाली—" जीवन ! माझी विद्यार्थिनी—धूता एखादें वेळीं फारच त्रास देऊन, मला अगदीं भंडावून सोडते ! रोज गायनाची जितकी तालीम करणं अवश्य आहे, तितकी ती मुळींच करीत नसल्यामुळं, तीच तीच गोष्ट मला तिला सारखी कितीदांतरी सांगावी लागते ! ...... आणि...कधीं कधीं तर तिच्या त्या सदाच्याच पूर्ण पांढऱ्या शुभ्र पेहरावाच्या पद्ध-तीचा मला इतका मनस्वी वीट येतो कीं, सांगतां सोय नाहीं ! एल्. वाय्. धुनेश्वर मात्र फारच सज्जन गृहस्थ आहेत ! जीवन, तुझा नि त्यांचा खूप—खूप परिचय व्हावा, अशी माझी फार इच्छा आहे ! धूताला मी ' पियानो ' शिकवितांना कित्येकदां त्यांची स्वारी त्याठिकाणीं येते व टक्कल पडलेल्या आपल्या डोक्यावरून मधुनमधून आपला हात फिरवीत, कांहीं काळ तेथें ऐकत उभी रहाते ! ' हं ! कसं काय चाललंय आमच्या धूतताईचं गायन ? ' अशाप्रकारची मान हलवित, हंसत हंसत विचारपूस करून निघून जाण्याची त्यांची विशिष्ट तऱ्हेची लकब अगदीं ठरलेली आहे ! "

"......आणि जीवन, धूता तरी अगदीं दिसते तितकीशी नाजुक मुलगी नाहीं अं! तिच्या अंगांत बराच काटकपणा आहे! मधुनमधून ती अशा कांहीं गोड गमती करते, कीं कांहीं विचारूं नकोस!...खरंच! त्या गोंडस बालिकेनं माझं मन सर्वतोपरी आकर्षण करून घेतलं आहे खास!"

कलेची ही चर्पटपंजरी संपते न संपते तोंच, जीवनहि कसलासा विचार करून एकदम आरामखुर्चीवरून उठला व खुंटाळ्यावरील आपल्या कोटांतून पन्नास रुपयांची आपली प्राप्ति बाहेर काढून, एखाद्या बड्या सामन्यांत यशस्वी झालेल्या विजयी वीराच्या नोंकझोंकांत त्यानें ती कलेच्या कमाईशेजारीं टेबलावर ठेवून दिली आणि नंतर आनंदातिशयानें तो कलेस म्हणाला—" कले! कोल्हापूरकडील एका छोटया जहागिरदाराला विकलं बुवा शेवटीं त्यांतील एक चित्र!"

" खरंच का जीवन? का माझी आपली थट्टा करतोयस?" कलेनें मोठया अजीजीच्या स्वरांत विचारणा केली.

" छट्! थट्टा कसली? खरं! अगदीं गळया-शप्पथ खरं!" जीवनानें उत्तर दिलें व तो पुढें सांगूं लागला,—" कले! बाकी सरदारसाहेबांची ती विचित्र मूर्ति एकदां खास नजरेखालून घालण्यांतली आहे! पोटाच्या अजस्त्र नगाऱ्यावर मोकळीच सुटलेली राजेश्रींची खास 'हेरींग बोर्डची' ती किंमती शेरवानी......गजपादांशीं बरोबरी करणाऱ्या पायांतून वर चढवितांना दोन चार ठिकाणीं कचकूलेली, बळीच्या पंखाप्रमाणं असणारी ती तंग, शुभ्र सुरवार......अजागळाप्रमाणं डोक्याला कसाबसा लपेटलेला तो निळसर छत्रपती 'फॅशनचा' फेठा व डुचक्या डोळयांना लाविलेले ते ' हॅरोल्ड लॉयडी स्पेक्स्'—वगैरे 'अप्-टू-डेट्', वेषांतील त्याचं तें ध्यान, म्हणजे मूर्तिमंत एखाद्या मराठी दरबाराला शोभणारं विदूषकी पात्रच! पहिल्याप्रथम जेव्हां ते महाशय 'शोरूममध्यें' आले, तेव्हां त्यांना माझं तें चित्र कशाचं आहे, हेंच मुळीं ओळखेना! मग, मीच इकडच्या तिकडच्या कलेच्या न समज-

णाऱ्या कांहीं तरी चार थापा मारून, कसंबसं एकदाचं तें त्यांच्या पदरांत बांधलं! आतां त्या महाभागांनीं आपल्या ठेवलेल्या एका प्रिय पात्राचं ' लाइफ् साइज् पोर्ट्रेट ' तैलरंगांत चितारण्याची मला बडी " ऑर्डर ' दिली आहे !......गायनाची तुझी ती शिकवणी!...कले! त्यांत कांहीं तरी अर्थात्मक कला असली पाहिजे, अशी माझी आतां निःसशय समजूत होऊं लागली आहे!"

" जीवना! लाडक्या !! तूं चिकाटी धरलीस हें पाहून, मला किती आनंद होतोय म्हणून सांगूं! खरोखर, तुझ्या विजयाचे आणि भाग्याचे दिवस लवकरच उगवणार!......ओ हो! महिन्याला नव्वद रुपये! केवढी तरी ही मदत ?...अहाहा! जीवना! खर्चायला आतां आपल्याला काय कमी?......बस्! ठरलं! आज ' चार्लस् फॅरेल ' व ' जेनेट गेनॉर ' ह्या जोडीच्या 'A Service Of Love' ह्या बोलपटाला ' कॅपिटॉल–मध्यें ' जायचंच अनू तिकिट मात्र, जीवन, अगदीं ' ए वन् '......' बाल्कनींतील पेअर सीटस्चींच ' काढायचीं अं ?...?"–एखाद्या लहान मुलाला मजेदार खेळणें मिळालें, म्हणजे त्या ब्रह्मानंदांत तें जसें बागडतें, तसें बागडत कला उद्गारली.

* * *

सुमारें दोन आठवड्यांनंतर एके दिवशीं संध्याकाळीं जीवन जरासा लवकरच घरीं येऊन पोहोंचला व कसल्याशा काळ्या रंगानें भरलेले आपले हात ' बाथरूममध्यें ' जाऊन त्यानें स्वच्छ धुवून टाकिले. साधारणपणें अर्धा तास गेल्यावर कलाहि येऊन दाखल झाली. तिच्या उजव्या हाताचा कोपरापासूनचा भाग पांढऱ्या पट्टयाचे आडवेतिडवे वेढे देऊन ' बॅंडेज ' केलेला दिसत होता.

"हं! आज हें काय?" नेहमींचा आगतस्वागताचा प्रकार उरकल्यानंतर जीवनानें तिला विचारलें.

कला हंसली परंतु त्यांत फारसा आनंद अगर मनमोकळेपणा दिसला नाहीं.

" आज शिकवणीनंतर धूतानं स्वतःच चहा करून, तो मला देण्याचा फारच आग्रह धरिला—" स्पष्टीकरणार्थ ती सांगू लागली—" धूता म्हणजे निव्वळ एक हट्टी व दुराग्रही मुलगी आहे!.....आणि तिचा हा हट्टी व हेकेखोर स्वभाव तिच्या आईच्या मृत्यूपासून अधिकच वाढला आहे असं म्हणतात! एकदां तिच्या मनानं एखादी गोष्ट घेतली कीं, कांहींहि असलं तरी ती शेवटास नेल्यावांचून तिला राहवत नाहीं! 'सर साहेब' ह्यावेळीं तिथंच होते! तेहि जेव्हां जराशा थट्टेनं म्हणाले कीं, 'विद्यार्थिनीनं आपल्या लाडक्या शिक्षकिणीसाठीं तयार केलेल्या खाशा चहांतील थोडासा मासला आपणहि पण घेऊं!, तेव्हां मग काय विचारतां? 'पपा चहा घेणार' हें ऐकतांच, आधींच गोंधळी असलेली धूता अधिकच गडबडून गेली. लगबगीनं उठून स्वयंपाक घरांतील विद्युत्घंटेचे दारावर असलेलं 'बटन' तिनं घाईघाईनं दाबतांच, केशव आचारी धांवतच वर आला! 'केशव हें बघ! मी इथंच चहा बनविणार आहे! तेव्हां त्याचं सर्व साहित्य झटपट वर घेऊन ये पाहूं' .....अवघ्या पांच मिनिटांच्या अवधींत केशवनं कोपऱ्यांतील एका 'टी पॉयवर' 'स्टोव्ह' पेटवून ठेवून, जवळच दुसऱ्या एका वाटोळ्या टेबलावर चहा, साखर, कपबशा, चमचे, 'केटल्', 'मिल्क पॉट', बिस्किटांचा डबा वगैरे जिन्नस व्यवस्थित तऱ्हेनं मांडून, सर्व सिद्धता अगदीं जय्यत तयार करून दिली! धूतानं लगेच तीन कप पाणी मोजून तें 'स्टोव्हवर' ठेवलें व बिस्किटांच्या डब्यांतून 'क्रीम क्रॅकर्स' बाहेर काढून, त्यांनीं तिनं 'बिस्किट रॅक' भरून ठेविला! आधणाला उकळी फुटतांच, त्यांत साखर व चहाची पत्ती टाकून, ती तें भांडं 'स्टोवरून' खालीं उतरूं लागली; परंतु कधींच संवय नसल्यामुळं व शिवाय तिच्या घायकुत्या स्वभावामुळं तें उतरतांना, त्याची वाफ तिच्या हातावर आली आणि तिच्या हातांतून तें निसटून, त्या भांड्यांतील तो उकळता चहा जवळच उभ्या असलेल्या माझ्या हातावर सपशेलच्या सपशेल सांडला

गेला! माझा हात चांगलाच चरचरीत भाजल्यामुळं, त्याच्या तीव्र वेदना असह्य होऊन, ' अग आई ग ऽ !' अशाप्रकाराचा एक आर्त दुःखोद्गार माझ्या तोंडावाटे बाहेर पडला! धूताला तर किती तरी वाईट वाटलं! घाबरून जाऊन एकदम मोठ्यानं ' पपा! पपा!! ' म्हणून ती केवढ्यानदा तरी किंचाळली? ' सर साहेब ' लगबगीनं पळत—धापा टाकीतच आंत आले आणि माझ्या हाताला कांहीं उपचार करण्याकरितां म्हणून लगोलग तळ-मजल्याकडं धांव घेऊन, त्यांनीं तेथील भट्टी ... अं ऽऽऽ ...

...कुणाशाशा इसमाला जवळच्या ' ड्रग स्टोअरमधून ' भाजल्यावर लावण्याचं थोडंसं तेल व वरून बांधण्याकरितां ' बँडेजच्या ' एक दोन पट्टया आणावयास ताबडतोब धाडून दिलं !......असू देत कीं!... त्यात काय मोठंसं आहे?... आतां तर तें फारसं दुखतहि पण नाहीं!"

" ऑं? हें काऽऽय ??' '—शक्य तितक्या हळुवारपणानें तिचा हात हातांत घेऊन, ' बँडेजखालील ' कसल्याशा जाड पांढऱ्या धांदोटीचें एक टोंक जपून ओढीत जीवननें तिला विचारिलें.

" वर तेल असलेलं मऊमऊसं असं कांहीं तरी तें आहे " तिनें उत्तर दिलें व मग, त्याचें लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठीं तिनें त्याला प्रश्न केला—

" जीवन! तें दुसरं चित्र तूं विकलंस कारे?...?"

" वि-क-लं-स का-रे??" एक एक शब्द संथपणें, तुटक आणि स्पष्ट उच्चारीत जीवन म्हणाला—" त्या कोल्हापूरकडील महाजनांनाच विचार कीं? त्याचं ' इन्शुअर्ड लेटर ' म्हणे त्यांच्या जहागिरीच्या गांवावरून त्यांना मिळणार होतं व मग, ते आणखीहि कांहीं चित्रं खरेदी करणार होते!... बरं पण ... कले, ... आज दुपारीं साधारण किती वाजतां तुझा हा हात भाजला ग ... ??"

"अंऽऽऽ! मला वाटतं...... साधारण पांच वाजले असतील! त्याच वेळेला लोखंडाच्या त्या इ...!" चू-चू करून कलेनें एकदम आपली जीभ चावली व मग, कांहींच झालें नाहीं असें दाखवून, आपलें चुकीचें विधान फिरून सुधारीत ती सांगू लागली —"हं! म्हणजे...... चहाच्या त्या उकळलेल्या पाण्यानं माझ्या हातावर आपल्या प्रतापाची चुणुक गाजविली!... जीवन!... जीवन!!...पण तूं आतां 'सरसाहेबाकडं' केव्हां रे येणार?"

"कले! क्षणभर इथं बैस पाहूं!!" जीवनानें तिचा हात धरला व तिला आपल्या शेजारीं 'कॉट्वर' बसवून घेतलें. नंतर आपल्या हातानें तिच्या कमरेभोंवतीं विळखा घालून, मोठ्या आर्जवी स्वरांत त्यानें तिला विचारिलें—"ए प्रियक! खरं... अगदीं खरं सांग! गेल्या सबंध महिनाभर तूं कुठं होतीस?"

मधुनमधुन 'सर साहेबासंबंधीं' कांहींतरी अस्फुट, पुटपुटत इकडचीं तिकडचीं कसलीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन, आली वेळ कशीबशी निभावून नेण्याचा कलेनें एक दोन मिनिटें कसाबसा प्रयत्न केला; पण त्यांत ती जास्त जास्तच घसरूं लागून, सरते शेवटीं तिला आपलें मस्तक अवनत करावें लागलें. हरिणीप्रमाणें बावरलेल्या तिच्या मोहक डोळयांतून अश्रुबिंदूंची अखंड झिरपणी सुरूं झाली आणि तोंडावाटे फिरून फिरून बाहेर पडणाऱ्या हुंदक्यांमधून खऱ्या हकीकतीच्या गौप्य-गोपनाची, अंतीं परिस्फुटता होण्यास मग फारसा वेळ लागला नाहीं.

"जीवन! शिकवण्या मिळविण्याकरितां चार दिवस मी खूप धडपड केली पण कुठंच कांहीं थांग लागला नाहीं! आतां तुलाहि माझ्याप्रमाणं चित्रकलेचं शिक्षण सोडावं लागणार, ही कल्पना मनाला डांचूं लागून, मला अगदीं सुचेनासं झालं! मग मी कसलाच विचार न करतां, चौपाटी समोरच असलेल्या त्या 'इन्टरनॅशनल लॉड्रीमध्यें' केवळ आपखुषीनं, 'फ्रॉकस्, ब्लाऊजेस्, जंपर्स, जॉर्जेटचीं मौल्यवान पातळं'—वगैरे स्त्रियांचे कपडे इस्त्री करण्याची मिळाली ती नोकरी पत्करली!...... बरं पण जीवन,

तुझी फसगत करण्याकरितां मी रचलेली ' धुनेश्वर व त्यांची कन्या धूता '–ही कपोलकल्पना तर नामी नि डोक्याची होती ना ?...? आज तिसऱ्या प्रहरींसुद्धां ' लाँड्रीमधील ' एका मुलीच्या हातून, तापून लाल झालेल्या इस्त्रीमधील विस्तवाचीं दोन चार रसरशीत इंगळं, जेव्हां चुकून माझ्या हातावर पडलीं, तेव्हां घरीं येतांना सबंध रस्ताभर चहाची ती बनावट गोष्ट मी आपल्या मनांत रचीत होतें ! ... जीवन, पण तूं माझ्यावर रागावला नाहींस ना ? खरंच सांग ! नाहीं ना रागावलास ? ... ? ... हें बघ, मला जर हें काम मिळालं नसतं तर, कोल्हापूरकडील त्या बड्या इनामदाराकडं तुला आपलीं चित्रं कशीं बरं खपवितां आलीं असतीं ?...? "

" बडा इ·ना·म·दा·र ?...? तो बडा इनामदार कोल्हापूरकडील होताच कुठं मुळीं ? "–अत्यंत हलक्या आवाजांत जीवन पुटपुटला.

" हं ! असं का ? " थोडेसं आश्चर्य दर्शवीत कला उद्गारली— " बऽऽरं कुठलाहि का असेना ! त्यांत काय विशेषसं महत्व आहे म्हणा !...बाकी जीवन, तूं इतका हुशार असून, तुला मी धूताला गायनाचे पाठ देत नसावें, अशाप्रकारची बारीकशीसुद्धां शंका इतके दिवस येऊं नये, हें एक आश्चर्यच आहे बाई ! "

" कांहींहि म्हण ! आज संध्याकाळपर्यंत तर बुवा, आपणांला कसलीच शंका आली नाहीं ! " जीवनानें उत्तर दिलें व मग तो म्हणाला—

—" आणि ह्यानंतरहि ती आली असती का नसती ह्या बद्दल वानवाच आहे ! परंतु आज साडे चार पांचच्या सुमाराला पेटलेल्या इस्त्रीनें हात भाजलेल्या एका मुलीकरितां, मी ' लिननचं ' कापड, भाजल्याचं थोडसं तेल, कापूस आणि बँडेजच्या कांहीं पट्ट्या आणून,त्या वर पाठवून दिल्या ! आज तब्बल एक महिना होऊन गेला, कले, मीहि पण तुझ्या त्याच ' इन्टर नॅशनल लाँड्रीमध्यें ' भट्टीच्या ' इंजिनांत ' कोळसा घालण्याचं बडं हवसाणी काम करीत असतो ! "

"......आणि जीवन, मग तूं तीं.........चित्रं...... !!"

" माझी चित्रं खरेदी करणारा कोल्हापूरकडील तो महाभाग ......आणि तुझे ते सर एल्. वाय्. धुनेश्वर—हे दोघेहि कले, एकाच कलेचे आवडते मानसपुत्र आहेत...... आणि ...... असं असूनहि तुला त्यांना ' चित्रक ' अथवा ' गायक ' ह्यांपैकीं कोणत्याहि नांवानं यथार्थपणें संबोधितां येणार नाहीं !......... आं ! हा: हा: हा: !"—असें म्हणून जीवन एकदम मोठ्यानें खो खो हसूं लागला.

कलेलाहि त्याचा उपसर्ग पोहोंचून तिलाहि अनिवार हसूं लोटलें व तीहि मग खदखदां हसूं लागली.

मनसोक्त हसतांना अन्तःकरणापासून फुटणाऱ्या त्यांच्या हास्यरसाच्या उकळ्याचा पहिला उद्रेक, कांहीं वेळानें थोडासा ओसरल्यावर जीवन म्हणाला—

"कलेच्या प्रेमपाशांत सांपडून, मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला......!"

" अं हः ! तसं नव्हे !" आपला हात जीवनाच्या तोंडावर ठेवून त्याला मध्यंतरीच थांबवीत कला उद्गारली—" कलेच्या प्रेमपाशांत सांपडून मनुष्य एकदां तिचा एकनिष्ठ दास बनला असं म्हणण्यापेक्षां, प्रेमाच्या कलापाशांत सांपडून मनुष्य एकदां त्यांचा एकनिष्ठ दास बनला, म्हणजे त्याला प्रसन्न करून घेण्याकरितां त्याला पत्करावी लागणारी कसल्याहि प्रकारची गुलामगिरी त्यास मुळींच कष्टतर वाटत नाहीं, असंच म्हणणं अधिक योग्य होय !......नाहीं का? जीवन असंच नाहीं का...?......?

" हो ऽ ऽ य ! असंच !! अगदीं अ–सं–च......!" एक प्रदीर्घ होकार देत, जीवनानें मान हालवून आपली संमति दर्शविली. नंतर आतुरलेल्या आपल्या करपाशांची प्रेमळ मिठी कलेच्या

वक्षःस्थलाभोंवती घालून त्यानें तिला एकदम आपल्या हृदयाशीं घट्ट आंवळून धरलें आणि त्या गाढ आलिंगनाच्या चिरंतन सौख्यांत निमग्न असतांनाच, आपले बुभुक्षित ओठ तिच्या आरक्त अधर-बिंबाजवळ नेऊन, एखाद्या प्रेमवेड्या आधाशाप्रमाणें त्यानें तिचीं एक–दोन–तीन–अशीं पटापट दोन चार चुंबनें घेतलीं.

| | | |
|---|---|---|
| प्रकाशनस्थलः—<br>'अप्रकाशित' | O. Henry च्या<br>'A Service of Love'<br>ह्या गोष्टीवरून | लेखनकालः—<br>जुलई १९३८ |

# माझें आजपर्यंतचें प्रकाशन

| | | किंमत |
|---|---|---|
| १ | पुनर्भेट भाग २ रा | १–०–० |
| २ | वळवांचे पाऊस | १–४–० |
| ३ | दुर्दैवी मोहरे | १–०–० |
| ४ | पैसाच पैसा | १–०–० |
| ५ | फुलबाग | १–०–० |
| ६ | जीवनपथ | १–०–० |
| ७ | आवडत्या गोष्टी | ३–०–० |
| ८ | चित्तरंजन | १–४–० |
| ९ | वायफळांचा मळा | २–८–० |
| १० | सोनेरी नागीण | १–०–० |
| ११ | वाहते वारे | ०-१२-० |
| १२ | रशियांतील राज्यक्रांति | २–८–० |
| १३ | बाबू कुँवरसिंह | ०-१२-० |
| १४ | प्रो. शहाणे | ०-१२-० |
| १५ | गुलाबाच्या पाकळया | १–४–० |
| १६ | पुनर्भेट भाग ३ रा | १–४–० |
| १७ | गारांचा वर्षाव | १–४–० |
| १८ | रेशमी चिमटे | १–४–० |
| १९ | उपहासिनी | १–८–० |
| २० | शि. म. परांजपे चरित्र व आठवणी | १–०–० |
| २१ | आईची कृपा | १–०–० |
| २२ | व्यक्ति आणि वाङ्मय | १-४-० |
| २३ | साहित्य-संग्रह | ३–०–० |
| २४ | ललिता | १–८–० |
| २५ | तंट्या भिल्ल | ०-१२-० |
| २६ | परशुराम चरित्र | १–४–० |
| २७ | हिंदुस्थानची नवी राज्यघटना | १–०–० |
| २८ | हायस्कूल विद्यार्थी | ०–८–० |
| २९ | उत्तरध्रुव | ०–४–० |
| ३० | सोशॅलिझम | १–०–० |
| ३१ | चुटके चमत्कार | ०-१२-० |
| ३२ | अलका | २–४–० |
| ३३ | सावल्या | १–८–० |
| ३४ | तिचें अखेरचें पत्र | १–०–० |
| ३५ | चांदणें | १–०–० |
| ३६ | बलिदान | २–०–० |
| ३७ | होमकुंड | २–०–० |
| ३८ | पुनर्भेट भाग १ ला | १–४–० |
| ३९ | खेड्यांतील स्व. चित्रें | १–४–० |
| ४० | नरम गरम | १–८–० |
| ४१ | उर्मिला | २–०–० |

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ऑर्डरीप्रमाणें पाठविलीं जातात.

प्रकाशकः— य. गो. जोशी, ६२३।१५ सदाशिव, पुणें २.

# माझें प्रकाशन

| | | | |
|---|---|---|---|
| १ | तिरंगी नवमतवाद | (श्री. न. चिं. केळकर) | ०—१०—० |
| २ | विस्तवाशीं खेळ | (श्री. वा. म. जोशी) | १—०—० |
| ३ | फ्रेंच राज्यक्रान्ति | (श्री. न. चिं. केळकर) | २—०—० |
| ४ | हास्यविनोद मीमांसा | (न. चिं. केळकर) | ४—०—० |
| ५ | राका | (सौ. संजीवनी मराठे) | १—०—० |
| ६ | सहारा | (श्री. श्री. गो. देशपांडे) | १—०—० |

**आमचीं नवीं प्रकाशनें:—**

एकलें बीज (पद्यसंग्रह) श्री. शांताराम आठवले.
(नोटेशनसकट) येत्या दिवाळीस प्रसिद्ध होईल.

**पडसाद** (स्वतंत्र सामाजिक कादंबरी) लेखक श्री. य. गो. जोशी प्रभात फिल्म कंपनीच्या आगामी "**माझा मुलगा**" या बोलपटाचे कथानक या कादंबरीवरून घेतलें आहे. लौकरच प्रसिध्द होईल.

**मनोहर ग्रंथमाला,**
६२३।१५ सदाशिव पेठ, पुणें २.

ज. स. लि. पुणें २.